म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १६५
११२१८
REFBK-0003049

# शांततेचा शाहिर

अर्थात्

## प्रेसिडेंट विल्सन यांचें चरित्र

REFBK-0003049

लेखक

धुंडिराज त्र्यंबक गद्रे वाङ्मयविशारद

संपादक—प्रतियोगी, ठाणें

किंमत १॥ रुपया.

# जिज्ञासाकथन.

१९२३-२४ सालीं टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पदवी परीक्षा पास झाल्यानंतर केसरी–मराठा संस्थेनें काढलेल्या संपादकीय शिक्षण संस्थेंत School of Journalism एक वर्षभर शिष्यवृत्तिवर होतों. संपादकीय शिक्षण कितीहि विविध आणि व्यापक स्वरूपाचें असलें तरी त्यांत प्राधान्येंकरून लेखनकलेचाच अंतर्भाव होतो. अर्थात् या दृष्टीनें आपण शिकलों किती याचा आढावा वर्षअखेरीस काढणें अत्यंत जरूर होतें. आणि प्रस्तुत दीडशें पानांचें चोपडें म्हणजे एक प्रकारचा तद्विषयक शिक्षणाचा आढावा अगर परीक्षापत्रक आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. परीक्षाच म्हटली कीं विद्यार्थी शिकला किती या बरोबरच शिक्षकानेंहि शिकविलें किती याचीहि थोडीशी चांचणी झाल्यास अस्वाभाविक नाहीं. परंतु नापास ठरलेल्या विद्यार्थ्यास शिक्षकाप्रमाणें ‘ वितरति गुरुः प्राज्ञे विद्या यथैव तथा जडे ’ या भवभूति मंत्राचा आधार घ्यावयास सांपडत नाहीं ! म्हणून प्रस्तुत कृतीचें एका अर्थानें कांहीं श्रेय जरी संपादकीय शिक्षण संस्थेकडे जात असलें, तरी तींत असलेल्या दोषांचा भाग मात्र सर्वथा लेखकाच्या मालकीचाच असावयाचा. संपादकीय शिक्षणाचें वर्ष एप्रिल १९२४ अखेर संपावयाचें होतें. त्यापूर्वी फेब्रुवारीच्या तीन तारखेस अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन हे ख्रिस्तवासी झाले. त्यापूर्वी ‘ रशियांतील राज्यक्रांतीचा विश्वकर्मा लेनिन ’ यांच्या मृत्यूनंतर लेखकानें लिहिलेला एक छोटा लेख केसरींत प्रसिद्ध झाला होताच. तसाच एकादा विल्सन यांचेवरहि लिहावा अशी इच्छा झाली व पुढें तोच विचार लेनिन अगर विल्सन या दोहोंपैकीं कोणाचें तरी चरित्र विस्तृत निबंधरूपानें लिहावें इतका वाढला. लेनिनच्या चरित्राचा विषय यापूर्वी एकदोघां जणांनीं हाताळलेला असल्यामुळें विल्सन यांसच लेखन-विषय करण्याचें निश्चित केलें. त्याप्रमाणें सप्टेंबर अखेर एक लिखाण तयारहि झालें व आतां तें छापून प्रसिद्ध होत आहे.

युरोपांतील महायुद्ध चालू असतां प्रस्तुत लेखक हा दिवाळीचे सणांत मातीचा किल्ला करून त्यास ‘ लीज ’ ‘ नामूर ’ इत्यादि नांवें देणारा शाळा-विद्यार्थी होता. त्यावेळीं नैसर्गिक ओढा केसर बादशहा, हिंडेनबुर्ग, लुडेनडॉर्फ यांचेकडे असे आणि पुढें जेव्हां प्रे. विल्सन जर्मनीविरुद्ध युद्धांत प्रविष्ट झाले, तेव्हां ‘ ही कोण ब्याद् ’ असेंहि प्रस्तुत लेखकास वाटलें असल्याचें स्मरतें. परंतु त्यानंतर लो. टिळकांची डेप्युटेशनची चळवळ, स्वयंनिर्णयाचा पुकारा, हिंदुस्थानास मिळालेला सुधारणारूपी स्वराज्याचा हप्ता, इत्यादि गोष्टी घडून आल्यामुळें विल्सन यांजविषयींहि आदराची भावना उत्पन्न झाली आणि राजकारणांतील भानगडींचा विचार कळण्याची पात्रता आल्यावर तर विल्सन त्यावेळीं दोस्तांच्या बाजूनें युद्धांत न

पडते तर हिंदुस्थानांत कोणती ' इस्लामी मुस्लीमी ' गाजली असती याची पुरेपूर साक्ष पटून तो आदर वाढूं लागला आणि त्याचेंच निदर्शक म्हणून हें अल्प चरित्र लिहिलें गेलें.

अर्थातच, हें चरित्र सामान्य लेखनशास्त्राच्या कसोटीस कितपत टिकेल याचा संशयच असून चरित्रलेखनांत शक्य असलेले सर्व दोषहि यांत आढळतील यांत शंका नाहीं. एका अलंकारशास्त्रकर्त्याची गोष्ट अशी सांगतात कीं, एका कवीनें आपलें महाकाव्य त्यास दाखविलें असतां तो म्हणाला, ' माझें अलंकार-शास्त्र तयार होण्यापूर्वी जर आपलें महाकाव्य माझ्या नजरेखालीं आलें असतें तर दोषस्थलांचीं उदाहरणें शोधशोधून देण्याचा अगर स्वतः तयार करण्याचा तरी माझा खटाटोप वांचला असता ! तेवढा उपयोग जरी या निबंधाचा पुढें कोणी चरित्रलेखनशास्त्र लिहावयास उद्युक्त झालेल्यास होणार असला तरी पुष्कळ ! चरित्र कसें असावें, चरित्रनायक कोणत्या प्रकारचा असावा, त्याचें दोष वर्णन करावे अगर नाहीं, इत्यादि प्रश्नांचा आजपर्यंत पुष्कळांनीं विचार केला, परंतु त्यांच्यांत फार मतभेद आहेत. कार्लाइलच्या म्हणण्याप्रमाणें तर विश्वसनीय चरित्र असें कोणाचेंच लिहिलें गेलें नाहीं व जाणें अशक्यच आहे ( There is no life of a man faithfully recorded. ) मेकॉले साहेब आपल्या विल्यम पिटच्या चरित्रावरील परीक्षणलेखांत म्हणतात, ' चरित्रकार , भाषांतरकार, संग्राहक इत्यादि दुसऱ्या व्यक्तींच्या चरित्रासंबंधानें अगर लेखासंबंधानें लिहावयास निघालेले जे जे कोणी असतील त्या सर्वांस अंधस्तुतीचा रोगच ( disease of admiration ) जडलेला असतो. त्यांचा चरित्रनायक म्हणजे सर्व उत्तमोत्तम गुणांचा पुतळाच असें चित्र ते चितारतात. ' परंतु हा नियम जर व्यतिरेकानें सुद्धां अबाधित असेल तर मेकॉले साहेब त्यांत सांपडतात, आणि केवळ दोषैक-दृष्टि मनुष्यापेक्षां गुणैकदृष्टि मनुष्य त्याज्य नव्हे खास.

महाराष्ट्राचे लोकप्रिय चरित्रकार श्री० न० चिं० केळकर हे ' लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका ' या पुस्तकास जोडलेल्या आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात. " इतिहास काय अगर चरित्र काय तें कोणाचेंहि कोणीहि लिहिण्याचे व छापण्याचे श्रम घेतले एवढ्याच कारणानें देखील वाचक तें सहज एक वेळ तरी वाचतो. ग्रंथसंग्रहालयांतून झडतीच घेतली तर केवळ ग्रंथाचें स्वरूप मिळाल्यामुळेंच ज्याचें चरित्र एक वेळ वाचनीय झालें, अशा चरित्रविषयांचीं उदाहरणें अनेक सांपडतील ! " प्रस्तुत पुस्तकास निदान चरित्रविषयापुरतें तरी हें म्हणणें लागू होत नाहीं. चरित्रलेखकाच्या दृष्टींतील मेकॉले साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें असल्यास तो दोष वजा घालून सुद्धां विल्सन यांचें चरित्र " केवळ ग्रंथस्वरूप पावलें म्हणूनच वाचनीय झालें " अशा सदरांत मोडणारें नाहीं खास ! फार तर लेखकानें इतक्या मोठ्या चरित्रविषयावर लिहिलें म्हणूनच त्याचें लिखाण वाचलें तर कोणी वाचील, इतक्यापुरता सत्यांश आढळला तर आढळेल. विल्सन

सारख्या जगविख्यात चरित्राविषयावर लिहिण्यास प्रस्तुत लेखकानें तयार होणें म्हणजे एकाद्या वामन बटूनें उंच वेलीवरील द्राक्षें हात व पाय उंच करकरून तोडण्याचा प्रयत्न करणें अशा प्रकारचें झालें तरी शेवटीं इच्छित द्राक्षप्राप्ति न झाल्यामुळें स्वतःच्या ठेंगूपणाकडे दोष न घेतां त्या द्राक्षांसच आंबट म्हणण्याची जंबूक–वृत्ति अवलंबिण्याचें प्रस्तुत लेखकास कांहींच कारण दिसत नाहीं. कारण, परीक्षेच्या पेपरांत आलेल्या कितीहि मोठ्या विषयावर लिहितांना आपलें ज्ञान किती तुटपुंजें आणि आपण यावर लिहावें तें काय असा विचार परीक्षितानें करणें इष्टच नसतें. शिवाय लेखकाची ही प्रस्तुत कृति पहिलीच असल्यानें तींतील दोष जरी अक्षम्य असले व वेळीं ती जरी मूर्तिमंत ‘ दोष–कोश ’ [illegible] स्वरूपाची ठरली तरी कोणाचीहि टीकादृष्टि तितकी कांटेकोर न राहतां टीका-स्त्राची धार उत्तेजनपर सहानुभूतीच्या क्षारानें थोडी बोथटलेलीहि असेल असा भरंवसा वाटल्यावरूनच प्रस्तुतच्या नदीमुखानें सारस्वतसमुद्रांत प्रवेश करण्याच्या प्रयत्नाच्या धाडसास तो प्रवृत्त झाला.

या धाडसाचे अव्वलपासून अखेरीपर्यंत ज्या ज्या कोणाची अल्पस्वल्पहि मदत लेखकास झाली त्यांचा लेखक फार आभारी आहे. गुरुवर्य तात्यासाहेब करंदीकर यांनीं आपल्या नित्याच्या सोशिक स्वभावास अनुसरून लेखकानें वाचून दाखविलेली हस्तलिखित प्रत सर्व ऐकून तींत ठिकठिकाणीं सूचना केल्या आणि या सर्वांवर कळस आपल्या प्रस्तावनेनें चढविला याबद्दल त्यांचेविषयीं लेखकास वाटत असलेल्या भावनेला कोणतें नांव द्यावें व ती व्यक्त कशी करावी हेंच कळेनासें झालें आहे. त्याचप्रमाणें परमस्नेही श्री० वामन त्र्यंबक आपटे, बी. ए. एलएल. बी. यांच्या मदतीची कल्पना समईंतील वात व तेल यांच्या दृष्टांतावरून येण्यासारखी आहे. परंतु ज्वलनक्रियेला मदत केल्याबद्दल वातीनें तेलाचे अगर ज्योतीनें ( आक्सिजन ) वायूचे आभार कसे व कां म्हणून मानावे ? प्रस्तुत निबंध १९२४ च्या सप्टेंबर अखेर लिहून तयार झाला व त्यावेळीं त्याला लाभलें असें वाटलेलें आशायुक्त वातावरण जर निसर्ग-नियमानुसार व्हावयाचें, त्याप्रमाणें चंचल व क्षणिक ठरलें नसतें तर प्रे० विल्सन यांच्या प्रथमवार्षिक श्राद्धदिन ता० ३ फेब्रुवारी १९२५ या दिवशीं तो छापून प्रसिद्ध झाला असताहि. परंतु मुद्रणालयांच्या कोंदट हवेंतील अज्ञातवास दोन वर्षें भोगीत राहण्याचें त्याच्या नशीबीं होतें त्यास कोण काय करणार ? आणि लोकसंग्रह छापखान्याचे उत्साही चालक व मालक हे जर पुढें न सरसावते तर कदाचित् हा अज्ञातवास अनंत कालाचाच ठरला असता. याबद्दल श्री० शंकरराव दाते यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार ! पुस्तकाची छपाई व रचाई वाचकांसमोर आहेच. पंक्तींत जेवणारांच्या पात्रांत वाढीत असतांच जिन्नस असा आहे न तसा आहे अशी वाढप्यानें आचाऱ्याची प्रशंसा करण्याचें काय प्रयोजन ?

असो, शेवटीं वाचकांस एक नम्रतापूर्वक सूचना करावयाची ती एवढीच कीं, यांतील मजकूर लिहून झाल्यानंतर गेल्या दोन वर्षांत उपलब्ध होत गेलेल्या हरएक नवीन माहितीचा अंतर्भाव करणें अत्यंत आवश्यक असतांहि अनेक कारणांमुळें सुशक्य झालें नाहीं. यामुळें विवेचनांत अपूर्णता भासली तरी फारशी विसंगतता अगर प्रमादशीलता आढळणार नाहीं असा भरंवसा वाटतो. त्यांतून न्यूनाधिक्य असल्यास ‘ परीक्षिताचें परीक्षापत्रक ’ या दृष्टीनें स्नेहार्द्रतेनें पहावें अशी विनंति आहे. निबंधाचें नांव ‘ शांततेचा शाहीर ’ असें ठेविलें आहे. याबद्दल खुलासा इतकाच कीं, शाहीराचें काम फक्त ती ती गोष्ट खड्या सुरांत ललकारून तो तो अविर्भाव रणमर्दांच्या अंगीं उत्पन्न करावयाचा एवढेंच असतें. तो कृतिरूपानें सुसंस्थापित करणें ही जबाबदारी त्याजवर राहात नाहीं. या दृष्टीनें विश्वशांतताप्रस्थापनेचा प्रयत्न फसला असला तरी विल्सन यांनीं शाहीराचें काम बजावलें हें महत्त्व कमी होत नाहीं. ‘ शांततेच्या शाहीराच्या ’ चारित्राचें यथामति केलेलें कथन मराठी वाचकवर्गाच्या चरणीं सादर समर्पण केलें आहे.

कल्याण.<br>
ता० ६-११-२६.

धुंडिराज त्र्यंबक गद्रे.

---

## ग्रंथपरिचय.

महापुरुष हे जगाला कोणता तरी एकादा संदेश सांगण्याकरितांच जन्मास येतात. ज्यांच्या तोंडून जगाला कोणतेंही नवें तत्त्व सांगितलें गेलें नाहीं असले पुरुष जन्मले केव्हां व कालवश झाले केव्हां याची जग पर्वा करीत नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे माजी अध्यक्ष वुड्रो विल्सन हे निःसंशय महापुरुषाच्या कोटींतले होते. महायुद्धाच्या कार्यकारणसंबंधांचें मंथन करून त्यांनीं भावि राजकारणी पुरुषांच्या मार्गदर्शकत्वासाठीं चतुर्दश रत्नें काढलीं. त्यांतलीं सर्वच रत्नें बहुमोल व चिरकाल टिकणारीं आहेत असें नाहीं. पण देवदानवांनीं समुद्र मंथन करून काढलेल्या रत्नांत देखील जर सुरा, रंभा, शंख व हालाहल असलीं रत्नें होतीं, तर प्रे. विल्सन यांच्या चवदा तत्त्वांनाच कांहीं नांवें ठेवावयास नकोत. जर्मनांना आणि विशेषतः जर्मनीच्या दोस्तांना मोह पाडणारीं त्यांतहि रंभासुरादि सदृश तत्त्वें असतील. परंतु समुद्रमंथनानें अमृतप्राप्ति झाल्यानें देवांना ज्याप्रमाणें श्रमपरिहार झाल्यासारखें वाटलें, त्याचप्रमाणें प्रे. विल्सन यांच्या तोंडून स्वयंनिर्णय आणि राष्ट्रसंघ या दोन नव्या कल्पना प्रसृत झाल्यानें महायुद्धानें त्रस्त झालेल्या राष्ट्रांना आपला क्लेश परिहार होणार असें वाटून आनंद झाला.

प्रे. विल्सन यांचें नांव इतिहासांत चिरकाल राहण्याला त्यांची एवढी कामगिरी देखील पुरे आहे. विल्सन यांनीं पुरस्कार केलेल्या दोन तत्त्वांपैकीं राष्ट्रसंघाची कल्पना कांहीं अगदींच अश्रुतपूर्व नव्हती. हेग येथील शांतता परिषदेच्या रूपानें तिचें बीजारोपण झालें होतें आणि महायुद्धाच्या दुर्धर आपत्तीची आंच लागली नसती तरी तिची उत्क्रान्ति कालानुरोधानेंच झाली असती. परंतु महायुद्धाच्या भट्टींतील तावानें तिला तात्काल परिणत स्वरूप प्राप्त झालें एवढें खरें. प्रे. विल्सन यांची स्वयंनिर्णयाच्या हक्काची मांडणी मात्र अगदींच नवी व विचारक्रांतिकारक अशी होती. जित राष्ट्रांना स्वातंत्र्य संपादनाची चळवळ करण्याला त्यापूर्वी सर्वमान्य झालेला सनदशीर असा मार्गच नव्हता. हिंदुस्थानांतली स्वराज्यप्राप्तीची चळवळ ‘ सनदशीर ’ असली पाहिजे, असा जेव्हां जेव्हां मवाळांचा आग्रह दिसून येई, त्या त्या वेळीं लोकमान्य म्हणत कीं, जेथें अधिकारदानाविषयीं अभिवचन किंवा आश्वासन देखील नाहीं तेथें कोठल्या ‘ सनदे ’ वर विसंबून आपण सनदशीर चळवळ करणार ? आपण चळवळ करावी आणि सरकारनें ती ‘ बेकायदेशीर ’ ठरवून ठार करावी असाच हा झगडा चालणार. पुढें १९१७ सालीं सरकारनें आपण होऊन स्वराज्यदानाचें उदक सोडून स्वराज्याच्या चळवळीला सनदशीरपणा लाभूं दिला ही गोष्ट वेगळी. पण प्रे. विल्सन यांच्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाच्या उच्चाराच्या पूर्वीं परतंत्र राष्ट्रांना सनदशीर चळवळीला

आधार अत्यल्प होता हें कांहीं मिथ्या नव्हे ! त्याचप्रमाणें प्रे. विल्सन यांच्या अपेक्षेप्रमाणें परतंत्र राष्ट्रांना या तत्त्वाचा फायदा घेऊं दिला गेला नाहीं हेंहि अगदीं निर्विवाद आहे. तथापि परकीयांच्या जुलमाखालीं चिरडल्या जाणाऱ्या राष्ट्रांना ओरड करण्याला देखील पूर्वीं तोंड नसें, ती मुस्कटदाबीची स्थिति दूर होऊन गुलामगिरींत खितपत पडलेल्यांना वाचा फुटली आणि ती कोणाच्या कर्तबगारीनें असा प्रश्न केल्यास प्रे. विल्सन यांच्याच कर्तबगारीनें असेंच त्याचें उत्तर कोणीहि देईल.

मध्यम वयाच्या विद्यार्थ्यांच्या हातीं जे ग्रंथ द्यावयाचे ते होतां होईल तों आपल्या देशांतीलच थोर पुरुषांचे चरित्रग्रंथ असावे हें स्वाभाविक आहे. तथापि कित्येक महापुरुष अशा कोटींतले असतात कीं त्यांना जात, गोत, देश, काल इत्यादि निर्बंध लागूच होत नाहींत. प्रे. विल्सन यांची गणनाही अशाच देश-कालातीत कोटींत होत असल्यानें त्यांचें चरित्र कोणत्याहि देशांतील विद्यार्थ्यांनीं व राजकारणी पुरुषांनीं आत्मीयभावनेनें वाचावें. त्यांच्या सार्वजनिक आयुष्यांतला अर्धा भाग अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन या पवित्र कार्यांत गेला आणि त्यांनीं त्यावेळीं प्रकाशित केलेले ग्रंथ सर्वच राष्ट्रांतून आदर्शभूत असे मानले जातात. त्यांच्या आयुष्याचा उत्तरार्ध इतका यशस्वी न होतां अखेरीस तर त्यांना निराशेच्या—सागरांत गटंगळ्या खाव्या लागल्या; तरी पण ज्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं यावज्जीव प्रयत्न चालाविले होते तें ध्येयच असें भव्य व उदात्त होतें कीं त्या ध्येयाच्या पायीं आत्मबलिदान करणाऱ्यांविषयीं जनता सदैव कृतज्ञच राहील.

शिक्षणाच्या पवित्रक्षेत्रांत सत्ताधाऱ्यांनीं आपली सत्ता गाजविण्याची हांव बाळगूं नये असें प्रे. विल्सन यांस जसें अंत:करणपूर्वक वाटत असे, तसेंच लक्ष्मीपुत्रांनींहि आपल्या संपत्तीच्या जोरावर त्यांत धांगडधिंगा घालूं नये असाच त्यांचा मनोदय होता व तो खरा करण्यासाठीं त्यांनीं आपल्या पवित्र व आवडत्या व्यवसायावरहि पाणी सोडलें. राजकारणांतहि संपत्तीच्या जोरावर अशीच दडपशाही करण्यास सवकलेल्या जड बुडाच्या प्रस्थांचें बंड त्यांनीं मोडून टाकिलें. जर्मन महायुद्धाच्या वेळींहि अशाच उदात्त हेतूनें त्यांनीं तलवार उपसली; परंतु देशांतल्या देशांत दडपेगिरीला आळा घालण्यांत त्यांना लाभलेलें यश या आंतरराष्ट्रीय भानगडींत त्यांच्या हातीं लागणें शक्य नव्हतें. तथापि असत्याला देखील सत्याचें स्वरूप धारण करावें लागतें हाच जसा सत्याच्या श्रेष्ठत्वाचा पुरावा त्याप्रमाणेंच युरोपिअन राष्ट्रांतील कुटिल मुत्सद्द्यांनाहि महायुद्ध चालू असेपर्यंत निष्काम कर्मयोगाचें व स्वार्थनिरपेक्षतेचें सोंग स्वीकारावें लागलें यांतच प्रे. विल्सन यांच्या उच्च ध्येयाचा विजय आहे.

सांप्रतकालीं विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमाची दिशा व पद्धति कशी असावी या विषयीं वादविवादाचीं रणें माजून राहिलीं आहेत. अशा वेळीं प्रे. विल्सन यांच्या विचारसरणींतून बाहेर पडलेलीं शैक्षणिक तत्त्वें आपणांस आदर्शभूत

होतील. प्रे. विल्सन लिहितात " शिक्षणसंस्थांचें ध्येय विद्यार्थ्यांना आत्मपोषणास उपयुक्त अशा एकाद्या धंद्यांत प्रवीण करणें हें नसून, उत्तम नागरिकांचीं कर्तव्यें पार पाडण्यास त्यांस समर्थ करणें हें आहे. त्यांचीं मनें मोठीं झालीं पाहिजेत, त्यांचे विचार उदात्त झाले पाहिजेत, आणि त्यांना शिस्त लागली पाहिजे; तरच शिक्षणसंस्थांनीं आपलें कर्तव्य केलें असें होईल. शिक्षणक्रमांत पूर्वजांचा सर्वांगीण इतिहास व अभिजात वाङ्मय याबरोबरच गणिताचाहि अंतर्भाव झाला पाहिजे. जगांत निश्चयानें आणि विवेकपूर्वक वागण्याची विद्यार्थ्यांच्या मनाला खबीरी यावी यासाठीं गणिताची कसरत अवश्य आहे. "

या उद्गारावरून स्वतः प्रे. विल्सन हे विद्यार्जनाच्या तात्कालिक फायद्यापेक्षां चिरकाल टिकणाऱ्या गुणांकडे अधिक लक्ष देत हें उघड सिद्ध होतें. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांच्या अंगीं विशिष्ट गुणांचें पोषण होण्यास विशिष्ट विषय उपयुक्त ठरतात हें तत्त्वही त्यांना मान्य होतें व त्याचा उपयोग ते आपल्या शिक्षणक्रमांत करीत असत; यावरून विद्यार्थ्यांच्या अंगीं राष्ट्रीय सद्गुण बाणण्यास तदनुकूल शिक्षण उपयोगी पडतें हें आपोआपच सिद्ध होतें.

असो. प्रे. विल्सन यांची शिक्षण–विषयक कामगिरी कितीहि श्रेष्ठ दर्जाची असली तरी आजमित्तीला ज्ञात जगाला त्यांचें जें नांव आदरणीय वाटतें त्याला कारण त्यांची महायुद्धकालीन कर्तबगारीच होय. व्हर्सेलीसच्या तहनाम्याचें भरतवाक्य जरी त्यांच्या मनासारखें कोणीच म्हटलें नाहीं, तरी अत्यंत स्वार्थलोलुप अशा राष्ट्रांना सुद्धां परकीय मुलूख स्वतःच्या ताब्यांत ठेवतांना ' मॅन्डेट-थिअरी ' चें लोढणें आपल्या गळ्यांत कायमचेंच अडकवून घ्यावें लागलें. त्याचप्रमाणें राष्ट्रसंघाचा सासूबाईचा अधिकार प्रत्येक राष्ट्रास निमूटपणें मान्य करावा लागत आहे.

अशा दृष्टीनें प्रे. विल्सन यांचें चरित्र सामान्य वाचकांस व राजकारणी पुरुषांस उद्बोधक आहे. व्हर्सेलीसच्या तहनाम्यांत त्यांचा वर्चष्मा कायम राहिला असता तर त्यांच्या तोडीचा यशस्वी मुत्सद्दी क्वचितच आढळला असता. तसा योगायोग जुळून आला नसला तरी प्रे. विल्सन यांचें चरित्र उदात्त भावनेच्या आणि तत्सिद्ध्यर्थ केलेल्या खटाटोपाच्या दाखल्यासाठीं म्हणून चिरकाल संस्मरणीय असेंच राहील. अशा चरित्राचा मराठी वाचकांस परिचय करून देण्याचें कार्य श्रीयुत धुं. त्र्यं. गद्रे यांनीं मोठ्या हौसेनें व कुशलतेनें केलें आहे. यावरूनच प्रे. विल्सन यांचें चरित्र वाचकांच्या मनांत सदभिरुचि व दीर्घोद्योग यांचें बीजारोपण करितें याचा प्रत्यय येतो आणि तोच प्रत्यय या पुस्तकाच्या वाचकवृंदांच्या अनुभवानेंहि खरा ठरो.

पुणें.
कार्तिक शु. १, १८४८ }

ज. स. करंदीकर.

# अनुक्रमणिका.

—:०:—


| प्रकरण. | नांव. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ | अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा त्रोटक इतिहास.... | १ |
| २ | जन्मवृत्तांत व अध्ययन. | १५ |
| ३ | प्रोफेसर विल्सन. | २५ |
| ४ | सुभेदार विल्सन. | ३३ |
| ५ | अध्यक्ष विल्सन. | ४४ |
| ६ | महायुद्ध व विल्सन. | ५४ |
| ७ | युद्धाध्यक्ष विल्सन. | ७२ |
| ८ | अस्तंगत विल्सन. | ८२ |
| | मतें. | ८७ |
| ९ | महापंडित विल्सन. | ८९ |
| १० | शांततेचा शाहीर विल्सन.... | ९८ |
| ११ | राष्ट्रसंघ ... | १०७ |


## परिशिष्ट १ लें.


राष्ट्रसंघाचा करारनामा. .... .... .... .... १२५


---

[library stamps]

# विलसन साहेबांचें चरित्र.

## प्रकरण १ लें.

### अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा त्रोटक इतिहास.

'Independence in the end, is the fruit of injustice.'
Voltaire.

इ. स. च्या १५ व्या शतकाच्या शेवटापर्यंत युरोप, आशिया व आफ्रिका या तीन खंडांपुरतीच जगाची व्याप्ति होती. परंतु या तीन खंडापलीकडेही आणखी कांहीं भूमि समुद्रानें वेष्टित अशी असावी अशी कल्पना प्रथम कोलंबसाच्या मनांत प्रादुर्भूत झाली. आणि त्याप्रमाणें हल्लींच्या अफाट अमेरिका खंडाचा शोध त्यानें इ. स. १४९२ या सालीं लाविला. या कामीं त्याला स्पेन सरकारची मदत मिळाल्यामुळें या नव्या भूमीवर अर्थातच स्पेनची सत्ता चालू झाली. आणि नव्या खंडाचा दक्षिणेचा भला थोरला भाग त्यांनीं आक्रमिला. कोणतीही गोष्ट नवीन ज्यानें शोधून काढली त्यासच तिचा उपभोग निरंतर घ्यावयास मिळणें अशक्य असतें. यूरोपमधील इतर दर्यावर्दी आणि धाडसी राष्ट्रांच्याही तोंडास या खंडाकडे पाहून पाणी सुटूं लागलें. स्पेनची सद्दी कमी होतांच ह्या राष्ट्रांनीं या 'नव्या जगांत' (न्यू वर्ल्ड) आपला चंचुप्रवेश करून घेतला. कोणत्याही कामांत जो शेवटीं शेवटीं पडतो, त्याच्या नव्या जोमापुढें, प्रारंभींच त्यांत सामील झालेल्यांचा टिकाव लागत नाहीं. शिवाय मागून आलेल्याला आयतीच तयार केलेली भूमिका मिळालेली असते आणि पूर्वीच्यांनीं खाल्लेल्या ठेंचांच्या शहाणपणाचाही फायदा त्यास मिळूं शकतो. तोच प्रकार इंग्लिशांचा झाला. सर्वांच्या मागून त्यांनीं आपले हातपाय या नव्या खंडांत शिरकावले व ते आयत्या बिळावर पसरण्यास सुरवात केली. सर मार्टिन फ्रोबिशर, हम्फ्रे, गिल्बर्ट इत्यादि धाडसी इंग्लिश पुरुषांनीं वसाहती स्थापन करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. वाल्टर रॅले यानेंहि हल्लींच्या उत्तर अमेरिकेंतील मिसिसिपी नदीच्या पूर्वेकडील प्रांतांत वसाहत बसविण्याचा दोन वेळां प्रयत्न केला; परंतु पहिल्यानें गेलेली मंडळी हाल अपेष्टा भोगून परत तरी आली; पण दुसऱ्या वेळीं गेलेल्या टोळीचा पत्ता सुद्धां लागला नाहीं! रॅलेची एलिझाबेथ राणीवरील भक्ति प्रसिद्धच आहे. या बेगम राणीच्या (व्हर्जिन क्वीन) सन्मानार्थ त्यानें या नव्या वसाहतीच्या टापूला व्हर्जिनिया ऊर्फ बेगमेचा प्रांत

असें नांव दिलें व तेंच नांव पुढें चालत राहून आजमितीसहि मूळ प्रांताच्या कांहीं अवशिष्ट भागाला व्हर्जीनिया हेंच नांव चालू आहे. पुढें जेम्स राजाच्या कारकिर्दींत १६०६ सालीं लंडन–कंपनी व प्लायमौथ–कंपनी, या दोन कंपन्या स्थापन होऊन, त्यांस राजानें सनदा ( चार्टर ) दिल्या व त्यांना वसाहती करण्यास प्रांत तोडून दिले. लंडन कंपनीनें हल्लींच्या व्हर्जीनिया संस्थानांत 'जेम्स टौन' नांवाचें नवीन शहर वसविलें. आणि पुढील बारा वर्षांत व्हर्जीनिया संस्थानाला सुव्यवस्थित स्वरूप आणून दिलें. पुढें इंग्लंडांत प्राटेस्टंट पंथांतील कांहीं विवक्षित मतवाल्यांवर राजाकडून जुलूम होऊं लागला; तेव्हां त्यास कंटाळून २१ डिसेंबर १६२० रोजीं 'मे फ्लावर' बोटींतून सुमारें १०० मंडळींचा तांफा इंग्लंडमधून बाहेर पडला होता, तो मध्यंतरीं हॉलंडमध्यें मुक्काम करून नंतर हल्लीं जेथें मॅसाच्युसेट संस्थान आहे, तेथील टापूंत येऊन उतरला; आणि त्यांनीं अनेक हाल अपेष्टा सोसून आपली वसाहत तयार केली. पुढील मुसलप्रवेशाचा आरंभींचा खरा चंचुप्रवेश हाच होय. यापुढें सारखी नवी नवी भरती इंग्लंडांतून होऊं लागली व मॅसाच्युसेट हें अगदीं पहिलें संस्थान तयार झालें. यापुढें थोडक्याच काळांत या वसाहतवाल्यांच्या लाटा समुद्रकिनाऱ्यावरून पसरत पसरत मिसिसिपीच्या कांठावर जाऊन आदळूं लागल्या.

लंडन–कंपनीनें १६२४ सालीं आपली सनद राजाकडे परत केली. तेव्हां राजानें व्हर्जिनिया वसाहतीचे निरनिराळे तुकडे पाडून ते आपल्या मर्जींतल्या लोकांना देण्यास सुरवात केली. आणि अशा रीतीनें हल्लींची, मेरी लँड, नॉर्थ कॅरोलिना आणि साऊथ कॅरोलिना, जॉर्जिया आणि व्हर्जिनिया असे चार विभाग झाले. प्लायमौथ कंपनीनेंही आपली सनद राजाकडे परत केली, तेव्हां तिनें व्यापिलेल्या प्रांतांचेही राजानें तुकडे पाडून ते बक्षीस अगर विकत देण्याचा उपक्रम सुरू केला. व त्यामुळें 'कनेक्टिकट' 'ऱ्होड आयलंड' 'न्यू हॅंपशायर' आणि 'मेन' असे आणखी चार विभाग झाले. व अशा तऱ्हेनें दोन वसाहतींचे संघ तयार झाले; परंतु या दोन संघांच्या डोळ्यामध्यें एक डच लोकांच्या नाकाची पाचर होती. त्यामुळें हे दोनही संघ सर्व दृष्टीनें एकच असतांही त्यांचा परस्परविनिमय होणें अशक्य झालें होतें. आणि विशिष्ट प्रांताभिमान या दोहोंतही शिरल्यामुळें, हे दक्षिण व उत्तर दिशांकडे फांकलेले संघ रक्तानें व परंपरेनें एक असतांहि त्यांच्यांत एकमेकांविषयीं थोडा दुजाभाव उत्पन्न होऊं लागला आणि तो पुढें पुष्कळ वर्षें 'आपस युद्ध' ( सिव्हिल वॉर १८६० ) झालें तोंपर्यंत चाललाही. परंतु कितीही झालें तरी डच लोकांचा कांटा त्या दोनही संघांस विशेष परका म्हणून बोंचत होता, आणि तो काढून टाकण्याची दोघांसही प्रबल इच्छा होती, आणि डच लोकांना हांकलून लावण्याची संधि केव्हां मिळते याची ते वाट पहात होते. इ. स. १६६४ त यूरोपमध्यें जेव्हां

इंग्लंड व हॉलंड यांत लढाई सुरू झाली तेव्हां त्या संधीचा फायदा घेऊन इकडे वसाहतींच्या संघांनींही त्यांवर स्वारी केलीच व आपल्या दोघांमधील ही परकी पट्टी काबीज केली व दुभंगलेल्या इंग्रज वसाहती एकत्र जोडल्या गेल्या. या नवीन जोडलेल्या मुलखाचे दुसऱ्या चार्लसनें पुन्हां भाग पाडून ते आपल्या दोस्तांना बहाल केले. त्यांत एक आपला भाऊ ड्यूक ऑफ यॉर्क यास दिला. त्यास 'न्यू यॉर्क' असें संबोधण्यांत येऊं लागलें, याचेच आणखी तीन विभाग 'न्यू जर्सी' 'पेन्सिल्व्हानिया' व 'दिलावेर' असे पडून पूर्वीचे दोन संघ व मॅसाच्युसेट मिळून नऊ व या नवीन चार मिळून एकंदर तेरा वसाहतींचा, एक-जिनसी संघटित असा वसाहतींचा संघ तयार झाला. हल्लींच्या संयुक्त संस्थानांच्या इतिहासाचा येथूनच उगम झाला आहे.

या तेरा वसाहतींत कांहीं राजाच्या मालकीच्या, कांही खाजगी मालकीच्या आणि कांहीं सनदी असे तीन प्रकार होते. अर्थात त्यांचा कारारही भिन्न भिन्न स्वरूपाचा असे. सनदी वसाहतींतून गव्हर्नर जरी राजा नेमी, तरी त्याला कारभार लोकांच्या पसंतीनें करावा लागे. राजाच्या मालकीच्या वसाहतींचा कारभार थेट इंग्लंडच्या धर्तीवर चाले. खाजगी मालकीच्या वसाहतींत, जमीनदार हा राजा असे व तो स्वतःच्या मनास मानेल तसा कारभार चालवी. परंतु पुढें या सर्वही वसाहतींतील कारभारांत सुधारणा होत होत, त्याचें पर्यवसान लोकशाहींत झालें. प्रत्येक वसाहतीला एक गव्हर्नर व त्याच्या मदतीस लोकांच्या दोन सभा असून त्यांपैकीं एक वरिष्ठ व एक कनिष्ठ असे. अशा प्रकारें सांगाडा जरी लोकशाहीचा होता तरी गव्हर्नर हा इंग्लिश पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळें वरचा आविर्भाव इंग्लिश नियंत्रित राजशाहीचाच होता आणि वस्तुतः वसाहतींचा कारभार इंग्लंडमधील पार्लमेंटच चालवीत असे. ही स्थिति वसाहतवाल्यांना जाचक वाटे. परंतु नवीन मुलुखांत असहाय स्थितींत, तेथील रानटी रेड इंडियन व इतर युरोपियन, विषेशतः फ्रेंच, यांच्या कात्रींत ते सांपडल्यामुळें इंग्लंडच्या साहाय्याची त्यांस आवश्यकता होती आणि म्हणून हें जूं झुगारून टाकणें त्यास अशक्य होतें, परंतु पुढें गोष्टी फारच विकोपास गेल्या, आणि या तेरा तरुण वसाहती जेव्हां प्रबळ झाल्या तेव्हां त्यांनीं आटोकाट प्रयत्न करून तें जूं झुगारून दिलेंच!

या तेरा वसाहतींत सुद्धां एकत्र कुटुंबांतील विभक्ततेप्रमाणें उत्तर व दक्षिण संघ असे दोन प्रकार होते, आणि त्यांत थोडें फार डावें उजवें होतें. एकमेकांविषयीं तितकासा खुला दिल नव्हता. दाक्षिणेकडील वसाहती सधन होत्या, आणि तेथें आलेल्यांत इंग्लंडांत विश्वविद्यालयांतून विद्यामृत प्राशन केलेले लोक पुष्कळ होते. त्यामुळें साहजिकच तेथें विद्येचा प्रसार प्रथम सुरू झाला आणि शिक्षणसंस्था निघूं लागल्या. 'हारवर्ड कॉलेज' १६३६ सालीं मॅसाच्यूसेट

संस्थानांत निघालें. त्यानंतर १६९२ सालीं व्हर्जिनियांत ' विल्यम व मेरी कॉलेज, १७०० सालीं कनेक्टिकटमध्यें ' येल ' विद्यालय, १७४६ त न्यू जर्सी मध्यें ' प्रिस्टन विद्यालय ' इ. स. १७४९ मध्यें ' पेन्सिलव्हॅनिया विद्यापीठ ' आणि १७५४ न न्यू यॉर्क संस्थानांत ' कोलंबिया विद्यालय ' अशा शिक्षण-संस्था निघाल्या.

व्यापाराच्या बाबतींतही दक्षिणेकडील वसाहतवाले पुढें होते. तेथील शेती करण्यासाठीं आफ्रिकेंतून नीग्रो गुलाम आणवून त्यांस राबवून, त्यांनीं आपली शेती उत्कृष्ट केली आणि शेतीचें उत्पन्न वाढूं लागल्याबरोबर व्यापारही वाढला आणि व्यापारवृद्धीबरोबर संपत्तिही वाढली. मोठमोठीं नवीन नवीन शहरें व बंदरें तयार होऊं लागलीं आणि दक्षिण दिशेचा हा वसाहतींचा संघ सर्वतो प्रकारें उत्तरोत्तर उत्कर्ष पावूं लागला. त्यांचा हा उत्कर्ष इंग्लंडमधील लोकांच्या डोळयांना दिपवूं लागला. त्यांच्या भूमींत संपत्तीचा धूर निघूं लागला, त्यानें या घरबशांचें डोळे चुरचुरूं लागले. त्यांचे मनांत दूरदेशीं असणाऱ्या आपल्याच बांधवांविषयीं असूया उत्पन्न झाली. आणि त्यांना त्यांच्या द्रव्याचा लोभ सुटूं लागला. वसाहतवाल्यांचा व्यापार आपल्या ताब्यांत ठेवण्याचे सतत प्रयत्न सुरूं झाले. मातृभूमि सोडून बिकट परिस्थितींत प्राणांची परवा न करितां, अतोनात श्रम व हालअपेष्टा सोसून मिळविलेल्या श्रेयाचा बराचसा भाग, या ऐदी लोकांच्या घशांत जातो असें आढळतांच वसाहतवाल्यांनाही तें वैषम्य कां वाटणार नाहीं ? परंतु इकडील शत्रूंपासून रक्षण व्हावयास लागणाऱ्या सैन्याच्या मदतीसाठीं वसाहतवाल्यांस इंग्लिश पार्लमेंटवर अवलंबून रहावें लागत असल्यामुळें पार्लमेंटची सत्ता त्यांस मानणें भागच होतें. परंतु इंग्लंडच्या या अनुदार व लोभी वृत्तीच्या तापानें तापल्यामुळें एकमेकांशीं मिळून न वागणाऱ्या परदेशांतील वसाहतींमध्यें एकोपा घडून येऊं लागला व परस्परसहानुभूति वाढूं लागली.

उत्तर अमेरिकेंतील कानडा व मिसिसिपीचे पश्चिमेकडील इंग्रज वसाहतीला लागूनच असलेला सर्व मुलूख फ्रान्सच्या ताब्यांत होता आणि येथें एक बडें फ्रेंचांचें साम्राज्य वाढण्याची मोठी भीति, इंग्लंड व इंग्रज वसाहतवाले या दोघांसही सारखीच वाटत होती. वसाहतवाल्यांना फ्रेंचांशीं व तद्देशीय रेड इंडियनांशीं नित्य झगडे करावे लागल्यामुळें ते अगदीं बेजार झाले होते. फ्रेंचांशीं झालेल्या या युद्धांतून इंग्लंडनें वसाहतवाल्यांस मदत केली, परंतु त्या वेळीं त्यांची खुनशी वृत्ति स्पष्ट दिसून आली. वास्तविक वसाहतवाले तर इंग्लंडला परके नव्हते ना ? परंतु इंग्लंडचा देशाभिमानच इतका संकुचित, स्वार्थी व तीव्र आहे कीं, त्यापुढें त्यास रक्ताचाही विसर पडतो. स्वहिताशीं येऊन भिडल्यावर इंग्लंडला नात्यागोत्याची ओळख रहात नाहीं. वसाहतवाल्यांचीं पलटणेंही इंग्लंडमधील पलटणांच्या खांद्याशीं खांदा लावून लढत, परंतु त्यांना नीच लेखलें जाई, आणि त्यांस

भरपूर युद्धसामुग्रीचा पुरवठा सुद्धां केला जात नसे. वॉशिंग्टनसारख्या सेनानायकाची कित्येक वेळां, केवळ तो वसाहतवाला, म्हणून अमर्यादा झाली! पॅरिसच्या तहानें या युद्धाचा शेवट झाला, आणि त्याअन्वयें मिसिसिपीच्या पश्चिमेकडील मुलूख फ्रान्सनें स्पेनला दिला, आणि अगदीं शेजारींच असलेली फ्रेंच शत्रूची खाई दूर होतांच इंग्रज वसाहतवाल्यांना हायसें वाटलें; व आतां हें निकटचें संकट दूर झाल्यामुळें ते आपलें डोकें अंमळ स्वतंत्रपणानें वर उचलूं शकूं लागले. उलट फ्रान्सच्या भीतीमुळें इंग्लंडही वसाहतवाल्यांना दुखविण्यास आजपावेतों अंमळ भीत असे तें भिईनासें झालें, आणि आजपर्यंत धुमसत असलेली त्यांचेमधील चुरस उघडपणें सुरू झाली. इंग्लिश पार्लमेंटला वसाहतींवर आपला सासूपणा गाजविण्याची फार हांव असे व तो जाच आजपर्यंत वसाहतींनीं सोसलाही; परंतु आतां वयांत आल्यावर त्यांना या कजाग सासूचा धाक तितका वाटेनासा झाला आणि त्या अंमळ धीटपणानें आतां डोळ्यास डोळा देऊं लागल्या, व शब्दास प्रतिशब्द बोलूं लागल्या. अखेर एखाद्या असमंजस सासूप्रमाणें इंग्लिश पार्लमेंटही हट्टास पेटल्यामुळें क्रियेस प्रतिक्रिया सुरू होऊन हें प्रकरण अधिकाधिक चिघळण्याच्या मार्गास लागलें.

अधिकारमदिरेचा मद इतका दारुण आहे कीं, त्यामुळें निकटचे खांच खळगे सुद्धां दिसेनासे होतात. 'आढ्योऽस्मि बलवानस्मि कोन्योऽस्ति सदृशो मया' अशा प्रकारची वृत्ति उत्पन्न झाल्याकारणानें दुसऱ्यांचे न्याय्य हक्क सुद्धां मान्य करण्याचें भान रहात नाहीं. असल्याच प्रकारचें अंधत्व ब्रिटिश पार्लमेंटला जडलें होतें. वसाहती दुर्बल होत्या, असहाय्य होत्या, व परदेशी शत्रूंच्या कचाटींत सांपडल्या होत्या. या त्यांच्या स्थितीबद्दल सहानुभूति तर दूरच राहिली, परंतु तिचा आपल्या स्वार्थाकडे उपयोग करून घेण्याचें पार्लमेंटनें धोरण धरलें. वसाहतींवर आपली अनियंत्रित सत्ता चालावी असे प्रयत्न पार्लमेंटचे आजपर्यंत चालू होतेच. आतां त्यांची प्रत्यक्ष कटु फळें दिसण्याचा काळ आला. पार्लमेंटच्या 'आह्मीं धरू तें धोरण व करूं तें कारण आणि बांधूं तें तोरण' असल्या जुलमी इच्छेपुढें गुलाम वृत्तीनें आपली मान वांकविणें हें त्या स्वाभिमानी वसाहतींना पटत नव्हतें. कोणाच्याही सहनशक्तीची मर्यादा कोठें तरी संपण्याचा काल येतच असतो. त्याप्रमाणें वसाहतींनाही आतां पार्लमेंटचा तितका मुलाजा वाटेनासा झाल्यामुळें या जुलमाविरुद्ध त्यांनीं धडपड सुरू केली. वसाहतींच्या संरक्षणासाठीं इंग्लंडनें ठेवलेल्या सैन्याचा खर्च देण्यास वसाहतींचा विरोध नव्हता. परंतु तो पैसा कोणत्या कराच्या रूपानें द्यावा हें ठरविण्यांत आपणास हात असावा अशी त्यांची रास्त आकांक्षा होती; परंतु तिची पायमल्ली करून ब्रिटिश पार्लमेंटनें तिकिटांचा कायदा (स्टँप अक्ट) पास केला. या कायद्यानें, वसाहतींत होणारा प्रत्येक व्यापारी व्यवहार, लग्न व इतर करार-

मदार व कोर्टांतील खटले वगैरे यांवर तिकिटें लावून, त्या रूपानें पैसा वसूल करण्यांत येणार होता. या वेळीं इंग्लंडमध्यें राजाच्या हातांतील निवळ खेळणें बनलेलें ग्रेनाव्हिल यांचें मंत्रिमंडळ अधिकारावर होतें. वसाहतींतील लोक तरी हाडामासानें पक्के इंग्रजच होते. आणि त्यांनीं मातृभूमि जरी सोडली होती तरी तेथील आपल्या बांधवांनीं राजकीय हक्कांच्या संरक्षणासाठीं आणि प्रस्थापनेसाठीं सोसलेले सर्व हाल व केलेल्या क्रांत्या यांपासून मिळालेलें शिक्षण त्यांच्या रोमरोमांतून भिनलें होतें. आपणांवर कर बसविणारे पार्लमेंट आपणांस जबाबदार नाहीं ही गोष्ट अर्थातच त्यास डांचत होती. आपले कायदे आपणच करण्याचा नैसर्गिक अधिकार व प्रतिनिधित्व जर आपल्याला मिळत नाहीं, तर कर देण्याचें आपणास कारण नाहीं हें आद्यतत्त्व त्यांना माहीत होतेंच, परंतु उघड बोलून दाखविण्याचें धाडस त्यांना करवत नव्हतें. तें धाडस वसाहतींत वयानें श्रेष्ठ आणि राजनिष्ठ म्हणून गणलेल्या व्हर्जिनियानेंच केल्यावर त्याचे प्रतिध्वनि सर्वत्र उठूं लागले आणि या कराराविरुद्ध अशी कांहीं जोराची चळवळ झाली कीं, ज्या दिवसापासून हा कायदा अमलांत यावयाचा होता, त्या १ नोव्हेंबर १७६५ रोजीं एकूण एक तिकिटें ( स्टँप्स ) नष्ट करण्यांत आलीं होतीं आणि करवसूली करणारे कामगारही अंतर्धान पावले होते. वसाहतींनीं एक प्रकारें इंग्लंडच्या पार्लमेंटला हें नाकच खाजविलें होतें. आतां त्यांच्या नाकाला कंडूच सुटल्यामुळें त्यांनीं तें खाजविलें होतें, ही गोष्ट खरी असली म्हणून तरी काय झालें? इंग्लंडचा तो अपमानच होता. ब्रिटिश पार्लमेंटच्या सत्तेविरुद्ध हा एक प्रतिकार होता. परंतु वसाहतींची मजल अजून सनदशीर मार्गाची चाकोरी सोडून गेली नव्हती. त्यांनीं हा कायदा रद्द करण्याबद्दल पार्लमेंट व राजा यांजकडे अर्जविनंत्या केल्या. इकडे खुद्द इंग्लंडांतही ग्रेनाव्हिलचे जागीं रॅकिंग्हाम महामंत्रि झाले होते. त्यानें हा कायदा रद्दबादल करून टाकला. परंतु अमेरिकन वसाहतींचा कटाक्ष केवळ या करावरच नव्हता, तर त्यांना पार्लमेंटमध्यें प्रतिनिधित्व पाहिजे होतें. उलट रॅकिंगहॅम यानें वसाहतींवरील करलादणीचे सर्वाधिकार इंग्लंडच्या राजाचे आहेत अशी एक खोंच मारून ठेविली होती. नंतर थोड्याच दिवसांत अमेरिकेंतील सनदी नोकरच्या पगारांची रक्कम वसूल करण्यासाठीं म्हणून काच, कागद, रंग व चहा इत्यादि वस्तूंच्या अमेरिकेंतील आयातीवर कर बसविण्याचा ठराव टौनशेंड या गृहस्थानें आणला व तो पार्लमेंटमध्यें पासही झाला. व त्यासाठीं बोस्टन शहरांत एक कस्टम खातें उघडण्यांत आलें. लष्कराची सोय लावण्यासाठीं, प्रत्येक नागरिकानें एका लष्करी शिपायाला पाहुणचार देण्याचा ( बिलेटिंग ) कायदा पास करण्यांत आला. अर्थातच हा सर्व प्रकार अत्यंत उद्वेगजनक व प्रक्षोभक होता. त्याविरुद्ध चळवळ मॅसाच्युसेट संस्थाननें प्रथम सुरूं केली. जकात बसलेला आयात माल ज्या त्या बंदरांतून जशाचा

तसाच पडून राहिला. एकदां चळवळ सुरू झाली कीं, तींत कांहीं आततायी माणसें असावयाचींच. व त्यांच्याकडून कांहीं गैरवर्तनही व्हावयाचेंच. त्याप्रमाणें बोस्टन येथें कांहीं लोकांनीं रेड इंडियनांचीं सोंगें घेऊन बंदरांत असलेल्या चहाच्या जहजांवरील सर्व चहा समुद्रार्पण केला. इतक्या मोठ्या जलसंचयाला उकळी फुटण्यास आगही तशीच प्रचंड पाहिजे म्हणूनच कीं काय इंग्लिश पार्लमेंटनें आणखी पुढें जाऊन बोस्टन बंदरच व्यापारास बंद केलें. व आणखीही कांहीं असलेच उतावीळपणाचे व वसाहतींस चिडविणारे बरेच किरकोळ कायदे पसार झाले. ही बातमी कळतांच सर्व वसाहतींची एक जूट बनली आणि त्यांनीं सर्वांची मिळून एक परिषद् ( कांग्रेस ) २ सप्टेंबर १७७४ रोजीं फिलाडेल्फिया येथें बोलावली. जॉर्जिया शिवाय सर्वांचे प्रतिनिधी हजर होते. जॅर्जियाचीही सहानुभूति होतीच. सर्वस्वी राष्ट्रीय अशी अमेरिकेंतील ही पहिलीच परिषद् होय !

या परिषदेंत एक संघटना ( आर्टिकल्स ऑफ् असोसिएशन ) मान्य करण्यांत आली. ग्रेट ब्रिटन व आयर्लंड येथील मालावर बहिष्कार पुकारण्यांत आला. त्याचप्रमाणें मॅसॅच्युसेट संस्थानांतील लोकांनीं या जुलमी कायद्याविरुद्ध चालविलेल्या झगड्याबद्दल सर्व वसाहतींची सहानुभूति दर्शित करण्यांत आली. आणि या न्याय्य झगड्यांत जर लागली तर मदत करण्याचेंही इतर वसाहतींनीं आश्वासन दिलें. हा एक प्रकारचा निर्वाणीचा (अल्टिमेटम) खलिता होता. इंग्लंडनें केलेले कायदे परत घ्यावे तर सर्व अनर्थ वांचतो, परंतु ती गोष्ट नामुष्कीची वाटण्याइतकें तें इरेस पेटलेलें ! परत घ्यावयाचे नाहींत तर अंमलबजावणी झाली पाहिजे. मॅसाच्युसेटनें प्रतिकारास सुरवात केलीच होती. इतर वसाहतीही तोच धडा गिरवणार हें नक्की होतें. म्हणजे त्या कायद्यांची अंमलबजावणी पाशवी शक्तीच्या जोरावर करणें प्राप्त होतें. आजपर्यंत वसाहती ‘ प्रतिनिधित्वाविना कर नाहीं,’ या तत्त्वावर भांडत होत्या. म्हणून पिट वगैरे इंग्रज मुत्सद्यांची त्यांस सहानुभूति होती. परंतु आतां यापुढें जाऊन ‘ प्रतिनिधित्वाशिवाय कायदा नाहीं,’ हें तत्त्व प्रतिपादलें जाऊं लागलें. व ही गोष्ट इंग्लंडच्या साम्राज्यवादी धोरणास मूलतः विरोधी होती. तेव्हां एकदां केलेले कायदे जबरीनें लादणें व पर्यायानें वसाहतींशीं युद्ध सुरू करणें हाच मार्ग उरला होता. आणि त्यास तोंड मॅसाच्युसेटमध्यें लागलेंही होतें. तेथील सुभेदार गेज हा बोस्टन द्वीपकल्पांत कडेकोट बंदोबस्तानें राहिला होता. व जणूं काय शत्रूच्या मुलखांत स्वारीवर निघाल्याप्रमाणें तो लोकांत हेर पाठवून माहिती गोळा करीत होता. लोकही तयारींत होते. गेजकडून झालेलें क्षुल्लक विरोधी कृत्य ठिणगी पेटविण्यास पुरेसें होतें.

इकडे इंग्लंडांतही मोठें राजकारण शिजत होतें. वसाहतींनीं बंड पुकार-

त्याचा पुकारा झाला होता. पार्लमेंटमध्यें झालेल्या राजांच्या भाषणांत मॅसाच्युसेटनें कायद्याचा प्रतिकार व उच्छाद मांडला आहे असें स्पष्ट विधान होतें. वसाहतवाल्यांच्या पुढाऱ्यांस अटक करण्याचा आग्रह मंत्रिमंडळानें गेजला चालविला. पार्लमेंटच्या दोनही हाउसेसनीं 'मॅसाच्युसेट बंडखोर असून त्यास दाबण्यासाठीं साम्राज्याची सर्व साधनसामुग्री उपयोगी आणावी, असा राजास सल्ला दिला. राजानेंही आपण पार्लमेंटबाहेर नाहीं असें जाहीर केलें. कानडा व उत्तर अमेरिकेंतील इतर ब्रिटिश प्रांताच्या सुभेदारांना सैन्य तयार ठेवण्याबद्दल हुकूम सुटले. आणि लढाईची सर्व तयारी जवळ जवळ झाल्यासारखीच होती.

कंकार्ड व लेक्झिंग्टन या गांवीं लोकांनीं दारूगोळा सांठविल्याची गुप्त बातमी सुभेदार गेज यांच्या हेरांनीं त्यास दिली. लगेच तो काबीज करण्यासाठीं गेजनें तेथें सैन्य पाठविलें. हें लोकांस कळतांच त्यांनींही आपले सैनिक जमा केले. सरकारी सेनापतीनें या (मिलिशिया)स्वयंसैनिकांना निघून जाण्याचा हुकूम सोडला. तो अमान्य झाल्याबरोबर गोळीबार करण्यांत आला. लोकांकडूनही गोळ्या सुटल्या; व अमेरिकन राज्यक्रांतीच्या युद्धांतील पहिला रक्तबिंदु येथें सांडला गेला. सरकारी सैन्यानें कंकार्डला जाऊन तेथील दारूगोळा जाळून टाकला. परंतु इतक्या अवधींत जनताही पूर्ण सावध झाली होती आणि हें विजयी सैन्य बोस्टनला परत जात असतां त्यावर घराच्या खिडक्यांतून, कोलारावरून कुंपणांतून, शेतांतून जिकडून तिकडून बाटल्या, दांडकीं, दगड, विटकरें, बंदुकीच्या गोळ्या इत्यादींचा बहुरंगी मारा असा कांहीं झाला कीं त्याची हबेलंडी उडाली. ते लोकांस तेव्हां शरणच यावयाचें, परंतु ऐन वेळीं कुमक मिळाल्यामुळें तो नामुष्कीचा प्रसंग टळला. बोस्टन द्वीपकल्प मूळ भूप्रदेशाला जोडणारी संयोगीभूमि लोकांनीं ताब्यांत घेऊन बोस्टनला वेढा दिला व दळणवळणाचे सर्व मार्ग रोखून धरले. आतां सरकार व जनता यांचें खरें खुरें युद्ध सुरू झालें, व अमेरिकन बंडास उघड उघड सुरवात येथें झाली !

गेलीं नऊ वर्षें लोकांनीं सारखा धीर धरला होता. परंतु त्या तुंबलेल्या तडागास येथें पाट फुटला व आजपर्यंत कोंडून राहिलेलें पाणी झपाट्यानें वाहूं लागलें. हां हां म्हणतां ही बोस्टनच्या वेढ्याची बातमी सर्व देशभर पसरली. शेतकरी आपलीं आऊतें शेतांतच टाकून आयुधें हातीं घेऊन बोस्टनकडे धांवत सुटले. शहरसंरक्षक मंडळ्यांनीं जागोजाग फंड गोळा करण्यास सुरवात केली. धनिकांनीं पटापट वर्गण्या देऊन टाकल्या. एक महिन्याच्या आंत अर्धशिके नवशिके शेतकरी शिपाई इतके जमले कीं, बोस्टनची धडगत दिसेना. फिलाडेल्फिया कॉंग्रेसमध्यें ठरल्याप्रमाणें इतर संस्थानांनीं मदत करणें त्यांचें कर्तव्य होतेंच. त्याचप्रमाणें उत्तरेकडील प्रत्येक संस्थानांतील कनिष्ठ सभेनें " प्रांतिक कॉंग्रेस " असें नांव धारण करून राज्यसूत्रें हातीं घेतलीं. स्वयंसैनिक पथकांचे अधिकारी

व मॅजिस्ट्रेट हे लष्करी अंमलदार बनले. आणि सरकारी अमलदारांपैकीं कित्येक लोकांना मिळाले, कित्येक शेजारच्या सुरक्षित जागीं आसऱ्यास गेले, व कित्येक तर इंग्लंडांत पळून गेले ! १० मे १७७५ ला फिलाडेल्फिया येथें दुसरी कॉंग्रेस भरली आणि तिनें मॅसाच्युसेटचे लोकांना आपला पूर्ण पाठिंबा पुन्हां एकवार स्पष्टपणें जाहीर केला. बोस्टन येथें जमलेलें सर्व सैन्य 'सार्वराष्ट्रीय लष्कर' असें मान्य करण्यांत आलें. आणि त्याची घटना करून त्यावर योग्य तसे अधिकारी नेमण्यांत आले. या कामासाठीं एक सेनासमिति ( मिलिटरी कमिटी ) नेमण्यांत आली होती. तिजवर फ्रेंच युद्धांत प्रसिद्धीस आलेले एक जमीनदार जॉर्ज वॉशिंग्टन हे काम करीत होते, त्यांसच या लष्कराचा मुख्य सेनासारंग करण्यांत येऊन त्यांची रवानगी बोस्टनला करण्यांत आली. याच ता. १७ जूनच्या दिवशीं 'बंकर हिल' ची चकमक उडाली. तींत शेतकरी लोकांचा पराभव झाला तरी त्यांचा दारूगोळा संपला असतां बंदुकांच्या दस्त्यांनीं व दगडांनीं लढत लढत ते परत फिरले. सरकारी अडीच हजार सैन्यापैकीं अकराशें सैनिक कामास आले. व 'बंडवाले केवळ भुरटे नाहींत' अशी त्यांची खात्री त्या दिवशीं प्रथम पटली.

फिलाडेल्फिया येथें कॉंग्रेस चालू होतीच व तिनें सर्वराष्ट्रीय सूत्रें हातीं घेतलीं होतीं. परंतु अजून तिची स्वातंत्र्यसंपादनाच्या विशाल मार्गाकडे दृष्टि वळली नव्हती. इंग्लंडशीं सामोपचारानें शक्य तर तडजोड करून आपलीं गाऱ्हाणीं दूर करून घ्यावीं अशी तिची सारखी खटपट चालली होती. १७७५ च्या जुलै महिन्यांत कॉंग्रेसनें शेवटला अर्ज राजास पाठविला. परंतु त्यास उत्तर सुद्धां न देतां उलट राजानें बेमुर्वतखोरपणानें फर्मान फिरविलें कीं, अमेरिकेंतील वसाहतींनीं बंड पुकारल्यामुळें त्यांस इंग्लंडांतून कोणीही मदत करूं नये. तें बंड मोडण्यास सर्वांनीं राजनिष्ठ राहून सरकारला मदत करावी. पार्लमेंटनेंही पंचवीस हजार सैन्य रवाना करण्याचें ठरविलें. परंतु इंग्लिश जनता वसाहतवाल्यांशीं सहानुभूति बाळगून होती. त्यामुळें इंग्लंडमध्यें सैन्य जमेना. तेव्हां तें जर्मनींत उभें करावें लागलें. असलेल्या नोकऱ्या लष्करी अंमलदारांनीं सोडल्या. अशा रीतीनें राजा व पार्लमेंट यांच्या विरुद्ध इंग्लिश जनतेनें बंडवाल्यांशीं सहानुभूति दाखविली, इतकेंच नव्हे तर कांहीं इंग्रज वसाहतवाल्यांच्या बाजूनें लढण्यासाठीं अमेरिकेंतही गेले. कॉंग्रेसला आपल्या सनदशीर चळवळीची चाकोरी सोडून क्रांतीच्या मार्गाकडे जाण्यास व साम्राज्यापासून फुटून स्वतंत्र होण्यास इंग्लंडनें आपल्या हट्टवादीपणानें भाग पाडलें हें खरें; परंतु त्या वेळीं इंग्लंडचें राजकारण राजाच्या शब्दांवर झुलत होतें. त्यांत जनतेचा कांहींच भाग नव्हता. तो जर असता तर गोष्टी इतक्या विकोपास गेल्या नसत्या. परंतु मग जगाला लोकशाहीचा एक उत्कृष्ट नमुना अंतरला असता ! आजच्या 'संयुक्त संस्थानांचें' सर्व श्रेय त्या तिसऱ्या जॉर्जच्या तसल्या हेकेखोर व बेमुर्वत हट्टवादीपणाला व त्याच्या ताटाखालचीं

मांजरें होऊन राहणाऱ्या त्या नेभळट व लांगूलचालनवृत्ति मंत्रिमंडळाला आणि आपणांस निवडून देणाऱ्या सर्व मतदारसंघाशीं बेइमान बनून लांचलुचपतीला व राजाच्या मानमरातबाला लोभावल्यामुळें स्वाभिमानशून्य श्ववृत्ति अंगीकारणाऱ्या त्या पार्लमेंटच्या सभासदांना आहे. त्याबद्दल जगानें त्यांचें आभारी असलें पाहिजे !

इकडे अमेरिकेंतील 'राजाविरुद्ध प्रजा' या भांडणास भलतेंच स्वरूप प्राप्त झालें होतें. गेजच्या मागून आलेला गव्हर्नर होवे याची लोकांशीं लढतां लढतां अत्यंत त्रेधा उडाली. हिंवाळ्याच्या दिवसांत तर लोकांच्यापुढें अब्रू राखून युद्धाच्या हालचाली करतांना त्याच्या नाकीं नऊ आले. वॉशिंग्टन कसलेला सेनापति होता. परंतु त्याचें सैन्य अर्धशिक्षित व बिनसराईत होतें. शिवाय त्याला एकाच वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं टक्करी द्याव्या लागत होत्या. युद्धाचें खरें तोंड मॅसाच्युसेट संस्थानांत आजपर्यंत होतें. आतां तें इतरत्रही पसरूं लागलें. राजाच्या सैन्यानें शत्रुप्रदेशांत करावयाचे ते सर्व अत्याचार बेदर्दपणें सुरूं केले आणि वसाहतवाल्यांना ' युनियन जॅक ' हें शत्रूच्या निशाणाप्रमाणें वाटूं लागलें. परंतु त्यांच्या मनांत अजूनहि इंग्लंडच्या राजछत्राखालीं राहण्याची कल्पना जाऊन पूर्ण स्वातंत्र्याची स्फुट कल्पना शिरली नव्हती अगर ती व्यक्त करण्यास ते भीत होते. वॉशिंग्टनच्या आधिपत्याखालीं तेराही वसाहतींचें सैन्य जमलें होतें. त्यांनीं आपलें नवीन निशाण तयार केलें, परंतु युनियन जॅकवरच दोन क्रॉस चढवून, त्यांनीं फडक्याचा रंग निळा ठेवला होता. पुढें याच क्रॉसचे जागीं तारे ( स्टार्स ) आले.

पूर्ण स्वातंत्र्याची कल्पना प्रथम बोलली गेली अशी ता. ९ जानेवारी १७७६ रोजीं. थॉमस् पेन नांवाच्या एका गृहस्थानें " सारासार विचार " या नांवाचें एक चोपडें प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें 'अमेरिकन वसाहतींस केव्हां तरी पूर्ण स्वातंत्र्याच्या डगरीवर हात ठेवावा लागणारच, मग उशीर कां ? जितका जास्त अवधि लोटेल तितकें तें काम अधिक कठिण मात्र होऊन बसेल' असें चक्क लिहिलें होतें. या चोपड्यानें सर्वत्र मोठी खळबळ उडवून दिली आणि विचारपरिवर्तन घडवून आणलें. कॉंग्रेसही जास्त धीट बनून तिनें पूर्ण स्वातंत्र्याच्या ताऱ्यावर आपली नजर रोखिली.

१७ मार्च १७७५ ला बोस्टन पडलें, तेव्हां कॉंग्रेसनें तेथील सर्व इंग्रजी जहाजें कायदेशीर लूट असल्याचें जाहीर केलें आणि ६ एप्रीलला तर अमेरिकेच्या सर्व बंदरांत इंग्लंडखेरीज इतर राष्ट्रांच्या जहाजांना मुक्तद्वार ठेविलें. कॉंग्रेस आतां एखाद्या स्वतंत्र राष्ट्राच्या कुलमुखत्यार सरकाराप्रमाणें इतर देशांशीं बोलणीं-चालणीं करूं लागली. फ्रेंच दरबारीं बेंजामिन फ्रँकलिन या सुप्रसिद्ध मुत्सद्दी, लेखक व वक्ता म्हणून गाजलेल्या वकीलाची नेमणूक झाली. त्याच्या करामतीनें

फ्रान्सनें पैसा, दारूगोळा आणि माणसें यांची मदत अमेरिकेस देण्यास सुरवात केली. हे सर्व स्वतंत्र युद्धाचे प्रकार होते. इकडे खुद्द अमेरिकेंत प्रत्येक वसाहतीच्या सरकारचें संस्थानी सरकारांत रूपांतर झालें आणि मतदारांत स्वातंत्र्याची ज्योत चेतविण्याचे अहर्निश प्रयत्न चालू झाले. सर्वांत व्हर्जिनिया संस्थानास स्वातंत्र्याची फार घाई लागून गेली होती. कांग्रेसमध्यें १७७६ च्या जून ७ ला तेथील प्रतिनिधि हेनरी ली यानें स्वातंत्र्याचा ठराव मांडला. तो कमिटीकडे सोंपविण्यांत आला. कमिटींत तो ठराव ता. २ जुलैस पास झाला. या कमिटींत थॉमस जेफरसन, जॉन अडाम्स, फ्रांकलीन, शेरमन इत्यादि लोक होते. ठराव असा होता:—

"या संयुक्त वसाहती स्वतंत्र आहेत आणि त्या तशा हक्कानें असल्याच पाहिजेत. त्या स्वतंत्र संस्थानें आहेत. ग्रेटब्रिटनचें प्रस्थापित सरकार आजपासून नष्ट झालें आहे आणि तें तसें झालेंच पाहिजे. त्याशीं असलेले राजकीय हित संबंध पार तुटले आहेत."

काँग्रेसच्या विनंतीवरून व्हर्जीनियाचा कायदेपंडित जेफर्सन यानें स्वातंत्र्याचा कच्चा जाहीरनामा तयार केला व तोच पुढें कांग्रेसनें मान्य केला. या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत पुढील तत्त्वें प्रतिपादिलीं आहेत.

"खालील तत्त्वें स्वयंप्रत्यक्ष आहेत असें आम्ही मानतों.

अखिल मानव जाति, उत्पन्न होतांना समतेच्या पायावरच उत्पन्न झाली. विधात्यानें प्रत्येकाला कांहीं सनातन हक्क दिले आहेत. त्यामध्यें जीवित, स्वातंत्र्य आणि सुखप्राप्ति यांचा अंतर्भाव होतो.

या हक्कांच्या शाश्वतीसाठींच, मनुष्यामध्यें शासनसंस्था ( सरकारें ) निर्माण झाल्या, आणि त्यांना त्यांचे न्याय्य अधिकार शासितांच्या संमतीनेंच प्राप्त झाले. अर्थातच जेव्हां एखाद्या शासनसंस्थेचें स्वरूप या अंतिमध्येयाच्या सिद्धीस हानिकारक होतें, तेव्हां तें बदलून अगर नष्टही करून, त्या जागीं आपली सुरक्षितता आणि सौख्य जेणेंकरून साधेल असें प्रजेस वाटेल, त्या तत्त्वांच्या पायावर व त्या स्वरूपांत अधिकार आंखून देऊन, नवीन शासनसंस्था निर्माण करणें हा प्रजेचा हक्क आहे."

या जाहीरनाम्याच्या शेवटीं असें वाक्य होतें. "ज्याच्या कारकीर्दीतील प्रत्येक कृत्य जुलमी बेबंदशहाची व्याख्या करण्यास उपयोगी पडेल, असला राजा स्वतंत्र लोकांवर राज्य करण्यास नालायक आहे." सरतेशेवटीं वर उल्लेखिलेल्या ठरावाच्या भाषेंत संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य जाहीर करण्यांत आलें आहे. अशा रीतीनें वसाहतवाल्यांनीं आपल्यापुरता तरी स्वातंत्र्याचा आचार व उच्चार यांत पूर्ण पुकारा करून टाकला. आतां फक्त त्यांस इतरत्र मान्यता मिळावयाचें राहिलें होतें. पण तेंही काम बरेंच सुलभ झालें होतें. कारण फ्रान्सनें एकाद्या

स्वतंत्र राष्ट्रास करावी त्याप्रमाणें त्यांना मदत केली होतीच. इंग्लंडकडून मान्यता मिळविण्यासाठीं त्याची दांतखिळी उघडावी म्हणून नाक दाबण्याकरतांच तर हा स्वातंत्र्याचा रणसंग्राम चालू होता.

अशा रीतीनें लोकसत्ताक राज्याचा असा सूर्योदय होत असतां इकडे त्याभोंवतीं अभ्रेंही जमा होत होतीं, आणि त्यांत तो कायमचा लोपून जातो कीं काय अशी भयाण भीति वाटतच होती. बोस्टन बंदर पडल्यावर वॉशिंग्टन न्यूयार्ककडे निघून गेला होता. हॉवे यानेंही आतां उघड्या रणांगणावर सोक्षमोक्षाची लढाई खेळण्याच्या विचारानें मध्यवसाहतीवर हल्ला चढविला. त्याचेजवळ एकतीस हजार कसलेले लढवय्ये होते. शस्त्रसामुग्री भरपूर होती. वॉशिंग्टनचें मावळी सैन्य सत्तावीस हजार होतें. परंतु त्यांतील बहुतेकांस असले युद्धप्रसंग अपरिचित होते. कांहींना तर त्यांची ऐकूनही माहिती नव्हती. अशा स्थितींत वॉशिंग्टनला एकसारखे पराभव खावे लागले. वॉशिंग्टनसारखाच कुशल व धीराचा सेनापति होता म्हणून बरें; नाहीं तर कुठलें स्वातंत्र्य आणि कुठलें काय ! वॉशिंग्टननें मोठ्या कौशल्यानें आपल्या सैन्यांत अव्यवस्था माजून त्याची पांगापांग होणार नाहीं अशा बेतानें पिच्छेहाटीचें धोरण ठेवलें होतें. लॉंग आयलंड येथील लढाईत तर त्याला चांगलाच चोप बसला. न्यू जर्सीतूनही त्याची हकालपट्टी झाली. फ्रेंचांची मदत अजून येऊन पोंचली नव्हती. परंतु हिंवाळा असल्यानें सृष्टिदेवतेनें वॉशिंग्टनच्या शत्रूस प्रतिकार करून वॉशिंग्टनची बाजू राखली. नाहींतर युद्ध येथेंच संपुष्टांत आलें असतें. आणि हा स्वातंत्र्याचा प्रयत्न फसला असता. परंतु कांग्रेसनें वॉशिंग्टनला कुलमुखत्यारी दिली होती. त्यामुळें सर्व कारभार एकहातीं व एकमतीं चालल्यानें त्यांत आणखी अंतःस्थ अडथळे होत नव्हते.

युद्धाचा हा घसरता रागरंग पाहून कांग्रेसनें आपलें ठाणें फिलाडेल्फिया येथून उठवून तें बाल्टिमोर येथें नेलें. दोनही सैन्यांत सारख्या चकमकी झडत होत्या. परंतु त्यांत जयापजयाचा ताजवा आजपर्यंत जो केवळ इंग्रजांच्या बाजूसच नेहमीं झुकलेला असे, तो आतां सारखा तोलला जाऊं लागला. वॉशिंग्टनला फिलाडेल्फिया कॉर्नवालिसच्या हातांत सोडावें लागलें. परंतु त्यानें डेलाबेरचें ठाणें नाकेबंद करून ब्रिटिश सैन्याची रसद मारली आणि त्याचें आरमारार्शी दळणवळण पार बंद करून टाकलें. हेंही ठिकाण सोडावें लागतांच गनिमी काव्यानें लढण्यास उपयुक्त अशा 'व्हॅली फोर्ज' मध्यें आपली फौज वॉशिंग्टननें सांठविली. इकडे सरदार कॉर्नवालिस जयाच्या आनंदांत नाचरंग करीत फिलाडेल्फिया येथें तळ देऊन राहिला.

दरम्यान इंग्लंडमधील मुत्सद्यांनीं वसाहतवाल्यांची वाताहत उडविण्याचा एक नवीनच डाव रचिला होता. त्याप्रमाणें सेनापति बर्गायने हा आपलें सैन्य

घेऊन कानडाच्या सरहद्दीवरून खालीं उतरत होता. दक्षिणेकडील सैन्य व आरमार यांनीं त्यास जाऊन मिळावयाचें अशी ही योजना होती व ती सिध्दीस जाती तर इच्छित साधलेंही असतें. परंतु अपरिचित प्रदेशांतून हालचाली करणें नकाशे पुढें ठेऊन टेबलाशीं बसून सोपें वाटलें, तरी प्रत्यक्ष वेळ आल्यावर अतिशय संकटाचें झालें. शिवाय अमेरिकन फौजाचें बर्गायनेभोंवती वाटोळें जाळें पसरलें होतें. उत्तरोत्तर तो फांस आवळला जात होता. त्याची कुमक कापली जाऊं लागली. रसद बंद झाली. घोडे चाऱ्याचे अभावीं मरूं लागले. अशा परिस्थितींत सभोंवतींच्या कड्यांतून बाहेर सुटण्याचा एक निर्वाणीचा प्रयत्न करण्याचें त्यानें ठरविलें. व तशा हालचाली चालविल्या. परंतु वसाहतींचा सेनापति गेट्स याच्या तें ध्यानांत येऊन त्यानें आपल्याही हालचाली तोंडीस तोंड सुरू केल्या. शेवटीं मेटाकुटीस आलेल्या बर्गायनेनें गेट्स याच्याशीं बोलणें सुरू केलें. अमेरिकनांनीं प्रथम बिनशर्त शरणचिठ्ठीच मागितली होती. परंतु बर्गायनेच्या मदतीसाठीं क्लिंटन हा सैन्य घेऊन येत होता. ही बातमी आल्यामुळें अटी सौम्य करण्यांत आल्या. बर्गायने हा चक्रव्यूहांत सांपडल्यामुळें अर्थातच त्यास याची गंधवार्ताही नव्हती. म्हणून त्यानें त्या अटी मान्य केल्या. बर्गायनेच्या सैन्यानें आपल्या तोफा व शस्त्रास्त्रें वसाहतवाल्यांच्या स्वाधीन करून बोस्टनला जावें व तेथून पुन्हां या युद्धांत न येण्याचें वचन देऊन स्वदेशीं निघून जावें असें ठरलें. या अटींवर सह्या झाल्यानंतर चारच तासांनीं क्लिंटन येऊन पोंचला. साराटोगा येथें ता. १७ आक्टोबर १७७४ रोजीं झालेला हा पराभव म्हणजे या युद्धांतील ब्रिटिशांच्या विजयाच्या कमानीचा मध्यबिंदु होय. येथून पारडें बदललें. आणि वसाहतींना जयावर जय मिळूं लागले. साराटोगाची ही लढाई जगांतील क्रान्तिकारक लढायांपैकीं एक गणली जाते. शस्त्रसंन्यास केलेले ब्रिटिश शिपाई जेव्हां एका बाजूस वसाहतवाले आणि दुसऱ्या बाजूस त्यांचे दोस्त फ्रेंच यांच्यामधून निघून गेले तेव्हां त्यांनीं फ्रेंचांशीं जें शिष्टाचाराचें वर्तन केलें तें त्यांच्यानें वसाहतवाल्यांशीं कांहीं करवलें नाहीं ! अमेरिकेच्या सद्योवैरापुढें फ्रेंचांच्या नित्यवैराचेंही त्यांस विस्मरण पडलें !

आतां एकदां शरण जाण्याची पाळी वसाहतवाल्यांची आली. क्लिंटनच्या वेढ्यांत सांपडलेला सेनापति लिंकन हा ससैन्य ता. १२ मे १७८० रोजीं शरण गेला. पण १७८० साल संपत आलें आणि फ्रेंचांची लष्करी व आरमारी कुमक अगदीं वेळेवर येऊन पोंचली. सहा हजार सैन्य आणि तेंही युरोपच्या युद्धभूमीवर गाजलेलें असें वॉशिंग्टनच्या हाताशीं येतांच, युद्धाचा नूर पालटला. डी ग्रेसच्या नेतृत्वाखालीं आलेल्या फ्रेंच आरमारानें ब्रिटिश आरमाराचा पराभव केला. इकडे इंग्रज सेनापति लॉर्ड कार्नवालिस यास त्याचे आठ हजार सैन्यासह तीन आठवडेपर्यंत वाशिंग्टननें वेढ्यांत कोंडून धरलें. शेवटीं नाइलाज होऊन

ता. ९ आक्टोबर १७८१ रोजीं तो सर्व सैन्यासह शरण आला. ऋतुमान बदलतांच वारें ज्याप्रमाणें दिशा बदलतात, त्याप्रमाणें विजयश्रीनेंही आपली कृपादृष्टि आतां इंग्रजांकडून काढून वॉशिंग्टनचेकडे वळविली आणि प्रतिदिनीं अमेरिकेच्या स्वातंत्र्यमंदिराच्या पायाचा एक एक चिरा भक्कमपणें बसूं लागला.

आतां युद्धक्षेत्र सोडून देशांत इतर ठिकाणीं सर्व व्यवहार शांतपणें सुरळीत चालू होते. आपण कधीं काळीं इंग्रजांच्या ताब्यांतील वसाहती होतों कीं नव्हतों, अशा बेफिकीरीनें वसाहतवाल्यांचे कारभार चालले होते. लोकांचे सुभेदार व लोकांचे अध्यक्ष लोकांसाठीं कायदे करून लोकांच्या शहरांचा व प्रांतांचा कारभार लोकांच्या वतीनें चालवीत होते. युद्धाचें मान इतकें बदललें कीं यशःश्री कोणास माळ घालणार याचा संदेश न उरल्यामुळें ब्रिटिश पार्लमेंटनें ता. ४ मार्च १७८३ रोजीं युद्ध तहकूब केलें आणि पुढील नवंबरमध्यें मामुली रीतीनें तह होऊन इंग्लंडनें वसाहतींचें स्वातंत्र्य मान्य केलें. आणि अशा रीतीनें आपल्या गतपापांचें प्रायश्चित्त घेतलें. राजाच्या जुलमाविरुद्ध गांजलेल्या प्रजेनें अगतिक होऊन सशस्त्र प्रतिकारार्थ बंड पुकारलें, व तें यशस्वी झाल्यामुळें त्यास ‘स्वातंत्र्य युद्ध’ हें गौरवार्ह अभिधान मिळालें. आजपर्यंत केवळ वसाहती होत्या त्याच आतां स्वयंशासित संस्थानें बनल्या. आणि या स्वातंत्र्य मिळविणाऱ्या आद्य तेरा वसाहतींनीं ‘संयुक्त संस्थानें’ असें नांव धारण केलें. जे फाजील राजनिष्ठ प्रजाजन होते त्यांच्या प्रकृतीला ही नवस्वातंत्र्याची हवा मानवेना म्हणून ते इंग्लंडच्या परत निघालेल्या पराभूत सैन्याबरोबर स्वदेशीं निघून गेले आणि संयुक्त संस्थानें हा निर्भेळ स्वतंत्रांचा प्रदेश झाला.

कोणतीही अमूल्य चीज संपादिल्यानंतर ती टिकविणेंच जास्त कष्टाचें व जबाबदारीचें असतें, त्याचप्रमाणें मिळविलेलें स्वातंत्र्य न गमवितां राखण्याचें काम मोठें कठीण असतें. त्या जबाबदारीला तोंड देण्यासाठीं म्हणून १७८७ त सर्व संस्थानांच्या मिळून पंचावन प्रतिनिधींची एक परिषद् वॉशिंग्टनचे अध्यक्षतेखालीं भरली. या परिषदेनें ‘ संयुक्त संस्थानांची राज्यघटना’ तयार केली. ही शासनपद्धति ४ मार्च सन १७८९ पासून अमलांत यावयाची होती. त्यापूर्वीं सर्व निवडणुकी झाल्या. त्यांत अध्यक्षाचे जागीं वॉशिंग्टन निवडून आला व त्याचे खालोखाल मतें मिळालेला जॉन अडाम्स यास उपाध्यक्ष नेमण्यांत आलें. अलीकडे मात्र उपाध्यक्षाची जागा वेगळी काढून तीसाठीं वेगळे उमेद्वार उभे करण्यांत येऊन स्वतंत्रपणें निवडणूक होते.

ता. ४ मार्च १७८९ रोजीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या जगांतील कित्तेवजा असलेल्या लोकशाहीचा शुभारंभ झाला !

# प्रकरण २ रें.

## " जन्मवृत्तांत व अध्ययन "

शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते । –भगवद्गीता.

Every country is renewed out of the ranks of the unknown, not out of the ranks of those already famous and powerful and in control.

—Wilson 'New Freedom'

१८०७ सालची गोष्ट. अमेरिकेनें स्वातंत्र्य नुकतेंच मिळविलें होतें. विक्रमोर्वशीय नाटकांत म्हटल्याप्रमाणें स्वतंत्र अमेरिका या वेळीं 'मुग्धत्वस्य च यौवनस्य च मध्ये स्थिता' होती. अमेरिका स्वतंत्र झाली, आतां तिचें कसें होईल अशी नक्राचिंता करणाऱ्यांच्या डोळ्यांना तिचा उत्तरोत्तर होणारा उत्कर्षच पहावा लागत होता. त्यांच्या अपेक्षित इच्छेप्रमाणें अमेरिकेंत सर्वत्र अंदाधुंदी माजण्याऐवजीं सुव्यवस्थित प्रजासत्ताक राज्यपध्दति अमलांत येऊन जिकडे तिकडे नवीन नवीन शहरें वसविलीं जात होतीं. व्यापारधंदा उत्तरोत्तर वाढत होता. सांपत्तिक स्थिति उत्कर्ष पावत होती. अशा त्या १८०७ सालच्या वसंतांत स्वातंत्र्यधाम फिलाडेल्फिया बंदरांत एक बोट धक्क्यास लागली आणि तींतून एक युवकयुवतीची जोडी खालीं उतरली. असें म्हणतात कीं, कोकिल पक्षी हा वसंत ऋतु असेल तेथेंच वास करितो व तेथला वसंत ऋतु संपला कीं तेथून आपलें ठाणें उठवून दुसरीकडे जेथें वसंत ऋतु त्या वेळीं असेल तेथें जातो. त्याप्रमाणेंच हीं दुक्कल आयर्लंडांत स्वातंत्र्याचा वसंतागम होण्याचीं कांहीं चिन्हें दिसेनात म्हणून कीं काय तेथून अमेरिकेंत नशीब काढण्याकरितां आलीं होतीं. त्यांपैकीं त्या तरुण मनुष्याचें नांव जेम्स वुइल्सन असें होतें. तो धर्मानें प्रॉटेस्टंट शाखेचा असून स्वभावतः बुध्दिमान, चतुरस्त्र व हरहुन्नरी होता. यामुळें त्याला उद्योग लागण्यास फार काळ लागला नाहीं. इतकें साहस करून हजारो मैलांवरून आल्यावर लक्ष्मी तरी तेथें प्रतिवास कां करणार नाहीं ? फिलाडेल्फिया येथेंच लोकशाही पक्षाचें 'अरोरा' म्हणून एक वृत्तपत्र होतें. त्याच्या संपादकवर्गांत त्याला एक जागा मिळाली. याच ठिकाणीं आधल्याच शतकांत सुप्रसिध्द अमेरिकन लेखक बेंजामिन फ्रांकलिन हा आपल्या लेखनकौशल्यानें चमकून गेला होता. आतां तरुण जेम्सला गृहस्थाश्रमी व्हावें असें वाटूं लागलें, व त्यानें पूर्वीं ठरल्याप्रमाणें

आपल्याबरोबर सहचार करून आलेली ॲन ॲडॉन्स हिला आतां आपली सहचारिणी बनविलें. हें दांपत्य फिलाडेल्फिया येथें सुखानें राहूं लागलें. परंतु महत्वाकांक्षी मनुष्याचें मन श्ववृत्तिराख्यात नोकरीनें कसें समाधान पावेल? १८१४ त पेन्सिल्व्हानिया संस्थानापलीकडे ओव्हियो प्रान्तीं त्यानें छापखानेवाल्याचा स्वतंत्र धंदा सुरू केला. व लवकरच 'वेस्टर्न हेरल्ड' या नांवाचें वर्तमानपत्र काढलें. १८३२ मध्यें 'पेन्सिल्व्हानिया ॲडव्होकेट' नांवाचें दुसरेंही एक वर्तमानपत्र त्यानें काढलें ही दोनही पत्रें जेम्स व त्याचे मुलगे मिळून चालवीत. जेम्स विल्सन पुढें मोठ्या मान्यतेस चढला. तो मॅजिस्ट्रेट झाला व त्याला न्यायमूर्ति विल्सन असें संबोधिलें जाऊं लागलें.

जेम्स विल्सन यांस एकंदर सात मुलगे होते. त्यांपैकीं सर्वांत धाकटा जोसेफ यास प्रथम जेफर्सन कॉलेज व नंतर प्रिन्स्टन येथें उच्च शिक्षण मिळालें होतें. त्याचें अध्ययन पुरें झाल्यावर त्यास उपाध्येगिरी आणि शिक्षकी अशीं दोनही कामें करावीं लागलीं. स्टुबन–विले येथें शाळेंत शिक्षक असतां जेनेट वुड्रो नांवाच्या तरुणीशीं त्याची ओळख झाली. ओळखीचें रूपांतर स्नेहांत होऊन त्याची परिणति प्रेमांत झाली व १८४९त त्या दोघांचा विवाह झाला. जेनेट बाईचे वडील थॉमस वुड्रो हे रेव्हरंड असून १८३७ मध्यें स्कॉटलंडांतून सकुटुंब सपरिवार अमेरिकेंत आले होते. अनेक स्थलांतरें व कार्यांतरें करीत करीत जोसेफ विल्सन हे व्हर्जिनिया संस्थानांत स्टॉन्टन येथें सपत्नीक येऊन राहिले. व येथेंच १८२६ च्या डिसेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस त्यांना एक मुलगा झाला. कोणत्याही आनंदाचें अतिशयत्व वर्णन करावयाचें तर पुत्रजन्मानंदाची उपमा त्यास देतात. अशा ह्या आनंदराजाच्या सागरांत तें जोडपें पोहूं लागल्यास काय नवल? त्यांतल्या त्यांत स्त्रीस्वभावानुरूप जेनेटबाईंना तर आतां स्वर्ग चार बोटें उरल्यासारखा झाला. दोन मुलींच्या पाठीवर झालेला, आणि चांगला गर्चेंड्यासारखा मुलगा पाहून जेनेटबाईंना धन्य धन्य झालें. म्हटलेंच आहे, 'पुत्रोदये माद्यति का न हर्षात् ।' मुलाचें नांव काय ठेवावयाचें या बद्दल नवराबायकोंत भांडण उत्पन्न झालें ! पण स्त्रीहट्टापुढें कोणता हट्ट टिकेल ! शेवटीं हो ना करतां करतां मुलाचें नांव 'थॉमस वुड्रो विल्सन' असें आईकडील आजोबांच्या धर्तीवर ठेविलें गेलें. अमेरिकेच्या पहिल्या अध्यक्ष पंचकापैकीं चार अध्यक्ष वॉशिंग्टन, जेफर्सन, मॅडिसन आणि मनरो हे ज्या प्रांतांत जन्मले होते, त्या व्हर्जिनिया प्रान्तांतीलच एका गांवीं थॉमस वुड्रो विल्सन याचा जन्म झाला. हा ईश्वरी योगायोग आतां पटत आहे. परंतु त्या वेळीं त्या माउलीला या मुलाचे पाय पाळण्यांत खरोखरीच दिसले असतील काय ? हा चिमुरडा मुलगा पुढें अमेरिकेचा अध्यक्ष होईल व सर्व जगभर त्याचें नांव गाजेल याची थोडी तरी कल्पना त्या सामान्य स्त्रीला असती, तर तिला त्याचें

नंतर दहा वर्षेंपर्यंत मूल न झाल्याबद्दल विषाद वाटला नसता. परंतु पुढें १९१०त वुड्रो विल्सन न्यूजर्सी संस्थानाचे सुभेदार होईपर्यंत जी गोष्ट मोठमोठ्यांना सुद्धां कळली नाहीं, इतकेंच नव्हे तर 'पुरुषाचें भाग्य प्रत्यक्ष ईश्वरालाही कळत नाहीं' मग असलें निदान त्या यःकश्चित् स्त्रीला कसें होणार ? ती आपली त्याच्या मंनोरम बाललीलांत अनुपम स्वर्गसुखाचा अनुभव घेत होती.

अशा रीतीनें एका साधारण गरीबच अशा कुळांत टॉम चालूं बोलूं लागला. अद्वितीय व्यक्ति नेहमींच समाजाच्या गाळांतून चंद्रमौळी झोंपड्यांत निर्माण होत असतात. कमळें चिखलांतच जन्मून सर्व सरोवरास शोभा आणतात. टॉमचें घराणें पैशाच्या दृष्टीनें गरीब असलें तरी त्याच्या बापाच्या शरीरांत ऐरिश रक्त खेळत असून आई स्कॉच हाडमांसाची होती. व टॉममध्यें त्या दोहोंच्या मिश्रणानें बेफिकीर वृत्ति, बुद्धिमत्ता, शिस्त इत्यादि आनुवांशिक गुण उतरले होते. ऐरिश देशप्रीति आणि स्कॉच देवभक्ति हे गुण ही त्याच्यांत पूर्णपणें होते.

छोटा टॉम दोन वर्षांचा झाल्यावर तें सर्व कुटुंब जार्जिया संस्थानांत आगस्टा गांवीं येऊन राहिलें. हें शहर या वेळीं उद्योगधंद्यांत प्रसिद्धीस येऊं पहात होतें. या ठिकाणीं हें कुटुंब पुढील एक तप होतें. या अवधींत रेव्हरंड जोसेफ साहेबांनीं आपलें बस्तान चांगलें बसविलें. लहानगा टॉम शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें प्रतिदिवशीं वाढतच होता. एवढासा मुलगा, परंतु त्याची निरीक्षणशक्ति मोठी होती. तो चार वर्षांचा असतांना एक दिवस आपल्या घराच्या खिडकीशीं एकटाच खेळत होता, तेव्हां पुढीलप्रमाणें दोन मनुष्यांचा संवाद त्याच्या कानावर आला. एक दुसऱ्यास म्हणाला, " काय हो कळलें कां ? लिंकनची प्रेसिडेंटच्या जागीं निवडणूक झाली ! "

दुसरा उत्तरला, " होय कां ? मग आतां खास युद्ध होणार."

हे शब्द पुढें त्याच्या स्मरणांतून गेले नाहींत. खरोखरच युद्ध उद्भवलें आणि तें अत्यंत भयंकरही होतें. असंख्य जन–धनाचा संहार झाला. वेळ मोठी आणीबाणीची होती. दक्षिणेंतील संस्थानांना गुलामांचा व्यापार बंद व्हावयास नको होता. उलट उत्तरेकडील संस्थानें असला मानवी चारित्र्यास कलंक लावणारा गुलामांचा व्यापार बंद पाडण्यास त्यांना भाग पाडीत होतीं. याशिवायही एक कारण असें होतें कीं, दक्षिणेकडील संस्थानांना प्रत्येकाला हवे तसे आपआपल्या कायद्याप्रमाणें स्वैर वागण्यास पाहिजे होतें. म्हणून त्यांनीं संस्थानांच्या संघांतून फुटून आपलें एक निराळेंच मंडळ बनविलें होतें. या बेमुर्वतखोर, वेगळें निघूं पाहाणाऱ्या संस्थानांशीं उत्तरेंतील संस्थानें काळ्या गुलामांचा कैवार घेऊन लढत होतींच, परंतु त्याहीपेक्षां सर्व अमेरिकेभर एक सूत्रबद्ध राज्यपद्धति नांदावी आणि सर्वत्र शांतता व सुबत्ता असावी यासाठीं अवश्य असणारें सार्वत्रिक ऐक्य असावें हें त्यांचें विशिष्ट ध्येय होतें. अशा

तऱ्हेनें उत्तरदक्षिण ध्रुवाइतकें जवळपण दोघांच्याही ध्येयांत व धोरणांत असल्यानें युद्ध होणें अगदीं अपरिहार्य होतें. गुलामांचा व्यापार बंद निदान नियंत्रित होऊन सर्व संस्थानांचें संघटन व्हावें या मताचा लिंकन असल्यामुळें तो दक्षिण संस्थानांस फुटून जाऊन सवता सुभा स्थापूं देण्यास तयार नव्हता. सामोपचारानें नाहीं, तर दंडोपचारानें त्यांना वठणीस आणण्याची त्याची तयारी होती. १८६० मध्यें लिंकनची निवडणूक कायम झाली. अर्थातच १८६१मध्यें ही आपआपसांतील लढाईत सुरू झाली, व पुढें १८६५पर्यंत ही यादवी चालू होती. शेवटीं दक्षिण संस्थानांचा पूर्ण पराभव झाला आणि अमेरिकेचें ऐक्य कायम राखिलें गेलें. परन्तु कोण्या वेड्या पीरानें लिंकनवर गोळी झाडून त्याचा खून केला व वादळांत सांपडलेलें अमेरिकेचें तारूं सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणून सोडण्यासाठीं ज्या 'कॅप्टननें' आटोकाट प्रयत्न केले तोच तें जहाज किनाऱ्यास लागणार न लागणार तोंच कालवश झाला. या धामधुमीच्या काळानंतरही स्थिरस्थावर होण्यास बरींच वर्षें लागलीं. कारण वादळ चालूं असतांना तर बोलून चालूनच अस्वस्थता असते, परंतु तें बंद झाल्यावरही इकडे तिकडे सैरावैरा पसरलेल्या गोष्टी पुन्हा सुव्यवस्थित होण्यास बराच काळ जावा लागतो. या झटापटीच्या आणि त्यानंतरच्या उदासीनतेच्या काळांतच थॉमसचें लहानपण गेलें. विल्सन मंडळी पक्की दाक्षिणात्य होती, तरी त्यांनीं या युद्धांत सक्रिय असा कांहींही भाग घेतला नव्हता. आणि ते रहात असत त्या संस्थानाशींही या युद्धाचा संबंध कधींच आला नाहीं. नाहीं म्हणावयास १८६४ सालीं एकदां शेरमनचें सैन्य आगस्टा शहरास उजवें घालून गेलें होतें! ह्यामुळें छोट्या विल्सनला युद्धाच्या काय रम्य वार्ता ऐकण्यास मिळाल्या असतील तेवढ्याच. तरीही या एकंदर धाळमेलीचा त्याच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहणें अशक्य होतें. प्रत्यक्ष आगींत सांपडलें नाहीं, तरी दुरूनही आंच कांहीं कमी लागते असें नाहीं; आणि निदान युद्ध ही बाब तरी अशी आहे कीं, प्रत्यक्ष युद्धक्षेत्रापेक्षांही गरीब बिचाऱ्या दूरच्या लोकांसच तें जास्त भोंवतें; आणि लहानपणीं मनावर झालेले कोणतेही संस्कार वज्रलेप होतात, त्याप्रमाणें लहानग्या विल्सनच्या मनावर या अनिष्ट आपस—युद्धाचें घातुक परिणाम पाहून, खरोखरी ऐकूनच, जो पगडा त्या वेळीं बसला, त्याचेंच प्रत्यंतर ह्या युद्धापेक्षांही भयंकर 'महायुध्दा'च्या वेळीं पुढें दिसून आलें, आणि लिंकनच्या चारित्र्याचा ठसा त्याच्या त्या वेळच्या वर्तनांत थोडाफार दिसून आला. विल्सनच्या अन्तःकरणांत अगदीं शेवटपर्यंत लिंकनविषयीं फार आदरभाव वसत होता.

युद्धकाल म्हणून म्हणा अगर अन्य कांहीं कारणांमुळें असो, परंतु नवव्या वर्षापर्यंत टॉमला लिहितां वाचतां येत नव्हतें. म्हणजे त्याचे वडिल जोसेफ विल्सन यांनीं त्याच्या शिक्षणाची हेळसांड केली असें मात्र नव्हे. ते

स्वतः बुद्धिमान् म्हणून नांवाजलेले होते. “ पिता वैरी येन बालो न पाठितः ” हें त्यांस पूर्ण माहीत होतें. परंतु प्लेटोची विचारसरणीही त्यांस अवगत होती कीं, ‘नुसता जुलमाचा रामराम म्हणून कठोरपणानें मुलांस शिक्षणास लावूं नका; त्यांना ज्यांत गोडी वाटेल अशा विषयांत त्यांचें मन रमवून शिक्षणाचा सुलभ मार्ग त्यांस दाखवून द्या ’ आणि तीस अनुसरून टॉमचें मन मोठें व बुद्धि प्रगल्भ होईल अशा प्रकारें ते त्याशीं बोलत चालत असत, उत्तमोत्तम कादंबऱ्या व इतर गोष्टी ते त्यास तोंडी सांगत, खेड्यापाड्यांतून आणि आगस्टा येथील कारखाने, दुकानें वगैरेंतून आपल्याबरोबर ते त्यास फिरावयास घेऊन जात आणि विविध विषयांची प्रत्यक्ष माहिती ते त्यास करून देत असत. हाच क्रम पुढेंही चालू होताच; परंतु त्याच्या जोडीस म्हणून वयाच्या दहावे वर्षीं टॉमला स्थानिक पंतोजींच्या गांवठी शाळेंत पाटीवर घालण्यांत आलें. शाळेचे पंतोजी हे पूर्वी आपस युद्धाचे वेळीं शिपाईबुवा म्हणून दक्षिण संस्थानांच्या बाजूनें लढत होते. परंतु एका लढाईंत जाया झाल्यानंतर दक्षिण संस्थानांचें रक्षण करण्याचे सोडून ते शिक्षणाचें पवित्र कार्य चालवूं लागले व बंदूक टाकून देऊन त्यांनीं हातांत छडी घेतली. यांचें नामाभिधान ‘ डेरी साहेब’ असें होतें. त्यांच्या छडीच्या छत्राखालीं सुमारें चार वर्षें काढल्यावर सुदैवानें टॉमच्या वडिलांची बदली होऊन ते दक्षिण कॅरोलिना संस्थानांत कोलंबिया येथील शाळेंत धर्मशिक्षक झाले. अर्थातच टॉम वडिलांच्या शाळेंतच दाखल झाला. तेथें तो १८७४ सालपर्यंत चार वर्षें होता. परंतु या सर्व शिक्षणक्रमांत टॉम म्हणजे पुढें मागें अमेरिकेचा अध्यक्ष होईल किंवा त्याच्या तत्त्वज्ञानाचा आणि विद्वत्तेचा जगभर इतर बोलबाला होईल असें एकही लक्षण विशेषसें आढळून आलें नाहीं. शरीरानें चांगला मजबूत असल्यानें अंगमेहनतीचे व मैदानी खेळ तो खेळत असे. समुद्राची त्याला मनांतून आवड असे आणि लहानपणीं प्रत्येकाला जसें कांहीं तरी वाटत असतें, तसें त्यासही आपण दर्यावर्दी व्हावें असें वाटे. परंतु समुद्र म्हणजे काय असतें, हें आपल्याकडे जसें घाटावरील कित्येक लोकांना प्रत्यक्ष कांहीं ठाऊक नसतें तीच तऱ्हा अमेरिकेंतही कांहींची होत असल्यानें वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत टॉमनें समुद्र असा डोळ्यांनीं पाहिला नव्हता. त्याला रसायनशास्त्राची अगदीं आवड नसे. तथापि इतिहास, तत्त्वज्ञान आणि ललित वाङ्मय यांकडे त्याचा अत्यंत ओढा असे. तसेंच त्याला लेख लिहिणें, संभाषण करणें इत्यादि गोष्टींचीही आवड विशेष असे. एकंदरींत तो मध्यम विद्यार्थिवर्गांतच मोडण्यासारखा होता.

आतां विल्सन १६ वर्षांचा झाला होता आणि आजूबाजूंच्या राजकीय परिस्थितीचें निरीक्षण करून आपल्या मतांस धोरण लावण्याचें त्याचें वय होतें. या वेळीं अमेरिकेंतील दक्षिण संस्थानें लोकशाहीचीं तत्त्वें शक्य तोंपरि अमलांत आणून आपली पुनर्घटना करीत होतीं. विल्सनही या वेळीं आपल्या अल्प

बुद्धीचें विकसन करून मतांची मांडण मांडीत होता. अशा वेळीं त्याच्या वडिलांनीं त्यास डेव्हिडसन कॉलेजमध्यें घातलें. येथील शेवटची परीक्षा झाल्यावर त्यास प्रिन्स्टन युनिव्हर्सिटींत घालण्याचा त्यांचा बेत होता. परंतु विल्सनला येथील हवा मानवली नाहीं म्हणून विश्रांति घेण्यासाठीं तो आपल्या वडिलांच्या नोकरीच्या गांवीं एक वर्षभर राहिला. व याच विल्मिंग्टन् शहरीं त्यानें प्रथम समुद्रदर्शन घेतलें. डेव्हिडसन् कॉलेजमध्यें असतांना त्यानें अगदीं पहिल्यानेंच एका वादविवादांत भाग घेतला. विषय ' नियंत्रित राजसत्ताक पध्दतीपेक्षां प्रजासत्ताक पद्धति उत्तम' हा होता. विल्सन विरुद्ध बाजूनें बोलला, यावरून त्याला राजकारणाची आवड अगदीं प्रथमपासून होती हें दिसून येतें. १८७५ सालीं टॉमी प्रिन्स्टन विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा पास झाला. या परीक्षेंत एकंदर १३० विद्यार्थी पास झाले होते, त्यांत विल्सन बराच वर आला होता, परंतु विशेषसा चमकला नाहीं.

दुय्यम शिक्षण आणि उच्च शिक्षण यांमधील उंबरठा ओलांडतेवेळची संक्रमणावस्था प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यांतील एक अत्यंत महत्त्वाची बाब असते. आयुष्यांतील रंग पालटून टाकणारे जे कांहीं चार पांच प्रसंग असतात त्यापैकीं हा एक असतो. बेजबाबदार रम्य बालपण येथें संपून जड जोखमीचें तरुणपणचें जूं मानेवर येऊन बसतें. स्वतःचें म्हणून कांहीं विवक्षित ध्येय व मत बनविण्याची जबाबदारी या वेळीं पार पाडावयाची असते. आपलें कुटुंब हेंच विश्व ही भावना विकासित होत होत विश्व हेंच एक कुटुंब अशी व्यापक दृष्टि प्राप्त होते. पुढील आयुष्याच्या इमारतीचा पाया या काळीं बांधून काढावयाचा असतो. अशा परिस्थितींत टॉम विल्सन येऊन पोंचला होता. मात्र त्यानें तिचा पूर्ण फायदा घेतला असें दिसतें. इतिहास व राजकारण याकडे त्याचें विशेष लक्ष असल्यानें त्या विषयावर लेखन व वाचन त्यानें बरेंच केलें. बर्क, मेकाले व ब्रोहाम हे त्याचे आवडते ग्रंथकार होते. वादविवादांतही तो नेहमीं भाग घेत असे आणि त्याचें वक्तृत्व इतकें अचूक व उत्कृष्ट होतें कीं पुढें पुढें दरसाल होणाऱ्या वादविवादाच्या सामन्यांत बक्षीस त्याचेंच ठेवलेलें असे ! एक वर्षीं मात्र तें बक्षीस त्यास मिळालें नाहीं. प्रिन्स्टन विश्वविद्यालयातर्फे वादविवादासाठीं उमेदवार दरसालप्रमाणें तोच होता. बक्षीस कोणास मिळणार याबद्दल कोणासच शंका नव्हती, इतकी विल्सन याची ख्याति होती. त्या दिवशींचा विषय 'खुलाविरुद्ध संरक्षक व्यापार' हा होता. कोणी कोणती बाजू घ्यावयाची हें चिठ्या टाकून ठरविण्यांत येणार होतें. सायंकाळची वेळ होती. एका टोपीमध्यें चिठ्या टाकून ती गर्कन फिरविण्यांत आली. गल्लतींतून विल्सननें एक चिठ्ठी उचलली, त्यानें ती वाचली व टरकन् फाडून टाकिली आणि त्या दिवाणखान्यांतून तो निघून गेला. चिठींत ' संरक्षक व्यापार ' असें लिहिलें होतें. विल्सन तर खुल्या व्यापाराचा

पक्का पुरस्कर्ता आणि म्हणून आपल्या मताविरुद्ध, केवळ वादविवादासाठीं असलें म्हणून काय झालें, बोलण्यास तो तयार नव्हता. आयत्या वेळीं दुसरा कोणी उमेद्वार मारून मुटकून तयार करण्यांत आला, परंतु त्या सालीं प्रिन्स्टन कॉलेजला बक्षीस मिळालें नाहीं. या एकाच गोष्टीवरून विलसनची मताची खंबिरी, सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध न वागण्याचें व्रत इत्यादि सद्गुण दिसून येतात.

लेखन हाही त्याचा आवडता व्यासंग होता. त्याच्या कॉलेजचें मासिक ‘ प्रिन्स्टोनिअन ’ याचा तो संपादक होता. १८७९ सालीं विल्यम पिटवरील त्याच्या निबंधाला बक्षीस मिळालें होतें. याच सालीं त्यानें जॉन ब्राईट व ग्लॅड-स्टन यावरही लेख लिहिले, ते पुढें व्हार्जिनिया युनिव्हर्सिटीच्या मासिकांत प्रसिद्ध झाले. ‘ संयुक्त संस्थानांतील मंत्रिमंडळ ’ हाही लेख ह्याच सालीं आगस्टमध्यें त्याच्या नांवावर इंटर नॅशनल रिव्ह्यूसारख्या भारदस्त मासिकामध्यें प्रसिद्ध झाला. या एकाच गोष्टीवरून या बिनपदवीधर व तरुण लेखकाच्या विचार-शक्तीची, व्यासंगाची आणि निश्चित मतांची पारख होण्याजोगी आहे. विलसन-चा स्वभाव मोठा कांटेकोर होता. दडपश्चमे अगर अदमासपंचे पद्धति त्यास संमत नव्हती. कोणत्याही गोष्टीचा तो पुरा पिच्छा पुरवीत असे. या त्याच्या इतर व्यापामुळें परीक्षांसाठीं करावयाचा अभ्यास त्याचेकडून तितका होत नसावा असें दिसतें. कारण पद्वीपरीक्षेंत ( A. B. ) त्याच्या बरोबर एकंदर बेचाळीस जण ऑनर्समध्यें आले. त्यांत त्याचा नंबर शेवटून दुसरा होता. परीक्षांच्या निकालावरून कोणी किती वाचलें अगर कोणाचें किती ज्ञान आहे हें तार-तम्यानें कदाचित ठरवितां येईल, परंतु विद्वत्तामापनाचें खरें गमक तें नव्हे. बुध्दिपोषणाइतकेंच देहपोषणाकडेही विलसन यानें लक्ष पुरविल्याचें दिसून येतें. याचें कारण शेवटल्या वर्षी त्याची उंची ५ फूट ११ इंच व वजन १५६ पौंड असल्याचें नमूद आहे.

जनरीतीप्रमाणें विलसन आतां पद्वीधर झाल्यामुळें त्याचे वडील एका प्रकारें त्याच्या जबाबदारींतून मुक्त झाले होते. आतां त्यानें आपल्या पायावर उभें राहणें अवश्य होतें. प्रत्येक नवीन पद्वीधरापुढें ‘ पुढें काय ’ हा प्रश्न भुता-प्रमाणें उभा राहिलेला असतो, त्याप्रमाणें तो विलसनपुढेंही होता. त्याची घरची सांपत्तिक स्थिति उत्तम नव्हती. इतकेंच काय तर कॉलेजचें शिक्षणच पुरें करण्यास त्यास फार श्रम पडले होते. डेव्हिडसन् कॉलेजमध्यें असतांना विलसन हे लाकूड फोडणें, पाणी काढणें, कपडे धुणें, खोली झाडणें, दिवाबत्ती-करणें वगैरे स्वतःच्या सर्व गोष्टी स्वतःच करीत असत आणि त्यांचा वर्षाचा खर्च साधारणपणें ३५० रुपयांपेक्षां जास्त नसे. परंतु पैशाचा प्रश्न जरी सुटला नव्हता, तरी ‘पुढें काय’ हा प्रश्न त्यानें परीक्षेच्या अगोदरच सोडवून टाकिला होता. वकिली करण्याचें त्यानें ठाम ठरविलें होतें व त्याप्रमाणें कायद्याच्या अभ्यासा-

कारितां तो व्हर्जिनिया युनिव्हार्सिटींत दाखलही झाला. परंतु सहा वर्षांपूर्वीप्रमाणें याही वेळीं त्याच्या प्रकृतीनें त्यास दगा दिला आणि १८८१ चें सबंध वर्ष त्यानें केवळ घरीं बसून काढलें. यापुढें शिकण्याचा नाद सोडून देऊन त्यानें वकिलीसाठीं जार्जिया संस्थानची राजधानी अटलांटा येथील मार्ग धरिला व तेथें रेनिक नांवाचा एक पातीदार घेऊन फर्म काढली. नांवाची जंगी पाटी लटकावून तो अशिलांची वाट पहात रोज बसूं लागला. दिवसामागून दिवस गेले, वर्ष लोटलें तरी ह्या नवथर वकीलाकडे कुळें येण्याचें चिन्ह दिसेना. वास्तविक वकीलीच्या धंद्याला लागणाऱ्या गुणांपैकीं ओंषधाला एकही गुण विल्सनमध्यें नव्हता. अशिलांचें आराधन करण्यास लागणारा लाघवी आर्जवीपणा, सत्यासत्याविषयीं बेदरकार वृत्ति, बुद्धीची वक्रता आणि कामापेक्षां दामैकदृष्टि हे गुण (!) विल्सनमध्यें मुळींच नव्हते. शेक्सपीयरनें 'व्हेनिसचा व्यापारी' या नाटकांत लिहिल्याप्रमाणें 'गोष्ट कितीही असत्य आणि घाणेरडी असली तरी तिचें तें दुष्ट स्वरूप मायावी मोहक भाषणांत झांकून टाकण्याची कायदेबाज कला त्याच्या अंगीं नव्हती. त्याचा आवडता ग्रंथकार ब्रोहाम याची, 'अशीलाची शत्रूच्या हातची दौलत सोडवून ती स्वतःच्याच घशांत टाकणारा तो वकील' ही व्याख्या त्याच्यांत मुरली नव्हती. अजून तो पापभीरू होता. रस्किननें 'आधीं दाम मग काम' (Fee-first men) या वर्गांत डॉक्टर व वकील यांस बसविलें आहे. इतका निगरगट्टपणाही त्याच्यांत नव्हता. मग एवंगुणविशिष्ट असा जर तो नव्हता तर त्याची वकिली कशी चालावी! पुढें एक काल ज्याच्याकडे सर्व जगाची वकिली येणार होती तो या वेळीं वकिलीच्या धंद्यास नालायक ठरला! त्याची वकिलीच्या धंद्याविषयींची पूर्व कल्पना सपशेल चुकीची ठरली. खरोखर त्याचा नैसर्गिक कलही इतिहास आणि राजकारण यांकडेच होता. आतां त्यानें आपलें लक्ष पुन्हां तिकडे वळविलें. कर्मधर्मसंयोगानें बाल्टिमोर येथें सुप्रसिद्ध 'जॉन्स हॉप्किन्स' युनिव्हर्सिटींत त्यास दोन वर्षांची फेलोशिपही मिळाली. अर्थशास्त्र व इतिहास या विषयांचा त्यानें जारीनें अभ्यास सुरू केला. शिवाय पुढील आयुष्यांत उत्कृष्ट इंग्रजी वक्ता म्हणून त्याची जी नांवाजणूक झाली, त्याची सर्व तयारी त्यानें येथें केली. १८८५ सालीं, त्यानें 'ब्रिनमार' या स्त्रियांच्या विद्यालयांत अध्यापकाची नोकरी पत्करिली. पुढील सालीं त्यानें (Congressional Government) या नांवाचा विद्वत्तापूर्ण निबंध लिहून Ph. D. ही पदवी मिळविली. १८८८ पर्यंत तो 'हॉप्किन्स' युनिव्हार्सिटी आणि 'ब्रिनमार' कॉलेज येथें एकाच वेळीं शिकवीत असे. परंतु त्या वर्षीं त्याची 'वेस्लिन' युनिव्हर्सिटींत अर्थशास्त्र व राजकारण या विषयाच्या प्रोफेसरचे जागीं नेमणूक झाली. परंतु येथेंच ही प्रगति न थांबतां १८९० सालीं जेथें त्यानें अध्ययन केलें होतें, त्या 'प्रिन्स्टन' युनिव्हार्सिटींतच अध्यापन करण्याची त्यास संधि मिळाली,

व येथून पुढें २० वर्षें वुड्रो विल्सन हे याच युनिव्हर्सिटींत कायदेशास्त्र आणि राजकारण हे विषय शिकवीत असत. अशा रीतीनें विल्सन यांची आयुष्य-नौका अनेक प्रकारचे गोते खात खात शिक्षणक्षेत्रांत एकदांची स्थिर झाली. तो नालायक वकील ठरला, पण नमुनेदार शिक्षक म्हणून त्याची इतकी प्रसिद्धि झाली कीं पुढें सर्व जगाला त्यानें राजकारणाचे धडे शिकविले!

आयुष्याच्या अथांग सागरांत थरथरणाऱ्या तारूला स्थिरत्व देणारे नांगरदोर म्हणजे विवाह होय. यामुळें कदाचित् पुढील प्रवासांत तितका चलाखपणा दिसून येत नसेल, परंतु त्या व्यक्तीचें आसन मात्र डळमळीत रहात नाहीं. विवाहित मनुष्यावर पडलेल्या जबाबदारीनें तो स्थिरचित्त होऊन एक प्रकारें त्याच्या आयुष्यास निश्चितता येते. अविवाहित मनुष्य हा अपूर्ण असतो आणि अपूर्णावस्थेंत जरी काव्य असलें, तरी तें बोलून चालूनच उच्छृंखल आणि भावनामय असल्यानें त्याला कोणता तरी पायबंद लावून ठाणबंद करणें भावी आयुष्याच्या दृष्टीनें अवश्य असतें. आणि ही गोष्ट ज्या विवाहानें साधते, तो विवाह विल्सन यानें १८८५ सालींच उरकून घेतला होता. आगस्टा येथें एलेन लुई ॲक्सन नांवाच्या तरुणीशीं त्याचा परिचय झाला होता. तिजशींच त्यानें त्या वर्षाच्या जून महिन्यांत लग्न लाविलें. कार्लाईलनें ‘बायको म्हणजे वेळीं अवेळीं आपणांस शहाणे व सुज्ञ म्हणणारी एक सत्तेची व्यक्ति’ अशी व्याख्या केली आहे. ती विल्सन यांच्या बाबतींत किती साधली कोण जाणे! परंतु या दंपत्यानें पुढील जवळजवळ ३० वर्षें सुखांत काढलीं. १९१४ च्या आगस्टमध्यें विल्सन हे अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर आतां आपली जगण्याची इतिकर्तव्यता झाली असें जाणून कीं काय विल्सन यांची पत्नी हा लोक सोडून गेली. या कुटुंबापासून त्यांस तीन मुली झाल्या. मुली आणि बायको यांच्या प्रेमळ सहवासांत पुढील जीवनक्रमांत विल्सन हे बाहेरील सर्व त्रासिक धकाधक विसरून जात.

१८९० सालीं वयाच्या चौतिसाव्या वर्षीं प्रिन्स्टन येथें स्थायिक होण्यापूर्वीं त्यांस फार उमेदवारी करावी लागली हें खरें; परंतु दरम्यानच्या अवधींत त्यांनीं आपला अभ्यास बराच परिणतावस्थेस नेऊन पोंचविला होता; व बरेच ग्रंथही लिहिले होते. आणि त्यांची त्यामुळें जी प्रसिद्धि झाली होती, तिचेंच फळ म्हणजे प्रिंस्टन युनिव्हर्सिटींत त्यांना शिक्षकाची जागा मिळाली हें होय. शिक्षणाचा धंदा एकमार्गी असल्यानें आतां त्यांना आपल्या आवडत्या विषयावरील व्यासंग एकतंत्री व अनिरुद्धपणें करण्यास फुरसत मिळूं लागली. त्यांनीं कोणकोणते ग्रंथ लिहिले, त्याचें विवेचन पुढील एका प्रकरणांत होणारच आहे. परंतु आयुष्याच्या उत्तरार्धाचे शेवटीं त्यांनीं जगाच्या रणांगणावर येऊन जें शौर्य गाजविलें त्याचें बीज त्या अर्धाच्या सुरवातींतच आहे. या वेळीं जेथें हल्ला करितां येईल अशा नाजूक माऱ्याच्या जागा त्यांनीं हेरून ठेविल्या. विल्सन

हे स्वतः जरी जनसंमर्दापुढें फारसे कधीं आले नाहींत तरी त्यांची कीर्ति त्यांच्या पुढें स्वैर संचार करीत धांवत होती. १९०२ सालीं या कीर्तीनें प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षस्थानापर्यंत दौड मारिली, १९१० मध्यें ती 'न्यूजर्सी' संस्थानच्या गव्हर्नर पदापर्यंत पोंचली आणि नंतर दोनच वर्षांनीं तिनें आपली पराकाष्ठा करून अमेरिकेच्या अध्यक्षाचें तक्त गांठलें. या प्रवासांतील त्या त्या मुक्कामावर तिनें आपल्या यजमानाची प्रतिष्ठापना करविली. विल्सन यांच्या सार्वजनिक चरित्रास प्रत्यक्ष प्रारंभ १९१० सालीं 'न्यूजर्सी'चे सुभेदार झाल्यावर—फार लौकर म्हणजे१९०२ सालीं प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष झाल्यावर—झाला असें म्हणतां येईल. त्या अलीकडे तो ओढतां येत नाहीं. परंतु प्रत्यक्ष ज्वालामुखीचा स्फोट झालेला दिसण्यापूर्वी ज्याप्रमाणें कांहीं काल लाव्हा आंत शिजत असतो त्याप्रमाणें १८९० ते १९०२ मधील एक तपाचा काल वरून अगदीं बिनघडामोडीचा दिसला, तरी तो सार्वजनिक चरित्राच्या गर्भधारणेचा अत्यावश्यक आणि अतिशय महत्त्वाचा असा इष्ट काल होता हें विसरून चालणार नाहीं.

विल्सन यांच्या प्रिन्स्टन येथील एकंदर वीस वर्षांपैकीं पहिलीं १२ वर्षें तेथील यंत्राचा एक अवयव यापलीकडे त्यांच्यावर विशेष जबाबदारी नव्हती. परंतु १९०२ मध्यें त्यांना त्या युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष नेमण्यांत आल्यानें तें यंत्र चालविण्याची जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली.

प्रोफेसर या नात्यानें ते 'विद्यार्थि—प्रिय' होते असें एका शब्दांत सांगतां येईल. विद्यार्थ्यांचे ते आवडते शिक्षक होते, आणि त्यांनाही विद्यार्थी आवडत असत. त्यांचें घर विद्यार्थ्यांना केव्हांही यावयास मोकळें असे, या मुक्तद्वाराचा फायदाही विद्यार्थी घेत असत. प्रत्येक विद्यार्थ्याची विशेष माहिती त्यांस असे. १९०२सालीं जेव्हां त्यांना युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष निवडण्यांत आलें, तेव्हां त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्याकरितां खूप विद्यार्थी नाचत, गात, टेंभे पाजळीत, रात्रीं नऊचे सुमारास विल्सन यांचे घराकडे आले. ही सेना पाहतांच विल्सन हे दार उघडून बाहेर आले आणि त्यांनीं त्या चांदण्याचे वेळीं थोडेसेंच परंतु चटकदार भाषण केलें. त्यांत शिक्षणकार्याचें पावित्र्य, विद्यार्थी व अध्यापक यांवरील तत्संबंधी जबाबदारी याचें त्यांनीं अल्प शब्दांत इतकें गंभीर चित्र उभें केलें कीं, हर्षोन्मादानें नाचत उडत आलेले विद्यार्थी जातांना अगदीं शांतपणें व चिंतनयुक्त मनःस्थितींत निघून गेले. विल्सन वर्गांत शिकवावयास आले म्हणजे विद्यार्थ्यांस त्यांचेविषयीं एक प्रकारचा आदरयुक्त दरारा वाटे. त्यांची ती भव्य मूर्ति, रुंद कपाळ, तेजस्वी डोळे, सरळ नाक, वाघासारखा चौकोनी जबडा आणि गंभीर आवाज यांच्या जोडीला, त्यांचें कोणत्याही विषयांतील सांगोपांग खोल ज्ञान, उदात्त व समयोचित भाषा, अस्खलित वक्तृत्व आणि मुग्ध विनोद यामुळें त्यांचीं व्याख्यानें फार परिणामकारक होत. त्यापासून ज्ञान व आनंद

या दोहोंचीही प्राप्ति विद्यार्थ्यांना होत असे. तरी सुद्धां कायदेशास्त्रासारखा विषय असला म्हणजे विल्सन यांनीं आपलें कितीही पांडित्य दाखविलें आणि विषय मनोरंजक करण्याची कितीही पराकाष्ठा केली, तरी विशीपंचविशीच्या सुमाराचे विद्यार्थी वर्गामध्यें अर्धवट सुप्तावस्थेमध्यें असत. एकदां ही गोष्ट त्यांच्याही लक्षांत आली. व्याख्यान संपल्यावर आपलीं टिपणें गोळा करीत विद्यार्थ्यांस ते म्हणाले " हा विषय रुक्ष नसून रुक्ष कोणी असेल तर ते तुम्हीच आहां !"

अशा रीतीनें बारा वर्षे निघून गेलीं. १९०२ सालीं युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ. फ्रॅन्सिस पॅटन यांनीं राजीनामा दिल्यामुळें ती जागा मोकळी झाली. त्या जागेवर बसण्यास लायक म्हणून सर्वांचे डोळे विल्सन यांचे कडेसच वळले. त्यांचे लेख व व्याख्यानें यांनीं त्यांची लायकी सिद्ध केलीच होती. शिवाय जॉन्स हॉपकिन्स प्रभृति तीन चार युनिव्हर्सिट्यांनीं त्यांस L. L. D. ची पदवी अर्पण केली होती आणि सुप्रसिद्ध 'येल' युनिव्हर्सिटीनें D. Lit. ची पदवी त्यांस दिली होती. त्यामुळें त्यांची शिक्केशीर लायकीही सिद्ध होती. आजपर्यंत प्रेसबिटेरियन पंथाच्या उपाध्यायाशिवाय कोणाही सामान्य मनुष्यास ही जागा मिळाली नव्हती, ती अपूर्व गोष्ट विल्सन हे प्रिन्स्टनचे अध्यक्ष झाल्यानें घडून आली. तेथून त्यांच्या खऱ्या सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# प्रकरण ३ रें.

## प्रोफेसर विल्सन

सम्यग् व्यवसिता विद्या प्रबोधविनयाविव । —रघुवंश ।

Education has this useful effect that it narrows of necessity the circles of one's egoism...... The only use of education is to open the understanding to comprehend as many things as possible.

—'New Freedom' W. Wilson.

सार्वजनिक आयुष्य हेंच विल्सन याचें ध्येय होतें; आणि राजकारण हाच त्यांचा धंदा होता. देशांतील प्रचलित प्रश्नांवर जबाबदारीचें चर्चा करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती; आणि समाजांत पुढें येणें एवढीच त्यांची सात्त्विक

मनीषा होती. तरुणपणीं ज्या आकांक्षा हृदयाशीं बाळगिल्या, त्या शिक्षण आणि ईश्वरदत्त देणग्या यांमुळें वृद्धिंगतच झाल्या होत्या. निश्चितार्थापासून सुखासुखी विराम पावण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. त्यांनीं ' प्रिन्स्टन ' युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षाची जागा पतकरून कांहीं काल राजकारणावर बोलणें वर्ज्य केलें. तथापि त्यांची दृष्टि सदैव राजकारणाच्या ध्रुव ताऱ्यावर अढळ होती. आजपर्यंत युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी मंडळांतसुद्धां विल्सन नव्हते. ते केवळ एक भाडोत्री अध्यापक होते. तेच विल्सन यापुढें दहाच वर्षांत अमेरिकेचे अध्यक्ष व्हावयाचे असा दैवी संकेत होता व त्याची पहिली पायरी ' प्रिन्स्टन ' युनिव्हर्सिटीचें अध्यक्षपद ही होती !

अमेरिकेंतील ज्या चारपांच पुरातन युनिव्हर्सिट्या आहेत, त्यांत 'प्रिन्स्टन' ची गणना होते. ' हारवर्ड ' 'येल' व 'विल्यम मेरी' यांच्यामागून सन १७४६ सालीं ही युनिव्हर्सिटी स्थापन झाली. प्रथम ही एक केवळ धार्मिक संस्था होती आणि त्यामुळें कित्येक वर्षेंपर्यंत तिचे अध्यक्ष प्रेसबिटेरियन, प्राटेस्टंट पंथांतील धर्मोपदेशकच निवडले जात. ही पद्धति आतां आतां एकोणिसाव्या शतकाचे अखेरीपर्यंत चालू होती. कालाच्या दृष्टीनें जशी ही युनिव्हर्सिटी पुरातन आहे, त्याप्रमाणें इतिहासाचीही परंपरा तिच्यामागें आहे. स्वातंत्र्य–युद्धाचे वेळीं वॉशिंग्टनच्या सैन्यानें येथें एकदां मार खाल्ला होता. आणि त्याच्या खाणाखुणा युनिव्हर्सिटीच्या इमारतीवर अद्यापही दिसून येतात. १७८३ ची कांग्रेस येथेंच भरली होती आणि येथेंच वॉशिंग्टननें आपल्या सैन्यास निरोप दिला. ही युनिव्हर्सिटी ' न्यू जर्सी ' संस्थानांत असून विशेषतः दक्षिण संस्थानांतले विद्यार्थी येथें येतात. ही सर्वस्वीं राष्ट्रीय युनिव्हर्सिटी आहे. ऑक्सफोर्ड, केंब्रिज वगैरे युनिव्हर्सिट्यांचा दिमाख आणि वैभव येथें असून शिवाय अमेरिकेचा सधनपणाही येथें दिसून येतो. येथून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी असून ते सधन असल्यानें मोठमोठ्या देणग्या देतात. युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत पांचसहाशें एकर जमीन असून ' मिलेटोन ' नदी शेजारून वाहात आहे. उंच उंच ओक वृक्षांच्या दाट राया, विस्तीर्ण मैदानें व टेकड्या इत्यादींनीं सृष्टिसौंदर्य खुलविलें आहे. दानशूर कर्ण मि. कार्नेजी यांच्या देणगींतून नदी अडवून तीन चार मैल लांबीचें एक सरोवर तयार केलें आहे. अशा या निसर्गसुंदर रमणीय प्रदेशांत, युनिव्हर्सिटीच्या भव्य इमारती, विद्यार्थ्यांचीं वसतिगृहें आणि रसायनशाला ठिकठिकाणीं बांधिल्या आहेत. या प्राचीन आणि श्रीमंत युनिव्हर्सिटीला लोकांत फार मान आहे. त्यामुळें तेथील अध्यक्ष व अध्यापक यांचाहि समाजांतील दर्जा फार उच्च समजला जातो.

अमेरिकन युनिव्हर्सिट्या ह्या स्वयंतन्त्र आहेत. त्यांच्यावर सरकारचा ताबा

चालत नाहीं. एकाद्या भांडवलवाल्या कंपनीप्रमाणें त्यांना देणग्या देणारे श्रीमंत आश्रयदाते हेच जवळ जवळ त्यांचे मालकच असतात. त्यांचें एक मंडळ असतें व तें सर्व कारभार चालवितें. अध्यक्ष हा मॅनेजिंग डायरेक्टराप्रमाणें असतो. इतर सर्व लोक आपआपल्या धंद्यांत गुंतलेले असल्यामुळें ते आपल्यातर्फे एक स्वतंत्र जबाबदार मनुष्य अध्यक्षस्थानीं निवडतात. युनिव्हर्सिटी एक बडें संस्थानवज. असल्यामुळें तिचा प्रमुख जो अध्यक्ष त्याचा थाटही संस्थानिकाप्रमाणें असतो. शाळा व कॉलेजें मिळून पांच सहा हजार विद्यार्थी त्याच्या ताब्यांत असतात- राजेशाहीं मालमत्तेचा तो वहिवाटदार असतो आणि त्याचें बौद्धिक वर्चस्व, पूर्व कालीन आर्य कुलपतींप्रमाणें असल्यामुळें त्याचा दरारा मोठा, अधिकार अनियंत्रित आणि रुबाब दरबारी असतो. देशांतील सामाजिक, नैतिक आणि बौद्धिक प्रश्नां-वरील त्याच्या मतांना फार मोठी किंमत असते. "हारवर्ड, येल, कार्नेल आणि प्रिन्स्टन येथील अध्यक्षांना लोक जितकामान देतात तितका देशांतील मोठमोठ्या धनाढ्यांनाहि मिळत नाहीं" असें व्हायकाऊंट ब्राइस यांनीं आपल्या 'अमेरिकन कॉमनवेल्थ' या ग्रंथांत लिहिलें आहे. ते पुढें लिहितात "संस्थेचा कारभार आणि प्रोफेसरांची निवड यांतील अध्यक्षाचे अधिकार इतर देशांतील कोणत्याही युनि-व्हर्सिटीच्या अध्यक्षापेक्षां जास्त आहेत. अशी ही महत्त्वाची, मानाची आणि जबाबदारीची जागा जी आजपर्यंत साध्या प्रोफेसराला मिळाली नव्हती, ती विल्सन यांना देण्याचा मोह युनिव्हर्सिटीच्या चालकांना आवरला नाहीं. विल्सन यांचें विद्यार्थ्यांवरील वजन आणि त्यांचा समाजांतील लौकिक यांनींच त्यांची बाजू उचलून धरिली होती. त्यांचे वैयक्तिक स्नेही असले तरी फार थोडे होते, परंतु त्यांच्या विद्वत्तेनें कांहींना त्यांचे हितचिंतक बनविलें होतें. या सर्वांचा परिणाम होऊन रिकामी झालेली जागा विल्सन यांस देऊं करण्यांत आली व त्यांनींही आपली महत्त्वाकांक्षा पुरी करण्याची आणि आपल्या मतांचा पुरस्कार करण्याची चालून आलेली संधि साधली. आजपर्यंत त्यांनीं आपलीं मतें नुसतीं व्याख्यानांतून सांगितलीं व लेखांतून लिहिलीं होतीं. आतां तीं कृतींत उतरविण्याची आयती सत्ता त्यांच्या हातांत आली आणि त्यांनीं तिचा पूर्ण उपयोग करण्याचें ठरविलें.

डॉ. विल्सन यांचे शिक्षणविषयक विचार राजकीय विचारांप्रमाणेंच ठाम बनलेले होते. शिक्षणाकडे वैयक्तिक दृष्टीनें न पहातां, ते सामुदायिक दृष्टीनें पहात. शिकागो येथील शिक्षणपरिषदेंत त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, "व्यक्तीला उदरभरणासाठीं जरी शिक्षण पाहिजे असतें तरी त्याच वेळीं राष्ट्रीय हिताकडेही नजर देणें जरूर आहे. आणि त्या दृष्टीनेंच शिक्षणाची दिशा ठरविली पाहिजे. शिक्षण-संस्था या अगदीं स्वतंत्र असल्या पाहिजेत आणि त्यांनीं समदृष्टीनें सामान्यतः शिक्षणाचें धोरण ठरविलें पाहिजे. कोणाच्याही आहारीं न जातां राष्ट्रीय शिक्षण देणें हेंच युनिव्हर्सिटयांचें कर्तव्य आहे."

१८९४ सालीं लिहिलेल्या आपल्या एका लेखांत ते लिहितात कोणत्याही राष्ट्राचे मनोधर्म, इतिहास, परंपरा आणि ध्येयें यांचे ज्यांत यथातथ्य दिग्दर्शन केलें असेल तें वाङ्मय, आणि ज्या संस्थांनीं त्या राष्ट्राला अभ्युदयाला चढवून त्यास स्वातंत्र्य आणि शिस्त प्राप्त करून दिली असेल त्यांचा इतिहास, या दोहोंचाही ज्या शिक्षणसंस्थेच्या अभ्यासक्रमांत प्रामुख्यानें अंतर्भाव करण्यांत आला असेल तीच खरी राष्ट्रीय शिक्षण–संस्था होय. विद्यार्थ्यांच्या मनांत राष्ट्रीय आकांक्षा आणि नागरिकत्वाची कल्पना आणून देण्यास यासारखें दुसरें साधन नाहीं. यासाठीं जीं पुस्तकें नेमावयाचीं, तीं त्याच देशांतील थोर पुरुषांनीं प्राचीन संस्थांची यथास्थित माहिती करून घेऊन लिहिलेलीं अशींच असलीं पाहिजेत. विल्सन यांचा मुख्य कटाक्ष अलीकडे जी एक स्वत:विषयीं भलती समजूत करून घेऊन उथळ ज्ञान असलेल्यांनीं अकालीं पुस्तकें लिहिण्याची, वृथाडंबराची प्रवृत्ति पडत चालली आहे त्यावर असे. “ शिक्षणसंस्थाचें ध्येय विद्यार्थ्यांना केवळ स्वपोषणास उपयुक्त अशा एकाद्या धंद्यांत प्रवीण करणें हें नसून, उत्तम नागरिकांचीं कर्तव्यें पार पडण्यास त्यांस समर्थ करणें हें आहे. त्यांचीं मनें मोठीं झालीं पाहिजेत, त्यांचे विचार उदात्त झाले पाहिजेत; आणि त्यांना शिस्त लागली पाहिजे; तरच शिक्षणसंस्थांनीं आपलें कर्तव्य केलें असें होईल. शिक्षणक्रमांत, पूर्वजांचा सर्वांगीण इतिहास, व अभिजात वाङ्मय याबरोबरच गणिताचाही अंतर्भाव झाला पाहिजे. जगांत निश्चयानें आणि विवेकपूर्वक वागण्याची विद्यार्थ्यांच्या मनाला खंबिरी यावी यासाठीं गणिताची कसरत अवश्य आहे. ” असें त्यांनीं १९०२ सालीं प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष झाल्याबरोबर जें भाषण केलें त्यांत म्हटलें आहे.

शिक्षणसंस्थांतून उच्चनीच भेदाभेद पार नष्ट झाला पाहिजे असें त्यांचें मत होतें. बारा वर्षांच्या प्रोफेसरगिरींत शिक्षणक्रम व व्यवस्था यांतील दोष त्यांनीं बरोबर ताडिले होते आणि ते नाहींसे करण्यास त्यांनीं आतां कंबर बांधली. प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी कशी असावी याबद्दलची त्यांचीं स्वत:चीं मतें अगदीं पूर्ण होतीं. आणि ध्येयसृष्टि तंतोतंत अमलांत येण्याच्या कामीं असलेल्या अडीअडचणींचाही त्यांनीं योग्य विचार केला होता. राष्ट्रीय युनिव्हर्सिटीच्या स्वरूपाविषयीं त्यांच्या कल्पना उच्च होत्या. ते म्हणत, “ आपले खाजगी उद्देश तडीस नेण्यासाठीं प्रिन्स्टनचा उपयोग करण्यास आपणांस अधिकार नाहीं. राष्ट्राच्या बौद्धिक व नैतिक गरजा भागविणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. ” या सर्व विचारांत थोडा तरी सत्यांश आहे इतकें धरून चाललें तर प्रिन्स्टन युनिव्हर्सिटी सुधारण्याला त्या काळीं पुष्कळच वाव होती. युनिव्हर्सिटी सर्वस्वीं नाहीं तरी बऱ्याच अंशीं संपत्तिवाल्यांच्या हातांतील खेळणें झाली होती. बडे बापके बेट्यांच्याच केवळ उपयोगाची ती होऊन राहिली होती. सुस्तपणा आणि

स्वच्छंदीपणा यांचे विद्यार्थ्यांत साम्राज्य माजून राहिलें होतें. बौद्धिक दर्जा फारच खालावला होता. या सर्वांचा नायनाट करून खालपासून वरपर्यंत नवीन रचना करणें अगदीं जरूर झालें होतें. आणि अशा तऱ्हेनें 'मुळांस हात घालणें जर आततायीपणाचें असेल तर तसा मी आहें' अशी विल्सन यांनीं जाहीर कबूली दिली. आतां ध्येयवाद व व्यवहार याचें युद्ध जुंपण्याचा रंग दिसूं लागला. कारण युनिव्हर्सिटीच्या स्वरूपांत कोणतीही सुधारणा करण्याचें ठरविलें कीं तिचे माजी विद्यार्थी जे आतां तिचे द्रव्यदाते असत आणि ज्यांचीं मुलें आतां तेथें शिकत असत ते विस्फारित नेत्रांनीं पहात आणि आपला संशय प्रकट करीत. विल्सन यांनीं याचा पूर्ण विचार अध्यक्ष होण्यापूर्वीच करून कोणत्या गोष्टी-पासून सुरवात करावयाची व ती कशी करावयाची याची रूपरेषा मनाशीं ठर-वून टाकली होतीच. त्याप्रमाणें त्यांनीं पहिला घाव ताबडतोब घातला. प्रथम त्यांनीं परीक्षेच्या अभ्यासाचें प्रमाण वाढवून त्या कडक केल्या. एक साधारण अभ्यासपत्रक तयार करूस त्यांत विद्यार्थ्यांनें पास तरी व्हावें अगर संस्था सोडून जावें असें त्यांनीं ठरविलें. व विद्यार्थ्यांची खोगीरभरती कमी केली. कांहीं काळ गवगवा आणि तोहि लक्ष्मीपुत्रांकडून झाला, परंतु थोड्याच काळांत सर्व सुव्य-वस्थित झालें. यापुढील पायरी युनिव्हर्सिटीचा सर्व 'करिक्युलम' बदलण्याची होती. व या बाबतींत मात्र बराच बखेडा माजण्याचा फार संभव होता. कारण विसाव्या शतकाचे सुरवातीपासून 'जुनेविरुद्ध नवें' या वादानें झाडून साऱ्या मृत भाषा आणि गणित विषय यांची शिक्षणक्रमांतून हकालपट्टी करण्यास सुरवात झाली होती; व हे विषय सहज टाळतां येतील, अशी अभ्यासक्रमांत सोय करून देण्यांत आली होती. विल्सन यांच्या समजुतीप्रमाणें दोनही विषय आवश्यक सदरांत पडण्याजोगें असल्यानें हा प्रश्न सोडविण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, आपण कोणता अभ्यासक्रम स्वीका-रावा याचा निर्णय करण्याचें काम अठरा एकोणीस वर्षांच्या अननुभवी विद्या-र्थ्यांवर सर्वस्वीं टाकणें इष्ट नाहीं. तेव्हां योग्य तडजोड म्हणजे त्यांनीं स्वेच्छेनें कोणताही जरी विषय घेतला तरी त्यास अवश्य असणारें सर्वसाधारण ज्ञान देणारें शिक्षण युनिव्हर्सिटीनें त्यांच्यावर लादलें पाहिजे. एका दृष्टीनें भूमिका फक्त युनिव्हर्सिटीची, त्यावरील इमला विद्यार्थ्यांचा विद्यार्थ्यांनींच तयार करावा. म्हणजे मुख्य जबाबदारी त्यांचेवरच. परंतु दुसऱ्या दृष्टीनें युनिव्हर्सिटीचा अधि-कार इतका मोठा कीं, ती सांगेल त्याच जागीं त्यांनीं इमारत उभारली पाहिजे ! विल्सन यांनीं अभ्यासविषयाचे गट असे पाडिले कीं, त्यांपैकीं दोन आवश्यक आणि तीन ऐच्छिक व वैकल्पिक असावे, अशासाठीं कीं विद्यार्थ्यानें कोणतेही गट घेतले तरी त्याला साधारणतः अर्वाचीन कालांतील ज्ञानाच्या विविध अंगो-पांगांचीं मूलतत्त्वें ज्ञात व्हावींत. या त्यांच्या कार्यक्रमानें शिक्षणाचा पाया तयार

झाला, परंतु जोंपर्यंत प्रत्यक्ष शिकविण्याची पद्धति सुधारली नव्हती तोंपर्यंत त्याचा काय उपयोग होता ? तेव्हां ज्ञानदानाची प्रचलित सदोष पद्धति सुधारण्याचे प्रयत्न त्यांनीं सुरू केले.

या वेळीं जुनी पाठांतर आणि प्रश्नोत्तरपद्धति नष्ट होऊन नवीनच ठराविक व्याख्यानपद्धति सुरू झाली होती. शिक्षक व विद्यार्थी यांचा दिवसांकाठीं फक्त दोन अगर तीन तास संबंध येई. बाकीचा वेळ विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या कल्पनेनें कांहींतरी करीत असावें अगर कांहींच करूं नये ! विद्यार्थ्यांना शिक्षकांनीं मार्ग दाखवून देणें व त्यांच्याशीं संभाषण करणें हें किती अगत्याचें आहे! केवळ व्याख्यानांनीं विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होण्याजोगें कौशल्य ज्यांच्या अंगीं असेल त्यांची गोष्ट निराळी; परंतु बाकीच्या शिक्षकांचीं व्याख्यानें म्हणजे शुद्ध एरंडाचीं गुऱ्हाळें ! यासाठीं विल्सन यांनीं एक योजना तयार केली व ती त्यांनीं युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी मंडळापुढें मांडिली. विद्यार्थ्यांचें लहान लहान संघ बनवून ते एका एका गुरूचे स्वाधीन करावयाचे व अशा रीतीनें ‘ मनाला मनावर परिणाम करूं देण्याची संधि ’ या योजनेनें मिळणार होती. त्यांनीं स्वतः ठिकठिकाणचे शंभर विद्वान पंडित शोधून त्यांचेकडे हें काम दिलें. यांपैकीं कांहीं इंग्लंड येथील व जर्मनी आणि फ्रान्स येथील अनुक्रमें चार व दोन पंडित होते. या प्रकारें विद्यार्थी व गुरु यांच्यांत नित्य सहवास घडून विद्यार्थ्यांस ज्ञानप्राप्ति होईल अशी ही योजना निम्मे तडीस गेली. परंतु विद्यार्थी व गुरु यांचा एकत्र वास कसा व्हावा ? प्रिन्स्टनचे सर्व विद्यार्थी एका ठिकाणीं रहात नसत. पहिल्या दोन वर्षांचे विद्यार्थी एका ठिकाणीं रहात व शेवटल्या दोन वर्षांचे विद्यार्थी दुसरीकडे स्वतंत्र क्लब करून रहात. आणि हे सर्वही खुद्द युनिव्हर्सिटीपासून बऱ्याच अंतरावर रहात असत. हे सर्व क्लब पूर्वापार चालत आलेले असून ते श्रीमंती चोचल्याचे आणि गर्विष्ठतेचे आगर होते. श्रीमंत व गरीब यांमधील ती पाचर होती. आणि याशिवाय या क्लबांत पहिल्या व तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना सहज सभासद होतां येत नसे. व मौज ही कीं, अभ्यासांत प्रावीण्य मिळविण्यापेक्षां यांपैकीं एखाद्या क्लबाचे सभासद होणेंच जास्त भूषणावह मानलें जाई! शिक्षणाच्या पवित्र व समतेच्या वातावरणांत असले अहितकारक घाणेरडे क्लब राहूं देणें विल्सनसारख्याच्या समतावादी स्वभावाला कसें पटेल ? अध्यक्ष व्हावयाच्या पूर्वीपासूनच हे क्लब त्यांच्या डोळ्यांत सलत होते. आतां त्यांचें निर्मूलन करण्याचें त्यांनीं ठरविलें न दुखवितां जेथें भागण्याजोगें असेल तेथें सहसा ते दुखवीत नसत. त्यांनीं एक निराळीच युक्ति योजली. विद्यार्थी व गुरु यांच्यांत परस्पर संघट्टन घडून येण्यास हे क्लब मोडणें अवश्य होतें व म्हणून १९०७ सालीं त्यांनीं कॉलेजलाच जोडून विद्यार्थि-वसति-गृहें काढण्याची आपली योजना युनिव्हर्सिटीच्या ट्रस्टींच्या पुढें मांडली. कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांनीं याच वसतिगृहांतून एकत्र राहिलें

पाहिजे अशी सक्ति करण्यांत येणार होती.सत्तावीस ट्रस्टींपैकीं चोविसांनीं या योजनेला आपला पाठिंबा दिला.परंतु योजना प्रसिद्ध होतांच सर्व लक्ष्मीपुत्रांचे व त्यांच्या पालकांचें पित्त खवळलें व त्यांनीं वर्गणी बंद करण्याच्या धमक्या दिल्या. झालें! ट्रस्टींनीं विल्सन यांना ती योजना मागें घेण्यास भाग पाडलें व अशा रीतीनें या वेळीं डॉलरनें जिंकलें! एकीकडे ध्येयवादी एकाकी अध्यक्ष व दुसरीकडे व्यवहारी पैसेवाले यांच्यांतील हा झगडा अजून खऱ्या स्वरूपांत सुरूं व्हावयाचाच होता. ही नुसती त्याची एक चुणुक होती.

युनिव्हर्सिटी, अध्यक्ष व त्याचे सल्लागार कार्यकारी मंडळ यांच्या तंत्रानें चालावयाची किंवा तो हक्क लाखो डॉलर देऊन कोणासही विकत घेतां येतो हा लढ्यांतील प्रश्न होता व तो १९०९ सालीं जेव्हां एक अडीच लाख डॉलरची व दुसरी पांच लाख डॉलरची अशा दोन देणग्या युनिव्हर्सिटीस मिळाल्या, तेव्हां उपस्थित झाला. देणग्या एक दुय्यम शिक्षणसंस्था काढण्यासाठीं देण्यांत आल्या होत्या. व त्यांत संस्थेची इमारत युनिव्हर्सिटीच्या इमारतीपासून दूर अंतरावर बांधण्यांत यावी अशी अट मुद्दाम घालण्यांत आली होती.विल्सन यांच्या शिक्षणविषयक सर्व मनोरथांवर हा एक घाला होता. लाखो रुपयांची देणगी स्वीकारावी तर तत्त्वाभिमान तो कोठें राहिला? अशा स्थितींत विल्सनसारखा मनुष्य म्हणूनच त्यानें शेवटीं ती देणगी नाकारण्याचें ठरविलें.

परंतु ट्रस्टींपैकीं सर्वांच्याच मनाची इतकी तयारी नव्हती. विल्सन यांनीं त्यांस सांगितलें कीं "आपण द्रव्यापेक्षां तत्त्वाला जास्त किंमत देतों अशी राष्ट्राची समजूत आहे. त्यास आतां आपण कृतीनें असें दाखविणार काय कीं, आम्ही चुकलों होतों, आम्हांस द्रव्यापुढें तत्त्वाची कांहींच किंमत वाटत नाहीं!" "ट्रस्टींनीं हा प्रश्न एका कमिटीकडे सोंपविला. हो ना करतां शेवटीं ध्येयवादी अध्यक्षानें या वेळीं तरी मायावी चंचळ लक्ष्मीवर मात केली. परंतु आपत्ति या जशा एकामागून एक कोसळतात, तीच गत संपत्तीचीही असावी. कारण विल्सन यांच्या या कृत्याबद्दल अनुकूल प्रतिकूल टीकेच्या वादळांत वर उडालेले धुळीचे लोळ खालीं बसतात न बसतात तोंच पुन्हां सुवर्णमुद्रांची वीज चमकूं लागली. आणि आतां पुन्हा द्रव्यवर्षाव होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. युनिव्हर्सिटींत एक वेळचे एक विद्यार्थी 'एझाक वायमन्' हे वारले आणि त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत तीस लाख डॉलरची देणगी प्रिन्स्टनला दिली. सर्व व्यवस्था लावण्याचें काम ज्या दोघांच्या देणग्या विल्सन यांनीं नुकत्याच लाथाडल्या होत्या, त्या 'डीन वेस्ट' व 'प्राक्टर' या दोघा गृहस्थांकडे सोंपविण्यांत आली होती. आतांही त्यांनीं आपल्या देणग्या पुन्हां एकवार देऊं केल्या. ज्या अटींवर पूर्वीच्या देणग्या धिकारल्या गेल्या, त्याच अटी आतां घालण्यांत आल्या. एकंदर देणगीची रक्कम जवळजवळ चाळीस लाख डॉलर म्हणजे सव्वा ते दीड कोट रुपये होत

होती ! दीड कोट रुपये ! कोणचा जिवंत शहाणा (!) मनुष्य केवळ तत्वासाठीं वाढून आलेली ही लक्ष्मी पायानें लाथाडील! ट्रस्टी तर काय, प्रथमपासूनच कांकूं करीत कसे तरी विल्सन यांचे बरोबर फरफटले जात होते.पण आतां त्यांचे हातपाय गळाले. लक्ष्मीच्या प्रचंड लोटापुढें ते लवाळ्यासारखे वाकले. त्यांनीं आपलें शिर त्या देवतेपुढें नमविलें व देणगी स्वीकारण्यांत आली. तत्त्व व द्रव्य यांच्या झगड्यांत अखेरीस द्रव्य विजयी झालें! विल्सन साहेबांचा पुरापुरा पराभव झाला! अशा स्थितींत प्रिन्स्टनचे अध्यक्ष रहावें कीं न रहावे हा मानापमानाचा प्रश्न विल्सन यांचेपुढें होता.

" या वेळीं १९१० सालचा जून महिना चालू होता. शैक्षणिक संवत्सर एकाच आठवड्यानें संपावयाचें असून त्यानंतरचे सुटीचे तीन महिने त्यांस पुढील विचार ठरविण्याकरितां अवधि होता. जगाशीं जंग करतांना नुसतीं उच्च तत्त्वें कशीं पंगु आहेत याचा अनुभव विल्सन यांस सार्वजनिक आयुष्याच्या सुरवातीस आला. हाच अनुभव त्यांना यापुढेंही जास्त कटुतेनें यावयाचा होता. या वेळीं फक्त त्यांचें तत्त्वप्रेम व्यक्त झालें. सव्वा कोटी रुपयांनीं त्यांचा जरी पराभव केला होता, तरी इतकी गोष्ट तरी जगाच्या निदर्शनास आली कीं, तत्त्वासाठीं संपत्तीवर पाणी सोडणारा तत्त्ववेत्त्यांच्या कोटींतील एकदा मनुष्य कोठें कोठें असतो.

आतां विल्सन यांनीं प्रिन्स्टनचे अध्यक्ष राहाणें केव्हांही बरें नव्हतें. दुसरीकडे कोठें जावें हा प्रश्न सुटल्यासारखाच होता. शिक्षणक्षेत्रानंतर राजकारण हें त्यांचें ईप्सित क्षेत्र होतेंच; फक्त त्यांत प्रवेश कोणत्या द्वारानें करावा, एवढाच प्रश्न होता. आतांपर्यंतची त्यांची निःस्पृह कामगिरी व बाणेदार तत्त्वनिष्ठा यांमुळें त्यांचीं किंमत जनसमाजाला कळून आली होती. आजपर्यंत त्यांनीं आपली महत्त्वाकांक्षा कधीं उघड बोलून दाखविली नव्हती, तरी अमेरिकेच्या अध्यक्षपदावरच त्यांची नजर होती. अध्यक्षाची जागा १९१२ सालीं रिकामी व्हावयाची होती. तत्कालीन अध्यक्ष 'टॅफ्ट' हे प्रामाणिक आणि लायक असले, तरी त्यांच्यांत तडफ नसल्यामुळें, ते पुन्हां निवडून येणें शक्य नव्हतें. रुझवेल्ट हे एक उमेदवार उभे राहिले असते, परंतु त्यांची चंचल प्रकृति लोकांस ठाऊक असल्यानें ते निवडून येतीलच असें सांगतां आलें नसतें. डेमोक्रॅटिक पक्षाचे धुरीण 'जे ब्रायन' हे यापूर्वीच दोन वेळां राहिले असूनही निवडून आले नव्हते. नवीन कोणी तितकाच दमदार उमेदवार उभा राहील, तर तो निवडून येण्याजोगी परिस्थिति होती. विल्सन यांचा लोकांत बराच बोलबाला झाला होता. १९०६ सालींच, अमेरिकेंतील सुप्रसिद्ध संपादक 'कर्नल जॉर्ज हार्वे' यांनीं विल्सन हे अमेरिकेचे अध्यक्ष व्हावयास सर्वथैव लायक असल्याचें त्यांस सर्टिफिकेट दिलें होतें. परंतु या गोष्टीसाठीं दोन वर्षें थांबावयास पाहिजे होतें. त्यांचे अगोदर आणखी चारच महिन्यांनीं 'न्यू जर्सी' संस्थानच्या गव्हर्नरची जागा अध्यक्षपदाच्या अलीकडील

पायरी असल्यामुळें ती स्वीकारणें निसर्गास धरून होणार होतें. अमेरिकेंत अलीकडे हा रिवाजच पडून गेला होता कीं, अठ्ठेचाळीस संस्थानांच्या गव्हर्नरांतूनच कोणी तरी अध्यक्ष निवडला जात असे. रुझवेल्टही अध्यक्ष होण्यापूर्वी गव्हर्नरच होते. तेव्हां विल्सन हे गव्हर्नर झाले असतां दोन वर्षें थांबावें न लागतां ती एक प्रगतीचीच बाब होण्याजोगी होती; आणि तशी संधिही आलीच.

न्यू जर्सी संस्थानांत रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक असे दोन पक्ष होते. गेल्या पंधरा वर्षांत डेमोक्रॅटिक पक्षाचा असा एकही गव्हर्नर झाला नव्हता. या वेळीं काय वाटेल तें करून आपलाच गव्हर्नर आणावयाचा अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली होती. आणि विल्सनसारखा मनुष्य त्यांना मिळता तर त्यांना खात्रीनें जय मिळणार होता. म्हणून डेमोक्रॅटिक पक्षानें आपल्या तर्फे त्यांस उमेदवार उभे करण्याचें ठरविलें. वास्तविक हा संयोग दोघांसही विशेष पसंत होता असें नाहीं. विल्सन यांची गणना जरी डेमोक्रॅटिक पक्षांत होत होती, तरी त्यांचीं मतें पुष्कळशीं कर्मठ व एकांडीं असल्यामुळें व त्यांस त्या पक्षांतील एकव्यक्तितंत्रत्व अमान्य असल्यानें त्यांचें सूत तेथें जुळण्याजोगें नव्हतें. परंतु गरजवंताला अक्कल नाहीं! दोघांनींही या गोष्टी यावेळीं बाजूस सारल्या. डेमोक्रॅटिक पक्षानें विल्सन यांस निमंत्रण दिलें व त्यांनीं तें स्वीकारलें.

आक्टोबर महिन्यांत डेमोक्रॅटिक पक्षानें त्यांस आपलें असें म्हटल्यावर त्याच महिन्यांत त्यांनीं प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. अशा रीतीनें परामूत स्थितींत त्यांनीं शिक्षणक्षेत्र सोडलें आणि राजकीय क्षेत्रांत उघड उघड पाऊल टाकलें. परंतु त्यांनीं आपल्या ज्या सुधारणा मागें ठेविल्या होत्या, त्यांनीं अमेरिकेच्या शिक्षणसंप्रदायांत विल्सन यांचें नांव कायम राहील. प्रिन्स्टन युनिव्हर्सिटींत त्यांचे पूर्वी एकानेंही इतकी क्रान्ति घडवून आणली नव्हती.

# प्रकरण ४ थें.

## सुभेदार विल्सन

Double, double toil and trouble, that is the life of all Governors that really govern. Not the spoil of victory, but the glorious toil of battle can be theirs. —Carlyle.

अविश्रमोऽयं लोकतंत्राधिकारः ॥—कालिदास.

नदी ज्याप्रमाणें जेथें तिचा मागमूसही दृष्टिपथांत येत नाहीं, अशा ठिकाणीं कोणत्या तरी एकाद्या पर्वतावर प्रथम उगम पावते व नंतर उत्तरोत्तर ज्यास्त

ज्यास्त दृष्टिगोचर होत होत तिचा प्रवास समुद्रोन्मुख दिशेकडे वहात असतो, त्याप्रमाणेंच विल्सन यांच्या सार्वजनिक चारित्राची सरिता विद्यार्थीदशेंत केव्हां तरी उगम पावली; त्यानंतर प्रिन्स्टन् येथें तिचें आस्तित्व उत्तरोत्तर ठसठशीत स्वरूपांत भासूं लागलें, आणि हा तिचा सर्व प्रवास अमेरिकेच्या अध्यक्षपदरूपी सागराच्या दिशेनेंच चालू होता; परंतु सागरांत विलीन होण्यापूर्वी ज्याप्रमाणें उपमानित व्यावहारिक नदीला मुखरूपी प्रवेशद्वारांतून जावें लागतें त्याप्रमाणें विल्सन यांची राजकीय आयु:सरिता आतां मुखापाशीं येऊन धडकली होती. तें मुख म्हणजे न्यू जर्सी संस्थानची सुभेदारी. या दोन व्यावहारिक व अलंकारिक सरितांत फरक इतकाच कीं, पहिली निम्नगा तर दुसरी ऊर्ध्वगा; दुसरीचा प्रवास दक्षिणेकडून उत्तरेकडे होत होत आतां ती अमेरिकेच्या अध्यक्षाचें निवासस्थान जें वॉशिंग्टन, त्या सन्निध येऊन पोंचली होती.

'प्रिन्स्टन् तर आतां सोडलेंच पाहिजे, मग आतां धरा काय ! आली आहे संधि चालून, घुसा आंत.' अशा रीतीनें अनन्यगतिक होऊन उपटसुंभाप्रमाणें विल्सन हे न्यू जर्सीचे गव्हर्नर होण्यास तयार झाले नव्हते. ए. जी. गार्डिनर आपल्या " Pillars of society " या पुस्तकांत म्हणतात, " विल्सन हे हंगामी राजकारणी होते असें म्हणणें चुकीचें आहे. विद्यार्थी, वकील व प्रोफेसर असतांना त्यांनीं आपली या दृष्टीनेंच तयारी चालविली होती......त्यांनीं राजकीय तत्त्वज्ञानाचें परिशीलनपूर्वक आकलन करून घेतलें होतें. ( He had a considered philosophy of politics. ) " प्रिन्स्टनचे अध्यक्ष असतांना त्यांना ठिकाठिकाणचीं राजकीय विषयांवर व्याख्यानें देण्यास आमंत्रणें येत असत. या राजकीय अभ्यासानें त्यांचीं स्वत:चीं कांहीं विवक्षित मतें बनलीं होतीं. तीं जरी लोकसत्तावादी अशींच होतीं, तरी त्यांत एक प्रकारचा निर्भीड सडेतोडपणा असे; आणि व्यवहाराच्या सहाणेवर घांसून पुसून न निघाल्यामुळें थोडासा एकांडेपणाही होता. यामुळें ते जरी पुष्कळसे डेमोक्रॅटिक पक्षाला जवळ होते, तरी त्यांतच सर्वस्वीं मिलिंदायमान होऊन त्यांशीं समरस होण्याजोगे नव्हते. शिवाय न्यू जर्सी संस्थानांत जे दोन डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन असे पक्ष होते ते दोन्हीही तत्त्वनिष्ठ असण्यापेक्षां व्यक्तिनिष्ठ होते. त्यांच्या हालचाली त्या त्या पक्षाचा एक कोणी तरी श्रीमान् दडप्या ( Boss ) असे, त्याच्या तंत्रानें चालत. त्यांच्या कारभारांत येथून तेथून कुटिल डावपेंच, लांचलुचपत, भीडमुरवत, आणि धंदेवाईक स्वार्थ यांचा धुडगूस चालू असे. बेजबाबदार, अप्रामाणिक पुढारी आपापल्या पक्षाचें सामर्थ्य वाढविण्याकरितां वाटेल त्या गोष्टी करीत असत; आणि एकदां यश मिळालें म्हणजे त्या पक्षाचा जो कोणी पुढारी असेल तो आपल्या पक्षाच्या मदतनिसांना अधिकाराच्या जागांची खैरात करीत असे. हा प्रकार राजरोसपणें चालू असल्यानें राजकारण गढूळ झालें होतें, त्यांत

प्रामाणिकपणाचा लेश नव्हता, पावित्र्याचा मागमूस नव्हता, आणि मत-दार मंडळी मत देण्यापलीकडे पूर्ण निष्क्रिय बनली होती. पक्षाचे जे उमेदवार उभे केले जात ते, त्यांची कोणत्याही प्रकारची लायकी न पहातां केवळ पक्षाच्या पुढाऱ्यांच्या लहरीप्रमाणें निवडून एकदां पक्षाच्या सर्व सभासदांची संमति मिळविण्याचा फार्स करण्यांत येऊन उभे केले जात. आणि या प्रकारें निवडून आलेले उमेदवार त्या त्या पक्षाशीं म्हणजे पुढाऱ्यांशीं सर्वथैव कृतज्ञ राहून त्यांच्या हातांतलीं निव्वळ बाहुलीं बनत, आणि अशा रीतिनें प्रत्येक पक्ष म्हणजे एक निर्जीव यंत्र, आणि त्यावर ताबा एका पैसेवाल्या दडप्याचा अशी स्थिति होती. अर्थात्च विल्सन यांना राजकारणाचा असा कुंटणखाना झालेला पसंत पडणें शक्य नव्हतें. ते या सर्व सांवळा गोंधळाच्या विरुद्ध होते. याविषयीं एका व्याख्यानांत विल्सन यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले होते: "संयुक्त संस्थानांत असा एकही टापू आढळणार नाहीं कीं जेथील राजकारण खाजगी उद्देश व हितसंबंध या दुहेरी चाकांवर चाललेलें नाहीं. आणि तें ज्यांना आपण बॉस म्हणतों, त्या मध्यस्थांच्या द्वारें चाललें आहे. बॉस हा राजकारणी पुरुष नसून कांहीं विशेष हितसंबंधांचें रक्षण करूं इच्छिणारा एक धंदेवाईक दलाल आहे. त्याला राजकारण नाहीं. त्याला राजकीय पक्षही नाहीं. एका पक्षाच्या बॉसचीं दुसऱ्या विरोधी पक्षाच्या बॉसशीं अंतःस्थ संधानें बांधलेलीं असतात. 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो,' त्यांचें हित साधलें म्हणजे झालें. दोघांही परस्परविरोधी पक्षांच्या बॉसना द्रव्यसाहाय्य मिळणारे झरे एकच असतात. आणि तें द्रव्य दोघेही शेवटीं एकाच हेतूसाठीं खर्च करितात. या सद्गृहस्थांना जो दर्जा प्राप्त झाला आहे तो त्यांच्या गुप्त कारस्थानांमुळें होय. कोणीही त्यांस नेमावें लागत नाहीं. ........ बॉस हा पक्षाचा पुढारी असें म्हणतांच येत नाहीं. कोणत्याही राजकीय पक्षाचें काम उघड उघड चाललें पाहिजे. परंतु त्यांच्या सर्व हालचाली अंधारांत चालू असतात. राजकीय पक्ष म्हणजे निवळ यंत्रें बनून गेले आहेत. आणि या यंत्रांची चावी मूठभर धंदेवाइकांच्या हातीं गेली आहे. त्यांचें राजकीय स्वरूप अजिबात झांकोळून जाऊन त्यास धंद्याचें स्वरूप आलें आहे. आणि राजकीय पक्षाची झूल घालून निरनिराळ्या व्यापारी पेढ्या आपले अप्रामाणिक उद्देश साधीत आहेत. या राजकीय पक्षाच्या संस्था मूलतः कायदेशीर आहेत, व हितावहही आहेत. परंतु त्यांचे ( अ ) प्रयोजक हे बॉस असल्यानें या संस्था खाजगी कामेंच करणास उपयोगी पडतात. राजकीय पुढारी व बॉस यांतील भेद लक्षांत ठेविला पाहिजे. सार्वत्रिक हितार्थ या संस्था सबल करून त्यांचा उप-योग करणारा पुढारी कधींही आदरणीयच आहे. परंतु तो बॉस नाहीं. विल्सन पुढें असेंही म्हणतात: " या बॉसच्या कदरेखालीं राहण्यापेक्षां मी एकाद्या सुलतानाच्या छत्राखालीं राहण्याचें पत्करीन ! सुलतानाचा जुलूम जाणून

बुजून होत असतो. परंतु हा बॉस अंतरिक्षांतून जेथें आपली कल्पनाही नसते तेथून आपणांवर गुप्तपणें शरसंधान करणारा असल्यामुळें असला धनी केव्हांही भयंकर!" या बॉसपद्धतीविषयीं त्यांना आज अनेक दिवसांचा तिरस्कारा होता. आणि तिचा पूर्ण नायनाट झाल्याशिवाय अमेरिकेचें राजकारण, राजकारण या संज्ञेसच मुळीं पात्र नाहीं अशी त्यांची ठाम समजूत होती. आणि अशी एखादी संधि चालून आली तर ती साधूनच हा मनोदय साधण्याची त्यांची उत्कट इच्छा होती; आणि म्हणूनच डेमोक्रॅटिक पक्षानें त्यांस आपलें म्हटल्यावर त्यांनींही विशेष आढेवेढे घेतले नाहींत. मात्र त्यांचें म्हणणें कबूल करतांना त्यांनीं आपणांस पुरेपुर सोडवून घेतलें होतें. "डेमोक्रॅटिक पक्षानें जें मला उभें केलें तें मी होऊन त्यांना विनंति केली अगर माझी तशी इच्छा दर्शविली म्हणून नव्हे तर त्यांना माझी जरूर होती म्हणूनच. यासाठीं मी जर गव्हर्नर निवडून आलों तर स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस स्मरून लोकसेवा करण्यास मी मोकळा आहे. कोणत्याही तऱ्हेनें पक्षाशीं अगर पक्षाच्या चालकांशीं मी बांधलेला नाहीं" असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. मग असलें हें नाकापेक्षां जड मोतीं डेमोक्रॅटिक पक्षानें तरी आपल्या गळीं कां बांधून घेतलें? अशा या मास्तरी थाटाच्या पापभीरू वारकऱ्याला आपला उमेदवार नेमण्यांत त्यांनीं आपला कोणता फायदा पाहिला!

एक तर असें कीं, काय वाटेल तें करून या वर्षीचा गव्हर्नर त्यांना आपल्या बाजूचा आणावयाचा होता. अर्थात याला, जें पक्षाच्या पाठीमागें एक प्रकारचें वजन लागतें तें त्यांच्याजवळ नसल्यानें कोणी तरी व्यक्तिच इतकी मोठी हाताशीं धरणें त्यांना जरूर होतें कीं, तिच्यामुळें तरी त्यांच्या मोडक्या तोडक्या देवळाचें प्रस्थ वाढेल आणि असा हटकून नवसास पावणारा देव त्यांना विल्सन यांच्यामध्यें आढळला; व म्हणूनच त्यांनीं विल्सन यांना 'असें म्हणतां असें, बरें तसें म्हणता तसें' असें बाबापुता करून दत्तक घेतलें. व विल्सन यांना सर्वतोपरी स्वच्छंदानें वागण्यास त्यांनीं मोकळीक दिली. इतकेंच नव्हे तर डेमोक्रॅटिक पक्षाचा दडप्या कोणी जेम्स स्मिथ होता, त्यानें न्यू जर्सी संस्थानातर्फे संयुक्त संस्थानांच्या सीनेटमध्यें (वरिष्ठ कायदेमंडळांत) निवडून येण्यास उभें न राहण्याचेंही आश्वासन विल्सन यांनीं मागितल्यावरून दिलें. कारण आजपर्यंतच्या अनुभवावरून त्यांस असें वाटत होतें कीं, एकदां गव्हर्नर झाल्यावर हा अननुभवी, अव्यवहारी, साधा भोळा मनुष्य आपण तेव्हांच गुंडाळून ठेवूं शकूं. आणि आपल्या इच्छेप्रमाणें राज्यशकट हांकूं. आतांची याची ही पतिव्रतेची भाषा तेव्हां कोठच्या कोठेंच जिरून जाईल. आणि निर्बुद्ध पशू सुद्धां कृतज्ञता हा विकार जाणतो, मग यालाच तो पारखा कसा असेल? असा त्यांचा ठाम भरवसा होता. आणि हा आपला कयास चुकणार नाहीं या खात्रीनेंच त्यांनीं ही घोरपड आपल्या गळीं बांधून घेतली होती. विल्सनला आपला उमेदवार म्हणून

मान्य केल्याची बातमी कळवून, त्यास डेमोक्रॅटिक पक्षाची सभा ट्रेंटन येथें भरली होती, तेथें घेऊन येण्यासाठीं त्यांनीं मोटारींतून माणसें पाठविलीं, तीं प्रिन्स्टनला आलीं तेव्हां विल्सन गोल्फ खेळत होते. ते तसेच मोटारींतून ११ मैल गेले आणि गेल्याबरोबर विल्सन बोलावयासच उभे राहिले. डेमोक्रॅटिक पक्षाच्या कित्येक सभासदांनीं विल्सन यांस आतांच प्रथम पाहिलें व बोलतांना ऐकिलें! पोकळ आभारप्रदर्शनांत वेळ न घालवितां विल्सन यांनीं आपला कार्यक्रम त्या सभेपुढें मांडला. त्यांनीं एकंदर सहा गोष्टी सांगितल्या; पैकीं विशेष महत्त्वाच्या अशा तीन होत्या. ( १ ) राज्यकारभाराची पुनर्घटना करून तो काटकसरीनें चालविणें. ( २ ) करलादणींत समप्रमाण ठेवणें. ( ३ ) व धनोत्पादक कारखान्यांवर सरकारी नियंत्रण बसविणें. गौण महत्त्वाच्या तीन ( १ ) कारखानदारांवरील मजुरांसंबंधींची जबाबदारी ठरविणें. ( २ ) निवडणुकींतील अनाचारांस आळा घालणें. ( ३ ) आणि सार्वत्रिक सुखसोईसाठीं नैसर्गिक उत्पन्नाच्या बाबी सरकारी ताब्यांत घेणें. त्या वेळीं बरेच प्रश्न विचारण्यांत आले; त्यांना उत्तरें देतांना आपल्याला या राजकीय पक्षांतील हुकुमबाज दडपेगिरीचा तिरस्कार वाटतो, आणि आपल्या मतांशीं जुळतें असणाऱ्यांसच आणि आपल्या मनास मानेल त्याप्रमाणें अधिकाराच्या जागा देऊं असें विल्सन यांनीं तेथल्या तेथेंच खडखडीत सांगितलें. येथपासून पुढें सात आठवडे विल्सन यांनीं व्याख्यानांचा दौरा काढला व ठिकठिकाणीं व्याख्यानांतून आपलीं मतें व धोरण जाहीर करण्यास त्यांनीं सुरवात केली. एका ठिकाणीं त्यांना प्रश्न विचारण्यांत आला कीं, " तुमच्या पक्षाच्या धुरीणांशीं तुमचें धोरण कसें राहील ? " " मी निवडून आलों तर त्या पक्षाचा मीच अध्वर्यु आहें असें मी समजेन. आणि राज्यकारभारांत मी जनतेचा एक प्रतिनिधी वागेन. " असें त्यांनीं उत्तर दिलें.

नोव्हेंबरच्या ८ तारखेस ५०००० मतें जास्त मिळून विल्सन निवडून आले. वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुकींत रिपब्लिकनांचें १२ स ९ या प्रमाणांत बहुमत होतें. तर कनिष्ठ कायदेमंडळांत डेमोक्रॅटिक पक्षाचें ४८ स १८ या प्रमाणांत बहुमत होतें. आणि दोन्ही मिळून ५१ स ३० या प्रमाणांत डेमोक्रॅटिक पक्षालाच मताधिक्य मिळालें होतें. तेव्हां विल्सन यांना आतां आपल्या मताप्रमाणें न्यूजर्सी संस्थानाचा कारभार हांकण्यास मोकळीक मिळाली. आणि ज्या आखाड्यांत उतरून चार हात करण्याकरितां आजपर्यंत बुद्धीला राजकीय अभ्यास व सूक्ष्म निरीक्षण यांचा खुराक चालला त्याचें चीज झालें.

अमेरिकेंतील संस्थानांच्या सुभेदारांस पूर्णांशानें सदृश अशी अधिकाराची जागा दुसऱ्या कोठेंही सांपडत नाहीं आज मितीस एकंदर ४८संस्थानें या 'संघांत' आहेत; आणि त्यांतील प्रत्येकाची सत्ता सर्कत वांटणीनें त्यांच्याकडे आलेली नसून तिचा जीवंत उगम येथेंच झालेला असतो. अगदीं प्रथम१७७५सालीं इंग्लंडविरुद्ध

'स्वातंत्र्य-युद्ध' लढण्याचे वेळीं तेरा वसाहती एका संघांत सामील झाल्या. पुढें १७८३ त त्यांना जय मिळाल्यावर प्रत्येकजण आपापल्या पुरतें स्वतंत्र संस्थान बनली. १७८७सालीं प्रत्येक संस्थानानें आपापले कांहीं हक्क आपखुषीनें "सांधिक सरकारकडे" दिले. त्यानंतर आणखी ३५ वसाहती या संघांत सामील झाल्या. तेव्हां या आद्य तेरा संस्थानांनीं त्यांचा दर्जा ठरविला आणि प्रत्यक्ष राज्यघटनेंत सांधिक सरकारकडे जे अधिकार आहेत असा स्पष्ट उल्लेख असेल त्याशिवाय बाकीचे सर्व अधिकार त्या त्या संस्थानाच्या स्वाधीन ठेवण्यांत आले कारभारासाठीं कोणत्या व कशा संस्था असाव्या,याचा तपशील जरी ज्यानें त्यानें ठरविण्याचा असतो तरी राज्यघटनेप्रमाणें प्रत्येक संस्थानानें आपलें स्वरूप प्रातिनिधिक व लोकसत्ताकच ठेवलें पाहिजे व त्यांत लोकांनीं निवडून दिलेला एक गव्हर्नर आणि दोन कायदेमंडळें,एक वरिष्ठ सेनेट आणि एक कनिष्ठ असेंब्ली अशी असलींच पाहिजेत, असा निर्बंध आहे. गव्हर्नरच्या नेमणुकींत मध्यवर्ती सरकारला कांहीं हात नाहीं. आणि जोंपर्यंत त्यानें मूलभूत राज्यघटना अगर एकादा सांधिक नियम यांचें उल्लंघन केलें नाहीं, तोंपर्यंत मध्यवर्ती सरकार त्याच्या कारभारामध्यें पडत नाहीं. प्रत्येक संस्थानाची अंतर्घटना निरनिराळी असली तरी प्रत्येक ठिकाणीं गव्हर्नरचा दर्जा एकच आहे. त्याची नेमणूक कोठें दोन कोठें तीन तर कोठें चारही वर्षांची असते. त्याचप्रमाणें त्याचा पगारही अडीच हजारपासून बारा हजार डॉलर्सपर्यंत असतो. न्यू जर्सी संस्थानांत नेमणुकीची मुदत तीन वर्षांची असून पगार दहा हजार डॉलर्स आहे. संघाच्या अध्यक्षाप्रमाणेंच प्रत्येक गव्हर्नरच्या ताब्यांत कार्यकारी सत्ता असते आणि कायदेमंडळाचे निकाल तहकूब करण्याचा त्यास विशेष अधिकार असतो राज्यकारभारांतील नेमणूका करण्याची मोठी सत्ता त्याच्या हातीं असते. खुद्द गव्हर्नर कोणत्याच कायदेमंडळांत स्वत: बसत नाहीं; फक्त प्रसंगोपात् तो त्यांस संदेश पाठवितो. यामुळें कायदेमंडळावर त्याचें प्रत्यक्ष वजन असें कांहींच पडत नाहीं. गव्हर्नर असलेली व्यक्ति ज्या मानानें तडफदार व चलाख असेल त्या मानानें त्याच्या हातांत कमी जारत सत्ता खेळते, व तो आपलें स्वत:चे कार्यक्रम पार पाडूं शकतो. रूझवेल्ट आणि विल्सन यांनीं या सत्तेचा भरपूर फायदा घेतला.

विल्सन यांची कसोटी ते गव्हर्नर झाल्याबरोबर लगेच लागण्याची वेळ आली. डेमोक्रॅटिक पक्षाचा दडप्या जेम्स स्मिथ हा न्यूजर्सीतर्फे संयुक्त संस्थानांच्या सीनेटमध्यें सभासद असे. आणि आतां खुद्द न्यूजर्सीच्या दोन्ही कायदेमंडळांत डेमोक्रॅटिक पक्षाचें बहुमत असल्यानें त्यानें पुन्हां तेथें निवडून येण्याची इच्छा धरणें स्वाभाविक होतें. विल्सन यांना हें पूर्ण माहीत होतें. आणि आपल्या नांवावर या शकुनीनें विकूं नये यासाठींच त्यांनीं गव्हर्नरच्या जागेसाठीं उमेदवार म्हणून उभें राहतांना अट घालून त्यास सीनेटसाठीं उभें राहण्यास मना केलें

होतें. त्यानेंहीं त्या वेळीं तें कबूल केलें होतें. परंतु आतां त्याची बुद्धि फिरली. उमे न राहण्याचें कबूल करतेवेळीं बिघडलेली त्याची प्रकृति आतां एकदम ठणठणीत झाली. आणि त्यानें जाहीर केलें कीं, पूर्वी ठरल्याप्रमाणें विल्सन यांचा नवीन उमेदवार मार्टिन यास मतें न देतां, तीं आपणांसच देण्यांत यावींत. आणि या त्याच्या कृत्याला फारसा विरोधही कोणाकडून झाला नाहीं. परंतु नवीन गव्हर्नरला आपली अशी फसवणूक झालेली कळतांच फार संताप आला. आणि त्यानें ताबडतोब आपला विरोध स्मिथ यांस कळविला व त्याच्या वचनाची त्यास आठवण दिली. परंतु दडपेगिरी करण्यास सोकावलेला स्मिथ काय त्यांस दाद देतो ? त्याच्या खटपटी चालूच राहिल्या. अर्थातच डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'मतदारांत दोन तट पडले. विल्सन यांनीं स्मिथ यांस अठ्ठेचाळीस तासांच्या मुदतींत काय तें नक्की कळविण्यास सांगितलें. ती मुदत टळून गेल्यावर दुसऱ्याच दिवशींच्या वर्तमानपत्रांतून या प्रश्नावर गव्हर्नरचीं मतें प्रसिद्ध झालीं, संस्थानांतील मोठमोठ्या शहरांतून हिंडून त्यांनीं व्याख्यानें देण्याचाही सपाटा चालविला. व्याख्यानांतून स्मिथ अगर मार्टिन या कोणाचीच निंदा स्तुति न करितां सर्व भर त्यांनीं जनतेच्या हक्कावर दिला. सीनेटचा सभासद निवडण्याचें काम स्थानिक कायदेमंडळाचें असतें. त्यांना आतां मोठा पेंच पडला. एकीकडे गव्हर्नर व दुसरीकडे डेमोक्रॅटिक पक्षाचें यंत्र व त्याचा हडप्या; परंतु शेवटीं मार्टिन यासच चाळीस विरुद्ध चार मतांनीं निवडून देण्यांत आलें, आणि या प्रथमग्रासाला मक्षिकापात होण्याच्या आपत्तींतून विल्सन पार पडले. या वेळीं जर एकादा लेचापेचा गव्हर्नर असता, तर त्यानें या पापांत पडण्याचेंच मुळांत टाळून स्मिथला सीनेटमध्यें जाऊं दिलें असतें ! किंवा त्यापेक्षां तडफेचा असता तर तो कायदेमंडळांतील सभासदांची मनें वळविण्याचा प्रयत्न करता ! परंतु विल्सन यांनीं एकदम मतदारांकडे धांव घेऊन मुळासच हात घातला, आणि पहिल्याच फटक्यास पूर्वापार चालत आलेल्या पक्षपद्धतीचें बंड पार मोडून विल्सन यांनीं जो विजय मिळविला, त्यानें एक प्रकारें त्यांच्या पुढील कार्याला योग्य भूमिका तयार केली. डेमोक्रॅटिक पक्षानें हातांतील खेळणें करण्यासाठीं म्हणून जो शिक्षक खुर्चीवरून उचलला, तो त्यांचाच शासक होऊन त्यांच्या डोक्यावर बसला. स्मिथसारख्या अरेराव्यांना विल्सनसारखा अकृतज्ञ विचित्र प्रतिस्पर्धी आजच पहावयास मिळाला; आणि न्यू जर्सी संस्थानासही इतका कर्तबगार व बाणेदार गव्हर्नर यापूर्वी लाभला नव्हता.

राज्यघटनेच्या मसुद्यांतील कलमाप्रमाणें अमेरिकेंतील संस्थानांचा गव्हर्नर कायदेमंडळांत बसूं शकत नाहीं. त्यामुळें तो कायदाबजावणीला जबाबदार असल्यामुळें कायद्यांत फरक अगर सुधारणा घडवून आणण्याची जरूरी ज्या व्यक्तीस विशेष वाटण्याचा संभव, त्या गव्हर्नरला स्वतःचे विचार प्रत्यक्षपणें कायदेमंडळापुढें मांडतां येत नाहींत. संदेश पाठविणें वगैरे कागदी निर्जीव

घोड्यांच्या टापांची छाप पडणें शक्य नसतें. यामुळें कायदेबजावणीला जबाबदार गव्हर्नर, परंतु कायदे बनविण्यांत त्यास कांहींहि हात नाहीं, अशी स्थिति झाल्यामुळें 'कार्यकारी' आणि 'कायदेकारी' सत्ता एकसंवादी असूं शकत नाहींत. आणि कायदेमंडळाचें नेतृत्व सर्वस्वीं एकाद्या पक्षाकडे आणि पर्यायानें कांहीं थोड्या व्यक्तींकडे जातें, त्यामुळें कायदेमंडळांतील कामकाज बरेंच वेळां स्वार्थी बेजबाबदारपणास बळी पडतें! ही गोष्ट विल्सन हे प्रोफेसर असतांनाच त्यांच्या लक्षांत आली होती. आणि आतां बावीस लाख लोकांचा प्रतिनिधि, गव्हर्नर झाल्यावर तर ही अडचण त्यांच्यापुढें मूर्तिमंत उभी राहिली. परंतु घटनेंत फेरफार करणें, त्यांच्या अधिकारांतील नव्हतें; यामुळें आहे याच स्थितीचा जास्तींत जास्त फायदा घेण्याचें त्यांनीं ठरविलें. आणि या कामांत त्यांची तडफ आणि परंपरेविषयीं बेपर्वाई त्यांना फार उपयोगी पडण्याजोगी होती. शिवाय जेम्स स्मिथला सीनेटमध्यें निवडून येऊं न देतां, त्याचाच नामधारी परंतु भिन्न आडनांवाचा आपल्या पुढाऱ्यांतील जेम्स मार्टिन यास निवडून आणण्यांत त्यांनीं जें यश संपादिलें, त्याचीही त्यांत भर पडली. तत्त्वतः ते सर्व मतदारवर्गाचे प्रतिनिधि होतेच. आणि ते आपल्याम आपल्या डेमोक्रॅटिक पक्षाचेही पुढारी समजत. १९१० सालीं रिपब्लिकन पक्षांत दुही झाली. आणि त्यांतून फुटून नवीनच निघालेल्या रूझवेल्ट यांच्या 'प्रागतिक' पक्षाचें साहाय्य आपल्या बाजूस घेऊन आपला कार्यक्रम पार पाडण्याचें विल्सन यांनीं ठरविलें.

विल्सन यांचा कार्यक्रम काय होता, हें मागें सांगितलेंच आहे. १९११ च्या कायदे मंडळाच्या बैठकींत या वचनांच्या पूर्तीस सुरवात झाली. असेंब्लींत जेरान नांवाच्या सभासदानें एक बिल मांडलें; व या बिलास त्याच्या जनकाचेंच नांव मिळालें. प्रत्यक्ष निवडणुकीवर ज्याप्रमाणें सरकारचें नियंत्रण चालतें त्याप्रमाणेंच तें,पक्षाचे उमेदवार उभे राहण्यावरही या जेरान बिलाच्या योगानें राहणार होतें. हें बिल पास झालें तरी सुद्धां, आंतून सूत्रें हालविणाऱ्या पाताळयंत्री धंदेवाल्या राजकारणी पुरुषांचें वर्चस्व, अगदींच नाहींसें झालें असें नाहीं. तरी पण असा एकदा कायदाच झाला, म्हणजे त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. नागव्या तरवारीवर सुद्धां नाच खेळणारे कांहीं लोक असतात, परंतु सामान्यतः त्यांची संख्या लक्षांत न घेण्याइतकीच असते! आपल्या हातांतील सत्ता उघड्या डोळ्यांनीं कोण जाऊं देईल? या बिलासही अर्थातच विरोध आणि तो दोनही पक्षांकडून झाला. विरोधकांची संमिश्र सभा, हें बिल कसें हाणून पाडावें याचा विचार करण्याकरितां भरली असतां, गव्हर्नर मजकूर अनाहूतपणें तेथें गेले. चार तासपर्यंत विल्सन हे बोलत होते. राजकारणांतील नीति आणि लोकशाहीचीं तत्त्वें यांची ग्वाही देऊन त्यांनीं विरोध जरी तत्त्वतः नष्ट केला नाहीं तरी पुष्कळ विरोधकांना मात्र त्यापासून ओढून आपल्या बाजूचें

ना. ... ८. सं.

केलें. आणि असलें हें खटयाळ बिल सुकाळ मतें मिळून असेंब्लींत पास झालें. सीनेटमध्यें तर हें बिल अमान्य केलें जाणार याबद्दल संदेह नसतांही तें शांतपणें पसार झालें. एका बाजूला या बिलानें लोकांच्या हातीं सत्ता दिली, तर दुसऱ्या बाजूस गव्हर्नरचीही सत्ता वाढविली. कोणत्याही पक्षाचें काम आतां गुप्त कमित्यांच्या दारें न चालतां उघडपणें चालणें जरूर झालें. आणि जेव्हां जेव्हां आपला कार्यक्रम ठरविण्यासाठीं म्हणून कोणत्याही पक्षाच्या सभा भरतील त्या वेळीं त्यांना सल्ला देऊन मदत करण्याचा एक प्रकारचा कायदेशीर हक्क या बिलाच्या योगानें गव्हर्नरला मिळाला. आणि याविरुद्धच, गव्हर्नर आतां सर्वाधिकारी होणार कीं काय अशा भीतीनें ओरड करण्यांत आली होती. जेरान बिल म्हणजे विल्सन यांच्या अमोघ भात्यांतील अगदीं पहिलेंच अस्त्र सुटलें होतें. खरे ‘ सात बार ’ अजून यापुढेंच सुटावयाचे होते. परंतु या पाहिल्याच बारानें आजपर्यंत कायदे मंडळांत ‘ कर्तुमकर्तु शक्ति ’ अप्रतिहत चालविणारे गणेगंपे दचकले. हें गाडें कांहीं ठीक नव्हे असें त्यांस कळून आलें. आणि त्याच रात्रीं माजी सिनेटर जेम्स स्मिथ यांचा एक पित्या जेम्स न्यूजंट यानें या भयंकर गव्हर्नरला कांहीं तरी ताळ्यावर आणण्यासाठीं म्हणून त्याशीं बोलणें करण्याकरितां त्याची गांठ घेतली. परंतु सर्व व्यर्थ ! विल्सन हे वज्राप्रमाणें अभेद्य व पर्वताप्रमाणें अचल असलेले त्यांस आढळून आलें. तेव्हां त्याचें भान सुटलें. तो बरळला:—

“ मला ठाऊक नाहीं कीं काय, तुम्ही घोड्यावर कां तें ? तुमच्या पाठीमागें मतांचा जोर आहे. परंतु तीं आपण कशीं मिळविलीं असतील तें भगवान् जाणें!”

“ आपल्या म्हणण्याचा अर्थ काय ? ”विल्सन उत्तरले.

“ नाहीं, नाहीं ! स्टेट हाऊसमध्यें असा प्रवाद आहे कीं, आपण तीं पेट्रनेजनें (लोकांस अधिकाराच्या जागा इत्यादींचा मालीस चारून) मिळविलीं.”

“ बरें तर, नमस्कार; मि. न्यूजंट” दाराकडे बोट दाखवीत गव्हर्नर बोलले.

“ तुम्हांला सभ्य रीत माहित नाहीं ” न्यूजंट ओरडला.

“ तुम्हीं कांहीं न्यायाधीश नाहीं. ” अजूनही दाराकडे हात करीत विल्सन बोलले.

या गोष्टीवरून निरनिराळया अरेराव उमरावांच्या नाकाला मिरच्या कशा झोंबल्या होत्या हें कळून येईल. आणि ज्याप्रमाणें आपले शत्रू आपली स्तुति करूं लागले कीं, आपलें कुठें तरी चुकलें असें हमखास समजावें, त्याप्रमाणें आपल्या कार्याची यशःसिद्धि मोजण्याचें माप, म्हणजे आपले शत्रु आपणांवर चरफडत असतील, तें प्रमाण ! यावरून विल्सन यांनीं आपल्या कार्यक्रमांतील गोष्टी अमलांत आणण्याचा शुभारंभ कसा केला होता हें प्रत्ययास येतें. अमेरिकेंतील यच्च यावत् निवडणुकींचा जो बेताल बस्या बोळ झाला होता, तो

सुधारण्यास जेरान बिल सर्वथैव समर्थ नव्हतें. आणि त्याची पूर्ति करण्यासाठीं म्हणून याच सेशनमध्यें एक निंद्याचार प्रतिबंधक बिल पास करण्यांत आलें. कोणत्याही पक्षास, कोणत्याही तदितर संस्थेनें आर्थिक मदत करूं नये; उमेदवारांनीं निवडणुकीला किती खर्च केला, तें प्रसिद्ध करावें. अमुक एका रकमेपेक्षां जास्त खर्च करूं नये; व निवडणुकींच्या निकालावर सट्टेबाजी करूं नये; असें या कायद्यानें ठरविलें. या दोनही कायद्यांमुळें न्यू जर्सी संस्थानांतील गढूळ झालेलें राजकारण निवळलें. निवळ सोंग बनलेल्या लोकशाहीच्या ढोंगाखालीं चाललेला वैयक्तिक स्वार्थाचा नंगा धांगडधिंगा अशा रीतीनें थोडा फार प्रमाणांत आळ्यांत आला.

मजूर मालकांची जबाबदारी ठरविणारें बिल पास झालें आणि मालक व मजूर यांत विशिष्ट प्रकारचा करारमदार झाला नसेल तेव्हां मजुरास, त्याचें काम करीत असतां दुखापत झाली तर, मालकाची जबाबदारी काय हें ठरविण्यांत आलें.

अमेरिकेंत सार्वजनिक हिताच्या बाबी म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांच्या प्रत्यक्ष ताब्यांत नसतात. तर रस्तेसफाई, दिवाबत्ती पासून तों थेट आगगाड्या व ट्रामापर्यंत सर्व बाबींचीं कंत्राटें विकण्यांत येतात. अर्थातच कंत्राटें घेणाऱ्या कंपन्या व्यापारी फायद्याच्या दृष्टीनें पाहाणार कीं सार्वजनिक हित साधणार ? थोडी सोय करून पुष्कळ पैसा लोकांपासून जितका उकळतां येईल तितका त्यास पाहिजे. अर्थातच हे मक्ते मिळविण्याकरितां निरनिराळ्या कंपन्यांत चढाओढ लागते. मग म्युनिसिपॅलिटीसारख्या संस्थांतील सभासदांना खाजगी तऱ्हेनें चंदीचारा चारणें, किंवा त्याच्या पक्षाच्या द्रव्यनिधीस हस्तें परहस्तें मदत करणें असले लफंडावीचे खेळ सुरू होतात. अर्थातच जो कोणी या संस्थांतील घटकांचीं मुखें जास्त पिंडपूरित ठेवील त्याचें ढोलगें ते वाजवूं लागतात; आणि अशा प्रकारें मक्ते मिळवून शिरजोर बनलेल्या खाजगी कंपन्या गिऱ्हाइकांची सोय गैरसोय न पाहतां, वाटेल तसे दर वाढवून लोकांच्या पैशाच्या पिशव्या, स्वतःच्या तिजोरींत आणून सार्वजनिक हिताचें गूळ खोबरें करून स्वहिताच्या सैतानाला त्याचा नैवेद्य दाखवितात ! सार्वजानिक हितविघात आणि नैतिक अधःपात करणारा हा प्रकार बंद पाडण्यासाठीं विल्सन यांनीं एक सार्वजानिक सुखसोयीचें बिल कायदे मंडळांतून पास करवून घेतलें. या बिलाप्रमाणें जास्तींत जास्त चार पगारी इसमांचें एक मंडळ नेमण्यांत आलें. आणि सार्वजनिक हिताच्या सर्व बाबींवर देखरेख ठेवण्याचें काम त्याकडे देण्यांत आलें. निरानिराळया कंपन्यांच्या कारभारावर देखरेख करून त्यांचे भाव ठरविणें व त्यावर नियंत्रण राखणें, ही कायदेशीर सत्ता या मंडळास बहाल करण्यांत आली.

हें मंडळ त्रयस्थ असल्यानें गिऱ्हाइकांप्रमाणेंच त्या कंपनीच्या भागीदारांच्याही हिताकडे दृष्टि देत असे.

याच बरोबर म्युनीसिपॅलिटयांच्या घटनेंतही सुधारणा करणारें बिल, पास करण्यांत आलें. नव्या पद्धतीनें म्युनिसिपॅलिटींत एक छोटें मंडळ, दोन अगर तीन वर्षांच्या मुदतीनें निवडण्यांत येऊन, त्यावर एक पगारी अध्यक्ष नेमण्याची व्यवस्था झाली. ही पद्धति केवळ शिफारसवजा असतांही न्यूजर्सी संस्थानांतील २४ शहरांनीं ती मान्य केली. या दोन बिलांनीं सार्वजनिक हितविषयक अनास्था बरीच नाहींशी केली.

१९११ च्या नोव्हेंबरमध्यें झालेल्या कायदेमंडळाच्या नव्या निवडणूकींत रिपाब्लिकन पक्षाचें बहुमत झालें. डेमोक्रॅटिक पक्षांतील कितीएक सभासद फुटून रिपाब्लिकन पक्षांत सामील झाले; व सर्व धोरण विल्सन यांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या हातांत गेलें. आणि विल्सन यांची कायदेमंडळांतील कामगिरी संपुष्टांत आल्याप्रमाणें झाली. परंतु विल्सन यांनीं इच्छिलेल्या बहुतेक महत्त्वाच्या सुधारणा घडून आल्या होत्याच. १९१२ सालीं ‘ सात बहिणी ’ अशी संज्ञा मिळालेलीं सात बिलें एकामागून एक पास झालीं. व त्यामुळें राज्यकारभारांत काटकसर होऊन पुनर्घटना झाली आणि पूर्वीचा शिराळशेटी कारभार बंद झाला. पुढें १९१२ सालीं अमेरिकेच्या अध्यक्षाची निवडणूक होणार होती.त्यासाठीं उमेदवार कोण उभे रहावयाचे हें जून महिन्यांत ठरावयाचें होतें. विल्सन यांची महत्त्वाकांक्षा काय होती याचें दिग्दर्शन पूर्वी झालेंच आहे. विल्सन यांनीं १९११ पासूनच ठिकठिकाणच्या राजकीय परिषदांतून व्याख्यानें देण्याचा उपक्रम सुरू केला. होता. त्यांचें लक्ष आतां या दौऱ्याकडे वेढलें गेलें, व न्यू जर्सी येथेंही त्याचें विशेषसें प्राबल्य राहिलें नसल्यामुळें त्यांची गव्हर्नर या नात्याची कायदेबाज कामागिरी येथें संपलीच. त्यांच्या कामागिरीविषयीं लोकमत काय होतें हें दर्शविण्याकरितां खालील दोन छोटे उतारे पुरे होतील. त्यापैकीं पहिला अमेरिकन, व दुसरा ब्रिटिश, वृत्तपत्रांतील आहे.

‘ हा राक्षस आपले हातपाय अमेरिकन राजकारणांत फार दूरवर पसरणार ! ”

“ विल्सन यांच्या भाषणांचें वाचन, त्याच्या कामागिरीचें सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांशीं संभाषण केल्यानें अमेरिकेच्या राजकारणाविषयीं आशेचे नवकिरण उत्पन्न होतात. नेहमीं दृष्टोत्पत्तीस येणारा पक्षाभिनिवेश व वितंडवाद त्यांत नाहीं. जुन्या पक्षांध मर्यादा अगर परंपरागत गोष्टी जीवंत राखण्याचा शुष्क प्रयत्न नाहीं; विल्सन यांचें सर्वच, बुद्धि व सदसद्विवेक यांस पटणारें आहे. ”

बालरवींतूनच चंडरवि उदयास येतो; त्याप्रमाणें या गव्हरर्नरमधूनच पुढील अध्यक्ष निर्माण व्हावयाचा होता !

# प्रकरण ५ वें.

## अध्यक्ष विल्सन

" Men of ordinary physigne & discretion can not be presidents and live if the strain be not somehow relieved. We shall b obliged always to be picking our chief magistrates from among wise and prudent athlets—a small class.

—Woodrew Wilson.

न्यू जर्सी संस्थानच्या दोनही कायदे मंडळांच्या नवीन निवडणुकी १९११ सालच्या नवंबरमध्यें झाल्या. त्या वेळीं मागें उल्लेखिल्याप्रमाणें विल्सन यांच्या विरोधकांचें माताधिक्य झाल्यामुळें, कायदेमंडळावरील विल्सन यांचें वजन सर्वस्वीं नाहीं तरी पुष्कळसें कमी झालेंच होतें. विल्सन यांच्या महत्त्वाकांक्षेची धांवही येथेंच संपली नव्हती. संयुक्त संस्थानांच्या अध्यक्षाची निवडणूक १९१२ सालीं व्हावयाची होती. सर्व राजकीय पक्षांनीं आपआपले उमेदवार जूनमध्यें नेमून त्यांची शेवटची निवडणूक नोव्हेंबरमध्यें व्हावयाची होती, हें जाणूनच दूरदर्शीपणानें विल्सन यांनीं १९११ सालापासूनच ठिकठिकाणच्या राजकीय परिषदांना हजर राहण्याचा व व्याख्यानरूपानें त्यांत भाग घेण्याचा परिपाठ ठेविला होता. आणि जवळ जवळ सर्व देशभर दौरा काढून व्याख्यानें देण्याचा सपाटा त्यांनीं चालू ठेवला होता. १९१२ च्या जानेवारींत वॉशिंग्टन येथें त्यांचें एक अत्यंत जोरदार भाषण झालें व त्या योगानें संयुक्त-संस्थान-डेमोक्रॅटिक पक्षाचे एक पुढारी म्हणून त्यांची विशेष नांवाजणूक झाली. व आज-पर्यंत विल्सन हे अध्यक्ष व्हावयास योग्य आहेत; पुढें मागें होतीलही, असा जो ध्वनि कोठें कोठें व केव्हां निघत असे तो सार्वत्रिक होऊन बसला. विल्सन-ही तयार होतेच !

अमेरिकेंतील राजकीय प्रश्न म्हणजे विशेष कांहीं परस्परविसंवादी तत्त्वांवर बनलेले आहेत असें नाहीं. एका काळीं जेव्हां गुलामांचा व्यापार यांसारखे बिकट प्रश्न उद्भूत झाले होते, तेव्हां स्वभावतः जे दोन विरोधी पक्ष अस्तित्वांत आले, तेच, मूळ कारण नाहींसें झालें तरीही टिकून राहिले होते. चुरस असल्याशिवाय कोणत्याही गोष्टींत सुधारणा होत नाहीं. आणि अगदीं एकतंत्री राजकारण मिळ-मिळीत वाटूं लागतें; म्हणून केवळ हौसेखातर हे दोन पक्ष टिकविण्यांत आले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां म्हणजे या दोहोंत पूर्ण मतैक्य होतें असें नाहीं, तरी मतभेद अगदीं क्षुल्लक बाबतींत होता. हे पक्ष म्हणजे, मागें उल्लेखिल्या-

प्रमाणें रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक हे होत. १९१२ सालीं या दोन पक्षांची स्थिति काय होती पहा! आज कित्येक वर्षें अध्यक्षपद रिपब्लिकन पक्षाच्या ताब्यांत होतें. १९०२ ते १९०८ पर्यंतची रूझवेल्ट यांची कारकीर्द प्रावृट् कालीन नदीप्रमाणें खळबळाटाची गेली. त्यानंतरचीं चार वर्षें टॅफ्ट हे अध्यक्ष होते. आणि त्यांचा कारभार जरी प्रामाणिकपणाचा आणि सुव्यवस्थेचा झाला, तरी एकंदरींत लोकांस त्यानें चटका लाविला नाहीं. उलट तो थोडासा कंटाळवाणा असाच झाला. 'नवनवगुणरागी' लोकांना कांहीं तरी नवीन चमक व तडफ दाखविणाऱ्या नेत्याची जरूरी होती. अशा वेळीं डेमोक्रॅटिक पक्षाला विल्सन म्हणजे आपल्या हातीं इष्टसिद्धि करून देणारा एक ताईतच लाभला असें वाटलें. कारण, त्यांचें वजन व लौकिक काय चमत्कार करूं शकतात, हें न्यू जर्सीच्या निवडणुकींत दिसून आलेंच होतें. डेमोक्रॅटिक पक्षाचा सराईत उमेदवार ब्रायन हा होता. व त्यानें १८९३, १९०० व १९०८ इतक्या सालीं उभें राहून अपयश मिळविलें होतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन त्या पक्षानें जूनमध्यें आपली परिषद भरवून ब्रायनचें नांव काढून त्या ऐवजीं विल्सन यांचें नांव स्वीकारलें. त्या वेळीं टाळ्यांचा कडकडाट सव्वा तासपर्यंत चालला होता. १९०८ मध्यें ब्रायन यांचें नांव स्वीकारतांना हाच उत्सव एक तास सत्तावीस मिनिटें चालू होता.

विल्सन यांना प्रतिस्पर्धी उमेदवार आणखी पांच होते. त्यांत रिपब्लिकन पक्षानें माजी अध्यक्ष टॅफ्ट यांसच पुन्हां उभें केलें होतें. दोनही पक्षांतून फुटून नवीन निघालेल्या प्रागतिक पक्षातर्फे रुझवेल्ट यांनीं टॅफ्ट यांस मदत केली असती तर ते निवडून आलेही असते. परंतु त्या दोघांच्या भांडणाचा विल्सन यांना फायदा मिळावयाचा होता !

आगस्टपासून प्रत्येक उमेदवाराच्या मोहिमा सुरू झाल्या. विल्सन यांनींहि आपल्या अमोघ व अचुक वाक्संधानाचा यथास्थित उपयोग करण्यास सुरवात केली. आजपर्यंत त्यांच्या वक्तृत्वांत कधींहि दिसून न आलेला परंतु लोकाग्रणीस अत्यंत आवश्यक असलेला भावनायुक्त धार्मिक ध्येयवाद त्यांच्या भाषणांत नव्यानेंच चमकूं लागला. या मोहिमेंतील व्याख्यानांचा संग्रह करण्यांत आला आहे, त्याला ( नवस्वातंत्र्य ) अशी संज्ञा देण्यांत आली आहे. या भाषणांसंबंधीं 'जेन इझुलेट' हे फ्रेंच गृहस्थ म्हणतात:—

They are not speeches, they are hymns. We do not know which to admire-The simple and deep inspiration or the profound religious tone."

हीं व्याख्यानें मुळांतून वाचणारास त्यांतील ओज व स्फूर्ति कळून येईलच. या दौऱ्यांत विल्सन यांस यश मिळणार अशीं लक्षणें प्रारंभापासूनच दिसून आलीं. नाहीं म्हणावयास मध्यंतरीं एकदां रूझवेल्ट यांचा खून करण्याचा प्रयत्न

झाला, तेव्हां जनसमाजाच्या चंचल व साहसप्रिय सहानुभूतीचा ओघ कांहीं काळ त्यांचेकडे वळला होता. परंतु त्यांचेमागें परंपरागत पक्ष नसल्यानें हे सहानुभूतीचे ढग शरद् ऋतूंतील ढगांप्रमाणें शुष्क व क्षणिक ठरले. टॅफ्ट यांचे मागें रिपब्लिकन पक्षाच्या परंपरेचें बल होतें. परंतु त्यास लागणारी वैयक्तिक चिच्छक्ति नव्हती. यामुळें विल्सन यांस सारें मैदान मोकळें झाल्याप्रमाणें होतें.

अमेरिकेंतील अध्यक्ष निवडण्याची पद्धति थोडी चमत्कारिक आहे. मतदार आपलें मत प्रत्यक्ष उमेदवारास देत नाहीं; तर प्रत्येक संस्थानांतून वरिष्ठ कायदेमंडळांत जितके प्रतिनिधी निवडून जातात तितके त्या त्या संस्थानांत 'मत दर्शक पंच' निवडून देण्यांत येतात. व हे प्रतिनिधि एकंदर उमेदवारांतून अध्यक्ष निवडून देतात. ही पद्धति प्रथम अंमलांत आणतावेळचा उद्देश स्तुत्य होता. साधारण मतदाराला तितकीशी जाणीव नसते. यासाठीं ती जाणीव असलेले अनुभवी, चतुर व राजकारणांतील मुरब्बी त्यानें निवडून द्यावे व त्यांनीं मतदारांच्या वतीनें निःपक्षपातीनें अध्यक्ष निवडावा. परंतु ही आचार्यद्वारा विधि उरकण्याची पद्धति प्रचारांत आल्यावर केवळ पक्षतंत्राप्रमाणें चालूं लागली.व आजामितीस अल्पमताक पक्षाला अध्यक्षाच्या निवडणुकींत कांहींच भाग नाहींसा झाला आहे. कारण एकाद्या संस्थानांत जितके पक्ष असतील, तितक्या पक्षांचें त्या संस्थानांतून जेवढे प्रतिनिधी निवडावयाचे असतील तितके उमेद्वार उभे राहतात. मतदारानें आपल्याच पक्षाचे सर्वच निवडावे असा कायदा नसला तरी व्यवहार तसा होणें अपरिहार्य असतें. अर्थातच त्या संस्थानांत ज्या पक्षाचें माताधिक्य असेल त्याच पक्षाचे लोक या पंच मंडळांत निवडले जातात. व त्या संस्थानापुरतें तरी अध्यक्ष निवडणारे तेच असतात. आणि अशा प्रकारानंतर निवडून आलेल्या अध्यक्षास सामुदायिक मतेंही नेहमींच जास्त मिळतात असें नाहीं. विल्सन यांच्या वेळींही अशीच स्थिति झाली. त्यांच्या दोघां प्रतिस्पर्ध्यांचीं मिळून सामुदायिक मतें त्यांच्यापेक्षां जास्त होतीं. परंतु अठ्ठेचाळीसपैकीं चाळीस संस्थानांत त्यांचें बहुमत झाल्यानें त्यांस पंचांचीं मतें त्या दोघांच्या चौपटीपेक्षांही जास्त मिळालीं. व विल्सन अमेरिकेचे अध्यक्ष निवडून आले.

विल्सन यांच्या चरित्रांत एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येतें ती ही कीं, ते ज्या ज्या पायरीवर उभे राहिले, तेथें तेथें प्रिन्स्टन येथील त्यांचें वर्तन जितकें स्वतंत्र, बाणेदार व निःस्पृह होतें तितकीच त्यांची गव्हर्नरीही गाजली. आतां ते ज्या आसनावर आले होते तें आसन सर्व जगांतील राजकारणांत अत्यंत महत्त्वाचें होतें. राजसत्ता खरी गाजविण्याचो संधि जर केव्हां कोणास मिळत असेल तर ती अमेरिकेच्या अध्यक्षाला; सर्व जगांत सुधारलेली प्रातिनिधिक राज्यपद्धति कोठें अमलांत असेल तर ती अमेरिकेंत; अशी ख्याति आहे. इंग्लंडच्या नामधारी राजाच्या हातीं जी सत्ता नाहीं किंवा फ्रान्सच्या लोकनियुक्त अध्यक्षाला सुद्धां जितके

अधिकार व सत्ता नाहीं इतकी प्रबल सत्ता अमेरिकेच्या अध्यक्षांत असते, व विशेष म्हणजे इतकें असूनही तो लोकप्रिय लोकप्रतिनिधीच असतो ! अशा या महनीय व स्पृहणीय अशा आसनावर विल्सन अधिष्ठित झाले होते. त्यांची जी सदाकांक्षा कीं तोल सुटून बहकलेल्या अमेरिकन राजकारणाला आळा घालून पर्यायानें सर्व जगाच्या राजकारणाला आपल्या तत्त्वज्ञानाच्या सुतांत आणावयाचें, ती पुरी होऊं शकण्यास यापेक्षां अनुकूल परिस्थिति दुसऱ्या कोठें मिळणार ? परंतु तीहि गोष्ट लवकरच घडून णाली. सुधारणा करण्यासाठीं म्हणून कां होईना, परंतु सुखासुखी शेजाऱ्याच्या घरांत कोण शिरूं देईल ! परंतु आग लागली कीं ज्याप्रमाणें वाटेल त्यास त्या घरांत प्रवेश करण्याचा जणूं हक्कच प्राप्त होतो, त्याप्रमाणें सर्व जगभर थोड्याच दिवसांत आगीचा डोंबाळा भडकला. इतका कीं, तो विझविण्याचें सामर्थ्य एकट्या अमेरिकेंतच असल्याची खात्री झाल्यामुळें सर्व जगाचें लक्ष अमेरिकेकडे लागलें. समुद्रांत बुडणाऱ्या मनुष्यास वांचवूं शकणारी नाव दिसली कीं, तिजकडे त्याचें लक्ष जातें; परंतु ती नाव आपले आपणच कांहीं त्यास वांचवूं शकत नसल्यामुळें तिला प्रेरणा करणारा जो तिचा कर्णधार नावाडी असेल त्याचेंच चिंतन तो करतो, त्याप्रमाणें या वेळचे अमेरिकेचे सर्वशक्तिकर्णधार व सूत्रधार जे तिचे अध्यक्ष विल्सन त्यांच्याकडे युद्धपीडित जगानें करुणाविष्ट होऊन पाहिलें आणि विल्सन यांनींही या संधीचा फायदा चांगलाच घेण्याचा प्रयत्न केलाही ! तो कसा तें पुढें यथावकाश येईलच. परंतु, येथें हें सांगण्याचा उद्देश एवढाच कीं, विल्सन यांच्या वाटणीला जो कालविभाग आला होता त्याचें यथार्थ महत्त्व लक्षांत घेतां त्यांना केवढी जबाबदार कामगिरी उरकण्याची संधि आली होती हें उघड व्हावें !

ह्या बाह्य परिस्थितीप्रमाणेंच अंतःपरिस्थितिही प्रारंभीं विल्सन यांस अनुकूळच होती. आज कितीतरी दिवसांनीं नवसासायासांनीं डेमोक्रॅटिक पक्षाचा अध्यक्ष झाला होता. अर्थात् डेमोक्रॅटिक पक्ष एकात्मतेनें त्यांचे मागें होता. दोनही वरिष्ठ कायदेमंडळांत त्या पक्षाचेंच बहुमत होतें. विरुद्ध पक्षांत दुफळी झाली होती. आणि त्यांतील नूतन शाखा रूझवेल्ट यांचा प्रागतिक पक्ष हा तत्त्वतः इतका पुढें होता कीं, विल्सन यांच्या मध्यस्थ पक्षानें ज्या सुधारणा करण्याचें योजिलें होतें, त्या सर्व त्या पक्षाच्या कार्यक्रमांत अंतर्व्याप्त होत होत्या. अर्थात् विल्सन यांना स्वमतानुसार इष्ट त्या सुधारणा करण्यास पूर्ण मोकळीक झाली होती. आणि कॉंग्रेस जर तयार असेल तर अमेरिकन अध्यक्षाला तिला वाटेल तितकें दूरवर खेचीत नेण्यास प्रतिबंध करण्याची राज्यघटनेंत योजना नाहीं. मैदान अप्रतिबंध होतें, तेव्हां अशा स्थितींत विल्सनसारखा प्रगमनशील महत्त्वाकांक्षी रगेल राऊत टांच लगावल्याशिवाय कसा राहील ?

प्रथमच त्यांनीं जो टोला हाणला तो पूर्वापार परंपरेला. आजपर्यंत निर-

निराळया खात्यांतील अमलदारांच्या नेमणुका करण्याचा हक्क केवळ अध्यक्षाचा होता तो आतां विल्सन यांनीं आपल्या ज्या त्या खात्याचे चिटणीस नेमले होते त्यांच्या स्वाधीन केला. गोष्ट लहान दिसली तरी तिचें महत्त्व फार आहे. या कृत्यानें अमेरिकन जनता थोडी दबून जाऊन विल्सन यांच्याविषयीं तिला वाटत असलेला आदरही थोडा वाढला आणि आदरयुक्त भीतिही वाटूं लागली ! एवढ्यावरच भागलें नाहीं. कायदेकरी व कार्यकारी संस्था एकमेकांपासून विलग असणें हितावह नाहीं इतकेंच नव्हे तर कार्यकारी संस्था कायदेकारी संस्थेला जबाबदार असली पाहिजे हें आपलें मत विल्सन यांनीं १८७९साली लेखद्वारा व न्यूजर्सीच्या सुभेदारींत सक्रिय व्यक्त केलें होतें, त्याचीच अंमलबजावणी आतांही करण्याचें त्यांनीं आरंभिलें. अध्यक्षानें काँग्रेसमध्यें स्वत: जाऊन भाषण करण्याचा अगर तें वाचून दाखविण्याचा प्रघात नव्हता. फक्त त्यानें आपलें म्हणणें लेखी संदेशद्वारा पाठविण्याचा संप्रदाय होता. तो मोडून टाकून विल्सन यांनीं स्वत:च एप्रिल ८ च्या पहिल्या काँग्रेसच्या अधिवेशनामध्यें जाण्याचें ठरविलें. परंपरेच्या अभिमान्यांच्या कपाळास आठ्या पडल्या, ते म्हणूं लागले. ' काय, अध्यक्ष आणि काँग्रेसमध्यें स्वत: बोलणार ? ' ही पद्धति फार पूर्वीं प्रचारांत होती; परंतु कित्येक वर्षांच्या अनभ्यासानें आतां ती जीर्ण आणि केवळ स्मृतिमात्र अतएव मृतप्राय झाली होती. त्यामुळें अमेरिकन राज्यघटनेच्या व पूर्वापार परंपरेच्याही विरुद्ध होत होतें. परंतु या परंपराभिमान्यांचें काय चालणार ? अध्यक्षाच्या मागें सर्व जनतेचा पाठिंबा होता. त्यांना मूग गिळून बसणें भागच होतें!

ठरल्याप्रमाणें उपाध्यक्ष माहील यांच्या नेतृत्वाखालीं सीनेटचे सभासद ओळीनें दोन दोन याप्रमाणें कनिष्ठ कायदेमंडळाच्या सभेंत गेले. व त्यांचेमागें अध्यक्षांची स्वारी जाती झाली. काँग्रेसचे क्लार्क यांनीं प्रस्ताव करून दिल्यानंतर विल्सन यांनीं या नवीन उपक्रमाच्या खुलाशानेंच आपल्या भाषणास आरंभ केला. त्यांचें भाषण इतकें उत्तम झालें कीं त्यांच्यावर रुसलले लोकसुद्धां खुष होऊन हसूं लागले.या भाषणांत त्यांनीं आपल्या कार्यक्रमाची रूपरेषा थोडक्यांत अशी आखली: अध्यक्ष आणि जनता यांचे अधिकार वाढविले पाहिजेत, तरच अमेरिकचें राजकारण धनाढ्यांच्या हातून मुक्त होईल. आणि यासाठीं अध्यक्षाला जे तीन अधिकार असावे असें विल्सन यांनीं निवडणुकीपूर्वीं एका भाषणांत प्रतिपादिलें होतें, ते (Referendum, Initiative आणि Revocation) काँग्रेसनें लादलेला अहितावह कायदा जनतेच्या प्रत्यक्ष मतानें निष्फळ ठरविणें, काँग्रेसला एकदा नवीन कायदा सुचविणें, आणि एखाद्या अधिकाऱ्याला कामावरून दूर करणें हे होत. आणि या योगानें धनाढ्य कमजोर झाले म्हणजे संरक्षक जकाती व चलन पद्धति यांत सुधारणा घडवून आणून सर्व व्यापारी संस्थावर ( Trusts Corporate Bodies) सार्वजनिक नियंत्रण ठेविलें पाहिजे; असें विल्सन

यांनीं आपल्या निवडणुकीच्या दौऱ्यांतील भाषणांतून वेळोवेळीं प्रतिपादन केलें होते. न्यू जर्सी संस्थानांतही याच तत्त्वावर त्यांनीं सुधारणा घडवून आणल्या होत्या. विल्सन यांचा सर्व कटाक्ष मुख्यतः बड्या बड्या व्यापारी कंपन्यांवर असल्यामुळें विल्सन हे त्यांच्या प्रतिनिधींची भेटसुद्धां घेत नसत. इतकेंच काय खुद्द त्यांच्या मंत्रिमंडळाशीं सुद्धां त्यांनीं फारच थोड्या गांठी भेटी घेण्याचा प्रघात ठेविला. मात्र आठवड्यांतून एक दिवस निरनिराळ्या वर्तमानपत्रांच्या बातमी-दारांना ते मुलाखती देत व प्रचलित महत्त्वाच्या राजकीय बाबींवर आपला अभि-प्राय व्यक्त करीत आणि त्या मुलाखती सर्व जनतेस वर्तमानपत्रांतून वाचावयास मिळत. अशा प्रकारें विल्सन हे खरे ' लोकांचे अध्यक्ष ' होते.

सर्व सुधारणांत जकातीचा प्रश्न महत्त्वानें प्रमुख होता व तोच विल्सन यांनीं प्रथम सोडविण्यास घेतला. रीतीप्रमाणें कांग्रेस डिसेंबरमध्यें भरावयाची परंतु या जकातीच्या प्रश्नासाठीं त्यांनीं ती तडकाफडकीं एप्रिलमध्येंच बोलाविली. अगदीं विद्यार्थी असतांपासूनच विल्सन संरक्षक जकातीच्या विरुद्ध होते. जकात ही फक्त उत्पन्नासाठींच बसवायाची असते. आणि चैनीचे पदार्थ व नित्योपयोगी नसलेल्या वस्तूंवरच ती बसविणें रास्त आहे, अशा मताचे ते असल्यामुळें, नवीन बिलानें गहूं, मासे, बटाटे , लोकर, कोळसे यासारख्या सर्वोपयोगी पदार्थांवरील जकात उठविण्यांत येणार होती; कापडचोपडावरील जकात कमी होणार होती; आणि साखरेवरील तीन वर्षांनंतर साफ उठवावयाची होती. यामुळें कमी झालेलें उत्पन्न नवीनच ' सांघिक प्राप्तीवरील कर ' बसवून भरून काढण्याचें ठरलें व व तशी पुस्ती बिलाला जोडण्यांत आली. हें बिल पास होण्यास फारच त्रास पडणार होता. कारण, कांग्रेसमधील व्यापारी प्रतिनिधी आपल्या पोटावरील हा पडता पाय उघड्या डोळ्यांनीं तसाच पडूं कसे देतील ? परंतु खुद्द अध्यक्षां-नींच त्याचा पाठपुरावा केला होता. तरीही कांहींतरी शुक्लकाष्ठ लागावें म्हणून इतक्या उपसूचना आणण्यांत आल्या कीं, शेवटीं विल्सन यांनीं लोकशाहीची अंतिम शक्ति जनतामत मदतीस बोलावण्याकरितां त्या विषयावर वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध केले व तें आपल्या बाजूस वळविलें. मग कांग्रेस ताळ्यावर आली आणि बिल बहुतेक जसेंच्या तसेंच पसार झालें.

यानंतर चलनपद्धतीचें बिल पुढें आलें. जूनच्या २३ तारखेस पुन्हां अध्यक्ष साहेब जातीनें कॉंग्रेसमध्यें हजर राहिले. आणि त्यांनीं करन्सी बिलाची प्रस्तावना केली. हें बिल तयार करतांना विल्सन यांनीं निरहंकारबुद्धीनें इतर तद्विषयज्ञ सभा-सदांची मदत घेतली. कारण या चलनाविषयांत त्यांची बुद्धि विशेष चालत नव्हती. डिसेंबर १९१३ त हेंही बिल फारशी छाटाछाट न होतां पास झालें. व पूर्वीच्या जकातीच्या बिलानें उद्योगधंद्यांना स्वतंत्र केलें आणि या चलनपद्धतीच्या बिलानें साहस व उद्योगधंद्याची वाढ यास वाव करून दिली.

प्रचलित चलनपद्धतीचा दोष असा होता कीं, पैसा सर्वत्र सारखा खेळत न राहतां एका कोणत्या तरी व्यक्तीच्या अगर संस्थेच्या जवळ तो जमून राही. यासाठीं एक 'सांघिक गंगाजळी पेढी' काढून संयुक्त संस्थानांचे एकंदर बारा जिल्हे पाडून त्या प्रत्येकास एकएक स्वतंत्र बँक देण्यांत आली. आणि त्यांच्याशीं इतर बँकांनीं व्यवहार करावयाचा; या बारा बँकांनीं शेंकडा चाळीसपर्यंत सोनें शिल्लक ठेवून कागदी नोटा काढून त्या दुय्यम बँकांना व्यवहाराला द्यावयाच्या असें ठरविण्यांत आलें. या सर्वांवर देखरेख एका बोर्डाची. त्यांत पांच सभासद अध्यक्षांनीं नेमलेले असून तीवर अधिकार सरकारी फडणिसाचा चालावयाचा अशी ही व्यवस्था होती. व्यवस्था वर्षभरानें चालू झाली. आणि महायुद्धासारख्या बिकट परीक्षेच्या कालांतसुद्धां तिनें टिकाव धरला यावरून तिची योग्यता सहज कळून येईल.

करन्सी बिल पास झाल्यानंतर एकाच महिन्यानें अध्यक्षांची स्वारी पुन्हां एकदां कांग्रेसमध्यें दाखल झाली. आणि २० जानेवारी १९१४ रोजीं ट्रस्ट विषयक कायदा पास करून घेण्यांत आला. मागें अमेरिकेंत सार्वजनिक हिताच्या बाबी व्यापारी कंपन्यांच्या ताब्यांत दिलेल्या असतात याचें वर्णन येऊन गेलेंच आहे. या व्यापारी मंडळयांवर सरकारचें नियंत्रण ठेवून सार्वजनिक हित साधण्यासाठीं या बिलाचा जन्म झाला होता. विल्सन यांच्या शब्दांत सांगावयाचें तर या सर्व संस्थांतून जी अंधेरनगरी माजली होती, तेथें न्यायाचा व सत्याचा उजेड पाडण्यासाठीं हें बिल पुढें आलें होतें. याच्या योगानें एक कमिशन नेमण्यांत आलें व त्याला या प्रकारच्या सर्व संस्थांवर नियंत्रण राखण्याचे सर्वाधिकार देण्यांत आले. आणि अशा रीतीनें एक वर्षाच्या अवधींत विल्सन यांनीं जकातींची सुधारणा, करन्सची सुधारणा, आणि ट्रस्टवर नियंत्रण या तीन प्रमुख लोकहिताच्या गोष्टी साधल्या. यापेक्षां जास्त सुधारणा घडवून आणण्यास विल्सन यांस सवड मिळालीच नाहीं. कारण १९१४ च्या ऑगष्टमध्येंच युरोपांत महायुद्ध सुरू झालें. आणि विल्सन यांच्या कायदेविषयक सुधारणांच्या कामगिरीला हा एक पायबंदच बसला. जागतिक महायुद्धाचा इतिहास म्हणजेच विल्सन यांच्या अध्यक्षत्वाच्या बहुतेक कारकीर्दीचा इतिहास; इतकेंच नव्हे तर त्यांच्या आयुष्याच्या उत्तरभागाचा इतिहास अशी स्थिति आहे. याकरितां विल्सन यांची अमेरिकेपुरतीच जी कामगिरी आहे तिचा या प्रकरणांत संपूर्ण परामर्ष घेऊन नंतर महायुद्धाकडे स्वतंत्रपणें वळूं.

अशा बाबी मुख्यतः तीन पडतात. चीन प्रकरण, मेक्सिको प्रकरण व पनामा प्रकरण. या तीनही गोष्टींत एक विशेष दिसून येतो तो हा कीं, विल्सन यांनीं शक्य तितकें युद्ध टाळून थोडी घस सोसून सुद्धां प्रत्येक वेळीं तडजोडच केली. याबद्दल त्यांना जनप्रवाद फार सोसावा लागला. परंतु शांति न सोडतां स्वमतानुसार त्यांनीं करावयाच्या गोष्टींत कोणाची कधीं पर्वा केली नाहीं.

३०५८

ज्याप्रमाणें एकादें बेवारशी प्रेत दिसलें कीं, त्यावर जिकडून तिकडून मांसाहारी गृध्रादिपक्षांच्या झुंडीच्या झुंडी येऊन कोसळतात; तद्वत् चीनची स्थिति झाली होती. इंग्लंड, जपान, जर्मनी, अमेरिका, फ्रान्स इत्यादि सहा राष्ट्रें त्याचे लचके तोडून उद्योगधंद्याच्या मिषानें त्याचा द्रव्यशोष करून फन्ना पाडण्यास चीनमध्यें शिरलीं होतीं. विल्सन यांनीं अमेरिकन भांडवलवाल्यांस तेथून परत बोलावून घेतलें.

मेक्सिकोची अशीच स्थिति होती. निसर्गतः समृद्ध असलेल्या प्रत्येक धनाढ्य राष्ट्राची नजर त्यावर होती. संयुक्त संस्थानांस मेक्सिको अगदीं नजीक असल्यानें तेथील साम्राज्यवादी लोकांचें लक्ष आपले हातपाय तेथें पसरण्याकडे लागलें होतें. शिवाय राजकीय दृष्ट्याहि इतर यूरोपच्या राष्ट्राचें तेथें प्राबल्य होऊं देणें त्यांस अनिष्ट होतें. यामुळें मेक्सिकोचा एक चिंताजनक प्रश्न होऊन बसला होता. मेक्सिको हा आपल्या या उत्तरेकडच्या श्रीमंत व सबल मित्राविषयीं साशंक होताच. मेक्सिकोनें १८२४ सालीं स्पेनचें जूं झुगारून देऊन लोकसत्ताक राज्य स्थापिलें होतें. परंतु तेथें तेव्हांपासून राज्यक्रांत्या, अंदाधुंदी, बंडें, रक्तपात व खून यांची इतकी बजबजपुरी माजली होती कीं, पन्नास वर्षांच्या अवधींत तेथें बावन्न अध्यक्ष व एक बादशहा होऊन गेले होते. १८७६ सालीं सेनापति पोर्टफिरो डैझ हा अध्यक्ष झाला आणि तोच हुकूमशहा बनला,परंतु तो १९११ सालीं पदच्युत होईपर्यंत सुमारें ३५ वर्षे मेक्सिकोंत कांहींशीं स्थिरस्थावर झाली होती. परंतु पुन्हां अराजकता माजली, आणि अध्यक्षांचे एकामागून एक खून होऊन खांदेपालट इतकी भराभर होऊं लागली कीं, राजधुरा कोणाच्याही खांद्यास स्थिर न लागतां अधांतरींच लोंबकळूं लागली. अशा वेळीं विल्सन संयुक्त संस्थानच्या लोकशाहीचे अध्यक्ष झाले. मेक्सिकोंत संयक्तु संस्थानाच्या भांडवलावर नाना प्रकारच्या खाणी, रेल्वे वगैरे उभारण्यांत आल्यामुळें अमेरिकेचे हितसंबंध त्यांशीं निगडित झाले होते. वारंवार मेक्सिकोंत संयुक्तसंस्थानीय भांडवलवाल्यांचे व रहिवाशांचे खून पडत. परंतु एकदां युद्धांत शिरल्यावर त्यांतून बाहेर पडणें कठीण हें जाणून व तेव्हां प्रकरणही विशेष विकोपास गेलें नव्हतें यामुळें टॅफ्ट हे त्यापासून अगदीं अलग राहूं शकले. व त्याबद्दल त्यांच्यावर विशेषशी टीकाही झाली नाहीं. परंतु विल्सन हे अध्यक्षपदारूढ होण्याच्या पूर्वी एक पंधरवडाच मेक्सिकोच्या तत्कालीन अध्यक्षाचा खून होऊन कोणी व्हिक्टोरीनो हर्ट अध्यक्षपद बळकावून बसला होता. त्याला मान्यता देण्यास विल्सन तयार नव्हते. परंतु त्या वेळीं त्या प्रकरणांत हात घालून दुसरा कोणी अध्यक्ष करण्यासही त्यांची तयारी नव्हती. नाहींतर त्यांचे जवळ साधनें भरपूर नव्हतीं असें नाहीं. दक्षिण अमेरिकेंतील इतर संस्थानांना आपणांविषयीं शंका उत्पन्न होऊं नये म्हणूनच विल्सन मेक्सिकोशीं लढाई करण्यास तयार नव्हते.

परंतु हें त्यांचें शांतिब्रह्म निदानीं टिकलें नाहीं. व त्यांना तलवार म्यानांतून बाहेर काढावी लागलीच. परंतु युद्धानेंही कांहीं एक निकाल लागेना. तेव्हां पुन्हां मेक्सिको जाणें आणि तें प्रकरण जाणें असें म्हणून विल्सन यांनीं या दगडाखालून आपला हात सोडवून घेतला. याच वेळीं महायुद्धालाही इकडे अगदीं रंग भरला होता.

पनामाप्रकरणही असेंच थोडें चावून चिवट झालें होतें. रूझवेल्ट यांनीं हा कालवा बांधण्यास सुरवात केली. ज्या जागेतून कालवा जावयाचा होता ती जागा कोलंबीया संस्थानच्या मालकीची होती. त्याबद्दल त्यानें एक कोटी डॉलरची भरपाई मागितली होती. एकास पळ म्हणून दुसऱ्यास पाठीवर सोडून आपला स्वार्थ साधण्याची निदान करमणूक तरी करून घेण्याची जी बुद्धि व्यक्तीव्यक्तींत असते तीच समष्टिरूप राष्ट्रांतही दिसून येते ! या कोलंबियाच्या शिराळशेटी मागणीला दक्षिण अमेरिकेंतील संस्थानांनींही आपला टेका अर्पण केला. विल्सन यांनींहि या प्रकरणाचा एकाद्या कुबेराप्रमाणें निकाल लावला. कोलंबीया संस्थानास एक कोटी ऐवजीं अडीच कोटी डॉलर देऊन त्यांनीं कालव्यानें व्यापलेली जागा तर आपल्या मालकीची केलीच, पण निकाराग्वे संस्थानाला दोन कोटी डालर देऊन त्या संस्थानच्या मालकीचीही कालव्याचे दोनही बाजूस असलेली जमीन विकत घेऊन त्याची हद्द वाढवून भांडणाचें मूळच नाहींसें केलें. याच कालव्याच्या बाबतींत आणखी एक भानगड माजी अध्यक्ष टॅफ्ट यांनीं करून ठेविली होती. व तें खरकटेंही विल्सन यांनीं आपल्या उदार व लोकशाही मतवालेपणास साजेसें काढून टाकलें. कालवा तयार झाल्यावेळीं ग्रेटब्रिटनला असें अभिवचन देण्यांत आलें होतें कीं, कालव्यांतून माल नेआण करण्याबद्दल जकात सर्वांवर सारखी बसविण्यांत येईल. परंतु टॅफ्ट यांनीं एक कायदा करून अमेरिकेच्या किनाऱ्यावरून चालणाऱ्या व्यापारास जकात माफ केली होती. तेव्हां अर्थात् याविरुद्ध तक्रार झाली. आणि तें काम विल्सन यांचेवर पडलें. त्यांनीं तो कायदा रद्द करण्याचें ठरवून कांग्रेसमध्यें बराच विरोध असतांहि तो वैयक्तिक वजनानें पास करून घेतला. याशिवाय बारीक सारीक भानगडी पुष्कळच उपस्थित झाल्या होत्या. विल्सन यांना त्यापैकीं कांहींचा निकाल कायमचा व कांहींचा जुजबी लावतां आला. पण कांहींचा मुळींच लावतां आला नाहीं. परंतु इकडे महायुद्धाचा नगारा सुरू झाल्यावर किरकोळ टिमक्यांचा आवाज कोणाच्या कानीं जाणार ?

परंतु एका गोष्टीचा येथें निर्देश करणें अवश्य आहे. कारण, त्यावरून त्यांच्या लोकशाहीमतवालेपणाची व उदारमनस्कतेची पूरेपूर साक्ष पटते. विल्सन यांच्या अगदीं लहानपणापासून पाहिलें तरी त्यांच्यांत एक विशेष आढळून येतो. तो हा कीं, स्वतःची सदसद्विवेक बुद्धि व प्रामाणिक मतें यांस विरुद्ध असलेली

कोणतीही गोष्ट कोणत्याही परिस्थितींत करण्याचें त्यांनीं नाकारलें व त्यासाठीं करावा लागणारा केवढाही स्वार्थत्याग पत्करला. तोच प्रकार आतां झाला. अमेरिकेंत निरनिराळ्या देशांतून निरनिराळे लोक जाऊन वस्ती करतात व उद्योग करून श्रीमंत होतात. अर्थातच स्थाईक अमेरिकन लोकांस त्यांचा मत्सर वाटतो. विशेषतः नीग्रो व आशियांतील लोक यांच्याबद्दल तर त्यांस फारच वैषम्य वाटतें आणि हरतऱ्हा करून या लोकांस हाकून लावण्याचा, निदान त्यांच्या उत्कर्षास प्रतिबंध करण्याचा ते प्रयत्न करितात.

कॅलिफोर्निया संस्थानांत कित्येक जपानी लोकांनीं बागाईत करून आपल्या उद्यमशीलतेनें इतकें वैभव मिळाविलें कीं, तें अमेरिकनांच्या डोळयांत सलूं लागलें. तेथील संस्थानच्या कायदेमंडळांत या सर्व मळेवाल्यांचे नागरिकत्वाचे हक्क नष्ट करणारें एक बिल आणण्यांत आलें. विल्सन यांस हें कळतांच त्यांनीं तें बिल पास होऊं दिलें नाहीं. तरी दीर्घदर्शी अमेरिकन लोकांनीं व्यवहारांत इतर रीतीनें या बिलानें जें साधावयाचें तें सर्व साधलेंच !

इकडे खुद्द वाशिंगटन येथें एक नवीन इमिग्रेशन बिल तयार होत होतें. त्याचे दोन भाग होते. एकानें सर्वसाधारण नागरिकाचे हक्क इंग्रजी लिहितां वाचतां येण्यावर असावेत व ते आफ्रिकेंतील नीग्रोस तर मुळींच मिळूं नयेत असें ठरविण्यांत येणार होतें. दुसऱ्या भागानें जपान्यांची अमेरिकेंतून हकालपट्टी करण्यांत यावयाची होती. पाहिला भाग कांग्रेसनें पास करून दोन वेळां विल्सन यांच्या संमतीसाठीं पाठविला, परंतु दोनही वेळीं आजपर्यंत त्यांनीं कधींहि न वापरलेला व्हेटोचा ( वडिलकीचा ) अधिकार विल्सन यांनीं गाजविला. आणि दुसरा भाग विल्सन यांचे भिडेस्तव कांग्रेसनेंच गाळला. आजही जपान्यांची हकालपटी करण्याचें अमेरिकेंत घाटत आहेच. परंतु अमेरिकेंत पाऱ्छाई धोरण जारीनें सुरू झालें असल्यामुळें या प्रश्नाचा शेवटीं निर्णय कसा लागतो हें एक कुतूहलच होऊन बसलें आंहे ! विल्सन यांनीं तरी त्या वेळीं आपल्या लोकशाही-मतवालेपणास जागून लोकशाहीच्या तत्त्वांस हरताळ फासणाऱ्या या पाच्छाई मस्तवालपणाच्या बिलांना मूठमाती देऊन आपली सदसद्विवेकबुद्धि निष्कलंक राखली यांत शंका नाहीं. परंतु यांतच विल्सन यांच्या सर्व चरित्राचें रहस्य आहे!

येथेंच एका खाजगी गोष्टीचाही उल्लेख करून हें प्रकरण पुरें करूं. महायुद्ध सुरू झालें होतें. जें तें युद्धमान राष्ट्र मदतीसाठीं, आपापसांतील न्याय निवडण्यासाठीं, आपल्या तक्रारी कानावर घालण्यासाठीं विल्सन यांचेकडे दृष्टि लावून होतें. अशा आणीबाणीच्या वेळीं विल्सन यांची पत्नी मरणोन्मुख स्थितींत होती. तिच्या शय्येशेजारीं बसूनच विल्सन यांनीं युध्यमान राष्ट्रांना उद्देशून पाठविलेला संदेश लिहिला होता. अखेरीस विल्सन यांची पत्नी ता० ६ आगष्ट१९१४ रोजीं त्यांस सोडून परलोकीं निघून गेली. विल्सन हे आतां अगदीं एकाकी झाले.

त्यांना तीन मुली होत्या. परंतु धाकट्या दोन मुलींचीं लग्नें दोन वर्षांपूर्वीच झालीं होतीं. जेसीचें फान्सिस बोस या गृहस्थाशीं आणि एलेनार हिचें विल्सन यांच्या मंत्रिमंडळांतील एक सभासद् डब्ल्यु जी. मॅकअड् यांच्याशीं लग्न झालें होतें. थोरली मुलगी मारगारेट ही नेहमीं बाहेरच लोककल्याणाच्या कामांत कोठें तरी गुंतलेली असे. अर्थातच विल्सन यांना ही परिस्थिति फारच जाणवली.

एडिथ बोलिंग गाल्ट नांवाची एक सुशिक्षित व सुस्वरूप आणि उच्च घराण्यांतलि एक विधवा स्त्री वाशिंग्टन येथें होती. ती विल्सन यांची फारा दिवसांची चहाती असून, विल्सन यांचे ग्रंथ तिला फार आवडत असत. या बाईशीं विल्सन यांनीं १८ डिसेंबर १९१५ रोजीं पुनर्विवाह लाविला. विल्सन यांनाही एक नमुनेदार सहचारिणी मिळाली. महायुद्धानंतर तहपरिषदेला विल्सन फ्रान्समध्यें आले तेव्हां ही बाई त्यांचे बरोबर होतीच.

---

# प्रकरण ५ वें.

## महायुद्ध व विल्सन.

" We are ready to draw upon our forces without reserve to preserve peace in the interests of humanity...... I am ready to fight for a cause worth fighting for........ Human blood must be spilt, if necessary, but it must be spilt for a noble cause. The little deeds of liberty are sealed with the blood of free men. "

--War speech W. Wilson

महायुद्धें होतात त्यापूर्वींही कांहीं दैवी सूचना मिळत असतात. हिंदू पंचांगाप्रमाणें त्या सालीं एका महिन्यांत तेरा दिवसांचा पंधरवडा आला होता. भारतीय युद्ध झालें तेव्हां सुद्धां हाच योग आला होता. युरोपखंडांत महायुद्ध सुरू झालें. एखाद्या पर्वतावर कोठें तरी एकादी बारीक ठिणगी पेटते व तिजवरून पुढें मोठा वणवा लागेल अशी कल्पना सुद्धां प्रथम होत नाहीं. त्याचप्रमाणें यूरोपमधील लहान लहान राष्ट्रसमूहापैकीं सर्व्हिया व पंचमहाराष्ट्रांपैकीं आस्ट्रिया हंगेरी यांच्या दरम्यान आस्ट्रियन राजपुत्राच्या खुनाचें निमित्त होऊन प्रथम कुरबूर सुरू झाली. प्रश्न कांहीं मोठा व्यापक व अति महत्त्वाचा होता असेंही नाहीं. या चकमकीचें स्वरूपांतर युद्धांत होऊन कापसाच्या वखारींत जशी आग पसरावी तसें तें युद्धसर्व युरोपभर पसरेल असेंही कोणास वाटलें नव्हतें. परंतु मनुष्यास वाटत असतें एक आणि परिस्थिति घडवून भलतेंच आणते ! तोच प्रकार येथें झाला.

आस्ट्रियामध्यें दुराग्रहाचें भूत शिरून त्यानें कोणाही स्वाभिमानी राष्ट्रास मान्य करतां येण्यास अशक्य अशा अटी सर्व्हियावर लादल्या. अर्थातच लहान परंतु स्वाभिमानी सर्व्हियानें आस्ट्रियानें लादलेल्या त्या अपमानकारक अटींचा धिक्कार केला व आस्ट्रियाच्या दुराग्रहाच्या पोलादावर सर्व्हियाचा स्वाभिमानबुध्दीची गारगोटी आदळून चकमक झडली. नेहमींच्या न्यायाप्रमाणें इतर शेजारी राष्ट्रांची सहानुभूति दुर्बळ सर्व्हियाकडे वळली.

ऑस्ट्रियाहंगेरी व जर्मनी यांचे हितसंबंध फार मोठे व निकटचे. ऑस्ट्रिया हंगेरींतील लोकसंख्येंत व राजपुरुषांत जर्मनांचा भराण फार. अर्थात् जर्मनीनें आस्ट्रियाहंगेरीची बाजू घेतली. झालें. सुतास सूत येऊन मिळावें त्याचप्रमाणें युरोपांतील प्रत्येक राष्ट्र हें ना तें नातें सांगत सांगत रणरंगांत सामील झालें. युरोपांतील प्रत्येक राष्ट्राच्या हितसंबंधाच्या तंगड्या इतर खंडांत गुंतल्या असल्यामुळें प्रत्यक्ष रंगभूमि जरी मध्ययुरोप होतें तरी इतर खंडांतूनहि रक्ताची रंगपंचमी साजरी होऊं लागली. महायुध्धाचें स्वरूप भडकलें. तटस्थ बेल्जममध्यें नानाप्रकारचे अत्याचार जर्मनीकडून होऊं लागले. प्रत्येक युध्दमान राष्ट्र आंतरराष्ट्रीय व युध्दकालीन कायद्यांचें सरसहा उल्लंघन करूं लागलें. या गोष्टी पाहून युरोपमध्यें सुध्दां आश्चर्यानें चमकून जाणारे लोक होते. मग या कत्तलखान्यापासून दूर असलेल्या व तसले हिडिस प्रकार पहाण्यास न निर्ढावलेल्या लोकांची त्या सर्व प्रकारांचीं आतियोक्तीनें भडक रंगांत केलेलीं वर्णनें वर्तमानपत्रांतून वाचून काय स्थिति झाली असेल ?

दोन एडक्यांची लागलेली टक्कर सोडविण्यासही तसाच शक्तिमान् मनुष्य लागतो. त्याचप्रमाणें या महायुद्धांत मध्यस्थी करून योग्य निकाल लावण्यास लागणारी शक्ति अमेरिका होती. युद्धांत गुंतलेलें प्रत्येक राष्ट्र दुसऱ्याविषयींची आपली तक्रार विल्सन यांचे दरबारीं सुनावीत होतें. अमेरिकेनें तटस्थ राहावें कीं कोणत्या तरी बाजूस मिळून त्या बाजूचें पारडें भुईस लावावें हा प्रश्न होता. परंतु युद्धांत शिरलें कीं मग तितक्या निःपक्षपातीपणानें वागतां येत नाहीं. आणि मध्यस्थ या नात्यानें करावयाच्या कामगिरींत गौणत्व येतें. काठावर बसून न्याय देण्यापेक्षां पाण्यांत उडी घेऊन आपल्या अंगावर पाणी उडवून घेऊन दुसऱ्याच्याही अंगावर उडाविल्यानंतर कांहीं अधिकार आपोआपच नाहींसे होतात. यासाठीं शक्य तों आपली पाटी कोरी ठेवण्याची विल्सन यांची इच्छा होती. विल्सन हे स्वभावतः शांततावादी होते. रूझवेल्टप्रमाणें लष्करशाही त्यांना प्रिय नव्हती. परंतु शांतता संपादनासाठीं जर क्षणिक अशांततापत्करावी लागून रणरंग खेळावा लागतच असेल तर त्यास मात्र ते डरणारे नव्हते. संयुक्तसंस्थानानें यापूर्वी वेळोवेळीं भाग घेतलेल्या लढ्यांचा त्यांनीं आपल्या अमेरिकेच्या इतिहासांत योग्य उलगडा करून राजकारणाच्या क्षेत्रांतील लढाया व त्यांचें

महत्त्व जाणून त्याविषयीं आपली संमतिच त्यांनीं दर्शविली होती. आणि या वेळीं सुद्धां विल्सन यांनीं चक्क जाहीर सांगितलें होतें कीं, यापुढील कोणतीही लढाई टाळणें अमेरिकेस शक्य नाहीं. हें महायुद्ध शेंवटचेंच कीं ज्यांत अमेरिकेनें भाग घेतला नाहीं तर कदाचित् चालू शकेल. परंतु डेमॉक्रॅटिक पक्ष लढाईविरुद्ध होता. आणि विल्सन हे जरी त्या पक्षाला विशेष जुमानीत नव्हते, तरी त्या पक्षांतील एक पुढारी ब्रायन हा त्यांचा परराष्ट्रीय मंत्री असल्यामुळें व त्याची मदत अद्याप त्यांस पाहिजे असल्यामुळें युद्धांत पडण्याचें शक्य तों टाळण्याचा ते प्रयत्न करणार होते. शिवाय, खुद्द अमेरिकेचें परराष्ट्रीय धोरण गेलीं शंभर वर्षें मनरो धोरणाप्रमाणें चालू होतें. ' अमेरिका ही अमेरिकनांची आहे. युरोपच्या राजकारणांत अमेरिकेनें पडूं नये आणि युरोपनें अमेरिकेंत ढवळाढवळ करूं नये, असें हें धोरण होतें. अर्थात् युरोपमधील महायुद्ध हें या धोरणाच्या कक्षेच्या बाहेर होतें.

हें धोरण त्या वेळच्या मनरो नांवाच्या अध्यक्षानें आपल्या एका संदेशांत व्यक्त केलें होतें. पुढें त्याला इतकें महत्त्व आलें कीं, प्रत्यक्ष राज्यघटनेंत त्याचा समावेश झालेला नसतांही, अथवा काँग्रेसच्या दोनही सभांनीं ठराव करून त्यास केव्हांही आपली संमति सुद्धां दिली नसतांच अमेरिकेचें परराष्ट्रीय धोरण म्हणून कायदेशीर हक्क त्यांस केवळ परंपरेनें प्राप्त झाला होता. या तत्त्वाचा प्रणेता जो मनरो तोही म्हणजे अमेरिकेच्या विख्यात मुत्सद्यांपैकीं एक होऊन गेला असें नाहीं आणि ज्या प्रासंगिक कारणामुळें तें आखलें त्या कारणापेक्षां तें ज्या एकांतिकतेनें तेव्हांपासून आजतागायत पाळलें जात आहे त्यामुळेंच त्यास इतकें महत्त्व प्राप्त झालें आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या शतकांत दक्षिण अमेरिकेंतलि स्पॅनिश वसाहतींनीं मातृभूमीविरुद्ध बंड पुकारलें होतें. १८२२ मध्यें ' होली अलायन्स ' नें या बाबतींत हात घालण्याचें ठरविलें. अशा रीतीनें होली अलायन्सचें प्रस्थ वाढणें इंग्लंडला इष्ट नव्हतें. उलट या दक्षिण अमेरिकेंतील नवीन लोकसत्ताक संस्थानाबद्दल उत्तर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांना सहाजिकच सहानुभूति वाटत होती. आणि आपल्या सरहद्दीशेजारींच युद्ध होणें अगर चालू रहाणें त्यांच्या हिताच्या दृष्टीनें धोक्याचें होतें. दोन निरनिराळ्या कारणांमुळें या दोन पन्नासच वर्षांपूर्वींच्या शत्रुराष्ट्रांची एकजूट होऊन त्यांनीं एक करारनामा पाळण्याचें ठरविलें. हा करारनामा तत्कालीन अध्यक्ष मनरो यानें रीतीप्रमाणें कांग्रेसला संदेशद्वारां ता० २ डिसेंबर १८२३ रोजीं जाहीर केला. त्याचीं तीन कलमें होतीं.

( १ ) होली अलायन्सचे सभासदांपैकीं कोणीही आपली राज्यपद्धति ( राजसत्ताक ) या गोलार्धावरील कोणत्याही देशावर लादण्याचा प्रयत्न केल्यास

लें अमेरिकेच्या हितसंबंधास शांतता व सुरक्षितता या दृष्टीनें धोक्याचें आहे असें समजण्यांत येईल. यूरोपीय राष्ट्रांच्या आजमितीस असणाऱ्या वसाहती व मांडलिक संस्थानें यांत मात्र आम्ही ढवळाढवळ करणार नाहीं.

( २ ) यूरोपांतील कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत व्यवस्थेंत हात न घालण्याचें धोरण राहील.

(३)अमेरिका खंड हें यापुढें वसाहती करण्याचें क्षेत्र असें यूरोपच्या राष्ट्रांनीं समजूं नये.

मेक्सिकोंतून फ्रेंच सैन्य काढून नेण्याबद्दल १८६७ सालीं अँड्र्यू जान्सन यानें आग्रह धरतांना याच मनरो धोरणाचा हवाला दिला होता. व्हेनिझुएला व ग्रेट ब्रिटन यांमधील सरहद्दीचा तंटा उत्पन्न झाला असतां याचेंच आधारावर १८९५ मध्यें क्लीवलंडनें आपला हात तेथें शिरकविला. सॅन डोमिंगो येथील आर्थिक घोंटाळे नाहींसे करण्यासाठीं तेथला कारभार आटोपण्यास सुरवात करून रूझवेल्टनें १९०७ मध्यें या तत्त्वाची व्याप्ति थोडी वाढविली. आणि विल्सन यांनीं तर पुढें महायुद्धांत पडून आणि यूरोपच्या राष्ट्ररचनेंत प्रत्यक्ष भाग घेऊन या तत्त्वाचा रूढ लौकिकार्थ पार झुगारून दिला.

या मनरो धोरणामुळें सर्वसाधारण अमेरिकन जनता नेहमीं इतरत्र चाललेल्या युद्धप्रसंगाविषयीं उदासीन असे. व स्वतः एखाद्या युद्धांत सामील होण्याइतकी त्यांची तयारीही नस. अमेरिकन सरकारजवळ आयत्या वेळीं उपयोगी पडेल असें भरपूर सैन्य अथवा आरमारही नसेच. या वेळींही हीच स्थिति होती. अशा प्रकारें अमेरिकन जनता ही परंपरा, तयारी व स्वभाव या सर्व दृष्टींनीं युद्धाविरुद्ध होती. शिवाय आणखी एक महत्त्वाचें कारण म्हणजे कायदे मंडळांच्या नव्या निवडणुकी नजीक आल्या होत्या. अशा वेळीं विल्सन यांनीं युध्दांत भागधेयी होण्याचें जाहीर करणें तेथें त्याचें बहुमत होण्यास धोक्याचेंही होतें. परंतु या सर्व कमी महत्त्वाच्या बाबो होत्या. खरी नडणारी अडचण दुसरीच होती.

समजा, युद्धांत भाग घ्यावयाचें ठरलेंच तर तो कोणत्या बाजूनें घ्यावयाचा हा प्रश्नच होता. कारण 'सागरसम्राज्ञी' अशा इंग्लंडविरुद्ध अमेरिकेचा निभाव लागणार नव्हता. शिवाय अमेरिकेंत त्या वेळीं तरी जर्मनीविरुध्द लोकमत असण्यापेक्षां तें रशियाविरुध्दच होतें. बरें, कोणासही जाऊन मिळण्यास तितकेंसें सयुक्तिक कारण कोणतेंच नव्हतें. खुद्द विल्सन यांचा ओढा इंग्लंडकडे होता. परंतु अमेरिकन जनता ही 'सर्वलोकसंग्रह' अशी असल्यामुळें त्यांत नाना पगडजातीचे लोक होते. आणि पाण्यापेक्षां रक्त घट्ट असतें यामुळें या युध्दानंतर त उसळी मारून वळणाचें वळणाला मिळूं पाहात होतें. जो मूळ ज्या देशांतल्या त्या देशाविषयींची त्याची सहानुभूति जागृत झाली होती. कांहीं कांहीं संस्थानें एकजात ब्रिटिश होती. तर कांहींत बहुसंख्या जर्मनांची

होती. एकदंर अमेरिकेंतील लोकसंख्येच्या जवळ जवळ एक अष्टमांश जर्मन लोक असल्याचें १९१० च्या खानेसुमारींत आढळून आलें होतें. त्यांतीलही चाळीस लक्ष खुद्द जर्मनींत जन्मास आलेले होते. आयरिश रक्ताचे सर्व अमेरिकन एकजात इंग्लंडच्या विरुध्द होते. अशा स्थितींत कोणत्याही पक्षास जरी मिळण्याचें विल्सन यांनीं ठरविलें असतें तरी त्या वेळीं देशांतच इतका गोंधळ झाला असता कीं, सांगतां पुरवत नाहीं. आणि एक दुसरें ' आपसयुध्द ' सुरू झालें असतें. १८६० च्या आपसयुध्दाचे वेळीं निदान सुटसुटीत असे दक्षिणसंस्थानें व उत्तरसंस्थानें असे तरी तट पडले होते, पण आतां सर्व अमेरिकाभर, प्रत्येक संस्थानांत, प्रत्येक शहरांत इतकेंच काय, प्रत्येक घरांत सुध्दां दोन विरुध्द पक्ष एकमेकांच्या मानगुटीस बसण्यास उद्युक्त झाले असते. ही यादवी टाळण्याची मोठी जबाबदारी विल्सन यांचेवर येऊन पडली होती आणि तिची यथार्थ जाणीव त्यांस होती. हें संकट टाळण्यास अमेरिकन नागरिकांचें मन इतकें फांकलें जाणें अवश्य होतें कीं, त्यांत वैयक्तिक अगर जातिविषयक अभिमान आणि सहानुभूति लोपून जावी. असले क्षुद्र परंतु दुर्दम विकार दडपून जाण्यास जें वजन उत्पन्न करावयाचें तेंही तसेंच भरदार असावें लागतें. नुसत्या शांतिब्रह्माचा उपदेश करणें म्हणजे ज्योति नाहींशी करण्याजोगें होतें ! काजळी तर झाडली जावी परंतु ज्योत कायम टिकावी ! अमेरिकन लोकांची वैयक्तिक पूर्वग्रहरूपी राख फुंकरून टाकतांना आंतील आवेशाचा निखारा कायम न राहिला तर पुढें मागें प्राप्त होणारें कार्य कसें पार पडणार !

या सर्व गोष्टी साधतील असला उपाय विल्सन यांनीं काढला. एक प्रकारचें आमिष परंतु तें विल्सन यांनीं अमेरिकन जानपदास लावलें. " युद्धमान राष्ट्रें एकमेकांचीं टाळकी फोडून थकलीं कीं त्यांच्यांत मध्यस्थी करण्याचा मान म्हणजे असातसा नव्हे. अमेरिका जर या वेळीं युद्धापासून अलिप्त राहील तरच तो तिला मिळेल आणि एकप्रकारें सर्व जगाला शांततेचा कित्ता घालून दिल्याचेंही श्रेय अमेरिकेस मिळेल तेव्हां सर्व राष्ट्रें म्हणतील 'मूर्ख आम्ही ! व्यर्थ आपला व दुसऱ्याचा नाश करून घेतला! कितीएक जीवाची राखरांगोळी केली ! तुम्हीं मात्र आपलीं शिरें राखिलीं ! धन्य ! !" अशा प्रकारची भाषा आतां विल्सन बोलूं लागले. अमेरिकन लोकांनीं युद्धांत शिरण्याची आजच घिसाडघाई करूं नये यासाठींच हा मार्ग त्यांनीं स्वीकारला होता व साधारणत: प्रत्येक गबर मनुष्य स्तुतिप्रिय असतो त्याप्रमाणें अमेरिकन लोकही स्तुतिप्रिय असून एवढ्या तेवढ्यानें हरबऱ्याच्या झाडावर चढण्याची त्यांची तयारी असते! ते जितक्या लवकर भावनावश होतात तितक्याच प्रमाणांत त्यांचा तो पारा वेळीं उतरतोही. ही गोम लक्षांत आणून विल्सन यांनीं आणखीही एक टूम काढली. या लोकांना कशांत तरी गुंतवून टाकलें पाहिजे, या उद्देशानें विल्सन यांनीं युध्दांत जखमी व निराश्रित

झालल्यांची सोय लावणें ह अमेरिकेचें कर्तव्य आहे असें प्रतिपादण्यास सुरुवात केली. इकडे युरोपमध्यें १९१४ च्या शेवटल्या तीन महिन्यांत 'न भूतो न भविष्यति ' कहर उडाला. हें युध्द लांबणार हें ठाम ठरून गेलें होतें. पोलंडमध्यें घनघोर युध्द, फ्लँडर्समध्यें युध्द, बेल्जममध्यें अनन्वित अत्याचार याप्रमाणें एकामागून एक अनेक प्रकार सुरू झाले. असंख्य स्त्रिया व मुलें, म्हातारेकोतारे अन्नवस्त्रावीण हैराण झाले. इकडे अमेरिकेच्या औदार्याला पूर लोटला. अमेरिका म्हणजे एक मिशन हाऊसच बनली. विल्सन यांनींही या प्रकारास सर्वतोपरी उचलून धरलें. या भूतदयेच्या कामांत अमेरिकन लोकांनीं अहमहमिकेनें आपले कोट्यावधि डॉलर खर्च केले. आणि ते सर्वस्वीं त्यांत रंगून गेले.

विल्सन यांनीं आपली शांतिपाठाची मोहिमही इतकी जारीनें सुरू केली कीं, ते सर्वस्वीं युध्दाविरुध्द असल्याचा गैरसमज होऊन रूझवेल्ट यांनीं युध्दच पाहिजे अशी प्रतिकृतिरूप मोहीम सुरू केली. याच वेळीं युध्द हवें असणाऱ्या लोकांनीं अमेरिकेचें सैन्य व आरमार वाढवावें अशी चळवळ सुरू केली. 'आम्हांला अमेरिकेस लष्करी तळ बनविण्याचें नाहीं आणि तरुण मुलांचीं आयुष्याचीं बहुमोल वर्षें हडेलहप्पी करण्यांत घालवावयाचींही नाहींत असें म्हणून विल्सन यांनीं त्या चळवळीस विरोध केला. याच वेळीं जर्मनीच्या बादशहाच्या वाढदिवशीं अभिनंदनपर संदेश विल्सन यांनीं पाठविला. या सर्वांचा एकत्वानें परिणाम असा झाला होता कीं, विल्सन हे शांतिब्रह्माचे अनन्य पुरस्कर्ते आहेत इतकेंच नव्हे तर तत्त्वतःच ते युद्धद्वेष्टे आहेत असा सार्वजनिक समज होऊन बसला. अमेरिकन सामान्य जनतेला अर्थातच ' युध्दापासून दूर ठेवणाऱ्या ' या अध्यक्षांविषयीं फार प्रेम व आदर वाटूं लागला. आणि विल्सन यांनीं जी ही उप्पर बनविली होती त्या सजावटीनें सर्व जग फसून गेलें. परंतु अंदरकी बात काय ती विल्सन यांना एकट्यालाच माहीत !

अमेरिकेच्या अध्यक्षाची जागा अशी आहे कीं, तेथें एखाद्या बावळट माणसाचे तीन तेरा व्हावयास फार दिवस नकोत ! या जागेवर बसणारा इतर कसाही असला तरी दोन गुण त्यास अत्यावश्यक आहेत व ते म्हणजे तो उत्कृष्ट प्रतिभासंपन्न वक्ता पाहिजे व चतुर, निश्चयी आणि थंडा, परंतु आपलें तेंच खरें करणारा राज्यकारभारी पाहिजे. मग त्याचा निभाव सहज लागतो. वॉशिंग्टन, लिंकन व रूझवेल्ट एवंगुणविशिष्ट असे होते. अर्थातच वॉशिंग्टनची सर्वच गोष्ट निराळी. विल्सन यांचें अंगीं सुध्दां हे गुण वास करीत होते व म्हणूनच जगाच्या अर्वाचीन राजकारणांतील अत्यंत बिकट परिस्थितींत त्यांनीं नेट धरला. त्यांच्या जिव्हेवर तर सरस्वतीच बसली होती. ' प्राप्तं प्राप्तमुपासीत ' या न्यायानें जी जी परिस्थिति प्राप्त झाली तिचा तिचा ओघ आपल्या फायद्याकडे वळवून घेण्यासाठीं तिचें स्वरूप तसें तसें भासविणें या कामीं आपल्या अमोघ वक्तृत्व-शक्तीचा बेमालूम उप

योग त्यांनीं केला. त्यांच्यांत जी विसंगतता दृष्टीस पडते ती यामुळेंच! परंतु राजकारणांत विसंगतता हा केवळ दुर्गुणच असतो असें नाहीं तर उलट त्या योगानें त्या माणसाच्या नवनवोन्मेषी बुद्धिमत्तेची साक्ष पडते. राजनीतिनिपुण मनुष्य कोणत्याही प्रश्नावरील आपलें खरें मत केव्हां व्यक्त करावें याची अनुकूल संधि पाहूनच तसें करीत असतो. विल्सन हेही अशाच संधीची वाट पहात होते. राष्ट्राची उदार मतें व लोकशाहीचीं तत्त्वें यांस बाध न येतां व राष्ट्रैक्य राखूनच काय करावयाचें तें केलें पाहिजे, हें विल्सन जाणून होते. आणि म्हणूनच १९१५ सालच्या आरंभापासून अमेरिकन राजनीति मोठ्या पेंचांत सांपडली असतां, तो डाव फसतां तर कामा नयेच, परंतु तो कुजूंही नये यासाठीं विल्सन यांनीं कांहीं काल स्वपक्षीयांचा त्याग व विपक्षीयांचा रागही सहन केला.

युध्यमान राष्ट्रांपैकीं कोणीच आतां राष्ट्रीय कायदे पाळीत नव्हते. परंतु सन १९१५ च्या आरंभीं जर्मनीनें सर्व राष्ट्रीय अन्नसंग्रह सरकारी नियंत्रणाखालीं घेतला, तेव्हां इंग्लंडनें जाहीर केलें कीं, ज्या अर्थीं आतां या सदरांत मोडणारा माल खाजगी मालमत्ता राहिली नाहीं त्या अर्थीं त्याची तपासणी करण्यासाठीं असा माल नेणाऱ्या बोटी आम्ही पकडून ब्रिटिश बंदरांत नेऊं! सर्व राष्ट्रीय हक्कांवर हा बडा बडगाच होता! जर्मनीनें तर याच्याहीवर ताण करणारा सवाई तडाखा असा हाणला कीं, त्या योगानें प्रत्यक्ष मानवी जीवितावरच संक्रांत ओढवली. "इंग्लंडसभोंवार असलेला सर्व समुद्रप्रदेश हें युद्धक्षेत्र आहे व त्यांत शिरण्याचें धाडस कोणीही तटस्थ राष्ट्रांच्या बोटींनीं करूं नये. त्यांचें नुकसान झाल्यास जर्मनी जबाबदार नाहीं." असें बर्लिन सरकारनें फेब्रुवारीमध्यें जाहीर केलें. विल्सन यांनीं इंग्लंड व जर्मनी या दोघांशींही पत्रव्यवहार केला. त्यांत जर्मनीला तर 'अमेरिकन नागरिक आणि जहाजें यांचें ताटस्थ्य लक्षांत न घेतां जर कांहीं नुकसान करण्यांत आलें तर जर्मन सरकारला त्याचा जाब देणें भाग पडेल आणि तटस्थ राष्ट्रांच्या हक्कांच्या रक्षणासाठीं वाटेल ती तजवीज करण्यास अमेरिका मागें घेणार नाहीं.' अशी धमकीच दिली होती. या बाबतींत पत्रव्यवहार चालू असतांच, ता. ८ मे रोजीं सुप्रसिद्ध 'लुसिटानिया' बोट बुडविण्यांत आली. अमेरिका व युरोप या दोन देशांतील विलासी धनिकांचें हें सुखवाहन कोणत्याही प्रकारचा इषारा न देतां व उतारूंचें प्राण वांचविण्याची कांहीं एक तरतूद न करतांच बुडविण्यांत आलें होतें. एकंदर अकराशे जीव समुद्रास्तृप्यन्तु झाले. त्यांत शंभर अमेरिकन होते. सर्व जगच या प्रसंगानें सखेदाश्चर्ययुक्त झालें. अमेरिकेंत तर नुसता हाहा:कार उडाला. अमेरिकेच्या संतापाची सीमा झाली. जें युद्ध हजारों मैलांवर चालूं होतें त्यांत तिला जखमा होऊं लागल्या होत्या. जर्मनीशीं शत्रुत्व पुकारावें असें न्यूयॉर्क संस्थानानें ठरविलें! अध्यक्षांच्या एका शब्दावर केवळ अवलंबून होतें. त्या

दिवशीं जर्मनीशीं युद्ध पुकारण्यास अध्यक्षांना कोणीही मना केलें नसतें इतका तो धक्का मोठा होता.

परंतु हें स्मशानवैराग्य चिरकालीन होतें काय ? असलें महायुद्ध करतांना लागणाऱ्या निःसीम निष्ठेनें, एकात्मतेनें व अचंचलत्वानें अमेरिकन जनतेनें अध्यक्षांचा पाठपुरावा सर्वकाल केला असता काय ! कीं मध्येंच पाठ फिरवून अनेक प्रकारच्या अंतःस्थ आपत्तींनीं त्याची पाठ पुरविली असती ! हार्वर्डचे प्रो. लावेल म्हणतात. " अशा प्रसंगाचे वेळीं राष्ट्र भावना दर्शवितें, परंतु मत देऊं शकत नाहीं. यामुळें या वेळीं राष्ट्रावर अवलंबून राहून तदिच्छेप्रमाणें वागणें इष्ट नसून विल्सन यांनीं स्वतःच्या अनुसंधानानेंच चालणें इष्ट होतें. " विल्सन यांना अशा वेळीं घाई केल्याचे दुष्परिणाम इतिहासांत स्पष्ट दिसत होतें. १८९८ सालीं, मेन नांवाचें जहाज बुडविल्याबद्दल स्पेनला जबाबदार धरून असाच युद्धप्रसंग घडवून आणण्याची तत्कालीन अध्यक्षांनीं घिसाडघाई केल्यामुळें मोठी बिकट परिस्थिति उत्पन्न झाली होती. पुष्कळ काल, द्रव्य व जीवित यांचा व्यय होऊन कशी बशी लढाई संपली. विल्सन यांनीं आपल्या अमेरिकेच्या इतिहासांत या युद्धासंबंधीं असा शेरा मारला आहे. " ही लढाई अपरिहार्य व न्यायाचीही होती. परंतु सारासार विचार व योग्य ती तयारी करून ती सुरू करण्यांत आली नाहीं. भावनावश होऊन घाईघाईनें व पूर्ण सिद्धता नसतांना केवळ अठ्ठावीस हजार लढाऊ लोकांचे जिवावर ती सुरूं करण्यांत आली." अर्थातच भावनावश राष्ट्राच्या मताप्रमाणें मान तुकविणें विल्सन यांच्या स्वभावास व दर्जास युक्त नव्हतें. त्यांच्या मतें त्या वेळीं व्यवहार व नीति या दोनही बाबतींत अमेरिकेची तयारी नव्हती. म्हणून अमेरिकन प्रक्षुब्ध जनतेला उद्देशून यानंतर तीनच दिवसांनीं सांत्वनपर जाहीर भाषण त्यांनीं केलें. त्यांत ते म्हणाले. ' जिचा अभिमान धरून युद्ध सुध्दां करावें अशा प्रकारची ही बाब आहे. परंतु अमेरिकेनें या वेळीं शांत राहून सर्व जगाला उदाहरण घालून दिलें पाहिजे.

या भाषणावर झाली इतकी कडक टीका विल्सन यांना केव्हांही सहन करावी लागली नाहीं. चुरचुरीत व अलंकारिक वाक्जालानें आपल्या भेकडपणावर व धैर्याभावावर पांघरूण घालून शांतिगायक जनतेची हांजी हांजी करण्याचा आरोप त्यांचेवर करण्यांत येऊं लागला. विल्सन यांनीं मात्र इकडे अगदीं एकट्यानें बसून एक खलिता तयार केला. व तो ता. १३ मे ला जर्मनीला पाठवून प्रसिद्धही केला. ' इषारा दिल्याशिवाय व उतारूंचे प्राणसंरक्षणाची तजवीज केल्याशिवाय कोणतेंही जहाज बुडविलें जातां कामा नये. व आपल्या नागरिकांच्या हक्कासाठीं अमेरिका कोणताही उपाय योजावयास मागें पुढें पहाणार नाहीं ' असा त्यांत मजकूर होता. परंतु कुटिल जर्मनीनें यास त्वरित उत्तर दे-

ऊन ' लुसिटानियावर शस्त्रसामुग्री होती कीं नव्हती ?' असा खोंचदार सवाल उलट विचारला. या प्रश्नाचें उत्तर होय असें आलें तर जर्मनीनें जहाज बुडविलें हें न्याय्य कीं अन्याय्य हा प्रश्नच उरत नव्हता व नाहीं असें उत्तर देणें नीतिदृष्ट्या धाडसाचें होतें. कारण त्यावर लढाऊ तयारी करण्यांत आली होती असें सिद्ध होण्याचा संभव होता ! यामुळें मोठी खळबळ उडाली. सरचिटणीस ब्रायन यानें राजीनामा दिला व तो विल्सन यांनींहि मुकाट्यानें मान्य केला. वास्तविक प्रश्नानें प्रश्न उडून जात होता. तरी या उडवाउडवीच्या उत्तराकडे लक्ष न देतांच विल्सन यांनीं ' पुन्हां असला प्रकार घडून येऊं नये ' अशी मोघम ताकीद फिरून एकदां जर्मनीस दिली. आतां मात्र विल्सन यांच्या शेळपटपणाची कमाल झाली असें म्हणून इंग्लंड व अमेरिका या देशांतील कित्येक लोक तिरस्कारयुक्त स्मितहास्य करूं लागले.

जर्मनीनें आपला क्रमही चालूंच ठेविला. जुलैमध्यें ' नेब्रास्का ' हें अमेरिकन व आगष्टांत इंग्लंडचें ' अरेबिक ' हीं जहाजें बुडविण्यांत आलीं. त्यांतही अमेरिकेची प्राणहानि खूप झाली. या कठिण परिस्थितींत सुद्धां विल्सन यांनीं कायद्यास धरून प्रत्येक वेळीं जर्मनीस निषेधपर पत्रें पाठविलीं व जर्मनीनेंही उलट पोकळ आश्वासनें, फालतू कारणें आणि भरीव भुलथापा रगड दिल्या. सप्टेंबरमध्यें आणखी एक उतारूंची बोट अमेरिकेच्या किनाऱ्यापासून केवळ सव्वाशें मैलांवर जर्मनीनें बुडविली, व अमेरिका म्हणजे आपण यःकश्चित समजतों असें उघड उघड दाखविलें.

समुद्रावर ही स्थिति असतांना खुद्द अमेरिकेच्या भूमीवर पाताळयंत्री जर्मनीच्या कुटिल बुद्धीचा नांगर आपलें भेदकार्य करीतच होता आणि त्या घरभेदी कारस्थानांनीं तर विल्सन यांना टेकीस आणण्याची वेळ आणली. जर्मनीच्या हस्तकांनीं अमेरिकेंतील जर्मनदेशज आणि जर्मनवंशज लोकांस चिथवून त्यांच्याकरवीं डायनामाईटनें पूल तर उडविले, कारखाने तर जाळले आणि ठिकठिकाणीं संप करविले. या सर्व हकीगती न्यू यॉर्कच्या ' वर्ल्ड ' या पत्रानें चव्हाट्यावर आणल्या आणि विश्वसनीय कागदपत्रांचा पुरावा हजर करून या गुप्त कारस्थानांतले खेळ्ये उघडकीस आणले. त्यांतच आस्ट्रियन वकील डॉ. डंबा आणि एक बडे लष्करी व एक आरमारी अंमलदार सामील असल्याचें सिद्ध केलें. या प्रकरणीं सरकारनें शोधन केल्यावर इतके भयंकर लांचलुचपतीचे व फंदफितुरीचे हिडिस प्रकार नजरेस आले कीं, जनतेस ते न कळविणेंच इष्ट वाटल्यावरून गुप्त राखण्यांत आले.

मेक्सिकोंत तर जर्मन हेरांचा व हस्तकांचा नुसता सुळसुळाट माजला होता. त्यांच्या लष्करी शिक्षणामुळें स्वभावतःच ते स्थानिक बंडखोर टोळ्यांचे नायक बनत. आणि त्यांकरवीं अनेक अमेरिकन लोकांचे खून पाडण्यांत आले.

व त्यांची मालमत्ता उध्वस्त करण्यांत आली. आणि ज्या रक्तपातानें यूरोपला ग्रासून टाकलें होतें त्याच्या चिळकांड्या अमेरिकेंतही उडूं लागल्या. प्रत्यक्ष सूर्यास तर ग्रहणच लागतें, परंतु त्यापासूत हजारों मैलांवर असलेल्या पृथ्वीस सुद्धां अंधकार ग्रासून टाकतो ! अशीच काळोखी अमेरिकेच्या तोंडास लागण्याचा प्रसंग आला होता. मगरूर जर्मनी प्रथम अमेरिकेपासून दूर चार पावलांवर आपल्या अत्याचारांचे धडे भरीत होता. परंतु आतां बेमुर्वतखोरपणें खुद्द तिच्या निकटवर्ति प्रांतांतच नव्हे तर प्रत्यक्ष वासगृहांतच आपली बद्माष बेदिलशाही चालवूं लागला होता. व अमेरिकेला स्वतःच्या अब्रूची व मानापमानाची चाड असेल तर तिनें तसें कृतीनें दाखवावें असें स्पष्ट आव्हान देत होता.

या बेअब्रूच्या व लज्जाहरणाच्या प्रसंगीं अमेरिका नामर्दासारखें वर्तन करून हें सर्व उच्छृंखल छंदफंद उघड्या डोळ्यांनीं धर्मराजाप्रमाणें पहात आहे असा चित्रपट अमेरिकेची अब्रू रक्षण करण्याचें काम ज्याच्याकडे जनतेनें दिलें होतें तो अध्यक्ष सर्व जगास दाखविणार कीं काय हा रोकडा सवाल होता ! व कांहींनीं अप्रत्यक्षपणें विल्सन यांस तो वदून दाखविला. विल्सन यांनाही हें कळत नव्हतें कीं काय ? परंतु जनतेस मात्र परिस्थिति कळत नव्हती. दहा कोटि लोकसंख्येच्या अमेरिकेंत दोन कोटि लोक जर्मन, आयरिश, ऑस्ट्रियन व इतर जर्मनीस सहानुभूति असलेले असे होते. आणि सरकारजवळ लष्कर ह्मणाल तर सारें साठ हजार ! आरमाराची स्थिति अगदीं वाईट नाहीं तरी विशेष उत्तेजक अशीहि नाहीं, अशा परिस्थितींत चढाईचें धोरण स्वीकारून घराशेजारीं मेक्सिको व परकीयस्थ जर्मनी या दोन शत्रूशीं लढाई जाहीर करून त्यांत त्यांचा निभाव लागला असता काय हा प्रश्न आहे. विल्सन यांनीं स्वतः याबद्दल कधीं तक्रार अगर कुरकुर केलेली नाहीं. परंतु किती कठिण परिस्थितींतून त्यांस मार्ग काढावयाचा होता याची कल्पना करतां येते. शिवाय, अमेरिका कितीहि जोमदार धनाढ्य व बलाढ्य असली तरी दुर्योधनाप्रमाणें तिचेंहि मर्म मांडीत आहे अगर श्रीकृष्णाप्रमाणें तिचें मरण तळव्यांत आहे. एका दृष्टीनें अध्यक्षाच्या हातीं अप्रतिहत अधिकार व अमर्याद सत्ता राज्यघटनेनें दिली आहे. परंतु त्या अध्यक्षाच्याच अस्तित्वाला चार वर्षांची मर्यादा घालून एक हातचा काढून ठेवला आहे. उगवतां मावळतांच मुळीं चार वर्षांपैकीं बराच काळ जावयाचा ! विल्सन यांचीं तीन वर्षें सरून गेलीं होतीं व आतां त्यांचा मावळण्याचा वेधकाल सुरूं झाला होता. फिरून तेच निवडून येतील कीं नाहीं कोणास ठाऊक ! अशा वेळीं इतकी जड जोखीम कीं जी उरलेल्या अल्प मुदतींत पार पाडतां येइल अशी खात्री नाहीं ती अंगावर घेणें त्यांस अनिष्ट वाटलें. आणि या परिस्थितीचा विपर्यास करून त्यांच्या शत्रूंनीं त्यांचेवर गहजब केला. 'अमेरिकेच्या अब्रूपेक्षां यांना फेरनिवडणुकींत यश मिळण्याची जास्त काळजी आहे. आणि साधारण

शांतिप्रिय जनसमाजाची सहानुभूति मिळविण्यासाठीं हे युद्ध टाळूं पहात आहेत' असा क्षुद्रबुद्धि आरोप त्यांचेवर करण्यांत आला.

परंतु विल्सन यांचेपुढें कोणतें ताट वाढून ठेवलें होतें पहा ! जर्मनी प्रत्येक ठिकाणीं छळण्यास सिद्ध होता. पुरेसें सैन्य नाहीं, युद्धसामुग्री नाहीं, आंतरराष्ट्रीय झगडे सुरू होऊन 'आपसयुद्ध' होण्याची आपत्ति आ वासून उभी होती ! त्यांच्या मनोदेवतेनें त्यांस 'सबूर' असा कौल दिला. प्रथम संस्थानांत अंतःशांतता राखणें अगदीं अवश्य होतें. म्हणून फितुरी लोकांचें उच्चाटण करून अमेरिके-विरुद्ध खटपट्या लोकांना त्यांनीं काँग्रेसची परवानगी न घेतांच हद्दपार केलें. इकडे जर्मनीकडून तटस्थ राष्ट्रांचा कोणत्याही समुद्रावर सुरक्षितपणें फिरण्याचा अधिकार कबूल करवून घेण्याची खटपट त्यांची चालूच होती. मोठ्या प्रयासा-अंतीं एकदांचें जर्मनीनें कबूल केलें कीं, "उतारूंच्या बोटी आगाऊ इषारा दिल्याविना व त्यांच्या जीवरक्षणाची तजवीज केल्याविना आपण बुडविणार नाहीं. 'अरेबिक' बोट बुडविली ही वाईट गोष्ट झाली. तीबद्दल नुकसानभरपाई करून देण्यास आपण तयार आहों. भूमध्यसमुद्रांत व्यापारी जहाजें बुडविणार नाहीं. इत्यादि.' हा करार सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस झाला. यांत विल्सन यांनीं फक्त अन्याय व गैरशिस्त वर्तणुकीबद्दल निषेध करण्याचा आपला हक्क प्रस्थापित करून तटस्थांच्या हक्कांचें जर्मनीकडून नुसतें उच्चारण करविलें जर्मनी तें कितपत मानणार हें शंकितच होतें.

डिसेंबर १९१५ च्या कांग्रेसला मामुली वहिवाटीस अनुसरून विल्सन यांनीं आपला संदेश पाठविला. त्यांत अमेरिकन नागरिक असतां बेइमानपणें जर्मनीशीं सहानुभूति दाखवीत असलेल्या लोकांचा तीव्र निषेध करून त्यांची खोडकी जिरवण्यास सध्याचे कायदे अपुरे आहेत तरी त्यांच्या मर्यादा वाढविल्या पाहिजेत. आणि प्रसंगविशेषीं उपयोग व्हावा म्हणून देशांत लष्करी शिक्षणाची सुद्धां सोय केली पाहिजे असें त्यांनीं लिहिलें. याच लष्करी शिक्षणाविरुद्ध मागें एकदां ते बोलल्याचें वर आलेंच आहे. परंतु हा पगडीफिरवेपणा नसून समय-साधूपणा आहे. ज्या वेळीं जें पाहिजे त्याच वेळीं आणि तेंच केलें पाहिजे ! या समयसाधूपणांत महायुद्धकालीन मुत्सद्यांत सर्वांत अग्रगण्य इंग्लंडचे मुख्य प्रधान लाईड जार्ज, आणि त्यांच्या नंतर विल्सन यांचा नंबर लागेल. विल्सन यांनीं आतां या उपरोक्त दोन गोष्टींसाठीं मोहीम काढण्याचें ठरविलें.

जर्मन अत्याचारीही कांहीं स्वस्थ बसले होते असें नाहीं. पेनसिल्व्हानिया-मध्यें मोठमोठीं धान्याचीं कोठारें त्यांनीं जाळून टाकलीं. बेथलेम व टोपेक येथी-ल शस्त्रागारें उडवून दिलीं. ओहिओंत संप व बंडाळी यांची उठावणी केली. न्यूयार्क बंदरांत एक व्यापारी जहाज भगदाडें पाडून बुडविलें. मेक्सिकोंतील बंडखोरांना सैन्य व संपत्ति पुरविली. खुद्द संयुक्त संस्थानांतील जर्मन लोकांस

हत्यारें वगैरे देऊन त्यांची सुसंघटित फौज उभारण्याची तयारी चालविली. एक ना दोन, हजारों मार्गांनीं त्यांनीं उच्छाद मांडला होता. संयुक्त संस्थानांमधून इंग्रजांच्या कानडावर स्वारी करण्याचाही त्यांनीं घाट घातला होता. परंतु अमेरिकिन पोलिसांच्या चातुर्यानें तो कट फसला. अमेरिकेचें ऐक्य व शांतता तडकण्याच्या मार्गास लागली होती. या सर्वांवर उपाय म्हणून विल्सन यांनीं ही व्याख्यानांची मोहीम योजिली होती. अर्थातच ही मोहीम आगामी निवडणुकीच्या उद्देशानेंही होतीच.

या वेळीं त्यांच्या डेमोक्रॅटिक पक्षालाही थोडें वारें भरलें होतें. विल्सन यांच्या या लष्करी शिक्षणाच्या योजनेवर मतें देण्यास त्यांनीं दिरंगाई चालविली होती. ब्रायननें मोठ्या दिमाखानें विल्सन यांच्याबरोबर दौऱ्यावर जाण्याचें नाकारलें. तरी विल्सन यांनीं वॉशिंग्टन सोडलेंच. ही मोहीम अयशस्वी झाली तर पुन्हां विल्सन यांस प्रोफेसर एके प्रोफेसर करीत बसावें लागणार होतें. पहावें काय होतें तें! या मोहिमेस आरंभ मुद्दामच ज्या भागांत जर्मनांची वस्ती दाट होती तेथें करण्यांत आला.

या मोहिमेंतील पहिलें व्याख्यान ता. २९ जानेवारी रोजीं पिटस्बर्ग या शहरीं झालें. येथील सर्व वस्ती मजुरांची होती. व ते सर्व पैशाचे मागें लागलेले लोक होते. आजूबाजूस नजर फिरवण्यास त्यांचेजवळ फुरसत कोठें होती? यामुळें अध्यक्षांचें स्वागत यथातथाच झालें आणि व्याख्यानाचा कार्यक्रमही असा तसाच झाला! दुसरें व्याख्यान मिलावाकी या चार लक्ष लोकवस्तीच्या गांवीं झालें. येथील बहुतेक वस्ती जर्मनांची आहे. विल्सन हे मुद्दामच येथें उतरले होते. आजपर्यंत अध्यक्षाला संरक्षकांची जरूर वाटत नसे. पण येथें जमाव व विल्सन यांची मिरवणूक यांच्यांत दुतर्फा पोलिसांची सांखळी तयार करण्यांत आली होती.आणि घोडेस्वार विल्सन यांच्या मागें व पुढें त्यांचें रक्षण करीत होते. 'प्रथम अमेरिका!' या उद्गारानें विल्सन यांनीं आपल्या व्याख्यानास प्रारंभ केला. स्वतः तुम्ही कोणत्याही देशाचे असला तरी आज तुम्ही अमेरिकिन नागरिक आहांत व म्हणून अमेरिकेची इभ्रत सांभळण्यासाठीं राष्ट्रैक्य राखणें तुम्हांस भाग आहे आणि ही अमेरिकेची अब्रू जर लढाईशिवाय रक्षण होतच नसेल तर रक्तपातासही आपण डरतां कामा नये.' अशा प्रकारचें त्यांनीं भाषण केलें. त्यांत कित्येक वेळां टाळ्यांचा कडकडाट शिष्टाचार अगर सहजस्फूर्ति म्हणून करण्यांत आला. विल्सन यांनीं तेथें येण्याचें धाडस केलें हेंच फार झालें होतें. या मोहिमेसाठीं स्पेशल गाडी सोडण्यांत आली होती. प्रत्येक स्टेशनवर ती उभी केली जाई. अध्यक्षांचा सन्मान करण्यांत आल्यावर थोडेंसें भाषण होऊन गाडी पुढें जात असे. शिकागोस जर्मन वस्तीच प्रामुख्यानें असल्यामुळें दंगा होतो कीं काय अशी पोलिसांस धास्ती वाटत होती परंतु व्याख्यान निर्विघ्नपणें पार पडलें.

ता. २ फेब्रुवारी रोजीं कॅन्सस नांवाच्या शहरीं ते आले. हें शहर मध्यवर्ती आहे आणि लोक आपलीं शेतें व आपण या मंडूकवृत्तीनें राहातात. बाह्य जगाची त्यांस दादफिर्यादही नसते. येथें विल्सन यांचें उत्कृष्ट भाषण झालें. "शेतकऱ्यांचें धान्य परदेशीं जातें यामुळें त्यांचा फायदा होतो. जहाजांचें जर योग्य संरक्षण झालें नाहीं तर या शेतकऱ्यांचें कसें होणार ? अध्यक्षाचें हें काम आहे. परंतु खुद्द प्रजेचा त्याला आधार पाहिजे. अमेरिकेची अब्रू रक्षण करण्यास कायद्याला जसा दंड (Sanction) तशी अध्यक्षाचे मागें जनता ही शक्ति आहे. जनतेचा पाठिंबा असेल तरच तो आपली जबाबदारी पार पाडूं शकेल. प्रत्येक प्रजाजनाजवळ मताची शक्ति आहे. परंतु त्याचे जोडीला शस्त्रही पाहिजे. शस्त्र वापरण्यास मोकळीक असणें हा प्रत्येक स्वतंत्र नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. त्या आपल्या हक्काला जागून मत व शस्त्र ही दुधारी शक्ति तुम्ही आमच्या पाठीमागें द्या एवढेंच मागणें आहे." या प्रकारची विचारसरणी त्यांनीं आपल्या व्याख्यानांत मांडली. शेतकऱ्यांना अर्थातच त्यांच्या बोलींत बोलली गेलेली ही भाषा तेव्हांच पटली आणि त्यावर शिक्का मोर्तब करण्यासाठीं म्हणूनच कीं काय व्याख्यानाचे शेवटीं विल्सन यांनीं राष्ट्रगीत म्हणण्यास सुरवात केली. सर्व श्रोते उठून उभे राहिले होते व त्यांनीं आपला सूर अध्यक्षांच्या सुरांत मिसळला होता. श्रोतृसमुदायानें दुसऱ्या कडव्याला 'वन्समोअर' दिला. तेव्हां तर विल्सन यांनीं आपले बाहू त्यांचेकडे आडवे पसरले. जणूं काय त्यांना ते आलिंगनच द्यावयास सिद्ध झाले होते. शिक्षण व सुधारणा यांच्या योगानें चिकित्सक बुद्धि वाढून ज्यांची अंतः-करणें भावनारहित झालीं नव्हतीं, अशा त्या साध्याभोळ्या शेतकऱ्यांवर याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? विल्सन यांसही जास्त हुरूप आला. या दौऱ्यांत लष्करी शिक्षणावर भर देतांना विल्सन हे जितके उत्कटतेनें बोलत तितके रूझवेल्ट सुद्धां बोलूं शकतेना ! आरमाराबद्दलही असेंच. "पनामापासून वर एका बाजूला अलास्कापर्यंत व दुसरीकडे मेनपर्यंत असा दोन बाजूला अफाट समुद्र किनारा पसरला आहे. त्याचे रक्षण करण्याची आपणांवर जबाबदारी आहे. इतकी मोठी जबाबदारी जगांतील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास नाहीं. माझ्या मतें आपलें आरमार जगांत बालिष्ठ व प्रचंड असलें पाहिजे. तरच निभाव लागेल." हे त्यांचे शब्द आहेत. अठरा हजार श्रोत्यांनीं त्यावर टाळ्यांचा कडकडाट केला. यावेळीं इंग्लंड महायुद्धांत गुंतलें होतें म्हणून बरें, नाहीं तर या भाषणावर त्यानें आकाश-पाताळ एक केलें असतें ! या दौऱ्यावरून मध्येंच विल्सन यांस परत यावें लागलें.

वाशिंग्टन येथें खुद्द त्यांच्याच पक्षांतील बरेच पुढारी अगदीं उघडपणें त्यांच्याविरुद्ध गेले होते. लढाईचा नूरही थोडा पालटला होता. इंग्लंडनें आपल्या व्यापारी जहाजांवर संरक्षणासाठीं लढाईची तयारी ठेवली होती. हीं जहाजें अमेरिकेच्या किनाऱ्यावर नांगरून ठेविलीं जात. असल्या जहाजांनाही लढाऊ

गलबतें कां समजण्यांत येऊं नये अशी जर्मनीनें अमेरिकेकडे तक्रार केली होती. अमेरिकेंतील जर्मनांनीं तर ही तक्रार उचलून धरलीच धरली, परंतु कांहीं अमेरिकनांना सुद्धां याच वेळीं जर्मनीचा पान्हा फुटून तिच्यांत कांहीं तथ्य आहे असें वाटूं लागलें. जर्मनीच्या खटपटीनें कॉंग्रेसमध्येंही या तक्रारीचे कांहीं वाली निघाले. अमेरिकन नागरिकांनीं असल्या जहाजांतून प्रवास करणें धोक्याचें आहे सबब तशी बंदी करावी अशा आशयाच्या बिलाचा खर्डा तयार झाला व तो कॉंग्रेसमध्यें मांडण्यापूर्वीं त्याची वर्दी देण्यासाठीं दोन प्रतिनिधी अध्यक्षांकडे आले. परंतु विल्सन यांनीं त्यांची भेट न घेतां त्यांचें लेखी म्हणणें मागून घेऊन आपलें उत्तर पाठविलें. " अमेरिकन नागरिकांच्या जीवाला धक्का लागला तर त्याचा सूड उगविण्यासाठीं युद्ध करावें लागेल, या भीतीनें असला कायदा पास करणें म्हणजे निवळ आत्मवंचना आहे. अमेरिका नादान नाहीं. युद्धाचे नियम मोडून व तटस्थांच्या हक्कांची पायमल्ली करून कोणी जर वागूं लागले, तर त्याचा प्रतिकार करण्यास अमेरिका मागें घेणार नाहीं. वाटेल त्या जहाजांतून जाण्याचा अमेरिकन प्रजाजनास नैसर्गिक हक्क आहे. त्यावर असें नियंत्रण घालणें भेकडपणाचें व गैरकायदाही आहे. " हें उत्तर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होतांच अमेरिकन जनतेनें अध्यक्षाचा उदो उदो चालविला. व पर्यायानें सभासदांची नाचक्की केली. कांहीं जर्मन पत्रांखेरीज झाडून सर्वांनीं अध्यक्षांसच पुष्टि दिली. इतकी शोभा झाल्यावर कॉंग्रेसचे सभासद सावध झाले. विल्सन यांनीं ज्यांची भेट घेण्याचें नाकारलें होतें, ते सभासद पुन्हां त्यांच्या भेटीस आले. विल्सन यांनींही आतां भेट देऊन माझ्या मताप्रमाणेंच याचा निकाल लागला पाहिजे असें त्यांस खडकावलें. दुसरी एक भुमका विल्सन यांचेविरुध्द उठविण्यांत आली होती.ती अशी कीं, 'या महायुध्दाचा शेवट लवकर होण्यास अमेरिकेनें युध्दांत पडलेंच पाहिजे, असें एक विधान त्यांनीं आपल्या दौऱ्यांतील एका व्याख्यानांत केलें आणि त्यावर कांग्रेसमध्यें व इतरत्रही खूप चर्चा चालू होती. ती बंद करण्याकरितां विल्सन यांनीं एका सभासदास मुद्दाम मुलाखत देऊन त्या विधानाचा इनकार केला व तेव्हांच सांगितलें कीं, मला नको असलेला हा ठराव नुसता गाळून न टाकतां कांग्रेसनें तो मतास घालून नापास केला पाहिजे. त्याप्रमाणें दोनही सभांनीं तो नापास केला व जर्मनीनें जुळवून आणलेला हा घाट कोसळून विल्सन यांचें माथें उजळ झालें. कारण हें बिल पास होणें म्हणजे अप्रत्यक्ष रीत्या सशस्त्र परंतु उतारू नेणारी व व्यापारी जहाजें बुडविण्याची जर्मनीस परवानगी देणेंच होतें !

जर्मनीनें तर काय विल्सन यांचें जणूं सत्त्वच पहावयाचा विडा उचलला होता. विल्सन यांना सहाच महिन्यांपूर्वीं दिलेलें वचन मोडून ता. २४ मार्च १९१६ रोजीं ससेक्स नांवाचें उतारू नेणारें जहाज अगाऊ इशारा न देतां व

प्राणरक्षणाची तजवीजही न करतां बुडविलें. पुन्हा अमेरिकन जनता खवळून गेली. जर्मनीनें ही बोट इंग्लिशांच्या पाणसुरुंगास लागून फुटली असें कळविलें. परंतु टार्पेडो कोठून आला हें कळलें होतें, त्यामुळें जर्मनीनेंच ती बुडविली याबद्दल संशयास जागा नव्हती. आतां मात्र विल्सन यांनीं काँग्रेस बोलावून भाषणांत सांगितलें कीं, ‘ अमेरिकेच्या सहनशक्तीची पराकाष्ठा झाली. जर्मनीनें आपल्या या नौयुद्धपद्धती ( Submarine warfare ) सोडून न दिल्या तर त्यांशीं अमेरिकेस शत्रुत्व पत्करावें लागेल. अजूनही काँग्रेसच्या सभासदांनीं रडतखडतच यास संमति दिली. जर्मनीला हें कळविण्यांत आलें. जवळ जवळ हा निर्वाणीचा खलिता होता. जर्मनीनें तो अमान्य केला असता, तर अमेरिकेस युद्ध करणेंच भाग होतें. परंतु जर्मनीनें उतारू बोटी न बुडविण्याचें पुन्हां एकदां कबूल केलें परंतु इंग्लंडनेंहि जर आपल्या जलांतःप्रवेशिकांचें कुटिल युद्ध थांबविण्याचें कबूल केलें तरच आपणहि बोलल्याप्रमाणें चालूं अशी अट घातली. ‘ हें वचन तरी प्रामाणिकपणें पाळलें जाईल अशी आशा आहे ’ असें विल्सन यांनीं उलट जर्मन सरकारास कळविलें. या वेळीं विल्सन यांचेवर केसरला कुरघोडी करतां आली नाहीं. इभ्रत राखून शांतताही साधण्याविषयीं तत्पर असलेल्या अमेरिकनांना जर्मनीचें हें उत्तर फोलकट होतें तरी तोच विजय वाटला व त्यांनीं तो तसा पाळलाही. परंतु विल्सन यांना मात्र धागधुगच वाटत होती. जर्मनीच्या आतांच्या वर्तनानें आकाश स्वच्छ झालें असें वाटत होतें. परंतु जर्मनी आपलें वचन पाळीलच अशी शाश्वती नसल्यानें, कोणत्या क्षणीं तें मेघव्याप्त होईल याचा नेम नव्हता. वर्षाकालारंभींच्या निरभ्र आकाशाची ग्वाही कोणी द्यावी ?

सूर्यास्तापूर्वी लख्ख उजेड असतां हलके हलके तमावरण पडत अमावास्येचा दाट अंधकार पसरतो, त्याप्रमाणें अमेरिकेवर न कळत युध्दपटल अगदीं पूर्णपणें पडलें होतें. राष्ट्राचें नैतिक ऐक्य नष्ट झालें होतें. आर्थिक स्थिति विस्कळीत झाली होती. शांततेनें कूच केलें होतें. संपत्तीचा ओघ समतेनें न वाहातां कांहीं विशिष्ट गटारींतूनच वाहूं लागल्यामुळें सर्वत्र संप व सामाजिक अस्वस्थता उत्पन्न झाली होती व बाहेर पडण्याचा मार्गही दिसेनासा झाला होता. आतां अमेरिकन जनतेला सैन्य व आरमार वाढविण्याची जरूर भासूं लागली आणि केव्हांना केव्हां तरी आज ना उद्यां या युध्दांत उडी घातल्याशिवाय गत्यंतर नाहीं हें कळून आलें. कित्येक वर्तमानपत्रें अध्यक्षाच्या सुस्तपणाला दोष देऊं लागलीं. ‘ इतक्या थरास गोष्टी आल्या नसत्या. यापूर्वीच विल्सन यांनीं मध्यस्थी केली असती, तर त्यांचें म्हणणें युध्यमान राष्ट्रांनीं मानिलें असतें व तह झाला असता’ असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु विल्सन यांस तसें वाटत नव्हतें. युध्दांत पडण्याची निकट येऊं पाहणारी ही नवीन जबाबदारी पार पाडण्याच्या उद्योगास आतां ते लागले. युध्दांत शिरावयाचें तर सर्व अमेरिका लखोटबंद पाहिजे आणि उत्साही पाहिजे.

विल्सन यांचीं वैयक्तिक मतें साम्राज्यें व लष्करशाही यांविरुध्द होतीं, परंतु तीं त्यांना इतक्यांतच जनतेला दाखवायाचीं नव्हतीं. अमेरिकेंतील एकूण एक जनता आपण होऊन जर आपल्यामागें यावयास पाहिजे असेल, तर त्यांच्या मनोभावनांस रुचतील अशीं कांहीं तरी नवीन तत्त्वें व पटतील अशीं कारणें दाखवून महायुध्दांत सामील झालें पाहिजे हें त्यांस कळून चुकलें होतें. सत्कृत्याविषयीं इच्छा असणें ही अमेरिकन लोकांची नैसर्गिक प्रवृत्ति आहे.मानवजातीविषयीं औदार्य हा त्यांचा मनोधर्म आहे. या गोष्टीस धरून कोणतीही चळवळ काढा, अमेरिका वाटेल तो स्वार्थत्याग करील! विल्सन यांस अमेरिकन लोकांची तत्त्वनिष्ठा ठाऊक असल्यानेंच ते एकदां म्हणाले होते कीं, " आपल्या तत्त्वापैकीं इतकासा सुध्दां भाग मी जपून ठेवीन आणि वाटल्यास देशाचा एकादा तुकडा त्यापायीं गमावीन. "

याच सुमारास हार्वर्डचे चार्लस इलियट यांनीं या गोष्टीचा पुढाकार घेतला. " अखिल विश्व आज संकटांत सांपडलें आहे. जर्मनीची लष्करशाही जर यशस्वी झाली, तर सर्व जगभर लष्करशाही माजून युद्धावरच त्याची उभारणी होईल. संयुक्तसंस्थानांची संस्कृति शांतताप्रधान आहे आणि ती नष्ट होऊं नये अशी इच्छा असेल तर अमेरिकेनें इंग्लंड व फ्रान्स या दोस्तांच्या बाजूनें लढाईत सामील झालें पाहिजे " असें प्रतिपादण्यास त्यांनीं सुरवात केली. अमेरिकेची हीं सर्व तत्त्वें जगभर पसरविण्याकरितां एक ' शांतताप्रस्थापक विश्व-संघ ' ( World League to enforce Peace ) स्थापण्यांत आला. माजी अध्यक्ष टॅफ्ट या संघाचे अध्यक्ष झाले. मोठमोठ्या कायदेपंडित व सुशिक्षित विद्वानांचें त्यास साहाय्य मिळालें. जनताही आपला पैसा सढळ हातानें या संघाच्या कार्यासाठीं खर्च करण्यास देण्यास तयार झाली. २७ मे १९१६ रोजीं एक परिषद् भरविण्याचें या संघानें ठरविलें. विल्सन यांसही निमंत्रण देण्यांत आलें. या संघाची कल्पना विल्सन यांस पसंत होती. कारण, त्या योगानें त्यांचें काम आयतेंच साधणार होतें. विल्सन यांनीं या परिषदेंत व्याख्यानही देण्याचें कबूल केलें आणि त्याप्रमाणें दिलेंही. त्यांत त्यांनीं अमेरिकेच्या इच्छा म्हणून सांगितल्या. त्या पुढीलप्रमाणें. ( १ ) युध्यमान राष्ट्रांनीं परस्पर विचारविनिमय करून तह घडवून आणावा. ( २ ) समुद्रावरील स्वातंत्र्यरक्षणासाठीं व तहांतील कलमांचें उल्लंघन करून कोणत्याही राष्ट्रानें आगाऊ इशारा न देतां अगर भांडणाचीं कारणें सर्व जगापुढें न मांडतां दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध युद्ध पुकारलें असतां त्याचें निवारण करण्यासाठीं एक राष्ट्रसंघ स्थापण्यांत यावा.

या कल्पनांवर ' स्वप्नसृष्टि ' ' मनोराज्य ' ' शेखमहंमदी ' इत्यादि विशेषणें देऊन अनेकांनीं अनेक प्रकारच्या सुष्ट दुष्ट टीका निरानिराळया हेतूंनीं प्रेरित होऊन केल्या. परंतु या व्याख्यानाचा मुख्य उद्देश अमेरिकन जनतेला युद्धांत

भाग घेतांना बुजरेपणा वाटूं नये हाच होता. हा उद्देशही जर्मनीच्या अमेरिकेंतील हितचिंतकांच्या ध्यानीं आला व त्यांनीं त्याचा निषेधही केला. ‘ सन ’ या वृत्तपत्रानें चक्क लिहिलें कीं, ‘ तोंडानें शांतिपाठ गाऊन अमेरिकेला युद्धाकडेच ओढून नेण्याचा अध्यक्षमहाशयांचा हा कावा आहे. ’ आणि हें खोटें होतें काय?

विल्सन यांची अध्यक्षाची मुद्दत अगदीं थोडी उरली होती आणि त्यांनीं इच्छिलेल्या गोष्टींपैकीं अजून बऱ्याच पार पाडावयाच्या होत्या. रात्र थोडी व सोंगें फार आणि अडचणी अपरिमित अशी स्थिति होती. सैन्य व आरमार वाढविण्याच्या त्यांच्या योजनेला फारसा महत्त्वाचा विरोध होणें शक्य नव्हतें.कारण महायुद्धानें त्याची जरूरी स्वसंरक्षणासाठीं किती आहे हें कळून चुकलेंच होतें. या बाबतींत दोन बिलें त्यांनीं पास करून घेतलीं, पण त्यांच्या मागण्या पुरापूर मान्य न होतां त्यांत छाटाछाट झालीच. अमेरिकेचा व्यापार बहुतेक परदेशी जहाजांतूनच चाले. ही स्थिति नाहींशी करण्यासाठीं विल्सन यांना पांच कोटी डॉलर मंजूर करण्यांत आले.

या शिवाय फॅक्टरीमधून लहान मुलें कामावर असतात त्यांच्या हिताचा एक कायदा विल्सन यांनीं घटनेच्या थोडा विरुद्ध होत असतांही पास करून घेतला, त्याअन्वयें रात्रीचें काम न सांगणें, आठ तासांपेक्षां जास्त काम न घेणें वगैरे बाबी ठरविण्यांत आल्या व दुसरेही किरकोळ लोकहिताचे कायदे त्यांनीं पास करून घेतले.

याच वेळीं एक अनाहूत संकट उपस्थित झालें होतें. रेल्वे कामगारांची १० व ९ ऐवजीं ८ तास कामाची मागणी रेल्वे कंपन्यांनीं नाकारल्यामुळें त्यांनीं ता० २४ सप्टेंबरला संप सुरू करण्याची नोटीस दिली होती. या संपांत निरनिराळ्या रेल्वे लाइनीवरील जवळ जवळ चार लाख लोक सामील होणार होते. आणि त्यामुळें सर्व देशभर मोठा गोंधळ उडून जाणार होता. नवीन निवडणुकीची ही वेळ असल्यानें कामगारांनीं मुद्दाम संपासाठीं हीच वेळ शोधून काढली होती. विल्सन यांना कामाचे तास कमी व्हावे असें वाटत होतेंच. त्यांनीं काँग्रेसमध्यें तसा कायदा पास करून घेऊन त्यांचें गाऱ्हाणें दूर केलें. ठरल्या दिवशीं अर्थातच संप झाला नाहीं. या कृत्याचा परिणाम कंपन्यांच्यावर काय झाला असेल तो असो ! परंतु सामान्य मनुष्याला एक मोठें संकटच विल्सन यांनीं टाळलें असें वाटणें साहाजिक होतें आणि अर्थातच याचा परिणाम निवडणुकीचे वेळीं दिसून येणें अगदीं नैसर्गिक होतें.

अध्यक्षाच्या नव्या निवडणुकीचे वेळीं विल्सन उभे राहणार हें ठरलेलेंच होतें. डेमोक्रॅटिक पक्षालाही त्यांच्याशिवाय दुसरा कोणी खात्रीचा पुढारी नव्हता. मतदार मंडळी व सर्व देश या निवडणुकींत अगदीं गुंग होऊन गेला होता. इतका कीं, महायुद्धाचें सुद्धां त्यांस विस्मरण पडलें आणि जें कांहीं स्मरण

होतें तें इतक्यापुरतेंच कीं, विल्सन यांनीं देशास युद्धापासून अलिप्त ठेविलें. या ' युद्धापासून अलिप्त ठेवणाऱ्या ' आणि ' तावून सुलाखून निघालेल्या ' मनुष्या-सच अमेरिकन जनता पुन्हां निवडून देणार होती काय ? निदान परंपरा तरी लोकप्रिय झालेल्या कर्तबगार अध्यक्षाला पुन्हां निवडून देण्याचीच होती !

रिपब्लिकन व प्रोग्रेसिव्ह पक्षांना मागील निवडणुकींत अद्दल घडली होती. तीमुळें शहाणे होऊन या वेळीं त्यांनीं आपसांत तडजोड करून विल्सन यांस म्हणून पाडण्याचें ठरविलें. न्यूयॉर्क संस्थानाचे माजी गव्हर्नर ह्यूजेस नांवाचे गृहस्थ आतां न्यायाधीश होते. त्यांची नेमणूक अध्यक्षासाठीं उमेदवार म्हणून करण्यांत आली. हा सत्तर वर्षांचा वयोवृद्ध मनुष्य अनुभववृद्धही होता. परंतु मतदार मंडळीला विल्सन यांच्याइतका तो आकर्षक वाटणें शक्य नव्हतें. परंतु ही शर्यत मात्र मोठी महत्त्वाची होती. दोघांच्याही व्याख्यानांच्या मोहिमा सुरू झाल्या. नवीन कार्यक्रम असा कोणापुढेंच सांगण्याजोगा नव्हता. विल्सन यांना आपलें गेल्या चार वर्षांतलें कामकाज लोकांपुढें मांडतां येण्याजोगें होतें. हा फायदा त्यांच्या प्रतिपक्षीयांस नव्हता. उलट विल्सन यांच्या कामगिरीवर बाधक टीका करून त्यांची लायकी हाणून पाडण्याचा जो फायदा त्यांना होता तो विल्सन यांना नव्हता ! खुद्द निवडणुकी जितक्या चुरशीच्या झाल्या इतक्या कांहीं या मोहिमा झाल्या नाहींत! महायुद्धासंबंधीं कोणीच कांहीं बोलेना. विल्सन हे मोघम म्हणत कीं, अमेरिकेला तह घडवून आणावयाचा आहे. परंतु तो घडवून आणण्यासाठीं लढाई करावी लागणार होती कीं काय त्याबद्दल चकार शब्द नाहीं ! अमेरिकेशीं अप्रामाणिक बनून जर्मनांच्या बाजूनें वागणाऱ्या लोकांचा त्यांनीं ठिकठिकाणीं जाहीर निषेध केला. उलट ह्यूजेस यांनीं नुसत्याच विल्सन यांच्या, त्यांच्या दृष्टीनें गुळमुळीत व पुळपुळीत परराष्ट्रीय धोरणाबद्दल खूप शिरा ताणल्या. पण विल्सन यांचा जागोजागीं सन्मान करण्यांत आला. मजूरवर्ग व बहुजनसमाज त्यांचेवर फिदा होताच. नवीनच हक्क दिलेल्या मतदार स्त्रिया कोणास मतें देतात हें अनिश्चित होतें. ही मतें चांगलीं चाळीस लक्ष होतीं. डेमोक्रॅटिक पक्षानेंच ही सुधारणा घडवून आणली होती व त्या वेळीं रिपब्लिक पक्षानें नसतें दुखें उत्पन्न करून कोलदांडा घालण्याचा प्रयत्न केला होता. अर्थात् हीं मतें बरीचशीं विल्सन यांसच मिळण्याचा संभव होता.

अशा स्थितींत नोव्हेंबरच्या सात तारखेस मतें देण्यास सुरवात झाली. दोनही पक्षांस सारखीच धाकधुक वाटत होती. आणि वातावरणही घटकेंत विल्सन यांस अनुकूल तर घटकेंत ह्यूजेस यांस अनुकूल याप्रमाणें रंगपालट करीत होतें. सायंकाळीं सात वाजतां तर विल्सन हरलेच असा रंग दिसल्यामुळें कांहीं वृत्तपत्रांनीं तसें प्रसिद्धही केलें. दुसऱ्या दिवशींच्या सकाळच्या लंडन टाइम्सनें आपला अंक मद्दाम थांबवून घेऊन त्यांत ह्यूजेस निवडून आले म्हणून

प्रसिद्ध केलें आणि सायंकाळच्या वर्तमानपत्रांनीं तर त्यांचें चरित्रही प्रसिद्ध केलें, पण पुन्हां वारें बदललें. विल्सन कां ह्यूजेस असा ताजवा उभा राहिला आणि कोणी तरी निवडून येणार खास, एवढेंच उत्तर देतां येण्याजोगें होतें ! शेवटीं विल्सन यांस २६९ आणि ह्यूजेस यांस २४७ मतें पडून विल्सन निवडून आले असें कळलें व शेवटीं सरकारी रीत्या जाहीर करण्यांत आलें, तेव्हां विल्सन हे २७६ विरुध्द २५५ मतांनीं निवडून आल्याचें ठरलें !

एका घटकेंत विल्सन यांच्या डोळ्यांपुढें पुढील चार वर्षांतील गोष्टींचा चित्रपट उभा राहिला असेल ! महायुध्दाचें भूत भेडसावीत होतेंच. त्यास गति देण्याची जबाबदारी त्यांचेवर येऊन पडली होती. परंतु आतां चार वर्षांची निश्चिती झाल्यामुळें त्यांना कोणतेंही पाऊल टाकण्यास क्षणोक्षणीं मागें वळून पाहाण्याचें कारण नव्हतें. ते पाऊल ते कोणत्या दिशेनें टाकणार होते हें अमेरिकन जनताही मोठ्या उत्सुकतेनें पहात होती.

# प्रकरण ५ वें.

## युद्धाध्यक्ष विल्सन.

Germany has once more said, that force and force alone shall decide whether justic and peace shall reign in the affairs of men, wheather right as America concieves it or dominion as Germany Conceives it shall determine the destinies of mankind. There is therefore, but one response possible from us; force, force to the utmost, force without stint or limit, thirighteous and tre umphant force which shall make right the law of the world and cast every selfish dominion down in the dust. ”

—W. Wilson. ( War speech.)

ता० २३ नवंबर १९१६ रोजीं रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार ह्यूजेस यांनीं अमेरिकेच्या अध्यक्षाचे जागीं पुन्हां निवडून आल्याबद्दल विल्सन यांचें तारेनें अभिनंदन केलें आणि विल्सन यांच्या वाटेंतील हा निवडणुकीचा बांध फुटला जाऊन १९२१ च्या मार्चपर्यंत त्यांच्या राजकीय प्रवाहाला मुक्तमर्यादा मिळाली. या सव्वाचार वर्षांच्या अवधीचे दोन भाग पडतात: नवंबर १९१६ ते नवंबर १९१८ ला ‘ युद्धतकुबी ’ होईपर्यंत एक भाग, आणि तेथून पुढील उरलेला काल हा दुसरा भाग. वस्तुतः जगाच्या दृष्टीनें यानंतर विल्सन यांचें चरित्र संपल्यासारखेंच आहे. परंतु त्याचा तत्त्वतः अंत यानंतरही उण्यापुऱ्या

चार वर्षांनीं ता. ३ फेब्रुवारी १९२४ रोजीं त्यांच्या नश्वर देहाच्या नाशाबरोबर झाला. वर सांगितलेल्या दोन वर्षांच्या पहिल्या भागांत महायुद्धाचा रंग पालटला होता. जर्मनीची लष्करशाही सामोपचारपद्धतीनें वळत नाहीं हें पूर्णपणें लक्षांत आल्यामुळें अमेरिकाही ता. ६ एप्रिल १९१७ ला युध्दांत सामील झाली.

महायुद्ध सुरू झाल्यापासून गेलीं दोन वर्षें अनेक कारणांस्तव अनेक प्रकारच्या लोकांचे अनेक उलट सुलट आक्षेप व आरोप सहन करून विल्सन यांनीं ताटस्थ्य राखिलें होतें. जगभर शांतता नांदविण्यासाठीं या युध्दाचा निकाल शक्य तितक्या लवकर लाविला पाहिजे हें उघडच होतें. त्याचप्रमाणें तो निकाल युध्दाशिवाय लागणार नाहीं हेंही यापूर्वीच कळून चुकलें होतें. अमेरिकेनें कोणाच्याविरुध्द लढावयाचें याचाही जवळ जवळ निश्चय झालाच होता. या युध्दांत सामील होण्यास योग्य संधीचीच काय ती वाट विल्सन पहात होते. जर्मनीचे हजार अपराधांचें माप भरेपर्यंत स्वस्थ बसून राहाणें त्यांस इष्ट वाटलें होतें. शिवाय, अशा वेळीं या आगींत पडावें कीं नंतर तींत फार वेळ राहावें लागूं नये हीहि दृष्टि होती. या दृष्टींनीं १९१६ सालचा शेवट विल्सन यांस अनुकूलतेचा दिसून आला. जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी यांची अंतःस्थिति असमाधानकारक असल्याची साधार बातमी होती. शिवाय जर्मनीकडून दुर्वर्तनही भरपूर झालें होतें. बेल्जममधील अत्याचारांचें अतिशयोक्त वर्णन 'ब्राईस कमिशन' नें प्रसिध्द केलें होतें. त्यामुळें अमेरिकेंत जर्मनीविरुध्द चीड उत्पन्न झाली होती. खुद्द अमेरिकेचें सैन्य व आरमार सामर्थ्यवान करण्याच्या कामीं विल्सन यांस यश आलें होतें, अशा प्रकारें युध्दांत पडण्याची योग्य संधि आलेली दिसतांच त्या दिशेनें हालचाल विल्सन यांनीं सुरू केली. युध्यमान राष्ट्रांना उद्देशून एक खलिता त्यांनीं तयार केला व तो डिसेंबरच्या ख्रिस्तमसपूर्वीं सर्वांस पाठविण्याचें त्यांनीं ठरविलें. यांत प्रत्येक युध्यमान राष्ट्रास त्यानें आपले उद्देश व मागण्या जाहीर करून, तह कोणत्या पायावर घडून येणें शक्य आहे हें विल्सन यांस कळवावें असें आव्हान दिलें होतें.

हा खलिता विल्सन यांनीं अगदीं एकट्यानें गुप्तपणें तयार केला होता, तरीही त्याची बातमी फुटलीच आणि धूर्त जर्मनीनें त्यापूर्वीच त्या दिशेनें कांहीं अर्धंपक्कें करून ठेवलेलें असावें, या धोरणानें ता. १२ रोजींच रिचस्टागची सभा बोलावून त्यांत चान्सेलरचें भाषण झालें; तेव्हां त्यानें आमची सुध्दां तह होऊन शांतता घडून यावी अशीच इच्छा आहे म्हणून विल्सन यांनीं ज्या अटी मांडण्याचें ठरविलें होतें, त्यांपैकींच कांहीं तहाच्या अटीही प्रसिध्द केल्या आणि असलें प्रथम तहाची भाषा बोलण्याचें व शांतिपाठ गाण्याचें श्रेय सुखासुखीं विल्सन यांना लाभूं दिलें नाहीं. विल्सन यांनीं आतां आपला खलिता प्रसिध्द करणें म्हणजे एक प्रकारें जर्मनीकडून झालेल्या उठावणीलाच उत्तर देण्याप्रमाणें होतें, तरी पण त्यांनीं ठरल्याप्रमाणें ता. २० रोजीं सर्व राष्ट्रांकडे आपलें म्हणणें

पाठविलेंच. मात्र आतां या खलित्यांत त्यांनीं तह घडवून आणण्याची अगर मध्यस्थीची भाषाच काढली नाहीं. फक्त प्रत्येक राष्ट्रांचें म्हणणें तरी काय आहे याचा थांग लावून तह घडून येऊन शांतता प्रस्थापित व्हावयाच्या मार्गांत काय काय अडचणी आहेत हें कळावें हा आपला हेतु असल्याचेंच फक्त त्यांनीं दर्शित केलें होतें आणि जातां जातां पुढील कार्यकारणभावासंबंधाची किल्लीवजा खोंच मारून ठेविली होती. ‘ सत्पक्ष कोणाचा आहे हें उडदामध्यें काळेंगोरें निवडण्यासारखेंच आहे. परंतु तटस्थ राष्ट्रांना आपलें ताटस्थ्य राखणें आजच दुरापास्त झालें आहे आणि यापुढें जर महायुध्द असेंच चालू रहावयाचें असेल तर तें एक क्षणभरही टिकणें अशक्य आहे ’ असें त्यांनीं लिहिलें होतें. या विल्सन यांच्या खलित्याला जर्मनीनें अगदीं ताबडतोब उत्तर दिलें. एक सर्वराष्ट्रीय परिषद् भरवून तींत तहाच्या कलमांची वाटाघाट करावी असें तिनें सुचविलें. विल्सन यांच्या अपेक्षेबाहेर हें काम झालें होतें. दोस्त राष्ट्रांनीं विचारपूर्वक लांबलचक उत्तर देऊन त्यांत जगभर शांतता नांदण्यासाठीं विल्सन यांनीं काढलेली राष्ट्रसंघाची कल्पना मान्य केली होती व आपलीं लढाईचीं कारणें व उद्देश स्पष्टपणें सांगण्याचा प्रयत्न केला होता.

२२ जानेवारी १९१७ रोजीं विल्सन यांनीं अमेरिकन कांग्रेसला आपला संदेश पाठविला. युद्धानंतर तह होण्याच्या वेळीं तो काय अटीवर व्हावा, त्याचें स्वरूप काय असावें इत्यादि गोष्टींचा यथास्थित उहापोह या व्याख्यानांत त्यांनीं केला होता. कारण खरोखरीच्या तहाच्या वेळीं त्यांच्या एकट्याच्यानें भागत नव्हतें. तर कांग्रेसची संमतिही त्यास मिळणें राज्यघटनेप्रमाणें अवश्य होतें. अर्थात आपल्या तत्त्वांवर व कल्पनांवर विचार करण्यास कांग्रेसला पूर्ण अवधि मिळावा हा विल्सन यांचा हेतु होता.

प्रथमतः या युद्धाचा शेवट लावून तह घडवून आणण्याचे कामीं अमेरिकेनेंही हातभार लावणें हें तिचें कर्तव्य असून अमेरिकेच्या आजपर्यंतच्या लोकशाहीच्या तत्त्वांना धरूनच आहे व यापुढें जर जगभर निरंतर शांतता प्रस्थापित व्हावयाची असेल तर अमेरिकेलाही तो तह पसंत असलाच पाहिजे असें प्रतिपादन करून विल्सन म्हणाले. “ या युद्धानंतर राष्ट्रसत्तांचें समतोलन होऊन सुसंघटित पक्षाविपक्ष निर्माण होण्यापेक्षां राष्ट्रसत्तांचें एकीकरण होऊन सुव्यवस्थित शांतता प्रस्थापित होणें अत्यंत अगत्याचें आहे. अमेरिकेची तहाची कल्पना अशी आहे. तह व्हावा परंतु त्यांत विजयाचा दर्प नसावा. विजयाची कल्पना आली कीं, तो तह जितांस अहितकारक असून त्यांचेवर लादला जातो. पराभूत झालेल्यांवर जेता आपल्या अटी लादूं शकतो. परंतु असला तह केवळ जुलमाचा रामराम म्हणून मानण्यांत येतो. मनांतील शत्रुत्वाची अढी कायमच राहात असल्यानें तो टिकाऊ नसतो.

"हा तह पूर्ण समतेच्या तत्त्वावर झाला पाहिजे. त्यांत लहान मोठा, प्रबल, दुर्बल, असा भेदभाव उपयोगाचा नाहीं. हक्क वैयक्तिक बलाबलावर न मोजतां सर्वांस समान दिले गेले पाहिजेत. राजा व प्रजा यांच्यांत सलोखा असल्याशिवाय कोणत्याही राष्ट्रांत शांतता राहाणें अशक्य आहे आणि त्याचा परिणाम जगाच्या शांततेवर होणें अपरिहार्य आहे. यासाठीं कोणताही प्रांत अगर मनुष्यजाती यांची जुगारांतल्याप्रमाणें निर्जीव वस्तु व गुरेंढोरें यासारखी देवघेव करण्यांत येतां कामा नये. तर त्यांना 'स्वयंनिर्णय' करूं द्यावा. समुद्र समायिक समजावे. त्याचप्रमाणें सैन्य व आरमार यांत प्रत्येक राष्ट्रामध्यें जी प्रचंड वाढ झालेली आहे तींत छाटाछाट करून प्रत्येक राष्ट्रानें अंतर्गत सुव्यवस्थेसाठीं जरूर इतकेंच कमींत कमीं सैन्य व आरमार ठेवावें व या धोरणावर जर तह झाला तरच जगास शांततेचा स्वर्ग गांठतां येईल. हीं तत्त्वें जगांतील, कोणत्याही राष्ट्रांतील मानवजातीच्या कल्याणासाठीं व स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या व्यक्तीला मान्य होण्याजोगीं आहेत आणि मी त्यांचा एक प्रतिनिधि या नात्यानेंच तीं बोलून दाखवीत आहें......हीं अमेरिकन तत्त्वें आहेत आणि हेंच अमेरिकेचें धोरण आहे. आणि हीं तत्त्वें अखिल मानव्याचीं असल्यामुळें अमलांत आलीं पाहिजेत !"

अशा प्रकारची आपली तहाची कल्पना व शांतता प्रस्थापित व्हावयास अवश्य वाटणारीं तत्त्वें विल्सन यांनीं कांग्रेसच्या सभासदांपुढें मांडलीं; महायुद्धाच्या समुद्रमंथनांतून निघालेलीं हींच तीं चतुर्दश रत्नें आणि हीं चौदा तत्त्वें व राष्ट्रसंघ या दोन गोष्टींनीं पुढें सर्व जगभर खळबळ उडवून दिली. त्यांतल्या त्यांत यांपैकीं स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानें तर जगांतील सर्व परतंत्र राष्ट्रांना मोह पडला व विल्सन हे आपले उद्धारकर्तेच आहेत असें त्यांस वाटूं लागलें. कोणत्याही परतंत्र राष्ट्रानें उठावें व आपलें गाऱ्हाणें विल्सन यांच्या अदालतींत रुजूं करावें असा त्या वेळीं शिरस्ताच पडून गेला होता. सुब्रह्मण्य अय्यर यांनींही विल्सन यांस एक परभारें पत्र पाठविलें होतें व त्याबद्दल ब्रिटिश सरकारनें त्यांच्यावर केवढा गहजब उडाविला होता हें वर्तमानपत्रांच्या वाचकांस आठवत असेलच. हिंदुस्थानालाही या तत्त्वामुळें आपला कांहीं फायदा होईल व पारतंत्र्य शृंखला काहीं तरी ढिली होईल अशी वेडी आशा वाटत होती. परंतु अशा कितीक आशा सफल होतात ? असो.

विल्सन यांच्या या भाषणावर खुद्द कॉंग्रेसमध्यें व इतरत्र खूप चर्चा झाली. जर्मनीनेंही त्यांतील सर्व गोष्टी आपणांस मान्य असल्याचें विल्सन यांस कळविलें. 'परंतु दोस्त राष्ट्रांनीं अशी स्थिति उभी केली कीं, जर्मनीस आपल्या अब्रूसाटीं लढाई चालविणें इतकेंच नव्हे तर जलयुद्धाचे बाबतींत आजपर्यंत पाळण्यांत येत असलेले निर्बंधही तोडणें भाग पडलें.' यासाठीं अमेरिकेनें निःपक्षपातीपणानें

यापुढें जीवहानि होऊं न देण्यासाठीं यथाशक्ति जर्मनीस मदत करावी अशी विनंतिही करण्यांत आली होती. परंतु शेवटीं मात्र असें लिहिलें–लिहिलें कसलें फर्माविलें–होतें कीं, यापुढें दर आठवड्यास अमेरिकेचें फक्त एकच जहाज ठराविक दिवशीं ठराविक मार्गानें जाऊं दिलें जाईल ! आणि त्याशिवाय युद्धक्षेत्रांत शिरणाऱ्या कोणत्याहि प्रकारच्या जहाजाला आपल्या धाडसाचें यथोचित फळ भोगावें लागेल. या उर्मट उत्तरानें विल्सन यांचें सत्त्व घेतलें. आतां विल्सन यांनीं सर्व शांतिगान बाजूस ठेवून तत्काल जर्मनीशीं असलेले हितसंबंध पार तोडून जर्मन वकीलाची बोळवण करून आपला वकील परत बोलाविला. आणि अशा रीतीनें अस्तमानकाळीं लालबुंद झालेला सूर्य पहातां पहातां क्षितिजावरून समुद्रांत उडी घेतो त्याप्रमाणें आजपर्यंत कांठावर घोंटाळत असलेली अमेरिका युद्धकुंडांत उडी टाकण्यास तयार झाली. आणि ती उडीही यथावकाश पडलीच !

जर्मनीच्याविरुद्ध टक्कर देतां यावी म्हणून सर्व प्रकारच्या जहाजांवर लष्करी लढाऊ तयारी ठेवण्याची विल्सन यांनीं काँग्रेसकडे परवानगी मागितली. परंतु ती मिळण्यापूर्वींच त्या काँग्रेसचें विसर्जन झालें. नवी काँग्रेस विल्सन यांनीं सोळा एप्रिलला बोलाविली. परंतु जहाजांवर लढाऊ तयारी करण्याचे हुकूम ता. १२ मार्चलाच अमलांत आले होते. जर्मनीला तर जसा कांहीं चेव भरला होता. असल्या सर्व जहाजांना चांचे असें समजलें जाईल म्हणून त्यानें प्रसिध्द केलें. उलट विल्सन यांनींही जर्मन लढाऊ जहाज दिसतांच त्यावर भडिमार स्वसंरक्षणार्थ करावा, असे हुकूम दिले आणि वस्तुतः येथूनच अमेरिका व जर्मनी यांचें युध्द सुरू झालें. जर्मनांनीं अमेरिकेचीं तीन जहाजें बुडविल्याची खबर मिळतांच नव्या कांग्रेसची तारीख एक पंधरवडा अलीकडे ओढण्यांत आली आणि एप्रिल २ ला अध्यक्षांनीं जर्मनीशीं युध्द पुकारण्याची परवानगी मागितली. काँग्रेसनें फक्त पन्नास मतें विरुध्द पडून ठराव पास केला. अमेरिकन बंदरांत असलेलीं एकंदर सहा लक्ष टन वजनाचीं जर्मन जहाजें पकडण्यांत आलीं आणि सहा एप्रिलपासून अमेरिका जर्मनीचा प्रत्यक्ष शत्रु बनली.

विल्सन यांचा स्वभाव असा होता कीं, कोणतीही गोष्ट करावयाची असें ठरलें कीं मग त्यांत कुचराई अगर दिरंगाई म्हणून व्हावयाची नाहीं. त्याचप्रमाणें आतांही एकदां युद्ध करावयाचें असें ठरल्याबरोबर एकदम ते त्या उद्योगास लागले. कोणतीही गोष्ट कमी पडतां कामा नये. माणसें, पैसा, हत्यारें व इतर युद्धकालीं उपयोगी साहित्य जास्तींत जास्त मिळविण्याची त्यांनीं तजवीज आरंभिली. ५ जून रोजीं २१ ते ३१ वयाच्या दरम्यानच्या एकंदर शहाण्णव लाख लोकांनीं आपलीं नांवें सैनिकाच्या यादींत नोंदविलीं. प्रत्येक संस्थानानेंहाय लष्करी शिक्षणाची सोय करण्यांत आली. फ्रान्समध्यें अमेरिकेची पाहिली पलटण १९१७ च्या

मेमध्यें आली आणि १९१८ च्या आक्टोबरपर्यंतच्या पुढील आठरा महिन्यांत एकंदर २० लाख सैनिक अमेरिकेंतून रवाना झाले. अमेरिकेजवळ आरमार कमी होतें आणि जें होतें तें खुद्द तेथेंच रक्षणासाठीं पाहिजे असल्यामुळें त्याची मदत दोस्त राष्ट्रांना विशेष होऊं शकली नाहीं. परतु युद्धसाहित्य पुरें पाडण्यासाठीं अमेरिकेंतील सर्व उद्योगधंदे करणाऱ्या कारखान्यांत तेवढा एकच उद्योग करावा लागला. अमेरिका युद्धांत सामील झाल्यावेळीं एकदम नवीन दृश्य दिसूं लागलें.

अमेरिकेच्या राज्यघटनेच्या एका कलमाप्रमाणें युद्धकालीं खुद्द अध्यक्षच सैन्य व आरमार या दोहोंचाही मुख्य असतो. पहिले दोन अध्यक्ष सेनापतीच होते. परंतु त्यानंतर आजपर्यंत अमेरिकेचा इतर राष्ट्रांशीं युद्धप्रसंगच फारसा येत नसल्यामुळें या अधिकाराचा उपयोग करण्याची संधि फक्त लिंकन आणि विल्सन यांसच लाभली आणि दोघांनींही या लष्करी सत्तेचा उपयोग सत्तत्वप्रस्थापनेसाठींच केला. विल्सन यांनीं अमेरिकन सेनेला युरोपखंड दाखवून मनरो डॉक्ट्रिनचीही परंपरा खंडित केली. या प्रकरणाचे शिरोभागीं म्हटल्याप्रमाणें, " जगांत न्याय व शांतता नांदावयाची तर ती मनगटाचे जोरावर नांदेल " असा सवाल जर्मनीनें टाकला होता आणि विल्सन यांनींहीं त्यास तितक्याच जोराच्या प्रतिक्रियेनें उत्तर देण्यास सुरवात केली होती. काट्यानें कांटा काढावा त्याप्रमाणें जर्मन लष्करशाहीचें उच्चाटन करण्यासाठीं लष्करशाहीचा शह देणेंच जरूर झालें होतें. परंतु त्यानंतर लोकशाही प्रस्थापित व्हावयास ही तलवार उपयोगी नसल्यामुळें विल्सन यांनीं आपल्या तत्त्वांचा ज्ञानदीप पाजळला होता व त्याचे किरण सर्व विश्वभर पसरविण्यास आपल्या वाणीचा व लेखणीचा त्यांनीं यापुढें अव्याहत उपयोग केला व त्याचा परिणाम लवकरच दृष्टोत्पत्तीस आला. रणांगणावर जेथें तेथें जर्मनीला पराभव खावे लागले व पिच्छेहाट करावी लागली. त्यामुळें देशांत लष्करशाहीचें वजन नाहींसें झालें आणि तेथेंही तिला थपडा खाव्या लागल्या. महायुद्धाचा अगर यूरोपच्या राजकारणाचा इतिहास देण्याचें प्रस्तुत स्थल नसल्यामुळें ती हकीगत तपशीलवार व सांगोपांग देण्याचें कांहीं कारण नाहीं.

नदीचा प्रवाह फुगल्यामुळें आजूबाजूचे बांधबंधारे फोडून पाणी ज्याप्रमाणें या शेतांत, त्या खाचरांत, व सखोल प्रदेशांत भुरूंभुरूं शिरतें, आणि तोच मूळ पूर ओसरल्यावर परत तो व्यापलेला प्रांत सोडून जातें त्याचप्रमाणें जर्मन लष्कराचा प्रचंड लोंढा प्रथम जो सुटला तो त्यानें इकडे वार्सा तिकडे लीज, नामूर ॲंटवर्प जवळजवळ पारिस, खालीं सर्विया मोंटेनिग्रो, याप्रमाणें प्रदेश आटोपला, परंतु आतां त्या त्या प्रदेशांतून त्यांची सारखी पिच्छेहाट होऊं लागली. हिंडेनबुर्ग लाईन पुसली गेली. सरते शेवटीं जर्मनी चारी मुंडे चीत होऊन विल्सन यांचीं तत्त्वें मान्य करण्यास तयार झाली. जर्मनीच्या विनंतीवरून दोस्त राष्ट्रांशीं विल्सन यांनीं मध्यस्थी केली व तहाच्या चर्चेसाठीं ता. ११ नवंबर १९१८

रोजीं महायुद्ध तहकूब करण्यांत आलें. जर्मनीनें आपलें सर्व सैन्य शत्रुप्रांतांतून परत बोलावलें आणि शस्त्रसंन्यास केला. विल्सन यांच्या इच्छेप्रमाणें अमेरिका युद्धांत पडल्यावर अठरा महिन्यांनीं महायुद्ध संपलें व त्यांच्या तत्त्वाप्रमाणें तह घडवून आणून आपला बोलला बोल खरा करण्याची अत्यंत बिकट जबाबदारी आतां त्यांचेवर येऊन पडली.

जर्मनी आपण होऊन तहाची याचना करीत आहे हें पाहिल्यावर इंग्लंड व फ्रान्स यांना जोर चढला. याच जर्मनीनें त्यांना चांगलेच खडे चारले होते आणि अमेरिकेनें जर धांव घेतली नसती तर ह्या बहाद्दरांना कदाचित् पळतां भुई थोडी होऊन जर्मनीशीं मिटतें घेतां घेतां नाकीं नव आले असते. परंतु जर्मनीच्या विवेकांधतेनें व विनाशकाले विपरीत बुद्धीनें अमेरिकेला डिंवचून दुखविलें होतें उलट कावेबाज इंग्लंडनें दूरदर्शीपणानें अमेरिकेचें अतिरंजन चालविलें होतें. आणि त्यामुळें शेवटीं अमेरिकेच्या पाठराखणीमुळें दोस्तांची पाठ भुईस लागण्याचें ठरलें व जर्मनी मानापमान गिळून तहास राजी झाला. परंतु दीर्घद्वेषी दोस्तांचा जर्मनीवर दांत होता. इंग्लंडचा खरा राग केसर व युवराज यांच्यावर होता. हें जाणून आपल्यामुळें देशावर अनर्थ कोसळूं नये या उच्च हेतूनें तहाचें बोलणें सुरूं करण्यापूर्वीं तीनच दिवस ते दोघेही हॉलंडमध्यें निघून गेले होते. फ्रान्स व जर्मनी यांचें पूर्वापार वैर होतेंच व जर्मनीचा शक्य तितका मुलूख घशांत घालण्याचा लोभ त्याच्या मनांत होता. असल्या क्षुद्र पिपासेनें पीडित झालेल्या राष्ट्रांना विल्सन यांचीं चौदा तत्त्वें कशीं मान्य होणार ? आजपर्यंत विल्सन यांची मनधरणी करून आपला स्वार्थ साधण्यासाठीं या तत्त्वांना ते माना डोलवीत होते. परंतु तीं अमलांत आणावयाचीं तर त्यांचें मनोगत साधत नव्हतें. परंतु बलिष्ठ अमेरिकेची इच्छा निखालस धुडकावून लावण्याची धमक त्यांचे अंगीं नव्हती.

पण आतां दोस्त राष्ट्रें जर्मनीच्या महत्संकटांतून वांचल्यामुळें त्यांस विल्सन यांची तादृश पर्वा नव्हतीच. यामुळें त्यांच्या तत्त्वांचा शाब्दिक अनादर न करितां कृतीनें आपणास हवें तेंच करण्याचें इंग्लंड व फ्रान्स यांनीं ठरविलें. आणि त्याप्रमाणें इंग्लंडचे महामंत्री लॉईड जॉर्ज व फ्रान्सचे क्लेमेंको यांनीं साखर पेरून, विल्सन यांस, कांहीं एक न विचारतां स्वतःसिद्धपणें तहाची वाटाघाट पॅरिस येथें सुरूं केली. वरकरणीं विल्सन यांचीं चौदा तत्त्वेंच मूलभूत आधार म्हणून धरली असें दाखवून आंत स्वार्थ, सूडबुद्धि आणि कापट्य यांच्या पायावरच ही तहाची इमारत रचण्यास त्यांनीं सुरवात केली आणि अशा प्रकारें विल्सन यांस कामापुरते मामा बनवून त्यांनीं तहाचा मसुदा तयार केला आणि आपला हात पुरता जगन्नाथ करून घेतला. जर्मनीचा प्रांत तर बुचाडलाच; भली थोरली खंडणी व नुकसान भरपाई लादून त्याबद्दल रूहर प्रांत कबजेगहाण तर ठेवला;

नानाप्रकारचें हातपाय तोडून त्यास पंगू तर बनविलें आणि नसतें फकरसंस्थानांचें कुलंगडें तर उपस्थित केलें आणि जी गोष्ट नको असें विल्सन म्हणाले होते तीच नेमकी घडून आली. विजयानें मत्त होऊन जितावर लादलेला तह करण्यांत आला. आणि सर्वांत मौज ही कीं, या भोंदू लोभ्यांच्या कारस्थानांतील मर्म न उमगतां विल्सन यांनींही तसल्या तहावर सही केली ! आजपर्यंत न घडलेली गोष्ट म्हणजे अमेरिकेचा अध्यक्ष पहिल्यानेंच युरोपांत आला. वॉशिंग्टन बोटींतून विल्सन फ्रान्सच्या किनाऱ्यावर उतरले; ते फ्रान्सच्या किनाऱ्यावर नव्हे तर आपल्या उच्च तत्त्वांपासूनही खालीं उतरले. दोस्तांनीं विल्सन यांची लुडबुड जर्मनी व आस्ट्रिया हंगेरी यांशिवाय इतर राष्ट्रांशीं तह करितांना, अमेरिका दोस्तमंडळांत सामील नव्हती, या कारणांमुळें व अमेरिकेनें फक्त जर्मनी व ऑस्ट्रिया हंगेरी यांच्याशींच युद्ध पुकारलें होतें या सबबीवर चालूं दिली नाहीं आणि त्यांच्याशीं अगदीं स्व–तंत्रानें तह घडवून आणून विल्सन यांचा व त्यांच्या तत्त्वांचा त्यांनीं उघडउघड अपमान केला.

विल्सन यांनीं स्वत: पारिसच्या तहपरिषदेला जाऊं नये असे कित्येक अमेरिकन मुत्सद्यांचें म्हणणें होतें. परंतु तें न ऐकतां ते आले. सहाजिकच परिषदेंत त्यांना प्रमुख स्थान मिळालें. युरोपभर त्यांचा सन्मान झाला, परंतु परिषदेंत इतके घोटाळयाचे प्रश्न उपस्थित झाले कीं, त्यांचे व्यवस्थित निकाल लावतां लावतां विल्सन यांस पुरवोट झाली. ते येण्यापूर्वींच युरोपच्या विजयी राष्ट्रांनीं आपापसांत गुप्त तह करून कोणी काय मागावयाचें व कोणास काय द्यावयाचें हें ठरवून टाकलें होतें. परंतु विल्सन यांना त्याची दादही नव्हती. अर्थातच आयत्या वेळीं त्या अनुरोधानें आलेल्या प्रश्नावर विल्सन यांस तडजोड करणें भाग पडलें आणि त्यामुळें त्यांच्या तत्त्वांचा तोल सुटून कांहीं तरी तह झाला व त्यावर २८ जून १९१९ रोजीं सह्या झाल्या. राष्ट्रसंघाच्या कल्पनेवरही अशींच रणें माजलीं, व शेवटीं 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडित: ' या तत्वानुसार विल्सन यांनीं कांहीं तरी डोलारा उभारला व त्यावरच समाधान मानून ह्या कार्यसिद्धीचें गाठोडें बांधून घेऊन ते अमेरिकेस परतले.

अमेरिकेंत एका काळीं मित्र परंतु आतां शत्रु बनलेल्या कित्येक वृत्तपत्रकारांनीं व इतर रिपब्लिक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं विल्सन यांचा यथेच्छ नालस्ती चालविली होती व अमेरिकन जनतेंत बुद्धिभेद आरंभिला होता. त्या विषबीजास अंकुरही फुटूं लागले होते. सीनेटनें या तहाला मान्यता देऊं नये अशा प्रकारची खटपट चालूं होती. एका खासगी सभेंत सीनेटच्या सदर्तास सभासदांनीं विल्सन यांचे विरुद्ध मतें देण्याची आणभाक केली. अशी परिस्थिति पाहून नेहमींच्या पद्धतीस अनुसरून अमेरिकन जनमत तयार करण्याकरितां विल्सन यांनीं एक हजार मैलांचा व्याख्यानांचा दौरा काढण्याचें ठरविलें. आणि त्या

प्रमाणें सव्वीस दिवसांत दीडलाख शब्द बोलले,परंतु पारिस परिषदेंत अत्यंत त्रास झाल्यामुळें तेथेंच त्यांची प्रकृति बिघडली होती. त्यांत भरींत भर या दौऱ्यांतील श्रमांची पडून ते एकदम आजारी झाले व त्यांस दौऱ्यावरून परत फिरावें लागलें आणि सप्टेंबरअखेर ते वॉशिंग्टन येथें परत आले.

शारीरिक श्रम त्यांस झाले हें तर निर्विवादच आहे. परंतु तहपरिषदेंत आपणांस चकविण्यांत आलें हेंही त्यांस कळून चुकलें होतें. त्यांच्या नेहमींच्या स्वभावानुसार बाह्यत: ते न दाखवूं देत, परंतु अंतर्यामीं त्यांस ती गोष्ट फारच जाणवली होती. आणि त्यांतल्या त्यांत अमेरिकेंतील त्यांच्या शत्रुपक्षाची तयारी पाहून तर त्यांस मोठाच धक्का बसला होता. शारीरिक व्याधींच्या जोडीला मानसिक आधींची उपाधि जडल्यामुळें त्यांच्यावर अत्यंत परिणाम झाला आणि ते अंथरुणास खिळले.

युरोपच्या राजकारणांत विल्सन यांचा निभाव लागला नाहीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण युरोपच्या राजकारणाला आज कित्येक शतकें होऊन गेल्यामुळें तें कुजलें आहे आणि पाच्छाईपणा व लष्करशाही या दोन तत्त्वांवर त्याचा जीव असल्यामुळें साधुत्व आणि सत्तत्व यांचें त्यांस कुपथ्य झालें आहे. तरुण अमेरिकेचे सच्छील विल्सन आपल्या सत्तत्वांचें तट्टू तेथें दामटूं पहात होते. युरोपनेंही त्या तट्टाचा उपयोग केला आणि स्वार्थ साधल्यानंतर त्यास मोकाट सोडून दिलें. प्रिन्स बिस्मार्क यांनीं आपल्या आत्मचरित्रांत एके ठिकाणीं लिहिलें आहे. “ युरोपच्या राष्ट्रेतिहासाचें चित्र जर डोळ्यापुढें उभें केलें तर त्यांत भलेपणानें वागून स्वार्थत्यागपूर्वक शांततेच्या मार्गानें उत्कर्षास चढलेल्या राष्ट्रांचें एकही उदाहरण दिसत नाहीं.शांतताप्रेमी,प्रजाहिततत्पर आणि सुधारणावादी राजापेक्षां आपल्या प्रजेचें रक्त सांडून रणांगणावर विजयी होणारा राजा युरोपच्या ख्रिश्चन राष्ट्रांना प्यारा वाटतो, एवढेंच नव्हे तर भयंकर रक्तपाताच्या लढाया लढणारा,मग त्याच्या हलगर्जीपणानें त्या फसल्या कां असेनात परंतु तो सुद्धां युरोपच्या राष्ट्रांना फार अभिमानास्पद व प्रिय वाटतो.” प्रख्यात मुत्सद्दी बिस्मार्क यांचा हा अभिप्राय आहे तेव्हां त्यास किती किंमत द्यावयास पाहिजे हें सांगावयास नकोच !

अशा प्रकारच्या युरोपच्या राजकारणाला अमेरिकेच्या राजकारणानें आपणांत लुडबुड करूं नये असेंच नित्य वाटत असतें. परंतु प्रसंग आला कीं, कोणाचेही पाय धरण्यास त्यास दिक्कत वाटत नसल्यामुळेंच अमेरिकेस आंत प्रवेश मिळाला आणि कांहीं काळ विल्सन यांच्या तत्त्वांना त्यास मान तुकवावी लागली आणि विल्सन यांची महत्त्वाकांक्षा अमेरिकेच्या द्वारें जुनाट युरोपच्या राजकारणाला,एवढेंच नव्हे विश्वकारणालाच धडे शिकविण्याची असल्यामुळें, तेही त्यांत

सर्वस्वीं पडले. अमेरिकन जनता युरोपच्या चित्तरंजनाला व विल्सन यांच्या महत्त्वाकांक्षेला भुलून त्यांत सामील झाली.

लार्ड लियान्स यांनीं अमेरिकन लोकांविषयीं एके ठिकाणीं असें लिहून ठेविलें आहे: " माझ्या मतें अमेरिकन जनता व सरकार सुद्धां शिष्टाचार व स्तुति यांचे मोठे भोक्ते आहेत आणि औपचारिक वागणुकींत एवढासा फरक झाला तरी त्यास अपमान झाल्यासारखें वाटतें. या गुणाचा केव्हां केव्हां आपल्या फायद्याकडे उपयोग करून घेतां येतो आणि म्हणून ज्या वेळीं त्यांना राजी राखणें जरूर असेल तेव्हां ही गोष्ट अवश्य लक्षांत असली पाहिजे. " हा पन्नास वर्षां पूर्वीं झालेला उपदेश युद्धकालीन यूरोपचे मुत्सद्दी विसरले नव्हते. इंग्लंडांतील प्रसिद्ध वृत्तपत्रकार लार्ड नार्थक्लिफ यांनीं आपल्या वृत्तपत्रांचा फैलाव अमेरिकेंत करून तद्वारां अमेरिकन जनतेचें परोपरीनें आराधन चालविलें होतें व त्यामुळें ती विल्सन यांचे मागोमाग लढाईंत दोस्तांच्या बाजूनें शिरण्यास तयार झाली होती. परंतु चक्रव्यूहांतून शिरसलामत बाहेर पडण्याची विद्या त्यांस विदित नसल्यामुळें युद्धांतीं त्यांच्या तत्त्वांचे हातपाय छाटले गेले व विल्सन यांचा पराभव यूरोपच्या जुनाट राजकारणानें केला आणि ते अमेरिकन जनतेच्याहि मर्जींतून उतरले.

अशा प्रकारचा एक तऱ्हेनें विल्सन यांचा अधःपातच झाला, तरी हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, 'क्षीयते वर्धते चन्द्रो न तु तारागणो क्वचित्' त्यांच्या या अधःपाताबद्दल त्यांचे टीकाकार त्यांजवर नानाप्रकारचे आरोप करतात. उघडच आहे, ते यशस्वी झाले असते तर यांनींच टाळी वाजविण्यास कमी केलें नसतें. परंतु सूर्य अस्तास गेला म्हणजेच दिवाभीतें कोलाहल करूं लागतात व काजवे चमकूं लागतात. विल्सन हे लढाईंत ज्या सद्धेतूंनीं प्रेरित होऊन पडले होते ते विसरून जाऊन, अमेरिकन भांडवलवाल्यांच्या भिडेस्तव अगर इंग्लंडवरील प्रेमाखातर, अगर स्वतांचें मध्यस्थ म्हणून प्रस्थ माजविण्यासाठीं ते युद्धांत पडले असावे इत्यादि कुतर्क हे टीकाकार काढतात. परंतु त्यांचें तोंड आज कोणत्या रीतीनें बंद करावें ? तें काम कालच करील !

तरीहि नेशन पत्रांत ' विल्सन यांचें अत्यंत शोकपर्यवसान ' Woodrow Wilson, A Supreme Tragedy) हा कडक टीकालेख लिहिणारे विल्यर्ड साहेब शेवटीं काय म्हणतात हें पुढील उताऱ्यांत पहा !

Aspiring to the stars, he crashed to earth, leaving behind him no emancipation of humanity, no assuaging of its wounds, only a world wrecked, embittered, more full of hataed, more ready to tear itself to pieces today than when he essayed in heavens. The moral of his fall is as immutable as the hills, as shining as the planets."

विल्सन यांचें ध्येय आकाशींचा चांद मागण्याप्रमाणें दुष्प्राप्य असेल, आपल्या ऐपतीपलीकडील ध्येय गांठण्याची हांव त्यांनीं धरली असेल, किंबहुना तें गांठण्याचे मार्ग त्यांच्या हातीं असतां त्यांचा उपयोग त्यांस नीट करून घेतां आला नसेल, परंतु म्हणून त्यांचें ध्येय उच्च नव्हतें, अगर त्यांचें मन सद्धेतु-प्रेरित नव्हतें अगर ते अप्रामाणिक होते अशांतला भाग नाहीं. अपेशाच्या खाईंत पडावें लागलें एवढ्यावरून त्यांचीं तत्त्वें कुचकामाचीं ठरत नाहींत. अपयश येत नाहीं कोणाला? आणि जो चढतच नाहीं त्याला पडावें तरी कां लागेल? म्हणून पडण्याची भीति आहे एवढ्याचसाठीं चढण्याची इच्छा कोणी धरूंच नये कीं काय? आज विल्सन यांना अपयश आलें असलें तरी त्यांत इतकें दूषणा-स्पद, इतकें अनैसर्गिक असें काय आहे? अगम्य आकाशांतील दीप्तिमान् तार-कांच्या तेजानें मोहून जाऊन एकाग्रतेनें त्यांचेवरच दृष्टि ठेऊन चालल्यास व्यव हारी पृथ्वीवरील निस्तेज व निश्चल तारे जे फत्तर त्यांनीं असूयायुक्त होऊन ठेंचा न दिल्या तरच नवल! परंतु या ठेंचा एकाद्या नीच पदार्थावर दृष्टि दिल्यामुळें लागल्या नसून उच्च व दिव्य अशाच ध्येयासाठीं सोसाव्या लागल्या हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. आणि अशा अनेक अपयशांतूनच यशःसिद्धीचा उज्ज्वल मार्ग निघत असतो!

नोच्चार्थो विफलोऽपि दूषणपदं दूष्यस्तु कामो लघुः।

---

# प्रकरण ८ वें.

## अस्तंगत विल्सन.

'Thou hast no longer the voice of thy other days; we are betrayed, and by thee shall we be led no more.'

New Testament.

यूरोपमधून परत आल्यावर विल्सन यांनीं, आपण तेथें बजावलेली काम-गिरी लोकांस पटवून देण्यासाठीं दौरा काढला होता आणि मोठ्या ईर्षेनें व्या-ख्यानांवर व्याख्यानें देत ते सव्वीस दिवसपर्यंत फिरले; परंतु त्यानंतर ते अति-शय आजारी पडले आणि त्यांच्या डॉक्टरांनीं त्यांस दौरा तहकूब करण्यास सांगि-तलें, कारण, त्यांना पक्षघात झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. परंतु विल्सन यांचें शरीर जर्जर झालें असलें तरी त्यांचें मन उत्साही होतें. त्यांनीं उत्तर दिलें, 'या दौऱ्यावरून परत फिरलों तर मला सुखानें झोंप देखील येणार नाहीं. माझें

उद्देश तडीस नेण्यासाठीं प्राणही द्यावे लागले तरी मी तयार आहें.' परंतु या तोंडाच्या जोराला देहाचा जोर नसल्यामुळें डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणें विल्सन यांस सप्टेंबरच्या शेवटीं शेवटीं वाशिंगटन येथें परत यावें लागलें. सरकारी रीत्या अध्यक्षमहाराज अत्यवस्थ असल्याचें जाहीर करण्यांत आलें. विल्सन यांचा जनमत आपणांस अनुकूल असें तयार करण्याचा कार्यभाग न साधल्यामुळें त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचें फावलें आणि प्रातिनिधिक सभेंत त्यांनीं यूरोपमध्यें केलेल्या तहनाम्याला अवश्य इतकें बहुमत न मिळाल्यानें तो नामंजूर झाला. आणि पुढें नवीन अध्यक्षाची निवडणूक झाल्यावर वॉरन हार्डिंग यांनीं त्या नामंजुरीवर आपलें शिक्कामोर्तब करून विल्सन यांच्या यूरोपांतील अर्ध्याबोबड्या कामगिरीवर सफाई बोळा फिरविला. अध्यक्षत्वाच्या दीर्घ कारकीर्दींत अगदीं प्रथमच विल्सन यांचा हा पराभव झाला. तथापि या एकट्या पराभवाची किंमत त्यांनीं आजवर मिळविलेल्या सर्व विजयांपेक्षां जास्त होती !

विल्सन हे अगदीं लहानपणीं सुदृढ व सशक्त होते. परंतु पुढील आयुष्यांत ते दिसण्यांत जरी गलेलठ्ठ असले तरी निरोगी नव्हते. अध्यक्षपदावर आले तेव्हांच त्यांस डॉक्टरांनीं प्रकृतीस जपून राहाण्याविषयीं बजावलें होतें व नियमितपणा आणि बिनचुक व्यायाम यामुळें ते आपली तनु संभाळून होते. परंतु गेल्या दोन वर्षांत त्यांस कायिक, वाचिक आणि मानासिक दगदग इतकी झाली होती कीं, तिनें त्यांच्या शरीराचा खुळखुळा करून टाकला. या दौऱ्यांतील श्रमांचें तात्कालिक निमित्त होऊन ते एकदम फार क्षीण दिसूं लागले. वॉशिंगटन स्टेशनवर आगगाडींतून 'व्हाइट हाऊस'च्या गाडींत ते चालत गेले. आणि स्टेशनवरील उतारूंच्या अभिवादनास सस्मित प्रत्यभिवादनही त्यांनीं केलें. परंतु ते अगदीं मलूल दिसत होते. डॉ. ग्रेसन यांनीं पूर्ण विश्रांति घेण्याची अत्यंत जरूरी आहे असें सांगितल्यामुळें सरकारी कामकाज कांहीं एक न पहातां रोज संध्याकाळीं विल्सन मोटारींतून सपत्नीक फिरावयास मात्र जात असत. लौकरच प्रकृतीस आरामही वाटूं लागला आणि फिरून सह्या करणें, महत्त्वाचीं पत्रें लिहिण्यास मजकूर सांगणें वगैरे सुरूं झालें.

परंतु ही सुधारणा दोन तीन दिवसच टिकली. आक्टोबरच्या पहिल्या तारखेस विल्सन डॉक्टर ग्रेसन यांच्याबरोबर बिल्यर्डही खेळले. परंतु त्यांना रात्री स्वस्थ झोंप येत नसे. पांच तारखेस पहांटे स्नानगृहांत गेले असतां विल्सन उताणे पडले आणि त्यांस उठतां येईना. त्यांचें कण्हणें ऐकून त्यांची पत्नी तेथें जाते तों हा प्रकार ! योगायोग असा कीं, कित्येक दिवसांत डॉ. ग्रेसन याच रात्रीं घरीं गेले होते. त्यांना बोलावणें पाठविण्यांत आलें व ताबडतोब ते आले. त्यांनीं विल्सन हे ज्या तरटावर पडले होते त्यांतच त्यांची वळकटी केली व दोन्हीं टोकें धरून कसेंबसें ओढीत तें ओझें विल्सन यांच्या निजावयाच्या खोलींत आणलें. विल्सन

यांच्या बायकोच्या मदतीनें तें पलंगावर ठेवण्यांत आलें. विल्सन बेशुद्धावस्थेंत असून, त्यांचा डावा पाय दुखवला होता. त्यांच्या तोंडांतून लाळ गळत होती आणि जबडा डाव्या बाजूस सारखा उडत होता. त्यांचें डावें अंग वातानें गेल्याचें डॉक्टरांस कळून आलें. विल्सन यांनीं शुद्धींत आल्यावर पहिल्या प्रथम त्यांच्या आजाराची बातमी लोकांस कळूं देणार नाहीं, असें वचन डाक्टर व कुटुंब यांचे जवळून घेतलें.

डॉ. ग्रेसन यांनीं आणखी दोन तीन प्रख्यात डॉक्टरांस सल्ला घेण्यासाठीं बोलाविलें. विल्सन हे जगणें व मरणें या दोन अवस्थांत आंदोले खात होते. बेशुद्ध असे ते नव्हतेच. उलट त्यांचें डोकें नाना प्रकारच्या चाळणा करण्यांत गर्क असे. लोकांपासून विल्सन यांच्या प्रकृतीसंबंधानें खरी हकीगत गुप्त ठेवण्यांत आल्यामुळें लोकांत नाना प्रकारच्या कंड्या पिकल्या. अध्यक्षांना वेड लागलें आहे असेंही कोणी म्हणूं लागले! विल्सन यांच्या भोंवतींचा बंदोबस्त इतका कडक होता कीं, आजाऱ्याच्या खोलींत डॉक्टर व दोन विश्वासू नर्सा यांचेशिवाय तिऱ्हाईत कोणीही जाऊं शकत नसे. त्यांचा खाजगी चिटणीस टयुमल्टी यांसहि बंदी झाली होती. त्यांच्या दाढीवाल्याला सुद्धां आंत प्रवेश नव्हता. यामुळें विल्सन दाढीमिशीवाले बोवा बनले! बायकांच्या कालेजांत शिकवीत असतांना एकदां त्यांची चेष्टा झाल्यापासून गेल्या तीस वर्षांत त्यांनीं मिशा राखलेल्या कधींच कोणी पाहिल्या नव्हत्या आणि आतां मिशा वाढल्या होत्या तर त्या पाहाण्याची सर्वांस परवानगी नव्हती! म्हणून विल्सन स्वतांच आरशांत पहात, आणि आपलें हें मुखभूषण रोज मोठ्या काळजीपूर्वक ब्रशानें विंचरीत असत. या वाढलेल्या दाढीमिशा आसपासच्या मंडळींशीं विनोद करण्यास त्यांना एक विषयच मिळाला होता.

इतका गुप्तपणा राखण्यांत आल्यामुळें, कांग्रेसमधील सभासदांस हा आजार खरा आहे किंवा खोटा आहे, खरा असल्यास कितपत विकोपास गेला आहे अशी शंका उत्पन्न झाली. खरें कळण्यासाठीं म्हणून त्यांनीं पुष्कळ उपाय योजून पाहिले. परंतु विल्सन यांची इच्छा खरा प्रकार त्यांस कळूं नये अशी असल्यानें ते त्यांच्याकडून आलेलीं सर्व कामें मागें टाकीत. अगदीं महत्त्वाचे तेवढेच सरकारी कागद सह्यासाठीं स्वीकारले जात. कांग्रेसचे सभासद त्या सह्याही पूर्वींच्या बोजड ' वुड्रो विल्सन ' या अक्षरांशीं ताडून पहातच असत! आणि या सह्या खुद्द विल्सन करतात कीं, परस्पर त्यांची बायको अगर खाजगी चिटणीस करतो हा संशय त्यांना होताच! कांहीं दिवसांनीं सभासदांना भेटण्यास येण्याची परवानगी मिळूं लागली, परंतु विल्सन बसूनच त्यांच्याशीं बोलत आणि ते येण्यापूर्वींपासून तों गेल्यावर सुद्धां बसलेलेच असत. ते गाडींतून फिरावयास जात, परंतु त्यांचा पाय बरा झाला किंवा नाहीं हें कोणास कळण्याचें साधनच नव्हतें.

तरी लोकांचा समज अध्यक्षांना दुसऱ्याच्या मदतीशिवाय चालतां येत नाहीं असाच होता. विल्सन यांना हवेवर नेण्याचें घाटत होतें, परंतु तशी व्यवस्था सर्व करून झाली असतां सुद्धां नेण्यांत आलें नाहीं. यावरूनही लोकांनीं तर्क बसविला होता कीं, अध्यक्षांना वाशिंग्टनहून हलविणें सुद्धां अशक्य झालें आहे.

अशा प्रकारचे हे लपंडाव चालू असतां अखेर लोकांचेच तर्क खरे असल्याचें निश्चयात्मक रीतीनें प्रत्ययास येऊं लागलें. आणि शेवटीं अध्यक्षांची स्वारी राजरोसपणें अर्धांगवायूनें आजारी होऊन सर्वकाळ आपल्या खोलींतच घालवूं लागली. येथून पुढें ते फारच थोड्या वेळां लोकांच्या दृष्टीस पडत. खोलींत बसल्या बसल्या ते लेखन व वाचन हा व्यवसाय करीत आणि हुशारी वाटेल त्या दिवशीं गाडींतून फिरावयास जात अगर नाटकही थोडावेळ पाहून येत, परंतु यापलीकडे कांहींहि त्यांस करतां येत नव्हतें. आणि त्यांची अध्यक्षाची मुदतही सरत आल्यामुळें त्यांची महत्त्वाची कामगिरीहि संपलीच होती.

विल्सन यांची फार इच्छा होती कीं, नवीन निवडणुकींत डेमोक्रॅटिक पक्षाचाच उमेदवार निवडून यावा. स्वतः त्यांना प्रकृतीच्या दृष्टीनें उमेदवार उभें राहाणें अशक्यच होतें. शिवाय केवळ लेखी राज्यघटनेप्रमाणें नाहीं, तरी परंपरेप्रमाणें तिसऱ्यांदा अध्यक्ष होणें बेसनदशीर होतें. म्हणून आपल्या पक्षाचा ओहियोचा गव्हर्नर जेम्स कॉक्स निवडून यावा अशी खटपट त्यांनीं केली. त्यांच्या निवडणूकीच्या मोहिमेच्या फंडास मोठी देणगी त्यांनीं दिली. व्याख्यानें देणें त्यांस शक्य नव्हतें; म्हणून लोकांस उद्देशून त्यांनीं एक जाहीरनामा स्वतःच्या सहीनें काढला परंतु त्यांची पुण्याई सरली होती. त्यांच्या शब्दांत पूर्वीची जादू आतां उरली नव्हती. त्यामुळें त्याचा कांहीं एक परिणाम न होतां कॉक्स पडले व वॉरन हार्डिंग हे रिपब्लिक पक्षाचे उमेदवार सत्तर लाख मतें जास्त मिळून यशस्वी झाले. आजपर्यंत इतका प्रचंड फरक कधींच पडला नव्हता ! या निकालानें विल्सन यांचा अमेरिकन जनतेविषयींचा भ्रमाचा भोंपळा पार फुटला. अमेरिकन जनतेचा इतउप्पर विल्सन यांजवर विश्वास नसल्याचें तिनें अगदीं चोख उत्तर दिलें होतें. या अनपेक्षित धक्क्यामुळें विल्सन यांच्या आजारासही स्फुरण चढलें आणि त्यांची स्थिति जास्त शोचनीय झाली. विल्सन यांना पुन्हा वाताचा झटका आल्याची व त्यांस एका डोळ्यानें दिसेनासें झाल्याची अफवा उठली, परंतु डॉ. ग्रेसन यांनीं तिचा इनकार केला आणि खरोखरीच पुन्हां विल्सन यांची प्रकृति कांहींशीं सुधारलीहि !

कांहीं तरी उद्योग पाहिजे म्हणून वकीली करण्याचें ठरून त्याप्रमाणें विल्सन यांनीं जाहीर केलें आणि त्यांच्या माजी मंत्रिमंडळांतील एक सभासद बेन ब्रिज कोल्बी यांच्याबरोबर पातीनें धंदा सुरूं केला. मागें वकीलीचा धंदा चालेना म्हणून त्यांना मास्तरकी करावी लागली होती. आतांही त्यांस कोठें

प्रोफेसर होतां आलें नसतें असें नाहीं. परंतु एक तर दर्जाच्या दृष्टीनें वकीली स्वतंत्र धंदा असल्यामुळें मास्तरकीपेक्षां उत्तम; शिवाय त्यांचें प्रकृतिमान असें तोळामासा झालें होतें ! पूर्वी अशील न मिळाल्यामुळें विल्सन यांना स्वस्थ बसून राहावें लागे, तर आतां शारीरिक अस्वस्थतेमुळें स्वस्थ बसणें भागच पडे. आणि विल्सन यांना वकीलीच्या धंद्यांत एकदां नालायक म्हणून लागलेला डाग धुवून कढण्याची संधि पुन्हां मिळाली होती, परंतु तिचाही उपयोग करून घेण्यास मिळालें नाहीं.

यापुढील काळांत ते कोठेंच फारसे आले गेले नाहींत. फक्त हार्डिंग यांच्या कारकीर्दीच्या सुरवातीच्या दिवशीं ते गाडींतून तेथें गेले होते. परंतु काठीच्या टेक्यानें पायऱ्यांचा चढउतार करतांना त्यांचा जीव घामाघूम झाला. विल्सन यांच्या तत्त्वांना तिलाञ्जलि देणाऱ्या या हार्डिंगसाहेबांच्या उत्तरक्रियेलाही विल्सन हजर होते. येथून पुढें १९२४ सालच्या जानेवारीअखेरपर्यंत विल्सन होते त्याच स्थितींत पडून होते. परंतु फेब्रुवारीच्या दुसऱ्या तारखेला एकाएकीं रूटरचें तारायंत्र हालूं लागून त्यांतून ते आसन्नमरण असल्याचे ध्वनि निघाले, आणि दुसऱ्याच दिवशीं ते निवर्तल्याचेंही वर्तमान त्याच तारायंत्रानें वाऱ्यावर पसरलेल्या आगीप्रमाणें जगभर कळविलें !

यानंतर प्रथमच प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही नियतकालिकाचा अंक घ्या. त्यांत विल्सन यांचेवर त्या त्या मतास अनुसरून कांहीं तरी लिहिलेलें बहुशः आढळेलच. त्यांच्यासंबंधीं इतर किरकोळ गोष्टींत अनेकांचे अनेक मतभेद आहेत. परंतु ते विसाव्या शतकांतील प्रथम पादांत एक महान् थोर पुरुष होऊन गेले, याविषयीं सर्वांचें मतैक्य आहे व ते जगाला एक नवीन प्रकारची दिशा व अलौकिक तत्त्वें देऊन गेले याबद्दलही कोणाचा फारसा मतभेद नाहीं.

मृत्युवश झालेल्या या ध्येयवाद्यावर स्तुतिपुष्पांजलि वहाण्यांत त्यांच्या शत्रूंनीं सुद्धां भाग घेतला. लॉइडजॉर्ज, रॅम्से मॅक्डोनाल्ड, मलेरंड वगैरे मुत्सद्यांचे अभिप्राय पुढें दिले आहेतच. ' लीग ऑफ नेशन्सच्या सर्व शाखांचें कामकाज त्या दिवशीं बंद ठेवण्यांत आलें होतें. अमेरिकन बहुजनसमाजानें तर एक वेळ त्यांच्यावर निरतिशय प्रेमच केलें होतें ! सर्व राष्ट्रानें एकमतानें त्यांच्या निधनाबद्दल आपलें दुःख प्रदर्शित केलें. अमेरिकेच्या इतिहासांत विल्सन यांचें नांव जसें कायम राहील, त्याप्रमाणेंच तीन फेब्रुवारी ही तारीखही राहील. कारण याच तारखेला १९१६ सालीं जर्मनीशीं राजकीय हितसंबंध तोडले गेले व अमेरिकेला महायुद्धाचा वेध लागला आणि त्यानंतर सात वर्षांनीं याच तारखेला अमेरिकेचा प्रख्यात युद्धाध्यक्ष आणि जगाचा बडा तत्त्वज्ञानी परलोकीं निघून गेला.

विल्सन यांचें मरणसमयीं वय अडुसष्ट वर्षांचें होतें. आपल्या इकडील मानानें हें वय म्हणजे अगदीं पिकून पान गळण्याचेंच आहे. परंतु तिकडे जेथें

साठीनंतर कोठें लोक राजकारणांत पुढें येऊं लागतात, तेथें यांचें इतकें महत्त्व नाहीं. विल्सन यांचेमागें त्यांचें दुसरें कुटुंब व तीन मुली व त्यांचा परिवार आहेच, परंतु याशिवाय त्यांच्या अमर तत्त्वांचा पसाराहि आहे. जगांत जोंपर्यंत कांहीं परतंत्र राष्ट्रें आहेत,—आणि पाच्छाईपणा नष्ट होणार नाहीं तोंपर्यंत तीं असणारच —तोंपर्यंत त्यांना आपल्या स्वातंत्र्याच्या जन्मसिद्ध हक्काची वकीली करतांना आधाराला ‘ स्वयंनिर्णय ’ या तत्त्वाचा मोठा उपयोग होणार आहे आणि स्वयंनिर्णय हें तत्त्व उच्चारलें गेल्याबरोबर विल्सन यांचें स्मृतिश्राद्ध नित्य घडत राहील यांत शंका नाहीं. अशा रीतीनें विल्सन हे मरणाचा अनुभव घेऊनही कीर्तिरूपानें जिवंतच राहातील. कीर्तीला थोर व्यक्ति जन्म देतात आणि तीही तो अपत्यसंबंध स्मरून मोठ्या कृतज्ञतेनें त्यांचा देहनाश झाला तरी त्यांचें नांव अखंड जिवंत राखते!

महाकवि शेक्सपीअर यानें ‘ महापुरुष फक्त एकदांच मरतात ’ असें म्हटलें आहे. परंतु वस्तुतः ते कधींच मरत नाहींत तर ‘ एकदांच ते जन्मतात ’ असें म्हणणेंच जास्त युक्त होईल !

---

# मतें.

**इंग्लंडचे माजी महामंत्री लॉइड जार्ज—**

“ इतिहासांतील थोर पुरुषांत विल्सन यांची गणना कालांतरानें होऊं लागेल. तेही एक मनुष्यच असल्यामुळें त्यांच्यांत कांहीं उणीवा होत्या. परंतु राष्ट्राराष्ट्रांत बंधुत्व उत्पन्न करण्याच्या ध्येयाला मूर्त स्वरूप देण्याच्या कामीं तेच अग्रगण्य होत. लिंकनप्रभृति इतर मोठमोठ्या ध्येयवाद्यांप्रमाणें स्वप्नसृष्टि कृतींत उतरलेली पहाण्याचें भाग्य त्यांस लाभलें नाहीं. तरी त्यांची कामगिरी त्यांच्या मागें त्यांच्या इच्छेप्रमाणें पार पडून मानव जातीचें शाश्वत हित झाल्याशिवाय राहाणार नाहीं. ”

**इंग्लंडचे माजी मजूर महामंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड—**

“ युरोपखंडास शांतता व स्थिरता यांकडे नेण्यांत त्यांनीं आपली बुद्धि व विद्वत्ता दाखविली. कार्यसिद्धि होण्यापूर्वीच ते दिवंगत झाले. परंतु जगाच्या उच्च तत्त्वज्ञान्यांपैकीं एक ते समजले जातील. ”

**अमेरिकेचे अध्यक्ष काल्विन कूलिज—**

“ संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष या नात्यानें त्यांच्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं देशाचें हित साधेल अशाच तऱ्हेनें प्रयत्न केले. त्यांचे हेतु उच्च होते, आणि

त्यांची कार्यनिष्ठा अशंकित होती. महायुद्धाच्या धामधुमीच्या काळांत उच्च ध्येयवादाकडे त्यांनीं सर्व देशाला खेचलें. अखिल मानवजातीच्या मूक आकांक्षांना त्यांनीं वाचा फोडली, इतकी कीं सर्व जगाचें लक्ष त्याकडे वेधलें गेलें आणि जगाच्या इतिहासांत अमेरिकेस एक नवीनच महत्त्व प्राप्त झालें. ”

फ्रान्सचे माजी अध्यक्ष **एम. मिलेरंड**—

“ सत्ता विरुद्ध हक्क यांतील लढ्यांत फ्रान्स व तिचीं दोस्त राष्ट्रें यांच्या बाजूस मिळून त्या युद्धाचा निर्णय लावण्यांत ज्यानें मोठा भाग घेतला, त्या अमेरिकेच्या थोर अध्यक्षाला माझा देश कधींहि विसरणार नाहीं. जगभर शाश्वतशांति नांदावी हीच एक मनापासून इच्छा असणाऱ्या या उदारमतवाद्याची स्मृति अखिल मानवजात साभिमान कायम राखील.

**लंडन टाइम्स**—

“ त्यांचे दोष कांहींहि असोत; इतकें खरें कीं, या थोर अमेरिकन मनुष्यानें आपल्यापूर्वी कोणीहि उचलला नव्हता एवढा मोठा भाग जगाच्या राजकारणांत कांहीं काळ उचलला होता. अमेरिकेच्या महामुत्सद्यांत त्यांची गणति होणार नाहीं. ते एक राजकारणाचे प्रोफेसर होते आणि कांहीं काळ त्यांनीं सर्व जगाला आपला वर्ग बनविलें होतें.

**‘ लीग ऑफ नेशन्स चे ’ सर चिटणीस सर एरिक ड्रमंड**

“ विलसन यांच्या मृत्यूनें जिनीव्हा येथल्याइतकें जगांतील दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं दाट शोकपटल पसरलें नसेल. कारण, विलसन अंथरुणास खिळले असतां त्यांनीं ज्या तत्त्वासाठीं प्राणांची आहुति दिली असें म्हणतां येईल तीं, आंतरराष्ट्रीय सहकारिता व सलोखा, प्रत्यक्ष व्यवहारांत उतरण्याचें जबाबदारीचें कार्य येथील मंडळींवरच होतें. कोणता मार्ग स्वीकारावा याविषयीं सर्वत्र दिङ्मूढता पसरली असतां इतिहासाच्या टप्प्यावर उभें राहून आपल्या समकालीनांना योग्य मार्ग दाखविण्याची संधि फार थोड्यांना लाभते. तशी संधि विलसन यांना मिळाली होती.

निःसंशय एक बडा तत्त्वज्ञानी नाहींसा झाला. जगाच्या अत्यंत भयंकर युद्धाच्या शेवटीं शेवटीं विलसन युरोपांत आले आणि रंजीस आलेल्या राष्ट्रांना एक एक नवीन आशेचा किरण वाटूं लागला. विलसन यांचा मुख्यतः विजयच झाला. कारण राष्ट्रसंघ, पंचायत, आणि शाश्वतशांतता प्रस्थापण्याचें साधन इत्यादि त्यांच्या आकांक्षांचा अंतर्भाव तहनाम्याच्या पहिल्या भागांत करण्यांत आला. कर्मगतीनें परंतु वाढत्या विश्वासानें राष्ट्रामागून राष्ट्रें या नवीन ध्येयाभोंवतीं जमा होऊं लागलीं आणि तेव्हांपासून विलसन यांच्या इच्छित कार्याचें महत्त्व आणि व्याप वाढतच आहे. विलसन यांचे निधानानें, आंतरराष्ट्रीय सहकारितेचा कट्टा

पुरस्कर्ता नाहींसा झाला असला तरी, जीनिव्हा येथील, त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें आपल्या शक्तीप्रमाणें त्यांचें ध्येय तडीस नेण्याचा प्रयत्न करणारांस जास्त उत्साहच चढेल. विल्सन गेले, परंतु त्यांनीं ज्यासाठीं आपले प्राणही अर्पण केले तें कार्य नुकतेंच कोठें सुरू झालें आहे !! ”

‘ केसरी ’ ता. १२ फेब्रुवारी १९२४.—

“ महायुद्धांत जर कोणतें एकादें राष्ट्र केवळ निःस्वार्थीपणानें सामील झालें असेल, आणि तहाच्या गोंडस नांवावर जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान या देशांना लुबाडण्याचा मोह जर कोणी आवरून धरला असेल, तर तो अमेरिकेनेंच होय व त्याचें सर्व श्रेय प्रे. विल्सन यांनाच देणें न्याय्य होईल......त्यांच्या चौदा तत्त्वांच्या बाह्य देखाव्याखालीं इंग्लंड, फ्रान्स, इताली, ग्रीस व सर्विया यांनीं जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांना यथेच्छ पिळून काढण्याचा आपला कावा साधून घेतला. वुड्रो विल्सन हे परत अमेरिकेंत गेल्यावर त्या राष्ट्रानेंही त्यांस पाठिंबा दिला नाहीं. अशा रीतीनें त्यांची दोहींकडे निराशा झाली. या त्यांच्या चरित्रावरून राजकारणी पुरुष तत्त्ववेत्त्याला पुढें करून आपला कावा कसा साधतात आणि मग रस काढून घेतलेल्या चिपाडाप्रमाणें त्याची कशी अवहेलना करतात तें दिसून येतें. मुत्सद्दीपणांत वुड्रो विल्सन यांना जरी अपयश आलें, तरी राजकीय ग्रंथलेखनावरून त्यांचें नांव राजकारणी ग्रंथकारांत चिरकाल राहील. त्याचप्रमाणें त्यांचीं रणनीतीचीं चौदा तत्त्वें व मुख्यतः राष्ट्रसंघाची कल्पना आज निष्प्रभ ठरली असली, तरी कालांतरानें तिचाच अवलंब केल्याखेरीज राष्ट्राराष्ट्रांतील कलहांना आळा पडणार नाहीं. ”

---

# प्रकरण ९ वें.

## ‘ महापंडित विल्सन ’

He has only one defect as a politician; viz, that he is a saint; and as a saint his only fault is that he dabbles in politics. I can take pleasure in his courage and energy and his eloquence, but he has an unlucky hand, the results which he obtains are only momentary. He is not able to establish them permanantly. Every equally good speaker, and there are such, snatches them from him.

Prince Bismarck's autobiography.

विल्सन यांचें सार्वजनिक चारित्र्य आपण पाहिलेंच. त्यांच्या खाजगी चारित्र्याबद्दल कोठेंही विपरीत बोभाटा नाहीं, इतकेंच नव्हे तर तें निर्मळ व पवित्र

होतें अशाबद्दल पुष्कळांनीं उल्लेखून त्यांची प्रशंसा केली आहे. लहानपणापासूनच ते नम्रवृत्ति असत. परंतु त्याबरोबरच त्यांचा बाणेदारपणाही वेळोवेळीं नजरेस आलाच आहे. त्यांचा स्वभाव शांत असे; आणि अगदीं माणुसघाणा नसला तरी थोडा एकलकोंडा असे. चार मंडळींत बसून अघळपघळ तऱ्हेनें वागणें त्यांच्यानें होत नसे. याचें कारण त्यांचा भिडस्तपणा अगर बुजरेपणा तर असूं शकेलच; परंतु साधारणतः असाधारण बुद्धिमत्तेबरोबरच येणारेही हे गुण अथवा दोष आहेत. हाच एकलकोंडेपणा पुढें अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावरही टिकला व किंचित् वाढलाही. त्यांची भेट घेणें म्हणजे महाकर्म कठिण होऊन बसलें होतें. एकदां एका काँग्रेसच्या सभासदानेंही अशी तक्रार केली आहे.तो म्हणतो, "मी अध्यक्षांची भेट व्हावी म्हणून त्यांच्या खाजगी चिटणीसाला सत्रा वेळां भेटलों असेन. तोही मला आश्वासनें देई ! परंतु व्यर्थ ! आतां मला जर लोकांनीं विचारलें, जर्मन प्रश्नाबद्दल अध्यक्षाशीं काय बोलणें झालें तर मी कांहीं तरी सांगून वेळ मारून नेईनही. परंतु मला अध्यक्षांचें नुसतें दर्शनही झालें नाहीं, ही गोष्ट जर लोकांस कळली, तर बरीक पुन्हां निवडून येण्याची मुळींच आशा नको. "—नॉर्थ अमेरिकन रिव्ह्यू सप्टेंबर १९१७ ( ' मिस्टरीज ऑफ वुड्रो विल्सन. )

परंतु या स्वभावामुळें त्यांचें कित्येक वेळां नुकसान झालें. लोकांचा त्यांचेविषयीं भलता गैरसमज होई; आणि जे. एम्. कीन्स यांनीं म्हटल्याप्रमाणें, ' ते एकटे असले म्हणजे आपलें म्हणणें चालवूं शकत; परंतु चार जणांत त्यांचें कांहीं चालत नसे. ' त्यांचेवर अहंकार व महत्त्वाकांक्षा यांचा आरोप करण्यांत येतो परंतु तो रास्त नाहीं. स्वाभिमान असणें वाईट नाहीं आणि महत्वाकांक्षेवांचून जगांत कोणती व्यक्ति उच्चपदाला चढूं शकेल ? परंतु विल्सन यांचा अहंकार आणि महत्त्वाकांक्षा केवळ वैयक्तिक नसून राक्षसीही नव्हती. अमेरिका देश आणि तेथील लोकशाही यांविषयीं त्यांच्या मनांत निरतिशय अभिमान होता आणि आपल्या तत्त्वांचा जगभर प्रसार करणें हीच त्यांची महत्वाकांक्षा होती.

त्यांच्या स्वभावांत क्वचित् रंगेलपणा व कोटीबाजपणा आढळतो. परंतु गंभीरतेच्या झिरझिरीत पडद्याआडून तो काय झळकेल तेवढाच. केव्हां केव्हां ते विनोदही करीत. मरणापूर्वी आदल्याच दिवशीं तिघे डॉक्टर त्यांना झोंप लागली या समजुतीनें त्यांच्या प्रकृतिमानाची चर्चा करीत होते. विल्सन डोळे उघडून म्हणाले. " या वेळीं इतके आचारी जमल्यामुळें स्वयंपाक बिघडला तर नाहीं ? "

विल्सन हे स्वभावानें प्रेमळ होते. परंतु त्या प्रेमांत स्थान मात्र अगदीं थोड्यांना मिळत असे. डॉ. ग्रेसन हे विल्सन अध्यक्षपदावर आल्यापासून त्यांच्याबरोबर नेहमीं असत व मरेपर्यंत विल्सन यांचा त्यांच्यावर अत्यंत लोभ होता. माजी अध्यक्ष टॅफ्ट यांचे डॉ. ग्रेसन हा कुटुंबवैद्य होते आणि त्यांनींच त्यांची

विल्सन यांचेपाशीं शिफारस केल्यामुळें विल्सन यांनींही त्यांसच आपले डॉक्टर नेमलें. गोल्फ खेळणें विल्सन यांना फार आवडत असे. पहाटेंच उठून डॉ. ग्रेसन यांचेबरोबर ते गोल्फ खेळत असत. त्यांना गुप्त पोलिसांच्या गोष्टी प्रिय असत, मोठमोठीं नाटकें आवडत नसत. छोटे छोटे जलसे व फार्स पहाण्यास मात्र ते नेहेमीं जात.

विल्सन यांच्या स्वभावांत त्यांचे वडील आयरिश व आई स्कॉच असल्यामुळें त्या दोन राष्ट्रीय स्वभावांचें संमिश्रण झालें होतें. याबद्दल तेच एकदां म्हणाले. " माझ्यांत आयरिश रक्ताचें प्रमाण किती आहे हें मला ठाऊक नाहीं. परंतु एकादे वेळीं रंगेल बेफिकीरवृत्ति माझ्यांत उत्पन्न होते, त्यावरून तें बरेंच असावें ! पण याला प्रतियोगी म्हणून स्कॉच रक्तही बरेंच असावें, कारण त्यांतील सावधगिरी या उच्छृंखल वृत्तीला पूर्ण ताळ्यावर ठेवते. "

विल्सन यांच्या बुद्धिमत्तेबद्दल मुद्दाम सांगण्याची कांहींच जरूर नाहीं. परंतु त्यांची ग्रहणशक्ति किती दांडगी होती याचें एक उदाहरण दिलें तर वावगें होणार नाहीं. ते फ्रान्सांत गेले, तेव्हां त्यांस फ्रेंच भाषेचा गंधसुध्दां नव्हता. परंतु रोज सकाळीं थोडथोडा अभ्यास करून अमेरिकेस परत येण्याच्या दिवशीं मेजवानीचे वेळीं अस्खालित व सुंदर फ्रेंच भाषेंत त्यांनीं व्याख्यान दिलें. तेव्हां सर्वांना फारच आश्चर्य वाटलें. क्लेमेंको म्हणाले, ' फ्रेंच भाषेवरही आपलें इतकें प्रभुत्व असेलशी माझी कल्पना नव्हती. ' विल्सन उत्तरले, " न कळविणेंच मला बरें वाटलें. कारण नाहीं तर तुमच्याशीं मला फार बोलावें लागलें असतें. "

त्यांना ललितवाङ्मयाची विशेष आवड नव्हती. तरी काव्यप्रकारांचें मर्म जाणण्याची रासिकता त्यांचे ठायीं होती. फुरसतीचें वेळीं ते टेनिसन व इतर कवी वाचीत असत. परंतु त्यांतही त्यांचा ' मूळ राजकारण-प्रिय स्वभाव ' वर डोकें काढीच.

परंतु उठल्या सुटल्या राजकारणावर वाद घालण्याचा त्यांना अत्यंत कंटाळ असे. इतकेंच नव्हे तर भेटावयास आलेल्या माणसानें आपण होऊन जरी गंभीर विषय काढला तरी रुक्ष तात्त्विक विवेचन करणें त्यांस पसंत नसे आणि तो विषय सोडून से साध्या गप्पा मारूं लागत आणि तेंही त्या मनुष्यास ज्याची आवड असेल त्यावरच ते बोलूं लागत. परंतु खुद्द त्यांस शास्त्रीय विषयांचीच आवड असे. अगदीं विद्यार्थिदशेपासूनच त्यांनीं राजकारण व इतिहास या विषयांचा विशेष आस्थेवाईक अभ्यास सुरू केला होता व त्यांचें लेखनही त्याच विषयांवर असे. त्यांचे आजे वृत्तपत्रकार होते आणि वडील प्रोफेसर होते. विल्सन यांनीं वृत्तपत्राचा स्वतः धंदा केला नाहीं हें जरी खरें ; तथापि त्या दृष्टीनें त्यांनीं प्रथम आपली तयारी चालविली असावी असें वाटतें. कारण, ते लघुलेखनपद्धति शिकले होते व त्यांचा वेग दर मिनिटास दीडशे शब्द म्हणजे साधारणपणें

उत्तम रिपोर्टराइतका होता. शिवाय त्यांनीं वृत्तपत्रांचा उपयोग आपल्या कार्यासाठीं पुष्कळच करून घेतला.

वडिलांचे प्रमाणें प्रोफेसरगिरी तर त्यांनीं जन्मभर केलीच. विल्सन मोठे विद्वान् झाले होते तरीसुद्धां कोणताही लेख अगर ग्रंथ त्यांनीं लिहिला म्हणजे तो वडिलांस ते हयात होते तोंपर्यंत वाचून दाखवीत.वडील मध्येंच एकाद्या वाक्याचा अर्थ अगर एकादी शंका विचारीत आणि चिरंजीवही नम्रपणें तो त्यांस समजून सांगण्याचा प्रयत्न करीत. खुद्द विल्सन यांनीं एम् टारबेले या बाईपाशीं असे उद्गार काढले होते कीं, ‘ कोणतीही व्याख्या कशी करावी हें मला माझ्या वडिलांनीं शिकविलें. ’

विल्सन यांनीं लेखनव्यवसाय केला, परंतु त्यांनीं वाङ्मय उत्पन्न केलें असें म्हणतां येत नाहीं. अगदीं विद्यार्थिदशेपासूनच इतिहास व राजकारण या विषयांवर निरनिराळ्या मासिकांतून त्यांचे लेख चमकूं लागले. यांपैकीं बहुतेक खोल अभ्यास, व पूर्ण विचार करूनच लिहिलेले असत; व त्यांत त्यांची बुद्धिमत्ताही दिसून येई. १८८९ सालीं एक दीर्घकाल परिश्रम करून लिहिलेला ‘ स्टेट ’ हा पहिला ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला. त्यांचा उद्देश फारसें तात्विक विवेचन करण्याचा नव्हताच. मुखपृष्ठावरच ‘ऐतिहासिक व व्यावहारिक राजकारणाचीं मूलतत्वें ’ ( Elements of Historical and Practical Politics ) असें लिहिलें होतें. हें पुस्तक अमेरिकन विद्यापीठांतून फार मान्यता पावलें. व ग्रंथकर्त्यास प्रोफेसरची जागा मिळण्यास त्याचा वशीला उपयोगी पडला. हें पुस्तक प्रत्येक राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास अत्युपयुक्त आहे व आतां जरी त्यांतील विवेचन जुनें पुराणें झालें असलें तरी राजकारणाच्या अभ्यासकास तें वांचल्यावांचून चालावयाचें नाहीं. शास्त्रीय असें हें एकच पुस्तक विल्सन यांनीं लिहिलें आहे.

१८९२ मध्यें ‘ विघटन व संघटन ’ ( Division and Reunion ) हें इतिहासाचें पुस्तक लिहिलें. यांत १८२९ ते १८८९ पर्यंतचा संयुक्त संस्थानांचा इतिहास आला आहे. हें केवळ शाळेच्या विद्यार्थ्यांच्यासाठींच लिहिलें आहे.

१८९७ मध्यें त्यांचें वॉशिंग्टनचें चरित्र बाहेर पडलें. वाङ्मयदृष्ट्या हें पुस्तक फार उच्च आहे; आणि विल्सन यांची तद्विषयक योग्यता त्यांत दिसून येते. चरित्र कादंबरीप्रमाणें मनोरंजक झालें असून संपूर्ण वाचल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं. तरी पण यथातथ्यदर्शनापेक्षां यथाकल्पदर्शनाकडेच भर फार ! तत्कालीन लोकाभिरुचीस धरून तें लिहिण्यांत आलें आहे. भाषा साधी, सहजसुंदर, असून वर्णनें बहारीचीं आहेत. किंचकट तात्त्विक विवेचन केलेलें नाहीं.

यानंतर १९०२ मध्यें विल्सन यांनीं अगदीं मुळापासून सुरवात करून

त्या तारखेपर्यंतचा अमेरिकेचा इतिहास कथन करणारा एक ग्रंथ लिहून प्रकाशित केला. इतिहासज्ञ व मुत्सद्दी असे दोन गुण एकत्र असलेल्या माणसाशिवाय हा ग्रंथ लिहून होणे शक्य नाहीं हीं गोष्ट ग्रंथ वाचताना प्रत्ययास येते. विवेचन जोरदार व राष्ट्रीयभावनायुक्त असून त्यांत साम्राज्यवाद उर्फ पाच्छाईपणा याचा लेशही नाहीं.

याशिवाय किरकोळ 'संयुक्त संस्थानची शासनसंस्था' (१९०८) 'स्वतंत्र जीवित' (Free Life 1913), On being Human (1916) इत्यादि बरींच पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. याशिवाय 'जगाचा इतिहास' ही ते लिहिणार होते असें म्हणतात. परंतु तसा तो कागदांत लिहिण्यापेक्षां पुढें कृतीनें सुरूं करून प्रत्यक्ष बनाविणेंच त्याच्या हातून घडलें ! आणि त्या भानगडींत फुरसत न मिळाल्यानें त्याचे हातून तो ग्रंथ लिहिणें झालें नाहीं.

त्यांच्या व्याख्यानांचीही कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत 'नव स्वातंत्र्य' (New freedom) हें त्यांचें तत्त्वज्ञान कळण्यास फार उपयोगी आहे. यांत दोनही वेळां अध्यक्ष होण्यापूर्वी निवडणुकीचे मोहिमेंत त्यांनीं दिलेल्या निवडक व्याख्यानांचा संग्रह केला आहे. याशिवाय, त्यांच्या राजकीय पत्रव्यवहारांतसुद्धां जागोजाग वाङ्मय, तत्त्वज्ञान भरपूर असल्यामुळें त्याची उपेक्षा करून चालणार नाहीं. आणि हें तत्त्वज्ञान एका काळीं जरी मृगजलाप्रमाणें आभासवत् अगर आकाशनगरीप्रमाणें असंभाव्य वाटलें तरी जगाच्या आजच्या राजकारणाकडे पहाणारास त्यावर याच तत्त्वज्ञानाची छाया पडल्याचें दिसून येईल. पुष्कळ चिखल उडविला म्हणजे थोडा तरी चिकटतोच हें जसें वाईट गोष्टींविषयीं त्याचप्रमाणें, चांगल्या गोष्टीचाही पुनः पुनरुच्चार व पुनर्लेप करीत गेलें तर तिचा कांहीं अंश राहातो, व कालांतरानें त्या गोष्टी वज्रलेपही होण्याचा संभव असतो. त्यास अनुसरून विल्सन यांचें तत्त्वज्ञानही कांहीं कालावधीनें सर्वत्र प्रसृत होणार अशीं प्रसादचिन्हें आज दिसत आहेत.

विल्सन यांच्या वक्तृत्वाबद्दल मागें प्रसंगोपात् उल्लेख येऊन गेलाच आहे. तरी पण त्याबद्दल गोळा बेरीज करून एकदम वर्णन करावयाचें तर 'बुद्धि व अंतःकरण यांच्या समन्वयापासून उत्पन्न झालेली चिच्छक्ति' असें देतां येईल. रूझवेल्ट यांची वक्तृत्वाबद्दल फार ख्याति आहे. परंतु त्यांत बुद्धिवाद फारसा आढळून येत नाहीं. मोहक शब्दजाल उत्पन्न करून त्या धोधाटाबरोबर श्रोतृवृंदाला वाहवून नेण्याचें सामर्थ्य त्यांत आहे. त्यांत आवेश आहे, अभिनिवेश आहे. परंतु तर्कप्रतिष्ठ विवेचकपद्धति नाहीं. सनातन असें तत्त्वज्ञान नाहीं. त्यांत झंझावाताचे सर्व गुण आहेत. पण प्राणवायूचें शीतल चैतन्य नाहीं. क्षुल्लक विषयाचें सुद्धां अवडंबर माजविण्याची करामत आहे. परंतु विश्वव्यापी विशाल विषयाची व्यवहाराच्या मर्यादित चौकटींत मांडण मांडण्याची कला नाहीं. विल्सन यांचें वक्तृत्व मनोवारूप्रमाणें बसल्या बैठकीवरून यत्किंचितही न

हालतां विश्वसंचार करतें, तर रूझवेल्ट यांचें वक्तृत्व सर्कशींतील घोड्याप्रमाणें इतक्याशा रंगणांत धुडगूस घालतें व धुळीचे लोळ उठवितें. विल्सन अलंकारिक बोलूं शकतात, परंतु वेळप्रसंग पडला तर अलंकाराचा अंगरखा दूर फेंकून केवळ तात्त्विक विवेचनही करूं शकतात. रूझवेल्ट हे अलंकारिक भाषेशिवाय बसत नाहींत अगर उठत नाहींत. कारण, भरींव तत्त्वज्ञांनाचा अभाव त्याशिवाय छपणार कसा ! विल्सन व रूझवेल्ट यांची तुलना करण्याचें कारण, अमेरिकेच्या अत्यंत प्रसिद्ध अध्यक्षांपैकीं ते एक आहेत आणि रूझवेल्ट यांसही प्रसिद्धि पुष्कळ अंशीं त्यांच्या वक्तृत्वानेंच मिळवून दिली आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षांत वॉशिंग्टन व लिंकन हे पूर्वी होऊन गेलेल्यांत फार प्रसिद्ध आहेत. अगदीं अलीकडील अध्यक्षांमध्यें रूझवेल्ट व विल्सन हे आहेत. या सर्वांत विल्सन यांचा विशेष म्हणजे त्यांची विद्वत्ता ! त्यांच्या इतका विद्वान अध्यक्ष यापूर्वी अमेरिकेस मिळाला नव्हता व यापुढेंही दीर्घकाळ मिळणार नाहीं. वॉशिंग्टनची योग्यताच निराळी आहे व तिची बरोबरी केव्हांही कोणाही अध्यक्षास करतां येणार नाहीं. लिंकन हेही वॉशिंग्टन व विल्सन यांचे प्रमाणेंच अमेरिकेचे युद्धाध्यक्ष ( War President ) होते. त्यांनींही जिवंत माणसास पशुतुल्य गुलामगिरी व नर्कतुल्य हाल अपेष्टा सोसावयास लावणाऱ्या पद्धतीविरुद्ध हत्यार उपसलें आणि त्यासाठीं स्वप्राणांची आहुति दिली. लिंकन यांचें सुदैव कीं, वाशिंग्टनप्रमाणेंच त्यांना यशःसिद्धि मिळाली. पण विल्सन यांच्या दुर्दैवानें त्यांना यशःप्राप्ति न होतां मनोभंग व तेजोभंग मात्र सोसावा लागला. परंतु त्यांच्या तत्त्वांचाही व्याप फार मोठा होता व त्यास तुल्य अशी प्रचंड मुत्सद्देगिरी व कुटिल नीतिज्ञता त्यांच्यांत नव्हती. ते केवळ महापंडित व तत्त्वज्ञानी होते. यामुळें युरोपांतील कसलेल्या कावेबाज राजपुरुषांपुढें त्यांस हार खावी लागली.

महायुद्धाच्या चौरंगी सामन्यांत प्रसिद्धीस आलेले चार पुरुष म्हणजे केसर, लॉइड जॉर्ज, विल्सन व लेनिन हे होत. त्यांपैकीं केसरची उद्दाम परंतु अप्रच्छन्न लष्करशाही तर विल्सन यांचा खरा शत्रू होता. या प्रबल शत्रूशीं खुली मैदान लढाई खेळावी लागल्यामुळें विल्सन यांनाही आपल्या अफाट बाहुबलानें विजय मिळवितां आला. परंतु लॉईड जॉर्जच्या मैंदपणापुढें त्यांनाही उलट गानिमी काव्याची लढाई लढतां न आल्यामुळें त्यांची फसवणूक झाली. त्यांच्या भाषणाची त्यास भुरळ पडली. जे कीन्स यांनीं केलेलें याबद्दलचें वर्णन मोठें मनोरंजक आहे. ते लिहितात.

'Lloyd George possessed of judging character, motive, aud subconscious impulse, percieving what each was thinking and what each would say next and com-

pounding with telepathic instinct the argument or appeal best suited to the vanity or weakness or selfinterest of his immediate auditor, was more than a match for the President—the blind and deaf Don Quixote."

लेनिनशीं विल्सन यांचें शत्रुत्व कधींच आलें नाहीं. उलट रशियांत बोल्शेव्हिक क्रांति झाल्यावर सर्व यूरोप लेनिनविरुद्ध असतांना विल्सन यांनीं मात्र बोल्शेव्हिक सरकारला आपला पाठिंबा जाहीर रीतीनें व्यक्त केला होता. लेनिन व विल्सन यांच्या तत्त्वज्ञानांत, देश व परिस्थिति यामुळें जो फरक पडणें सहाजिक होतें, तेवढा वगळला तर फारच थोडें अंतर असल्याचें आढळून येतें. लेनिन अमेरिकेंत जन्मता व विल्सन रशियांत जन्मता तर विल्सन यांच्या अचाट बुद्धिमत्तेमुळें पडणारा फरक वजा केला तर मूळ भूमिका दोघांच्याही तत्वज्ञानाची कायमच राहून वरच्या स्वरूपांत मात्र अलटापालट झाली असती, असें म्हणावयास पुष्कळ वाव आहे. त्या दोघांच्या मनांत चालू स्थितींत जें साम्य आढळून येतें त्या गोष्टी याप्रमाणें: (१) निरानिराळ्या राष्ट्रांस व लोकांस स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू करावें. (२) सरहद्दीवरील प्रदेश कोणत्या राष्ट्राकडे असावा हें तत्तद्देशस्थांनींच ठरवावें. (३) युध्दें बंद होऊन जगांत शांतता नांदावी. गुप्त तहनामे बंद व्हावे व राष्ट्रसंघानें सर्व जग एकत्र बांधलें जावें. (४) पारमार्थिक व उपासनाविषयक स्वातंत्र्य सर्वांस असावें, आणि (५) कामकऱ्यांस जन्मभर सुखानें राहातां यावें व त्यांचें संघ असावेत. संपत्तीची वांटणी कशी असावी हा प्रश्न विल्सन यांनीं उपस्थितच केला नाहीं. लेनिनचीं त्यावरील मतें ठरलेलीं आहेत व तीं मजूर वर्गास अनकुल अशीं असलीं तरी खासगी मालमत्ता अजीबात नसावीच असें तो म्हणत नाहीं. फक्त तिला बऱ्याच मर्यादा घालून नियंत्रित करण्याची तो इच्छा करतो. राष्ट्रवृक्षाचा उत्कर्ष व टवटवी त्याच्या शेंड्यावर अगर बुंध्यावर अवलंबून नसून जमीनींत खोल गाडलीं गेलेलीं व रसशोषण करून वृक्षपोषण करणारीं जीं मुळें त्यावरच अवलंबून असतात असें दोघांचेंही मत! व म्हणून अशा प्रकारचा जो बहुजनसमाज, त्याच्याच हातीं सर्व सत्ता असणें न्याय्य आहे आणि संपत्ति, विद्वता अगर जुलूमशाही यांच्या साह्यानें मूठभर लोकांनीं त्यांचे डोक्यावर मिरी वाटूं नये ही दोघांचीही खरीखुरी इच्छा! परंतु त्यांत सुद्धां भेद इतकाच कीं, या गोष्टी राजकीय तत्त्वज्ञानाप्रमाणें इष्ट म्हणून विल्सन यांना पाहिजेत तर लेनिनला समाजाचा मुख्य घटक सुखी रहावा म्हणून त्या पाहिजेत. विल्सन यांच्या तत्त्वज्ञानांत ध्येयवाद फार; उलट लेनिन हा पक्का व्यवहारी. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें 'अध्यक्ष विल्सन हे नांवाला व्हाईट हाऊसमध्यें बसलेले असत. परंतु त्यांचें खरें परिभाषण चंडोल अगर कवि यांच्याप्रमाणें उंच आकाशांत ढगामध्यें होत असे.

लेनिन अगोदर असा उंच भराऱ्या मारीत जावयाचा नाहीं आणि गेलाच तरी घारीप्रमाणें व्यवहाराच्या घरट्यावर त्याची नजर सतत कायम राहवयाची !

तथापि लेनिनची तत्त्वज्ञानाची भरारी विल्सन यांच्याइतकी जरी गगनचुंबी नसली तरी दोहोंतही लोकशाहीचीं तत्त्वें ग्रथित झालेलीं आहेत. लेनिनमध्यें राजकीय संघटनेपेक्षां सामाजिक सुव्यवस्थेची दृष्टि जास्त होती. विल्सन यांचीं तत्त्वें राजकारणाचा तात्त्विक अभ्यास परिशीलनपूर्वक केल्याचा परिणाम होता. उलट समाजशास्त्राचीं अंगोपांगें साग्र आकलन करून घेतल्यावर लेनिनचीं मतें बनलीं होतीं. परंतु लेनिन हा ' महामुत्सद्दी ' होता, तर विल्सन हे नुसते ' महा पंडित ' होते. " व्रजन्ति ते मूढधियः पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिनः " हें तत्त्व लेनिननें पूर्णपणें जाणलें होतें; आणि तो नेहेमीं ' जशास तसें ' या न्यायानें वागत असे. आततायी मनुष्यास विचार करण्याच्या भरीस न पडतां प्रथम ठोकून काढावें या बाबतींत मात्र विल्सन व लेनिन यांच्यांत साम्य होतें. शांतता दोघांसहि प्रिय होती. परंतु शांतता राखूनच शांतता राखतां आली तर राखावी; ती प्रस्थापित करण्यास अशांततेचे, अत्याचाराचे, किंबहुना रक्तपाताचेही मार्ग स्वीकारण्यापेक्षां असलेली अशांतताच बरी अशी मिळमिळीत अहिंसावृत्ति दोघांसहि मान्य नव्हती. म्हणूनच झारशाही बुडवितांना लेनिननें रक्तपाताकडे डोळेझांक केली. आणि केसरशाही नष्ट करण्यासाठीं विल्सन उघडया डोळ्यांनीं महायुद्धांत शिरले. महामुत्सद्दी लेनिननें झारशाही नष्ट करून स्वजनांचें प्रेम संपादिलें व सुखानें प्राण सोडला. महापंडित विल्सन यांनीं मात्र जर्मन लष्करशाही नष्ट केली तरीं तिचें भूत त्यांस पार गाडून टाकतां आलें नाहीं. एक महायुद्ध संपलें, परंतु दुसऱ्या अतियुद्धाचे वारे वाहूं लागले आणि त्या मृत लष्करशाहीचें भूत जास्तच हिडिसपणें जगाच्या मानगुटीस बसलें. पाच्छाईपणास आळा बसला नाहीं, उलट उघडपणें वावरण्याची लाज वाटूं लागल्यामुळें त्यानें कपटाचरणास व मिथ्याचारास सुरवात केली. चौदा तत्त्वांना चौदावें रत्न दाखविण्यांत आलें. राष्ट्रसंघाच्या विल्सन यांच्या मूळ कल्पनेची विटंबना होऊन कांहींतरी विकृत वानरकृति अस्तित्वांत आली, आणि स्वयंनिर्णयाचा बोजवारा उडून स्वैरनिर्णय होऊं लागला. अशी स्थिति झाल्यामुळें स्वतां विल्सन तर खट्टू झालेच. परंतु ज्या महत्त्वाकांक्षी आमिषामुळें अमेरिकन जनता युद्धास सिद्ध झाली आणि तिनें नानाप्रकारचा निःसीम स्वार्थनाश होऊं दिला त्याची पूर्तता झाली नाहीं. उलट नाचक्की होण्याची पाळी आली हें पाहून तिचा विल्सन यांच्या करामतीवरील विश्वास पार उडून गेला. तिनें विल्सन व त्यांचीं तत्त्वें यांचा धिक्कार केला. आणि अशा दुःखद स्थितींत विल्सन यांचा अंत झाला. योगायोग असा कीं, हे दोघे महापुरुष एका पंधरवड्याच्या अवधींतच मृत्यु पावले.

महामुत्सद्दी लेनिन व महापंडित विल्सन यांच्या बरोबरच आज आणखी

खीही एक नांव नजरेसमोर येतें व तें महात्मा गांधी यांचें ! महात्मा गांधी जरी आज जिवंत असले, तरी त्यांच्या तत्त्वज्ञानाची कामगिरी आतां संपलेली आहे. गांधी हे मुत्सद्दी नाहींत अगर पंडितही नाहींत. ते महात्मा आहेत. लेनिनचें जसें समाजशास्त्रावर अगर विल्सन यांचें जसें शासनशास्त्रावर, त्याचप्रमाणें महात्माजींचें अध्यात्म व नीति या शास्त्रांवर अधिष्ठान आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. हीं तीनही शास्त्रें थोड्या फार फरकानें परस्परसंबद्ध आहेतच; परंतु ज्याच्या बाबतींत ज्याचा विशेष परिपोष झाला आहे, अशा शास्त्राचा उल्लेख करावयाचा तर तो असाच करावा लागतो. गांधींचें सर्व तत्त्वज्ञान आध्यात्मिक व नैतिक आहे. सामाजिकपणा त्यांत थोडाफार चमकतो. परंतु राजकारणाचा मात्र तत्त्वतः अभाव आहे. आजच्या स्थितींत हिंदुस्थानांत कोणत्याही गोष्टीचा ओघ शेवटीं राजकारणाच्या सागरांत जाऊन मिळतो; यापलीकडे गांधींच्या तत्त्वज्ञानाशीं राजकारणाचा फार थोडा संबंध आहे. आत्यंतिक सत्य व अहिंसा हा गांधींचा नितांत आचार व विचार आहे. आणि वारांगनेप्रमाणें अनेकरूप असलेल्या नृपनीतीला तर त्यांचें वांवडें आहे. विल्सन यांना सत्य व अहिंसा कितीही प्रिय असली तरी त्यांची राजकारणांत इतकी पराकाष्ठा करणें त्यांस तत्त्वतः पसंत नव्हतें. त्यांच्यांत नैसर्गिक उणीवा असल्यामुळेंच त्यांना व्यवहारांत तग धरतां आली नाहीं. गांधींचें तसें नाहीं. वाटेल तसली अस्मानी सुलतानी व्हावयाची वेळ आली तरी ते सत्य व अहिंसा यांचीं टोकें धरून बसण्यास कमी करणार नाहींत. त्यापुढें त्यांना स्वातंत्र्याची सुद्धां किंमत नाहीं. विल्सन हे बुद्धिजीवी व तर्कप्रामाण्य मानणारे असल्यामुळें तडजोडीसही तयार असत आणि या तडजोडी स्वभावामुळेंच त्यांचे तहपरिषदेंत वाभाडे निघाले. गांधी तडजोडीस तुटेपर्यंत तयार होत नाहींत. लेनिन या दोहोंच्या मध्यें येतो. परिस्थितीप्रमाणें तो दुराग्रही बनतो, तडजोड करतो अगर सर्वस्वींही लीन होतो, परंतु पाण्यांत दाबलेल्या लांकडाप्रमाणें त्या प्रतिकूल परिस्थितीचें दडपण नाहींसें होतांच पुन्हां स्वमतांच्या पृष्ठभागावर तरंगत राहतो. यांतच त्याच्या यशःसिद्धीचें, विल्सन यांच्या अपयशाचें आणि गांधींच्या अकार्यक्षमतेचें बीज आहे. विल्सन यांची विद्वत्ता, लेनिनची कार्यपटुता व गांधींची तत्त्वनिष्ठा या तिहींचें संमिश्रण क्वचितच झालेलें आढळतें.

राजकीय अनत्याचारी असहकारितेचे पुरस्कर्ते गांधी हे हिंदुस्थान देशाचे महात्मा आहेत; राज्यक्रांतीचा विश्वकर्मा लेनिन हा रशियाचा महामुत्सद्दी आणि युरोपखंडाचा महात्मा होय; आणि शाश्वत विश्वशांतता प्रस्थापक राष्ट्रसंघाचे प्रणेते विल्सन हे अमेरिकेचे दूरदृष्टि मुत्सद्दी आणि सर्व जगाचे महात्मा आहेत. ह्या तिघांही महात्म्यांना १९२० सालचा आरंभ अत्यंत अशुभ होता असें वाटतें!

जानेवारीच्या एकविसाव्या तारखेस लेनिन आणि फेब्रुवारीच्या तीन तारखेस विल्सन मृत्यु पावले, आणि त्या दोन महात्म्यांच्या आयुष्यक्रमावर परमेश्वरी पडदा पडला. त्याच सुमारास इकडे हिंदुस्थानांतील महात्म्याच्या आयुष्यक्रमावरही कालपुरुषानें आपला पडदा पसरण्यास प्रारंभ केला होता. परंतु परमेश्वरी परवानगी नसल्यामुळें महात्मा गांधी त्या जिवावारच्या दुखण्यांतून आणि शस्त्रक्रियेंतून सुरक्षितपणें पार पडले, हें हिंदुस्थानचें सुदैवच समजलें पाहिजे!

# प्रकरण १० वें.

## शांततेचा शाहीर विल्सन.

" You know there is just one thing about us, that is immortal in this world, and that is our reputation."

—W. Wilson ' New Freedom '

' मरावें परी कीर्तिरूपें उरावें' —रामदास.

मूर्ख मनुष्य सुद्धां कोणतीहि गोष्ट करण्यास उगाउगीच प्रवृत्त होत नाहीं. मग सर्व ऐहिक ज्ञात्यांना अगम्य असा महाज्ञानी परमेश्वर हा जेव्हां कोणास उत्पन्न करतो तेव्हां त्या त्या पदार्थमात्रास कांहीं तरी उद्देश, आदेश अगर कार्य पार पाडण्यासाठींच योजीत असतो यांत शंका नाहीं. अर्थातच, त्याकरवीं करवावयाचें कार्य ज्या मानानें महत्त्वाचें असेल त्या मानानें त्याला कमजास्त सामर्थ्य देण्याचीही खबरदारी तो घेतच असला पाहिजे. या जगाचे पाठीवर जेथें कोठें म्हणून कांहीं श्रेष्ठ प्रतीचें कार्य घडवून आणण्याची त्याची इच्छा असेल तेथें लोकोत्तर पुरुषांना तो जन्मास घालतो. आणि असल्या अंशभूत प्रेषितांकडूनही होण्यास अशक्य असें जेव्हां एकादें महत्कर्म उभें राहतें, तेव्हां त्यास स्वतासही धांवून यावें लागतें, आणि म्हणूनच भगवद्गीतेंत या महत्कार्याची जाणीव 'यदा यदा हि धर्मस्य' आणि 'परित्राणाय साधूनां' या दोन श्लोकांत करून दिली आहे. यापेक्षां कमी दर्जाची कामगिरी उरकण्यास खुद्दांची स्वारी न येतां आपल्या प्रभावळींतील अनुक्रमानें महत्त्वाच्या 'वीरमणीं' ची योजना भगवंत करीत असतात; आणि असले थोर पुरुष दर देशांत उत्पन्न होत असतात.

अमेरिकेच्या इतिहासांतही अशा महान् व्यक्ती आजपर्यंत निरनिराळ्या काळीं होऊन गेल्या. अमेरिकेला दास्यमुक्त करण्यासाठीं तेथें वॉशिंग्टनचा जन्म झाला. त्यानंतर काळ्या निग्रोंना गुलाम बनवून त्यांचे जिवावर धनाढ्य बनलेल्या मदो-

न्मत्तांना ताळ्यावर आणण्यासाठीं लिंकनची योजना झाली. अमेरिकन जनता ज्या वेळीं राजकीय दृष्ट्या पूर्ण निष्क्रिय बनली होती, तिनें आपल्या नैसर्गिक हक्कांकडे दुर्लक्ष केल्यानें तेथील सरकार ज्यावेळीं एककल्ली व एकतंत्री बनलें होतें, व लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचा जेव्हां मागमूसही शिल्लक नव्हता, अशा अंधकारांत विल्सन यांचा जन्म झाला. विल्सन यांची अमेरिकेपुरती कामगिरी लक्षांत घेतली तर स्वाधिकारानिवृत्त सामान्य जनतेला त्या महानिद्रेंतून खडबडून जागे करण्यासाठीं त्यांची परमेश्वरी योजना होती असें दिसून येतें. धनाढ्यांच्या कचाटींतून अमेरिकन सरकार ओढून काढून लोकसत्तेला जबाबदार करणें हें त्यांचें कर्तव्य होतें.

'Freemen need no guardians' स्वतंत्रांना पालकांची जरूरी नसते अशी गर्जना त्यांनीं केली. 'राजकारणांत वयानें--अज्ञान ही सबब मी ऐकणार नाहीं. माझ्या कारभारांत माझा हात नाहीं अशा स्थितींत माझी काळजी वाहण्याचा बहाणा करणारांना मी स्वस्थ बसूं देणार नाहीं. माझा सल्ला तो 'हटकून चांगलाच असेल म्हणून घेण्यांत आला पाहिजे असें नव्हे, तर कोणतेंही सरकार, त्यांत जनतेंतील प्रत्येकाला जर भाग घेतां येत नसेल तर तें चांगलें असूंच शकणार नाहीं म्हणून !' 'बहुमताला मी मान देईन; परंतु त्याशीं माझीं मतें मिळतीं आहेत एवढ्याच करतां नाहीं तर शिस्त म्हणून देईन.' लोकशाहीची ही मोठी मजा आहे कीं, तुम्हीं अचरटपणानें वागाल तर तुमचाच जीवनक्रम विस्काळित होईल. खुनशीपणानें सूड उगवूं लागला तरी तो स्वतःवरच उगवून घ्याल. लोकशाहीचें अस्तित्वच मुळीं 'प्रत्येक हित तें प्रत्येकाचें हित' या तत्त्वावर आहे. लोकशाहीस पदच्युत करून मूठभर लोकांचें हातांत सत्ता जाणें अत्यंत घातक आहे. मग ते दयाळूपणानें वागण्याचा कितीही प्रयत्न करोत. विल्सन म्हणतात "मालक किती दयाळू आहे याशीं मला कर्तव्य नाहीं. कारण मी मुळीं कोणाला माझा मालक बनूं देण्यासच तयार नाहीं." ते आणखी म्हणतात, 'जनतेच्या सर्व वैभवावर अनियंत्रित सत्ता चालविणाऱ्यांचीं सरकारें कितीही दयाळूपणें वागण्याचा प्रयत्न करणारीं असोत, तीं नाशच पावलीं असें इतिहास सांगतो. विल्सन यांचें या बाबतींतील धोरण एका वाक्यांत सांगावयाचें तर असें सांगतां येईल कीं, 'साम्राज्यें अगर सुराज्यें हीं मनुष्यकृत असल्यामुळें चिरकाल टिकणारीं नसून स्वराज्यें हींच नैसर्गिक असल्यामुळें चिरकाल टिकणारीं आहेत. त्याचप्रमाणें विल्सन म्हणतात, "एकाद्या नीच मनुष्याला मी भीत नाहीं परंतु ज्याचीं तत्त्वें चुकलीं आहेत अशा बलिष्ठाला मी भितों; कारण तीं त्याचीं चुकीचीं तत्त्वें त्याच्या वैयक्तिक वजनामुळें इतरांवर लादलीं जाण्याचा संभव फार असतो. अमेरिकन राजकारण सर्वस्वीं धनाढ्यांच्या ताब्यांत गेलें होतें त्याविषयीं जनतेस उद्देशून ते म्हणाले, 'त्यांच्या सामर्थ्याला

तुह्मी डरतां? हें नुसतें फुसकें सामर्थ्य आहे. हा पत्त्यांचा किल्ला आहे. याला नुसती तुह्मी धडक मारण्याचा अवकाश; तो पार ढासळून पडेल. खरोखरच विल्सन यांच्या न्यूजर्सीच्या सुभेदारींत व अध्यक्षाच्या कारकीर्दीत अमेरिकन जनतेस हा अनुभव आलाही. व अमेरिकन जनता विल्सन यांच्या घंटानादानें बरीच जागृत झाली. आणि तिनें भांडवलवाल्यांचा नक्षा पुष्कळच उतरविला. कालरथ ज्या मार्गावरून आला आहे तो मार्ग चातुर्वर्ण्याच्या स्टेशनांवरून आलेला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. कांहीं दिवस ब्राह्मणांच्या सद्दीचे गेले. त्यानंतर क्षात्रतेज प्रभावी होतें. त्याचा निःशेष अंत गेल्या महायुध्दांत झाला. तरी त्यापूर्वी बराच काल वैश्यांच्या प्राबल्याचा गेला होता व तो अद्यापिही चालूच आहे. आज सर्व जगाच्या राजकारणांत ज्या अलटापालटी होतात, त्यांत या व्यापारी बाबीच फार असतात. शूद्रवर्णाचें महत्त्व विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच वाढतें आहे. आणि आज कोणत्याही देशाकडे पहा! तेथील राजकारणांत शूद्रांचा शिरकाव फार मोठ्या प्रमाणांत होत आहे याचा परिणाम वैश्यांच्या प्राबल्यानें अगोदरच अस्तप्राय झालेल्या लष्करशाहीला ठार बुडविण्याकडे होणार यांत शंका नाहीं व्यापाराचें संरक्षण करण्यास क्षात्रवृत्तीची जरूर असल्यामुळेंच अद्याप त्याचा अवशेष सांपडतो. परंतु, शूद्रवर्णाचें साम्राज्य झाल्यावर अर्थातच त्याचें तादृश महत्त्व उरणार नाहीं आणि याचा परिणाम आजपासूनच दिसूं लागला आहे. जेथें जेथें म्हणून या चौथ्या वर्गाचा वरपगडा झाला आहे, तेथें युद्धें व युद्धोपयोगी सामग्री यांचेविरुद्ध लढाई पुकारण्यांत आलेली आहे

इकडे ही अशी व्यवहारप्रगति होत असतां तत्त्वांतही उत्क्रांति होत आहेच. अगदीं पूर्वीकालीं जी संकुचित दृष्टी होती ती आतां राहिली नाहीं. व्यक्तिमत्वाच्या बिंदूपासून निघून विश्वमत्वाच्या सागराकडे त्याचा ओघ चालू आहे. आणि या चळवळीला महायुद्धानंतर फारच जोराचा पुरस्कार मिळाला. सर्व जगभर शांतता प्रस्थापित व्हावी; त्यासाठीं सर्व राष्ट्रांनीं बंधुत्वानें वागून एके ठिकाणीं विचारविनिमय करावा; समतेचा पाया नसेल तर असला विचारविनियम होणेंच मुळांत अशक्य, यासाठीं सर्व लहानथोर, सबलदुर्बल राष्ट्रांचा दर्जा समान असावा; म्हणजेच सर्वांनीं स्वतंत्र, स्वयंशासित असावें; अर्थातच आजचीं साम्राज्यें फोडलीं गेलीं पाहिजेत; म्हणजे त्यांच्या निरनिराळ्या घटकांची व्यवस्थिति लाविली पाहिजे; आणि ती व्यवस्थिति लावण्यासाठीं म्हणून ‘ स्वयंनिर्णया ’ चें तत्त्व त्यांस लागू केलें पाहिजे इत्यादि गोष्टी क्रमप्राप्तच होत. या गोष्टीचा स्फुट अथवा अस्फुट निर्देश एकोणिसाव्या शतकापासूनच चालू आहे. परंतु विल्सन यांनीं या तत्त्वांना वाचा फोडून त्यांस व्यवहाराच्या चौकटींत बसविण्याचा प्रयत्न केला. आणि महायुद्धानें त्यांना जें अधिकाराचें स्थान मिळवून दिलें होतें, त्याच्या योगानें तो त्यांचा प्रयत्न पुष्कळसा यशस्वी झाला असें

म्हणण्यास हरकत नाहीं. या विल्सन यांच्या तत्त्वांना 'चौदा तत्त्वें' असें उल्लेखिण्यांत येऊं लागलें. परंतु हीं चौदा तत्त्वें म्हणजे 'स्वयंनिर्णय' या एका तत्त्वाचाच तपशीलवार परिवार आहे. त्यांतील सहा ते तेरापर्यंचीं सर्व कलमें यूरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांच्या नवीन व्यवस्थेसंबंधानें असल्यामुळें त्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. चौदाव्या तत्त्वांत 'राष्ट्रसंघा'ची बीजरूप कल्पना आहे. त्याचा विशेष विचार पुढील प्रकरणांत केलाच आहे. पहिलीं पांच कलमें अनुक्रमें खुले तह, खुला समुद्र, आर्थिक बंधनांचें उच्चाटण, युध्दोपयोगी तयारींत छाटाछाट आणि वसाहतींसंबंधीं फेरव्यवस्था यांबद्दल आहेत. या सर्व प्रश्नांचा विस्तारपूर्वक विचार राष्ट्रसंघाच्या प्रकरणांत करण्यांत येणार आहेच. या सर्वांच्या अंतर्गत जो एक सूक्ष्म प्रवाह चालू आहे तो म्हणजे 'स्वयंनिर्णय' या तत्त्वाचा होय. हें स्वयंनिर्णयाचें तत्त्व निरनिराळ्या स्वरूपांत, यापूर्वी निरनिराळ्या काळीं वेगवेगळ्या परिस्थितींत पुष्कळांनीं पुष्कळ वेळां पुढें मांडलें असेल, परंतु तेव्हां तें त्या त्या व्यक्तीच्या अगर राष्ट्राच्या हितसंपादनार्थ पुढें करण्यांत आलें होतें आता मात्र प्रथमच इतक्या स्पष्ट स्वरूपांत आणि केवळ तत्त्वासाठीं तत्त्व म्हणून विल्सन यांनीं तें पुढें मांडिलें आणि तें कोणाही एका राष्ट्राच्या वैयक्तिक स्वार्थासाठीं नसून सर्व जगभर शाश्वत शांतता नांदावी या उच्च हेतूनें प्रतिपादण्यांत आलें होतें आणि हाच विल्सन यांचा विशेष होय. राष्ट्रसंघाची कल्पनाही जुनीच, पण तिला थोडें जास्त व्यापक स्वरूप त्यांनीं दिलें हातें. एकप्रकारें साम्राज्यवादावर हा मोठा हल्ला होता. आणि म्हणूनच या सर्व बाबी तत्त्वतः सत्य व मान्य म्हणून सर्वांनीं माना तुकविल्या, परंतु व्यवहाराशीं गोष्टी आल्या तेव्हां ज्यांना ज्यांना म्हणून त्या नडूं लागल्या, त्यांनीं त्यांनीं येनकेन प्रकारेण मागता पाय घेऊन हीं सर्व तत्त्वें कागदाच्या कोठडींत अक्षरांच्या साखळदंडांनीं बांधून टाकलीं व त्यांस व्यवहारांत शिरूं दिलें नाहीं. परंतु केव्हां तरी या शृंखला तुटून जाऊन तीं आपलें खरें स्वरूप बाहेर कृतींत आणल्याशिवाय राहाणें अशक्य आहे. ह्या साखळ्यांतील कांहीं कांहीं दुवे आजच ढिलावूंही लागलेले दिसत आहेत, हें सुचिन्ह आहे.

येथेंच विल्सन यांच्या 'शांतता व युद्ध' या विषयींच्या मतांचें थोडेंसें दिग्दर्शन केलें असतां वावगें होणार नाहीं. विल्सन हे नितांत शांततावादी म्हणजे अनत्याचारवादी अगर अहिंसावादी नव्हतेच. तसे ते असते तर महायुद्धापासून ते हजारों मैल दूर होते ते तसेच राहिले असते. आणि कोणी त्यांस फारसा दोषही त्याबद्दल दिला नसता. परंतु त्यांचा भर शाश्वत शांततेवर होता. ते म्हणतात " शांतता म्हणजे निष्क्रियता नव्हे. स्वाभिमानशून्यता अगर स्वतत्त्वन्यास या गोष्टी शांततेस धरून नाहींत. शिवाय, राष्ट्रानें ज्यासाठीं झगडावें अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती स्वतत्त्वप्रतिष्ठा ही होय.

"राष्ट्राची अब्रू ही राष्ट्राच्या सुखस्वास्थ्यापेक्षां, राष्ट्राच्या शांततेपेक्षां इतकेंच काय, राष्ट्राच्या खुद्द अस्तित्वापेक्षांही जास्त प्रिय अशी चीज आहे. या जगांत जोंपर्यंत पापवृत्ति आणि पैशुन्य नांदत आहे, तोंपर्यंत मी केवळ शांतिपाठ गात बसणार नाहीं. ...जर कोणी कोठें निष्ठुर अन्यायाखालीं चिरडले जातांना मला आढळले आणि त्यांचा तो जाच पाशवी शक्तीच्या जोरावर जर मला बंद पाडतां येण्याजोगा असेल, तर त्या कामीं उद्युक्त होण्यांत मला मोठा अभिमानच वाटेल." स्वातंत्र्य प्राप्तीकरतां लढाई करणें अन्याय्य नाहीं असेंच त्यांचें मत दिसतें. कारण ते म्हणतात, " स्वातंत्र्य ही दैवी भावना असून जेव्हां कोणाला स्वतंत्र करण्यासाठीं शस्त्रें उचललीं जातात तेव्हां त्या युद्धप्रसंगांत कांहीं तरी पावित्र्य, कांहीं तरी दिव्यत्व असतें." शेळपटपणा हा अगदीं त्याज्य ! क्षात्रवृत्तीबद्दल त्यांचें मत असें आहे. " खांद्यावर बंदूक असलेल्या माणसाशीं ती बंदूक तुम्हांस तेथें न दिसती तर ज्या स्वरांत तुम्ही त्याच्याशीं बोलला असतां, त्यापेक्षां कांहीं निराळयाच स्वरांत बोलाल. विल्सन यांची स्वातंत्र्याची कल्पना थोडक्यांत अशी आहे. " मानवी स्वातंत्र्य म्हणजे विचारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, वसतिस्वातंत्र्य आणि वर्तनस्वातंत्र्य होय. आणि या स्वातंत्र्याचा जगभर फैलाव व्हावा म्हणून ते महायुद्धांत तरी पडले. त्यांचे उद्गार असे आहेत. " जर्मन लोकांशीं आपलें शत्रुत्व नाहीं. उलट त्यांचेविषयीं आमचे मनांत मित्रभाव आणि पूर्ण सहानुभूतिच वसत आहे. फक्त त्यांचें बेजबाबदार सरकार आमचे शत्रू आहे. ( म. गांधी तरी ब्रिटिशांविषयीं असेंच म्हणतात. ) या महायुद्धांत आम्ही हक्कांचे प्रतिष्ठापनेसाठींच पडत आहों. शांततेपेक्षांही हक्क जास्त प्यारे आहेत. अशा त्या हक्कांसाठीं, लोकशाहीसाठीं, जुलमाखालीं तडफडणाऱ्या व स्वयंशासनासाठीं धडपडणाऱ्या परतंत्र राष्ट्रांच्या विमोचनासाठीं, आणि सर्व जगास स्वतंत्रांचा प्रदेश बनविण्यासाठीं, व त्या योगानें समग्र राष्ट्रांस शांतता व सुरक्षितता प्राप्त करून देऊन अंतीं विश्व स्वतंत्र करण्यासाठींच आम्हीं या महायुद्धांत भाग घेत आहोंत" अशा तऱ्हेचे उद्गार त्यांच्या व्याख्यानांतून व विचार त्यांच्या लेखांतून सर्वत्र आढळून येतात.

आतांपर्यंतच्या विवेचनावरून विल्सन यांचें जीवितकार्य ( misson ) काय होतें याची कल्पना होण्याजोगी आहे, आणि तें पार पाडण्यासाठीं त्यांनीं आपल्या प्राणांची सुद्धां पर्वा न ठेवतां, लाभालाभ, जयाजय व निंदास्तुति याविषयीं तुल्यदृष्टि ठेवून अविश्रांत श्रम केले. त्यांच्या चरित्रग्रंथांतील कोणतेंही पान उघडून कोठेंही बोट टेका, तेथें आपणांस तीच गोष्ट आढळून येईल. आणि म्हणूनच त्यांच्या व्याख्यानसंग्रहाला ' नवस्वातंत्र्य ' ( New freedom ) असें नांव मिळालें असून त्यांना ' नवस्वातंत्र्याचा प्रणेता ' ' शांततेचा शाहीर ' आणि ' लोकशाहीचा निष्ठावंत पुरस्कर्ता ' इत्यादि संबोधनें देण्यांत येतात.

अध्यक्ष विल्सन यांचें निधन नुकतेंच झालें असल्यामुळें त्यांच्या-विषयीं कित्येक गोष्टी अद्याप गुलदस्तांतच आहेत. आणि त्या उजेडांत यावयास अजूनही पुष्कळ काळ गेला पाहिजे. त्यांचें चरित्र ताजें ताजें असल्या-मुळें त्यांत एक प्रकारचा जीवंत परंतु उग्र दर्प आहे. तो दर्प कालाच्या शेकटींत तें तापून निघाल्यानंतर कांहीं साय व कांहीं खरवड या स्वरूपांत अनुक्रमें वर व खालीं बसल्यावर मधलें निर्भेळ दूध मिळूं शकेल. आजच विल्सन यांच्या चरित्राकडे निर्भीड निःपक्षपातीपणें पाहाणें बरेंचसें अशक्य आहे. पुढील काळां-तही म्हणजे अगदीं दोषैक अगर गुणैक दृष्टि असणारे लोक असणारच नाहींत असें नाहीं. कारण दुधाचा दृष्टांतच पुढें चालवावयाचा तर असें दिसून येतें कीं, नुसती साय अगर नुसती खरवडच आवडणारे कांहीं लोक असतातच ! परंतु इतकी गोष्ट खरी कीं, विल्सन यांच्या चारित्राचा प्रकाश आज सर्वांच्या डोळ्यांत जो भरला आहे तो कालांतरानें ओसरून सर्वांचे डोळे निवळल्यावर मगच त्यांच्या चरित्राचें खरें परीक्षण होणार आहे व त्यांच्या कार्याचें महत्त्व व त्याची सिद्धि इत्यादि बाबींची यथार्थ छाननी होणार आहे. तेव्हां त्यांच्या चरित्रक्रमाचें खरें रहस्य मिळण्यास अजून कालावधि आहे; इतकेंच नव्हे तर त्यांच्या तोडीचाच दुसरा कोणी मनुष्य निर्माण झाल्याशिवाय तें घडून येणेंही शक्य नाहीं !

परंतु आजमितीस त्यांच्या कार्याविषयीं कोणाचाही कसाही मतभेद असला, तरी विसाव्या शतकाच्या प्रथम पादांतील जगाच्या इतिहासांत त्यांचें स्थान अत्यंत उच्च आहे इतकी गोष्ट तरी खास निर्विवाद आहे. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं ‘ जगाचा इतिहास म्हणजे थोर पुरुषांचीं चरित्रें ’ ( History of the world is the biography of its great men) या न्यायानें पाहिलें तर गेल्या पंचवीस वर्षांचा जगाचा इतिहास म्हणजे निरनिराळ्या पांच सहा थोर विभूतींचा चारित्रसमुच्चय होय. या व्यक्तींपैकीं कांहीं कालाधीन झाल्या असून कांहीं जिवंत असल्या तरी त्यांचा चरित्रक्रम संपला आहे; आणि कांहींचा आयुः-क्रम अजून जगावर परिणाम करणार आहे. कालाधीन झालेल्या व्यक्तींपैकींच ‘ बुड्रो विल्सन ’ हे एक आहेत.

कोणाही व्यक्तीचें चारित्र्य दुभंगलेलें असतें. खाजगी चारित्र्याचा सार्वजनिक चारित्र्यावर कितीही परिणाम होत असला, इतकेंच नव्हे तर त्यावरच जरी सार्वजनिक चारित्र्याची इमारत उभी असली, तरी राष्ट्र-समूह-जगाचा इतिहास हा त्यांच्या सार्वजनिक चरित्रांतच प्रत्यक्षपणें प्रतिबिंबित झा-लेला असतो. खासगी चारित्र्य एकट्या व्यक्तीचें असूं शकेल. परंतु सार्वज-निक चरित्र एकाकी व्यक्तीकडून रचिलें जात नाहीं, तर त्याला ती व्यक्ति ज्या-वर अधिष्ठित झालेली असेल, त्या आसनाची योग्यता, तत्कालीन सभोंवारच्या प-रिस्थितीचें स्वरूप वगैरे इतर उपकरणीभूत गोष्टी अपेक्षित असतात. एकटी व्यक्ति

आपल्या असामान्य बुद्धिमत्तेच्या जोरावर कांहीं कल्पना, योजना व विचारणा करूं शकेल, परंतु त्यांना मूर्तस्वरूप देण्याचें कामीं ती अशक्त आहे; म्हणून तिला मदतगार साधनांची अवश्यकता असते. या दृष्टीनें पाहतां विल्सन हे अमेरिकेचे अध्यक्ष होते, त्याच वेळीं जगड्व्याळ महायुद्ध सुरू झालें या नेमानेमानें ते जगाच्या पुढें आले व त्यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली. महायुद्ध संपल्यावर एक दोन वर्षें सर्व जगाचे डोळे एका व्यक्तीकडे लागले होते व ती व्यक्ति प्रे.विल्सन हे होत. यासाठीं इतक्यापुरतें तरी विल्सन यांचें चरित्र अत्यंत महत्त्वाचें आहे. आतां विल्सन यांचें स्थान त्या कालांतील थोर व्यक्तींत किती उच्च आहे हा अलाहिदा प्रश्न आहे.

जगांत शाश्वत शांतता राखण्याकरितां विल्सन हे महायुद्धाच्या कटकटींत पडले, आणि शेवटीं मायावी जगास आपलीं तत्त्वें पटेनात हें पाहून त्यांना धक्का बसला, आणि त्याचमुळें शेवटीं त्यांचा अंत झाला. शांततेकरितां अक्षरशः देह झिजवूनही यशःसिद्धि न मिळाल्यानें कष्टी झालेल्या त्या आत्म्याला केव्हां तरी आपलीं तत्त्वें विजयी होऊन जगभर शांतता नांदलेली दिसेलच ! आणि तेव्हांच तो शांत होईल. अशा या शांततेच्या चरित्राचें पठण व मनन करणें बोधप्रद व पुण्यप्रदही आहे यात शंका नाहीं. तें चरित्र आतांपर्यंत आपण पाहिलेंच.

परंतु कोणत्याहि शतकांतील सर्वांत मोठा मनुष्य कोण याचा निर्णय करणें कठीण काम आहे. एका मोठ्या मनुष्याची दुसऱ्या एकाशीं तुलना करणें सोपें नाहीं. अशी तुलना करण्याच्या प्रयत्नांत निरनिराळ्या लोकांच्या वावदूक बलाबलाची परीक्षा होण्यापलीकडे त्यांतून कांहीं निश्चितार्थ उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण तुलना करण्यास जें समानाधिकरण्य लागतें, तें मनुष्याचें एकंदर कार्यक्षेत्र व्यापक असून त्यांत प्रत्येकाच्या कर्तबगारीची दिशा वेगवेगळी असल्यानें मिळूं शकत नाहीं ही एक मोठी अडचण आहे. कोणाची कर्तबगारी वाङ्मयांत दिसून येईल, तर एखादा दुसरा रणांगणावर चमकेल, तिसरा नानाफडणवीसाप्रमाणें बुद्धिसागर मुत्सद्दी असेल तर कोणाएकाचा प्रभाव शास्त्रविषयांत दिसून येईल. असें जरी आहे, तरी मानवी बुद्धिमत्तेचा परमोत्कर्ष ज्या कांहीं गोष्टींवरून आपणांस ठरवितां येईल अशा थोड्या सर्वसाधारण बाबी आहेतच. व त्यांची विवेचक बुद्धीनें चिकित्सा केली असतां त्या कमजास्त प्रमाणांत लागू अगर गैरलागू असल्याचें आपणांस ठरवितां येणें शक्य आहे. व त्यावरून कोणा तरी एकास तारतम्यानें श्रेष्ठपद देणें आपणांस शक्य आहे. कोणत्याही एका विवक्षित कालमर्यादेंतील इतिहासाला कलाटणी देऊन आपल्या कर्तबगारीनें कांहीं तरी निराळेंच अनपेक्षित वळण लावणारा तो लोकोत्तर पुरुष ! त्या विवक्षित इतिहासविभागाची मर्यादा, त्या वेळच्या प्रचलित प्रश्नांची किंमत, आणि कार्यसिद्धीचें

चिरस्थायित्व या गोष्टींचा विचार केला असतां त्या त्या पुरुषाच्या श्रेष्ठतेची पायरी ठरविण्याचें गमक आपणांस मिळूं शकतें. या तीनही परिस्थिति ज्याच्या बाबतींत त्याच्या कालच्या इतर कोणाहीपेक्षां उच्च दिसून येतील त्याला त्याच्या कालांतील मोठ्या मनुष्य म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

प्रे. विल्सन यांचें चरित्र जगाच्या इतिहासाशीं समरस झाल्याचा काल जरी बराचसा अल्पमर्यादित असला, तरी त्या कालमर्यादेंत जग त्या एका वणव्यांत होतें, त्यामुळें त्या कालमर्यादेला जगाच्या इतिहासांत अतिशय महत्त्व प्राप्त झालें आहे. या कालांत सर्व जगभर शांतता कशी राखतां येईल हा सोडविण्यांत अत्यंत बिकट प्रश्न उभा राहिला होता. व तो सोडविण्याचा डाव विल्सन यांचेवर येऊन पडला होता. त्यांनींहीं शांतता जेणें करून नांदूं शकेल असा कार्यक्रम तयार केला. परंतु तो ध्येयवाद होता. तो सोळा आणे प्रत्यक्ष कृतींत उतरला जाणें मानवी स्वभावाच्या निखालस विरुद्ध होतें असें नाहीं. तरी पण चोराच्या तांड्यांत सांपडलेल्या संन्याशाचा वेदांत जसा निष्फल होतो, त्याप्रमाणें विल्सन यांच्या कार्यक्रमाची स्थिति झाली. त्यांच्या साधुत्वाचा फायदा घेऊन अनेक भोंदूंनीं त्यांस बोलतां बोलतां फसविलें. त्यांच्या शब्दाला तोंडानें हो हो करून हातांनीं कृति विपरीत करावयाची असा क्रम त्यांनीं आरंभिला होता. आणि विल्सन यांच्या अंगीं ठकास महाठक बनण्याची कला नसल्यानें बिचारा फशीं पडला! शिवाय, त्यांचीं स्वदेबांधवांविषयीं असलेली कल्पनाही आमूलाग्र मिथ्या ठरून त्यांचा विश्वासघात झाला. प्रत्येक गुलाबाभोंवतीं जसे कांटे असतात, त्याप्रमाणें प्रत्येक थोर मनुष्यास शत्रु असतातच. किंबहुना इमरसन म्हणतो. ‘ युद्धाशिवाय शिपाई नाहीं, व शत्रूंशिवाय नेता नाहीं. ’ जॉर्ज हार्वे सारख्या त्यांच्या राजकीय शत्रूंनीं अमेरिकन लोकांस फितविलें व त्यांचा व त्यांच्या राष्ट्रसंघादि उत्तमोत्तम तत्त्वांचा त्या परप्रत्ययनेयबुद्धि मूढांनीं अव्हेर केला! अशी सर्व बाजूंनीं प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळेंच विल्सन यांचे उद्देश तडीस गेले नाहींत व त्यांचीं तत्त्वें धुळचारा खात पडल्याप्रमाणें झालीं. परंतु त्याचा दोष त्यांच्याकडे अगर त्यांच्या विचारसरणीकडे जात नसून त्यांना मिळालेल्या उपकरणसामुग्रीकडेच जातो. ‘ मुद्राराक्षसां ’ त राक्षसान म्हटलें आहे.

द्रव्यं जिगीषुमधिगम्य जडात्मनोऽपि । नेतुर्यशस्विनि पदे नियतं प्रतिष्ठा ।
अद्रव्यमेत्य भुवि शुद्धनयोऽपि मंत्री । शीर्णाश्रयः पतति कूलजवृक्षवृत्त्या ॥

अशा रीतीनें विल्सन यांचा शेवटीं जरी पाडाव झालासें दिसलें तरी त्यांचीं तत्त्वें जीं एकदां उत्पन्न झालीं तीं तशींच जीव धरून आहेत व यापुढेंही तीं राहणारच ! त्यांचे प्रणेते नाहींसे होतात. विरोधकर्ते विनाश पावतात, परंतु तत्त्वें कधीं मरत नाहींत ! विल्सन यांचीं तत्त्वेंही आतां जगाला पटूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

' मेल्या म्हशीला वीस शेर दूध ' या न्यायानें सामान्य जनतेस विल्सनसारख्या महात्म्यांची खरी किंमत त्यांच्या मरणानंतर कळूं लागते! जिवंत असतां ज्याशीं सतत शत्रुत्व केलें तो निवर्तल्याबरोबर अमेरिकन ( सीनेट ) वरिष्ठ कायदेमंडळानें आपल्या सहानुभूतीचा ओघ विल्सनकडे वळविला. ज्या अमेरिकन जनतेनें त्यांना वेडे ठरवून धिक्कारलें, तिच्याच नेत्रांतून विल्सन यांच्या मृत्यूच्या बातमीनें शोकाश्रु वाहविले धुगधुगी बाळगून असलेल्या त्यांच्या सत्तत्त्वांना या सहानुभूतिपर ओलाव्यानें पुन्हां जोमानें अंकूर फुटणार नसतील कशावरून ?

जगांत शाश्वत शांतता राखण्याकरितां विल्सन हे महायुद्धाच्या कटकटींत पडले, आणि शेवटीं मायावी जगास आपलीं तत्त्वें पटेनात हें पाहून त्यांना धक्का बसला, आणि त्याचमुळें शेवटीं त्यांचा अंत झाला. शांततेकरितां अक्षरश: देह झिजवूनही यश:सिद्धि न मिळाल्यानें कष्टी झालेल्या त्या आत्म्याला केव्हां तरी आपली तत्त्वें विजयी होऊन जगभर शांतता नांदलेली दिसेलच ! आणि तेव्हांच तो शांत होईल. अशा या शांततेच्या शाहिराच्या चरित्राचें पठण व मनन करणें, बोधप्रद व पुण्यप्रदही आहे यांत शंका नाहीं. आणि तें चरित्र आतांपर्यंत आपण पाहिलेंच.

आपल्या एका व्याख्यानांत विल्सन यांनींच पांच प्रश्न उपस्थित केले होते. त्या प्रश्नांतच विल्सन यांच्या जीवितकार्याचें सारसर्वस्व एकवटलेलें आहे आणि तें कायमचें सोडविण्यासाठीं म्हणूनच ' राष्ट्रसंघा ' ची प्राणप्रतिष्ठा त्यांनीं केली होती. ते प्रश्न अजूनही जशाचे तसे बिनसुटलेले असेच राहिले आणि ते कधीं सुटणार हें आजच्या दृष्टीला दिसतही नाहीं. तेव्हां त्या न सुटलेल्या प्रश्नांची यादी देऊन त्यांच्या प्रश्नचिन्हांशींच निरुत्तर झालेल्या लेखणीला या चरित्रलेखनापुरता विराम देणार आहे. ते प्रश्न असे:—

( I ) Shall the military power of any nation, or group of nations, be suffered to determine the fortunes of peoples over whom they have no right to rule except the right of force?

( 2 ) Shall strong nations be free to wrong weak nations and make them subject to their purposes and interest ?

( 3 ) Shall peoples be ruled and dominated, even in their own internal affairs, by arbitrary and irresponsible force, or by their own will and choice ?

( 4 ) Shall there be a common standard of right and privilege for all peoples and nations, or shall the strong do as they will, and the weak suffer without redress !

( 5 ) Shall the assertion of right be haphazard and by

casual alliance, or shall there be a common concert to oblige the observance of common rights?

वरील प्रश्नांचा तर्जुमा मराठी वाचकांचे सोयीसाठीं पुढें दिला आहे.

( १ ) कोणत्याही राष्ट्राच्या अगर राष्ट्रसमूहाच्या लष्करी सत्तेनें उठावें आणि ज्यांच्यावर सुलतानशाही गाजविण्यास पाशवी शक्तीच्या जोराशिवाय दुसरा कोणत्याही प्रकारचा हक्क त्यास नाहीं, अशा लोकांच्या नशीबाचा निर्णय करावा ही स्थिति अशचि यापुढें चालू द्यावयाची काय ?

( २ ) प्रबळ राष्ट्रांनीं दुर्बळ राष्ट्रांचा जुलमानें आपले उद्देश व स्वार्थ तडीस नेण्याचे कामीं उपयोग करण्याची त्यांस मोकळीक आहे काय ?

( ३ ) लोकांचें शासन त्यांच्या स्वतःच्या आवडीनिवडीप्रमाणें होणार कीं त्यांच्या अंतःस्थ कारभारांतसुद्धां बेलगामी व बेजबाबदार पाशवी शक्तीचा धिंगाणा चालूं राहाणार?

( ४ ) सर्व लोक व राष्ट्रें यांना हक्क व अधिकार यांचें एक सर्वसामान्य असें कांहीं प्रमाण असावें कीं, आपलें ' बळी तो कान पिळी आणि दुबळा सहन करी ' असाच प्रकार चालूं राहावा ?

( ५ ) आणि हक्कांचें प्रतिपादन हें असेंच मोघम आणि तात्कालिक तह-नाम्यांनीं चालावयाचें अगर सर्वसामान्य हक्कांचें पालन लादणारी एकादी सर्व-संमत संस्था असावी ?

---

# प्रकरण ११ वें.

## ' राष्ट्रसंघ '

Till the wardrum throbbed no longer, and the battle flags were furl'd.
In the Parliament of men of Freedom of the world.
There the common sense of most shall hold a fretful realm in awe.
And the kindly earth shall slumber, lapt in Universal Law.

Tennyson ' Locksley Hall '

जेथें जित नाहींत व जेतेही नाहींत, प्रत्येक मनुष्यसमूहास आपली प्रगति करून घेण्याची जेथें पूर्ण मोकळीक आहे; आणि युद्धाला रजा मिळून जेथें सर्व

जगांतील लोकांमध्यें अप्रतिहत दळणवळण व कायदेशीर स्पर्धा हींच तत्त्वें जिवंत राहातील, अशा नवीन मनूच्या प्रस्थापनेस प्रस्तुत ' राष्ट्रसंघ ' कारण होईल अशी अपेक्षा आहे. —ज्ञानकोश, प्रस्तावना खंड, हिंदुस्थान व जग.

शांतता ही जगाची नित्यप्रकृति असून तींत केव्हां केव्हां जेव्हां विकृति होते तेव्हां त्या स्थितीला आपण अशांतता अगर धामधूम असें म्हणतों. व्यक्ती-व्यक्तींमधील व्यवहार जसे नेहमींच सुरळीतपणें चालूं शकत नाहींत तसेंच राष्ट्रा-राष्ट्रांतील व्यवहारही केव्हां केव्हां धकाधकीचे होतात, व त्याला आपण ' युद्ध ' असें म्हणतों. लढा तोडण्याचे सामदामादि जे चार मार्ग आहेत त्यांतील तिसरा जो दंड त्या उपायामध्यें युद्धाचा अंतर्भाव चाणक्यांनीं केलेला आहे. अर्थात् युद्ध हें निरंतर टिकणारें नव्हे. ज्यासाठीं तो उपाय योजला जातो, तें कारण नष्ट होतांच युद्ध संपलें ! ज्याप्रमाणें हवेच्या खेळानें पाण्यांत बुडबुडा तयार होतो, परंतु शेवटीं पुन्हां त्याचें पाण्यांतच पर्यवसान होतें, त्याप्रमाणें शांततेच्या सागरांत अंतीं त्यांतच विलीन होणारे हे अनित्य युद्धबुद्बुद केव्हां केव्हां उत्पन्न होतात; आणि आपापल्या मगदुराप्रमाणें व त्यांच्या उत्पत्तिकरणांच्या कमीअधिक महत्त्वाच्या मानानें तेही आपलें स्वरूप कमजास्त भेसूर धारण करतात, आणि दीर्घ अगर लघु काळ टिकतात. एवंच वारंवार युद्धें होत असलेलीं आपणांस दिसत असलीं, तरी तीच प्रकृति नसून शांतता हीच विश्वाची प्रकृति आहे.

विश्वाच्या या प्रकृतींत बिघाड एकसारखा होऊं नये, इतकेंच काय, तसा तो कधींही होण्याचें शक्य तों टाळतां यावें, अशाबद्दल आजपर्यंत कैक जणांनीं कैक वेळां प्रयत्न केल्याचें इतिहासांतरीं आढळून येतें. कोणत्याही गोष्टीची खरी किंमत तिच्या विपरीत परिस्थिति घडून आल्यावरच कळत असतें. काळ्या पार्श्वभूमिकेवरच पांढरें चित्र खुलून दिसतें; अगर दुःखाच्या अनुभवानेंच सुखाची शोभा वाढते, या न्यायानें युद्धाची आपत्ति कोसळल्यावरच शांततेची महती कळते ! व तिची अत्यंत जरूरही तेव्हांच असते. विल्सन म्हणतात: परिस्थिति उत्तरोत्तर भयंकर होऊन आवाक्याबाहेर जाऊं लागली म्हणजेच शांततेची पिपासाही प्रबल होते.

गेल्या महायुद्धानें अशांततेचा इतका उत्तान ताण बसला कीं त्या महायुद्धानंतर जिकडे तिकडे शांतिपाठाचा घोष सुरू झाला. आणि इतकें शांतिगान चालूं असून सुद्धां जगाच्या शांततेला स्थितिस्थापकता अद्याप आली नाहीं. बुडत्या माणसाच्या धडपडीप्रमाणें या अशांततेच्या घनांधकारांत दीपदर्शन व्हावें यासाठीं अनेकजण चाचपडत होते, त्यांतच अमेरिकेचे माजी अध्यक्ष विल्सन हे होते आणि त्या त्यांच्या धडपडीचें दृश्यफल म्हणजेच महायुद्धाच्या अग्निकुंडांतून निघालेलें पायस-दान, अगर महायुद्धरूपी समुद्रमंथनांतून निघालेल्या चतुर्दश तत्त्वरत्नांपैकीं एक म्हणजेच ' राष्ट्रसंघ ' होय.

कोणत्याही चांगल्या गोष्टीचें श्रेय आपणांकडे ओढण्याची एक साहजिक प्रवृत्ति माणसांत असते आणि तिला अनुसरून कोणतीही एखादी चांगली संस्था निघाली कीं प्रत्येकजण तिचा उगम आपल्यायेथें आहे असें दाखवूं लागतो. तीच गोष्ट या राष्ट्रसंघाची आहे. प्रत्येक राष्ट्रास त्याचा उगम आपलेकडे आहे असें प्रतिपादन करण्याचा मोह पडतो; परंतु या राष्ट्रसंघाच्या जनकत्वाचा मान निर्विवादपणें अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांच्याकडेच जातो. आणि या संस्थेचा मूळ उगमही अमेरिकेंतच सांपडतो. आणि तो मागें एका प्रकरणांत उल्लेखिलेल्या ' शांतता-प्रस्थापक-विश्वसंघ ' यामध्यें होय. १९१८ च्या जानेवारीच्या आठ तारखेस विल्सन यांनीं अमेरिकन काँग्रेसला पाठविलेल्या संदेशांत चौदा तत्त्वांचा उच्चार केला. त्यांतील चौदावें तत्त्व म्हणजेच या राष्ट्रसंघाच्या कल्पनेचा 'मूळ धागादोरा' होय. तें तत्त्व असें आहे.—

" लहान आणि मोठ्या सरसहा सर्व राष्ट्रांच्या राजकीय आणि प्रादेशिक स्वातंत्र्याच्या रक्षणाची परस्परांनीं हमी देण्यासाठीं कांहीं ठराविक करारमदार होऊन एक राष्ट्रांचा सर्व साधारण संघ स्थापण्यांत यावा. "

याच कल्पनेचा विस्तारपूर्वक विचार न्यूयॉर्क येथील आपल्या भाषणांत ता. २७ सप्टेंबर १९१८ रोजीं विल्सन यांनीं केला. महायुद्ध संपल्यानंतर तह-परिषदेच्या वेळीं कोणते प्रश्न सोडविण्याची जबाबदारी विजयी राष्ट्रांच्या मुत्सद्यांवर होती याचें त्यांनीं विवेचन केलें ते प्रश्न मागील प्रकरणाचे शेवटीं दिलेच आहेत. त्या सर्व प्रश्नांचा उद्देश एकच होता आणि तो यापुढें शाश्वतविश्वशांतता नांदेल अशा प्रकारचा तहनामा तयार करणें हा होय, आणि हा तहनामा योग्य प्रकारें पाळला जावा यासाठीं एक मध्यवर्ती अधिकारी संस्था निर्माण करण्याची अत्यंत जरूरी आहे आणि ती संस्था विश्वशांतता राखण्यास उपयुक्त होईल अशाच प्रकारचा करारनामा तयार होऊन त्याचा अंतर्भाव मुख्यतः तहाच्या वाटाघाटींत झाला पाहिजे; असें विल्सन म्हणाले. या राष्ट्रसंघाबद्दल स्वतःच्या म्हणून पांच सूचना त्या वेळीं विल्सन यांनीं केल्या. त्या अशा होत्या.

( १ ) न्याय देतांना प्रियाप्रिय असा पक्षपात न करतां सर्व राष्ट्रांचे हक्क समान आहेत हें तत्त्व अमलांत आलें पाहिजे. ( २ ) सार्वत्रिक हितासंबंधास विसंगत आणि कोणत्याही एक अगर अनेक राष्ट्रांच्या विशेष अगर वैयक्तिक हिताच्या पायावर कोणतीही वाटाघाट होतां कामा नये. ( ३ ) राष्ट्रसंघाच्या सामान्य गोतावळ्यांत इतर कोणत्याही प्रकारचा संघ व मैत्री, करार अगर तह यांना जागा नाहीं. ( ४ ) विशेषतः संघामध्यें स्वार्थपुरस्सर कोणत्याही प्रकारचीं आर्थिक जुगें बनतां कामा नयेत आणि बहिष्कार घालण्याचा अधिकार राष्ट्रसंघाकडे शिस्त व हुकमत यासाठीं सोंपविण्यांत यावा. ( ५ ) सर्व प्रकारचे आंतरराष्ट्रीय समेट व तह खुलेपणें जगास विदित केले गेले पाहिजेत.

पुढें राष्ट्रसंघ स्थापन झाला, तेव्हां त्याच्या करारनाम्यांतील सरनामा असा होता. "आंतरराष्ट्रीय सहकारितेचा पुरस्कार करण्यासाठीं आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे सिद्धीसाठीं या करारनाम्यावर सर्व राष्ट्रें सह्या करीत आहेत." म्हणजे राष्ट्रसंघ या संस्थेचा जन्म विश्वशांततेच्या प्रस्थापनेसाठींच झाला ही कल्पना अगदीं अव्वलपासून अखेरपर्यंत कायम आहे. राष्ट्रांतील सहकार्य वाढविण्याची जरूर तरी त्याचसाठीं आहे. कारण, राष्ट्राराष्ट्रांतील सहकारिता नष्ट होऊन जेव्हां त्यांचेमध्यें अत्याचारी असहकारिता सुरू होते, तेव्हांच विश्वशांततेचा लोप होऊन सुरक्षितता डळमळीत होते. तेव्हां 'शांतता राखण्यासाठीं' असें म्हणणें काय अगर 'युद्धें टाळण्यासाठीं' राष्ट्रसंघ निर्माण झाला असें म्हणणें काय दोन्हीही सारखेंच.

दोन राष्ट्रांत तंटा उत्पन्न होऊन तो सामोपचारानें मिटणें जेव्हां अशक्य होतें तेव्हां युद्ध उद्भवतें. त्या दोघांचे हितसंबंध एकमेकांचे आड येतात तेव्हां अगर त्यापैकीं एक अन्यायानें दुसऱ्याच्या हक्काची पायमल्ली करूं लागतें तेव्हां तंटा सुरू होतो. ज्या वेळीं अंगांत फाजील रग वाढून बाहू फुरफुरू लागतात तेव्हां कंडूशमनार्थ कोठें तरी धडक मारावी याही उद्देशानें एखादें राष्ट्र आपल्या शेजाऱ्यावर चढाई करून जातें आणि युद्ध सुरू होतें. तेव्हां युद्ध टाळावयाचें असेल तर दोन राष्ट्रांत तंटाबखेडा होणारच नाहीं अशी व्यवस्था करणें प्रथम भाग आहे. त्यांतून तंटा झालाच तर तो सामोपचारानें मिटवून विकोपास न जाऊं देण्यासाठीं शिष्टाई करणें, आणि हक्कांची पायमल्ली होत असतां न्याय देऊन तो अतिक्रमण करणारावर लादणें आणि विनाकारण झोंबाझोंबी करण्यास उद्युक्त होण्याइतकी रगच कोणाच्या अंगांत माजूं नये यासाठीं त्यांचें मीठ तोडून त्यांस समधात ठेवण्याची व्यवस्था करणें अगर ती रग पूर्ण जिरेल अशा प्रकारची प्रतिकारी शक्ति तयार करणें इत्यादि गोष्टी शांतता रक्षणासाठीं अवतीर्ण झालेल्या राष्ट्रसंघावर क्रमप्राप्तच येऊन पडतात.

दोन व्यक्तींमधील तंटा मिटविण्याचे मार्ग पूर्वीपासून चार आहेत असें मानण्यांत आलें असलें, तरी त्यांची नीट छाननी केल्यास ते दोनच आहेत असें आढळून येईल. आणि ते शिष्टाई व चढाई हे होत. शिष्टाईमध्यें भांडणाऱ्या पक्षांनींच आपसांत तडजोड करणें; अगर त्यांचेपेक्षां जास्त बलवानानें शह देऊन त्यांचें भांडण तोडणें; अथवा त्यांनींच त्रयस्थ व्यक्तीस आपल्या तर्फे पंच नेमून त्याचा निर्णय मान्य करणें इत्यादि गोष्टींचा समावेश होतो आणि याखेरीज दुसरा उरलेला मार्ग म्हणजे चढाईचा अगर युद्धाचा. प्राचीन काळीं व्यक्तीव्यक्तींमधील भांडणांचा निकाल द्वंद्वयुद्धानें लागतही असे. याचीं प्रत्यंतरें पाश्चात्य देशांत तर अजूनही आढळून येतात आणि आपल्याकडे महाभारतांतील किरातार्जुनीय आणि रामायणांतील वालीसुग्रीव यांच्यासारख्या युद्धप्रसंगावरून त्याची साक्ष पटते आणि अद्यापही आडदांड व युद्धलोलुप जातींतून त्याचा अवशेष दृष्टोपत्तीस येतो परंतु राजसंस्थेच्या उत्तरोत्तर होत जाणाऱ्या निश्चित प्रतिष्ठापनेबरोबर आणि तिच्या वाढत्या

अधिकारव्याप्तीबरोबर व्यक्तीव्यक्तींमधील तंटे अशा द्वंद्वयुद्धानें तोडण्याचें मागें पडून त्या ठिकाणीं कायदा कांहीं संस्थांच्यामार्फत तें काम करूं लागला. द्वंद्वयुद्धानें तंटा तोडण्यापासून वरवर पाहिलें असतां तोटे दिसतात ते असे: 'सत्यमेव जयते नानृतम्-हें सुभाषित तत्त्वतः खरें असलें तरी व्यवहारांत आणि जेथें केवळ शारीरिक बलाबलाचाच संबंध आहे, तेथें त्याचा कितीसा पडताळा दिसून येईल ? दोन व्यक्तींत चाललेल्या युद्धांत सत्पक्ष जर असत्पक्षापेक्षां दुबळ असल तर त्याचा काय निर्णय लागतो हें वालीसुग्रीव यांच्यांत झालेल्या अनेक झगड्यांत सुग्रीव पराभूत होत होता यावरून ठरवावा. एकच म्हणतां येईल कीं, सत्पक्षाला पाठिंबा देणारे लोक जास्त मिळतात आणि अंतीं तो विजयी होतो. परंतु, म्हणजे शेवटीं जो निर्णय लागावयाचा तो कोणाचे हक्क किती न्याय्य होते अगर कोणाचा पक्ष सत्याचा होता, यावरच तो न लागतां बलाधिक्यावर अगर 'चान्स' म्हणजे 'संभवा' वरच लागतो, आणि म्हणूनच तो अन्यायाचा निर्णय होण्याचा फार संभव असतो.

शिवाय अशा प्रकारें निर्णय लागला तरी त्या दोन व्यक्तींतील चुरस कमी होण्याऐवजीं द्वेषभाव वाढतच जातो आणि पराभूत झालेली व्यक्ति सूडाच्या लालसेनें प्रेरित होऊन दंड बैठका मारून आपलें सामर्थ्य वाढविण्याच्या तयारीस लागते आणि या युद्धप्रसंगानेंच तंटा न संपतां दुसऱ्या एका जास्त भयंकर अशा युद्धप्रसंगाची पूर्ण सिद्धता होते. म्हणूनच सुधारणेच्या वृद्धीबरोबर मनुष्यांतील युद्धलोलुपता कानशून तर निघालीच; परंतु केवळ बाहुबलावर तंटे तोडण्याची प्रकृतिही नष्ट होत गेली व तंटे तोडण्याची 'कायदेसभा' 'पंचायती' आणि 'लवादें' निर्माण झालीं.

ही व्यक्तीव्यक्तींमधील परिस्थिति व्यक्तींनींच बनलेल्या राष्ट्रांना सुद्धां तंतोतंत लागू पडते. आजपर्यंत आणि अजूनही त्यांचेमधील तंटे मुख्यतः या बाहुबलानेंच तुटले जातात आणि ते निर्णय क्षणिक असल्यानें त्याच त्याच कारणासाठीं अनेक वेळां युद्धांच्या पुनः पुनरावृत्ति होत आल्या, याला उदाहरण—पूर्वी इंग्लंड व फ्रान्स यांमधील तंट्याचें व अलीकडील जर्मनी व फ्रान्स यांतील वैराचें देतां येईल. सूडाचा सूड, त्याचा पुन्हां सूड याप्रकारें हें वैर नागमोडीप्रमाणें एकदां हा देश तर दुसऱ्यांदा दुसरा देश याप्रमाणें स्पर्श करीत त्या त्या वेळीं त्या त्या देशाला उठावणी देऊन क्रियेची प्रतिक्रिया करवून एकसारखे युद्धप्रसंग घडवीत असतें. आणि दर एक पुढील युद्ध मागच्यास बरें म्हणवील अशा भयंकर रक्तपाताचें आणि वाढत्या अनर्थपाताचें होत असतें. गेलें महायुद्ध तत्पूर्वी झालेल्या एकंदर सर्व युद्धांच्या एकूण बेरजेपेक्षांही जास्त खर्चाचें, जास्त मनुष्यहानीचें आणि जास्त किळसवाणें असें झालें, आणि व्यवस्था लावण्याचें बाजूस राहून अनवस्था मात्र जगभर माजली. असा एकही देश नाहीं कीं, ज्याला महायुद्धाचे दुष्परिणाम भोंवले नाहींत. आणि अजूनही ते सर्वांस भोंवत आहेत. सर्व जगानें मिळून एकंदर पांच हजार कोटी पौंड म्हणजे पाऊण लक्ष कोटी रुपये पाण्यांत ओतावे, तसे

महायुद्धांत ओतले. याशिवाय निरनिराळ्या स्वरूपांत झालेला द्रव्यनाश आणि बसलेला व्यापार, वाढलेली बेकारी, इत्यादींमुळें नित्य होत असलेला संपत्तीचा विध्वंस निराळाच ! जवळ जवळ एक कोटी जीव कीड्यामुंग्यांप्रमाणें प्रत्यक्ष रणांगणावर चिरडले गेले. याशिवाय जन्माचे अधू झालेले आणि दुष्काळ व रोगाच्या सांथी वगैरेनीं झालेली प्राणहानि यांत जमा नाहींच ! आणि इतका संहार होऊनही युद्धपरंपरा चालूंच राहिली. मुख्य सम्राटाच्या स्वारीनंतर ज्याप्रमाणें त्याचा लवाजमा मागाहून बराच वेळ चालत असतो त्याप्रमाणें या महायुद्धानंतर ग्रीस व तुर्कस्थान यांत युद्ध सुरू झालेंच; रशिया व हंगेरी देशांत यादवी झाली; आणि अशाच बारीक सारीक चकमकी अनेक झाल्या; सारांश, व्यक्तीव्यक्तींमधील भांडणें मनगटाच्या जोरावर थांबत नाहींत तर त्यासाठीं कायद्यांचीं कोर्टें लागतात हें जसें सुधारणेनें शिकविलें, त्याचप्रमाणें राष्ट्राराष्ट्रांमधील भांडणेंही अशाच लवाद पद्धतीनें तोडणें इष्ट आहे हें गेल्या महायुद्धानें शिकविलें, आणि एका प्रसिद्ध मुत्सद्यानें म्हटल्याप्रमाणें " जर आपण युद्धांना गाडून टाकलें नाहीं, तर युद्धेंच आपला निकाल लावतील " ही गोष्ट उघडपणें दर्शविली.

या महायुद्धाचेंच स्वरूप निरनिराळ्या शास्त्रीय शोधांमुळें इतकें राक्षसी झालें होतें कीं, दूर राहून तीं वर्णनें वाचणारांना असंभाव्य अशा दंतकथाच आपण ऐकत आहों कीं काय असें वाटावें ? रेडियोच्या शोधानें आतां इतकी क्रांति केली आहे कीं, यापुढें होणाऱ्या एकाद्या ' अति युद्धाचें ' स्वरूप तर नुसतें कल्पनेनें सुद्धां जाणवत नाहीं. गेल्या महायुद्धामध्यें विषारी वायूचा उपयोग करण्यांत आला. आतां नवें विषारी द्रव्य शोधून काढण्यांत आलें आहे. त्याच्या फक्त तीन थेंबांचा स्पर्श होतांच ती व्यक्ति ठार होईल! आणि रेडियोनें तर कोणती आग लावतां येणार नाहीं हेंच सांगतां येत नाहीं ! दुसरें एकादें युद्ध उपस्थित होणें म्हणजे जगाची इतिश्री होणें आहे.

यापूर्वींच्या काळचीं युद्धें इतकीं भयंकर कां होत नसत याचीं कारणें अनेक आहेत. एक तर त्यावेळीं युद्धाचें स्वरूप इतकें ' अमानुष ' झालें नव्हतें, सर्व लढाया हातघाईच्या व्हाव्या लागत. आतांप्रमाणें मध्यंतरीं मैलामैलांचें अंतर ठेवून माणसाला माणूस न भिडतां अगर न दिसतां युद्धें चालूं शकत नसत. लांब पल्ल्याच्या तोफा, बंदुका इत्यादि सुधारलेलीं आयुधें प्रचारांत नव्हतीं आणि सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे सैन्यांच्या दळणवळणाचीं शीघ्रसाधनें आतांसारखीं उपलब्ध नव्हतीं. यामुळें युद्धाचा निकाल थोड्या अवधींत आणि थोड्या प्राणहानीनें होत असे. त्याचप्रमाणें अलीकडे प्रत्यक्ष रणक्षेत्राखेरीज इतर फार दूरच्या ठिकाणींहि युद्धाचा परिणाम भोगावा लागतो. तेव्हां तसें नसे. राष्ट्रांराष्ट्रांतील दळणवळण पूर्वीपेक्षां वाढल्यामुळें सर्व जग म्हणजे एक कोळ्याचें जाळें बनलें आहे. त्यांतील कोणत्याही ठिकाणच्या धाग्याला एवढासा धक्का बसला तरी सर्व जाळेंच्या जाळें डळमळूं लागतें. एकीकडच्या युद्धाचा दुसरीकडे व्यापारी अगर

अर्थिक दृष्टीनें ताण बसतो. पूर्वी जी एकेका राष्ट्राची परिस्थिति होती ती आतां सर्व जगासंबंधीं झाली आहे. जग म्हणजे एक शरीर आणि सर्व राष्ट्रें त्याचे अवयव बनले आहेत. परंतु त्यांच्यांत नुसता शेजारधर्म वाढला असून भाईचार उत्पन्न झालेला नाहीं. त्यामुळें भांड्याशीं भांडें आल्यानें एकमेकाशीं लागतें व हमेशा खणखणाट होण्याचे प्रसंग येतात. परंतु त्याच दोन भांड्यांना एके ठिकाणीं जोडल्यावर तो खणखणाट बंद होतो तसा एकसांधा सर्वराष्ट्रांत अद्यापि जोडला गेला नाहीं. तो जोडला जावा अशा प्रकारचें तत्त्वज्ञान ज्या वेळेपासून जगांतील सर्व राष्ट्रांच्या हितासंबंधांची 'याचे पाय त्याचे गळ्यांत' अशी गुंतागुंत होऊं लागली तेव्हांपासून सुरूं झाली आहे. आणि त्यासच 'विश्ववादित्व' असें संबोधिलें जातें. आणि ही विश्वबंधुत्वाची कल्पना आज उच्चार व विचार यापुरती तरी सर्व जगभर मान्य आहे, आणि कालावधीनें ती आचारांतही येईल अशी आशा वाटते.

सध्यां जगांतील राष्ट्रांची स्थिति 'शेजीवांचून नडते आणि घडीभरसुद्धा पटत मात्र नाहीं.' अशी आहे. जोंपर्यंत त्यांच्यांत बंधुभाव उत्पन्न झाला नाहीं तोंपर्यंत एकमेकांत तंटे उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. परंतु तें केवळ चढाईच्या उपायानेंच तोडून सर्व जगास अनेक अनर्थांच्या खाईत लोटावयाचें किंवा त्याबद्दल कांहीं इतर शिष्टाईचे इलाज योजावयाचे हा प्रश्न गेल्या महायुद्धापूर्वीपासूनच उपस्थित झाला आहे. आणि त्याची उजळणी दर शंभर वर्षांनीं एकदां होत आली आहे. परंतु त्याला फार मोठी चालना गेल्या महायुद्धांत मिळाली आणि युद्धांना गाडून टाकण्यासाठीं आणि त्यांचे जागीं कायद्यांचें अधिष्ठान बसवून राष्ट्राराष्ट्रांत बंधुभाव उत्पन्न करण्यासाठीं म्हणून राष्ट्रसंघ स्थापण्यांत आला; आणि शाश्वतशांतता नांदेल अशी परिस्थिति राखणें हा त्याचा उद्देश असें ठरविण्यांत आलें; व आतांपर्यंत एकंदर सत्तावन्न राष्ट्रांनीं त्यास मान्यता दिली आहे. "युद्धाचा आश्रय न करण्याबद्दल बांधून घेऊन, अंतरराष्ट्रीय व्यवहार अप्रच्छन्न, न्याय्य आणि प्रामाणिकपणाचें करण्यांत येतील असें आश्वासन देऊन, निरनिराळ्या सरकारांच्या वर्तणुकींमध्यें अंतरराष्ट्रीय कायद्याचें नियंत्रण मान्य करून आणि सुव्यवस्थित लोकसंघाचें परस्परविनिमय न्यायानें व तहनाम्याचें पूर्ण पालन करून चालतील असें कबूल करून, अंतरराष्ट्रीय सहकारितेच्या पुरस्कारासाठीं व अंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांच्या सिद्धीसाठीं" त्यांनीं एका सव्वीस कलमी करारनाम्यावर आपलें मोर्तब केलें आहे.

अशा रीतीनें युद्धाची जागा कायद्यानें भरून काढतां येणें व्यवहार्य आहे किंवा कसें? 'युद्ध हें अनिष्ट असलें तरी अवश्य आहे' या म्हणण्यांत

कितपत तथ्य आहे ? मनुष्यप्राणी स्वभावतःच युद्धलोलुप आहे कीं काय ? मनुष्यप्राणी हा निसर्गतः युद्धशील आहे असें आज जरी त्याच्या देहरचनेवरून दिसत नाहीं, तरी एकेकाळीं तो इतर हिंस्र श्वापदाप्रमाणेंच युद्धोपयोगी निसर्गसाधनांनीं युक्त असा होता. परंतु उत्क्रान्त होत होत तो जेव्हां आजच्या स्थितीला पोंचला, तेव्हां युद्धक्षम होण्यासाठीं त्याला आपल्या मेंदूच्या साहाय्यानें निरनिराळीं साधनें शोधून काढावीं लागलीं. जोंपर्यंत लोकसंख्या विरल होती आणि मनुष्याची राहाणी पशूपेक्षां फार निराळी नव्हती, तेव्हां मनुष्यामनुष्यात भांडणाचें अर्थातच फारसें कारण पडत नव्हतें. परंतु त्या ‘ फटिंग ’ अवस्थेपासून मनुष्य जसजसा उत्क्रान्त होत गेला व त्याची संख्या वाढून राहाणीही कांहीं निश्चित झाली, तसतसे निरनिराळ्या घटकांमध्यें तंटे सुरू झाले. सहवासानें जसें प्रेम उत्पन्न होतें तसाच सापेक्षतेनें कलहही वाढतो. आणि या न्यायानें आपल्या रक्तामांसाचे, समान आचारविचारांचे व चिरसहवासाचे असतील त्यांच्याबद्दल त्याला प्रेम वाटूं लागलें. आणि त्यांच्याहून भिन्न असलेल्या परकी मनुष्यसमूहाकडून स्वकीयांना उपसर्ग पोंचेल कीं काय या भीतीनें तो त्यांच्याशीं वेळ प्रसंगीं लढाई करूं लागला. परंतु मनुष्य हा सहवासप्रिय असल्यानें हे निरनिराळे समुहही कालांतरानें एक झाले आणि कुटुंबापासून जाति उत्पन्न होऊन अशा अनेक जातींचे मिळून देश बनले. अर्थात् या देशांबद्दलही मनुष्याला प्रेम वाटणें साहजिक होतें. या उत्क्रान्तीची दर पायरी चढतांना मनुष्यानें आपसांतील भांडणें शिष्टाईनें अगर कायद्यानें सोडविण्याची सोय केलेली आपणांस दिसून येते. आणि अशा रीतीनें त्यांची व्याप्ति जेव्हां राष्ट्रांपर्यंत येऊन थडकली तेव्हां त्यानें ‘ सरकार ’ ही शासन संस्था निर्माण करून आपल्या बऱ्याचशा नैसर्गिक हक्कांचा त्याग केला. या इतिहासावरून मनुष्य हा कलहप्रिय आहे असें कदाचित् म्हणतां येईल; परंतु तो युद्धाग्रही नाहीं. तो जेव्हां युद्धप्रवृत्त होतो तेव्हां युद्धाची आवड म्हणून नाहीं तर भांडण तोडण्याचे शांततेचे मार्ग नसतात म्हणून ! उलट उत्क्रान्तीच्या प्रत्येक अवस्थेंत चढाईचे मार्ग टाळून व शिष्टाईच्या मार्गाचा अवलंब करून समाजांत स्थैर्य राखण्याचा प्रयत्न त्यानें केला असेंच इतिहास सांगतो.

कुटुंब, ज्ञाति, देश अगर धर्म यांच्या रक्षणासाठीं व अब्रूसाठीं प्राणत्यागापर्यंतही तो मजल मारीत असतो. त्यामुळें इतर कोणत्याही सिध्या मार्गानें तें साधत नाहीं, तेव्हां युद्धाचाही अवलंब करण्यास तो मागेंपुढें घेत नाहीं. आणि राष्ट्र हें अनेक मनुष्यांचा समुदाय असल्यानें त्याच्या इभ्रतीसाठीं लढणारांचा व तीवर हल्ला करणारांचाही समूह मोठा असतो व त्यामुळें त्यांमधील युद्धप्रसंग तीव्र आणि विनाशक असा होतो. परंतु मनुष्याचा राष्ट्राभिमान सुद्धां राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार फार निगडित होऊन सहवास वाढल्याबरोबर तितका ज्वलंत राहिला नाहीं. प्रथम एकमेकांच्या उरावर बसूं पाहणारीं राष्ट्रेंच पुढें शांततेनें मांडीशीं मांडी लावून सहविचार करून

सहव्यवहार कसा करतात हें ' संयुक्त संस्थानां ' च्या उदाहरणावरून दिसून येतें; आणि याच कल्पनेची पुढील पायरी राष्ट्रसंघ ही आहे. मनुष्यानें शांतताप्रस्थापनेसाठीं केलेल्या या प्रयत्नांचा इतिहास लक्षांत घेतल्यावर तो स्वभावतः शांतताप्रिय आहे असें म्हणतां न आलें तरी निदान तो युद्धलोलुप आहे असेंही म्हणतां येत नाहीं.

शांतताप्रस्थापनेचे हे प्रयत्न प्रथम अत्यंत संकुचित स्वरूपाचे होते आतां मात्र त्यांची व्याप्ति यावच्छक्य विस्तृत अशी विश्वव्यापी झाली आहे. अजूनही ही सर्वच्या सर्व ध्येयसृष्टि व्यवहारांत येण्यास या ' राष्ट्रसंघा ' ची उडी भावी ' विश्व-संघांत ' पडावयास पाहिजेच आहे. आणि तेव्हांच मॅझिनी, कांट, विल्सन व टागोर इत्यादि तत्त्वज्ञान्यांचें समाधान होईल. परंतु अपूर्णावस्थेंतूनच मनुष्य पूर्णावस्थेप्रत पोंचतो. म्हणून आजपर्यंत झालेल्या सर्व अपूर्ण प्रयत्नांपेक्षां जास्त विकसित असला तरी अपूर्णच असा हा राष्ट्रसंघाचाही प्रयत्न आहे. तेव्हां त्याचे पूर्वीं झालेल्या अपूर्ण तुटपुंज्या व क्षणिक परंतु याच ओळींतील शांतताप्रस्थापनेसाठीं झालेल्या मागील वेगवेगळ्या प्रयत्नांकडे पहाणें अत्यावश्य आहे. त्याशिवाय हल्लींच्या राष्ट्रसंघाची बरोबर कल्पना येणार नाहीं !

आजमितीस एक अमेरिका सोडून दिली तर बाकी सर्व जगाचें राजकारण युरोपखंडाच्या राजकारणाच्या तालासुरांवर चाललेलें आहे. त्यामुळें युरोपच्या राज-कारणाविषयीं कांहीं बोलणें अगर लिहिणें म्हणजे पर्यायानें सर्व जगाच्या राजका-रणाचाच विचार करणें अशी स्थिति आहे. आणि या प्रस्तुत राष्ट्रसंघांतही सर्व वर्चस्व युरोपीय राष्ट्रांचें असून तत्त्वतः त्याचा उद्देश कोणताही असला तरी तो बाजूस राहून त्याच्या योगानें युरोपीय राष्ट्रेंच आपला फायदा करून घेतील व आज घेतही आहेत. तेव्हां युरोपच्या राजकारणांतच या राष्ट्रसंघाचा मूळ उगम व त्याची पूर्वींची परिस्थिति व नंतरची उत्क्रांति ही शोधली पाहिजेत. म्हणजे त्यांतच वेळों-वेळीं झालेल्या शांतता-प्रस्थापना-प्रयत्नांची माहिती आपणांस आढळून येईल.

राजकीय तत्त्वज्ञानाची प्रगति ' अनियंत्रित राजशाही ' पासून सांप्रत निर्भेळ लोकशाहीपर्यंत येऊन थडकली आहे. अर्थात् त्या तत्त्वज्ञानाचा जो रंग त्यावेळीं असेल तो त्यावेळच्या शांतताप्रस्थापनेसाठीं झालेल्या प्रयत्नांत आढळून येणें अगदीं साहजिक आहे. विश्वशांतता राखण्यासाठीं उत्पन्न झालेल्या आजच्या राष्ट्र-संघ या संस्थेचें स्वरूप लोकशाहीचें आहे, परंतु पूर्वकाळीं जी संस्था त्याचे कल्याणा-साठीं अस्तित्वांत आणण्याचे प्रयत्न केले गेले तिचें स्वरूप राजशाही होतें. रोमन लोकांनीं ' जागतिक साम्राज्य ' स्थापण्याचे प्रयत्न यासाठींच केले.

पुढें ख्रिस्ती धर्माचा उदय झाला आणि सर्व मानवी दुनिया एक असून त्यांनीं व्यक्तिशः अगर संघशः एकमेकाशीं भांडत राहाणें पारमार्थिक आणि ऐहिक दृष्ट्याही पापमय व अनिष्ट आहे; सर्वांनीं न्यायानें शांततेनें व प्रामाणिकपणानें

व्यवहार केले तर विश्वशांतता नांदेल; आणि तशी ती नांदण्यास सर्वांचें तत्त्वज्ञान, धर्म, उपासनाविषयक कल्पना समान पाहिजेत; हें तत्त्व प्रतिपादिलें जाऊं लागलें व या दृष्टीनें विश्वशांतता हा ख्रिस्तीधर्म प्रसाराचा एक उद्देश होऊन बसला! प्रस्तुत कालींही विश्वशांततेसाठीं उत्पन्न झालेल्या विल्सन यांच्या राष्ट्रसंघाला सर्व देशांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून पूर्ण पाठिंबा मिळत आहे. असो, परंतु पुढें धर्मप्रसारासाठीं जुलूम होऊं लागला आणि त्यापायीं युद्धें होऊं लागलीं अर्थात्च जो जास्त बलवान तो धर्मप्रसाराच्या कामांत यशस्वी होऊं लागला व पुन्हां युद्धाच्या जोरावर जास्त जास्त प्रदेश आपल्या ताब्यांत आणून त्यावर विश्वशांतता प्रतिपादणारा ख्रिस्तीधर्म लादण्याचा प्रघात सुरू झाला.पुन्हां एकदां साम्राज्यविस्ताराची कल्पना नव्या जोमानें पुढें झाली. हीच कल्पना मुसलमानांनीं आपल्या कृतींत आणली. त्यांनीं सर्व दक्षिण युरोपचा पट्टा व्यापून टाकला, तेव्हां युरोपची सर्व राष्ट्रें एकवटून धर्मयुद्धांचा काल सुरू झाला. मुसलमानांचा जोर कमी झाल्यावर तोंपर्यंत एक असलेल्या ख्रिस्ती राष्ट्रांत नाना पंथ उत्पन्न होऊन फाटाफूट झाली व आपापल्या धर्मपंथाच्या रक्षणार्थ व पुरस्कारार्थ प्रत्येक राष्ट्र ही जुनी साम्राज्यप्रस्थापनेची युक्ति योजूं लागलें.

अशा रीतीनें भेद नष्ट करून ऐक्यानें शांतता साधण्यासाठीं साम्राज्यें वाढविलीं पाहिजेत, ही कल्पना एकदां जी अस्तितांत आली ती व्यवहारांत अजूनही टिकून असली तरी तत्त्वतः नेपोलियनबरोबरच ती लयास गेली. विश्वशांतताही विश्वसाम्राज्याशिवाय साधणें शक्य नाहीं या हेतूनेंच नेपोलियन निरनिराळे देश पादाक्रांत करीत होता! सेंट हेलिना येथें लिहिलेल्या आपल्या आठवणींत त्यानें पुढील उद्गार काढले आहेत. "मास्कोच्या तहानें माझ्या लष्करी स्वाऱ्यांचा शेवट केला. नाहींतर सार्वत्रिक कल्याण आणि उत्कर्ष यांची शाश्वत प्रतिष्ठापना करण्याचें त्या शतकांतील कार्य मी पार पाडूं शकलों असतों." "सर्व युरोपखंडास एक कुटुंब बनवून त्यांच्या कल्याणाची काळजी कॉंग्रेसच्या द्वारें एका साम्राज्यानें पाहिली असती आणि सर्वत्र समान कायदे, समान तत्त्वें, समान मतें आणि समान हितसंबंध असा देखावा दिसला असता." परंतु एकछत्री साम्राज्यानें विश्वशांतता राखण्याची ही रोमन लोकांची अगर नेपोलिअनची कल्पना समूळ नष्ट होऊन आजच्या राष्ट्रसंघांत साम्राज्यवाद अजिबात नष्ट झाला पाहिजे; इतकेंच काय, कोणत्याही राष्ट्रानें स्वतःचें वर्चस्व वाढेल अशी नुसती कल्पनासुद्धां आपल्या मनांत वावरूं देणें विश्वशांततेला अनिष्ट आहे असें तत्त्व उदित झालेलें आहे.

याखेरीज दुसराही एक समप्रवाही मार्ग युरोपाच्या राजकारणांत सुरू झालेला दिसतो, व ज्यानें, या साम्राज्यानें शांतता स्थापण्याच्या कल्पनेला खाऊन टाकलें तो मार्ग ज्या तत्त्वावर अधिष्ठित झालेला आहे तें तत्त्व म्हणजे 'राष्ट्रशक्तिसमतोलन' हें होय. आपणांपैकीं कोणत्याही एका राष्ट्रानें शिरजोर होऊं नये यासाठीं युरोपाच्या राष्ट्रांनीं वारंवार आपली मित्रकूटें बनविलीं आणि जेव्हां

जेव्हां कोणतें एकादें राष्ट्र वरचढ होऊं लागलें तेव्हां त्याला खच्ची करून टाकलें. या त्यांच्या मित्रकूटांमुळें युरोपांत शांतता राहिली आणि त्यामुळेंच या सर्व राष्ट्रांना मुसलमानांच्या जबरदस्त लोटानंतर सुद्धां पुन्हां सलामतपणें वर डोकें काढतां आलें आणि आपसांतील धर्मविषयक भांडणें नाहींशीं करून इतर खंडांतून इतके खोल व दूरवर आपले हातपाय पसरवतां आले. असे त्यांचे हातपाय सर्व जगभर पसरले गेल्यामुळेंच 'राष्ट्रशक्तिसमतोलनाचें' तत्त्वही अत्यंत विस्तृत अशा स्वरूपांत आजच्या राष्ट्रसंघांत उत्क्रांत झालें.पूर्वीं निरनिराळ्या वेळीं निरानिराळीं मित्रकुटें बनत व मोडत; परंतु आतांचें राष्ट्रसंघाचे हें जंगी मित्रकूट कायम स्वरूपाचें असून पूर्वीं तुल्य वस्तु व तिचें तोलन हीं निरनिराळ्या पारड्यांत टाकावीं लागत असत,तीं आतांच्या सुधारलेल्या ताजव्यांत दोन्हींही एकाच पारड्यांत घालून ' राष्ट्रशक्तिसमतोलनाचें ' इच्छित उत्तर मिळूं शकेल ! पूर्वीं या उत्तरानें युरोपखंडाचीच शांतता व सुरक्षितता साधावयाची असे तर आतां युरोपखंडाच्या निरनिराळ्या घटकांची व्याप्ति वाढल्यानें साऱ्या विश्वाच्या शांततेचें व सुरक्षिततेचें साध्य साधावयाचें आहे. सारांश, आजचा राष्ट्रसंघ हा युरोपमधीलच पूर्वस्थित राजकीय संस्था व तत्त्वें यांच्यावर अधिष्ठित झालेला आहे. तेव्हां आतां त्याचा त्या दृष्टीनें उगम व प्रगति यांचा विचार करूं.

या राष्ट्रसंघाचें मूर्तस्वरूप प्रथम सन १६४८ सालीं वेस्टफालियाच्या तहानें युरोपची जी पुनररचना झाली तींत आहे. यामुळें युरोपखंडांतील राष्ट्रांची शक्ति समतोल राहील अशाच प्रकारची प्रांतविभागणी झाली. आणि पुष्कळ अंशीं युद्धाचें कारण खुडून टाकल्याप्रमाणें झालें. हा ताजवा त्यानंतर दर शंभर वर्षांनीं एकदां याप्रमाणें एकंदर तीन वेळां शुद्ध करून त्यांतील पासंग काढावा लागला. पहिला प्रसंग स्पॅनिश युद्धाचें शेवटीं १७१३ सालीं युट्रेच्चचा तह झाला तेव्हांचा ! यानंतर फ्रान्सच्या नेपोलियनचा सर्व राष्ट्रांनीं एकवटून वाटर्लूच्या लढाईंत पराभव केला, तेव्हां १८१५ च्या व्हिएन्नाच्या तहानें युरोपच्या पंचमहाराष्ट्रांनीं ' सर्व राष्ट्रांनीं एकमेकांशीं सचोटीनें वागावें आणि एकमेकांच्या मिळकती व करारमदार पाळावे 'हें राजनीतितत्त्व घालून दिलें व युरोपची फिरून एकदां रचना केली !ही व्यवस्था सुमारें शंभर वर्षें चालली. परंतु हें राष्ट्रशक्तिसमतोलन १९१४ सालीं पुन्हां एकदां गरगळलें आणि महायुद्ध इतकें कल्पनातीत झालें कीं युरोपांतील राष्ट्रांत कांहीं तरी शक्तिच उरते किंवा नाहीं याचीच भ्रांति पडली. मग तिचें समतोलन करणें पुढील गोष्ट ! परंतु युरोपच्या राष्ट्रांत सुदैवानें अमेरिका युद्धांत पडली व त्यांची अब्रू बचावली. आणि व्हर्सेलिसच्या तहानें हा राष्ट्रसंघाचा खिळखिळा खंडोबा कसाबसा चार काठ्या लावून उभा केला.

सारांश आजचा राष्ट्रसंघ ही नवीनच एकादी संस्था मध्येंच उपटली नसून येथून मागें फार दूरवर नजर फेंकली असतां त्या रस्त्यावर तिचींच तात्त्विक रूपें मैलांच्या दगडाप्रमाणें आपणास दिसून येतात;साहजिकच आपली दृष्टि जितकी जितकी दूर पोंचवावी तितकें तितकें तेथील तें स्वरूप निसर्ग नियमांप्रमाणें उत्तरोत्तर लहान

झालेलें आपणांस दिसेल ! परंतु राष्ट्रसंघाच्या मागल्या पहिल्याच टप्प्यावर आपणांस ओळख पटेल इतक्या स्पष्ट स्वरूपांत दिसणारी संस्था म्हणजे १८९९ आणि १९०७ सालच्या दोनहि 'हेगपरिषदा' होत. १८९९ सालीं हेगपरिषद स्थापन झाली. तेव्हां ज्या तत्त्वांवर राष्ट्रसंघ स्थापन झाला आहे त्या तत्त्वांवरच झाली. परंतु तेव्हां एकाद्या महायुद्धाची ठेंच लागून प्रत्यक्ष शहाणपण मिळालेलें नसल्यामुळें काल्पनिक संकटाचें तादृश महत्व वाटलें नाहीं; आणि पेरलेल्या तत्त्वांपैकीं सर्वांनाच अंकुर धरतां आले नाहींत. परंतु 'सर्वराष्ट्रीय अदालत' असणें राष्ट्रां-राष्ट्रांतील भांडणें तुटण्याच्या दृष्टीनें हितावह आहे, ही गोष्ट तेव्हांहि पटून त्याप्रमाणें एक 'आंतरराष्ट्रीय न्यायसभा' स्थापण्यांत आली; व तिलाच आजच्या राष्ट्रसंघांत मान्यता मिळालेली आहे. महायुद्धाच्या आचींनें तापल्यामुळें या वेळीं विल्सन यांच्या तत्त्वांना बराच जोर धरतां येऊन राष्ट्रसंघ बनवितां आला. शिवाय राष्ट्रशक्तिसमतोलनाचें त्या वेळचें परिणत स्वरूप जें 'अलाइज कौन्सिल' अथवा 'मित्रमंडळ' तेंही आयतेंच विल्सन यांना सांपडलें आणि विल्सन यांच्या लोकशाही तत्त्वांस अनुसरून त्यालाच थोडी नवीन प्रातिनिधिक जोड देऊन राष्ट्रसंघाचें 'कौन्सिल' बनविण्यांत आलें आहे.

राष्ट्रसंघ हा युद्धें टाळून शांतता रक्षणासाठीं निर्माण झाला आहे. तेव्हां युद्धें करण्याची ज्यांची कुवतच नाहीं अशा राष्ट्रांची खोगीरभरती कशास पाहिजे? शांततेचा भंग करूं शकतील अशाच म्हणजे स्वदेशाचे शासनाधिकार ज्यांच्या हातांत आहेत अशा स्वयंशासितांसच राष्ट्रसंघाचे सभासद होतां येतें हें युक्तच आहे ! अशा तंटेखोर राष्ट्रांचा राष्ट्रसंघानें काय बंदोबस्त केला आहे तें पाहूं !

राष्ट्रसंघावर क्रमप्राप्त रीतीनें कोणत्या गोष्टींची जबाबदारी पडते हें प्रारंभीं पाहिलेंच आहे. तदनुसार पहिली जबाबदारी म्हणजे राष्ट्राराष्ट्रांत तंटाबखेडा मुळांत उत्पन्नच न होण्याबद्दल काय खबरदारी घेतली आहे ! राष्ट्राराष्ट्रांत सध्यांचे कालीं तंटे होण्याचीं मुख्य कारणें व्यापार, वसाहती आणि वर्चस्वलालसा हीं आहेत. आपला व्यापार जास्त वाटेल आणि सापेक्षतेनें दुसऱ्याचा बसेल अशी परिस्थिति निर्माण करण्यांत सांप्रत सर्व राष्ट्रें मग्न असतात. यामुळें वारंवार झगडे उत्पन्न होतात. याचा निकाल राष्ट्रसंघानें तत्त्वतः लावून टाकला आहे. व्यापारी व आर्थिक हक्क कोणाही राष्ट्रांस कमी जास्त असे नसून ते सर्वांस समान आहेत; दळणवळणाचीं साधनें सर्वांस सारखींच खुलीं आहेत. वसाहती वाढाविणें ही बाब पुष्कळशी व्यापार वृद्धीसाठीं आवश्यक वाटत असली तरी आपल्या वाढत्या लोकसंख्येचा ओघ स्वदेशांत जिरेनासा झाला म्हणजे त्याचा उपसा दुसऱ्या कोठें तरी काढतां यावा म्हणून तरतूद करण्याची दृष्टि प्रत्येक राष्ट्रांत असते. या बाबतींतही राष्ट्रसंघानें निर्बंध घालून वसाहती होण्यास लायक प्रदेश सर्वांची समानक्षेत्रभूमि आहे असें ठरविलें. अर्थातच या बंदोबस्तानें ज्या परकीयांच्या ओसरीवर हे गोरे भट पाय पसरीत असतात त्या मालकाला त्याची ओसरी निर्वेध मिळाली

असें नाहीं; परंतु आतां निदान तेथें कोणी राहावें यासाठीं या निरानिराळया बुभुक्षितांत होणारी लठालठी आणि धिंगामस्ती होणार नाहीं आणि त्यामुळें होणारी धूळधाण फार तर वांचेल. त्याचप्रमाणें प्रत्येक सबल राष्ट्राला आपल्या पंखाखालीं व पंजाखालीं कांहीं दुर्बल राष्ट्रांचीं बाहुलीं आपण बोट दाखवूं त्याप्रमाणें नाचणारीं आणि डोळा फिरवूं त्याप्रमाणें फिरणारीं अशीं कांहीं असावीं अशी जबर इच्छा असते. या इच्छेप्रमाणें घडून यावें म्हणून तीं आपसांत ओरबडाओरबडी करीत असतात व त्याचा परिणाम म्हणजे तीं दुर्बल राष्ट्रें दोन सबळांच्या तावडींत सारखीं लोंबकळत असतात. ही त्यांची ओढाताण थांबावी म्हणून राष्ट्रसंघानें जीं जितकीं हुषार आढळलीं त्यांस त्यांचा कारभार बहाल केला. व बाकीच्यांचें पालकत्व नक्की ठरवून दिलें. हाही प्रकार गौणच. कारण, दुसऱ्याच्या घरांत शिरून त्याचा कारभार सगळा आपणच आटोपून टाकावयाचा, व मूळ मालकाला धत्तुरा दाखवून आपण लोण्याचा गोळा पळवावयाचा ही जी युरोपीयन राष्ट्रांची झोंडवृत्ति तिला विशेष आळा पडला नाहीं. परंतु आजपर्यंत शेजाऱ्याला त्याच्या घराचें मालकच मुळीं मानावयाचें नाहीं; "तूं आपल्या घरांत राहिलास तर भिंती पाडशील, दारें खिडक्या मोडशील, नाहींतर घराला आग लावशील आणि त्यायोगें आमचें नुकसान करशील, यासाठीं मी त्याचा ताबा घेऊन तेथील व्यवस्था लावतों व तुझें रक्षण करतों;" असा बहाणा करून सर्व जगभर जबरदस्तीनें मनगटाच्या मस्तीवर पुंडाई गाजविणाऱ्या राष्ट्रांना आतां अगदीं उघडउघड तरी तसें करतां यावयाचें नाहीं. पाल्य प्रदेशांतील लोकसमुदायांचें यथायोग्य पालन केलें जातें कीं नाहीं यावर देखरेख राष्ट्रसंघानें करावयाची आहे आणि पालकानें आपल्या तेथील कामगिरीचा अहवालही सादर करावयाचा असतो. यामुळें या बाबतींत दुर्बलांवर जुलूम आणि सबलांत कलागती लावण्याचें टाळण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

बरें, इतकेंही करून तंटा उद्भवलाच तर त्याचा निवाडा देण्याचें काम राष्ट्रसंघानें आपल्या कारभारी–मंडळ आणि अंतरराष्ट्रीय न्यायसभा या संस्थांच्या द्वारें आपणांकडे ठेविलें आहे. आणि या बाबतींत इतक्या चाळण्या ठेवल्या आहेत कीं तितक्यांतून प्रवास केल्यानंतर हें कलहाचें पाणी बाकी उरूंच शकणार नाहीं. तरीही एखादें राष्ट्र बिनमुर्वतखोर निघालें आणि त्यानें राष्ट्रसंघाचा निर्णय अवमानिला तर त्याविरुद्ध सर्व तों प्रकारें बहिष्कार घालण्याचें निर्वाणीचें नारायणास्त्र राष्ट्रसंघानें आपल्या भात्यांत ठेविलें आहेच.

याशिवाय दुसरी जबाबदारी म्हणजे कोणाचेंही सामर्थ्य फाजील वाढूं न देण्याची. या बाबतींत राष्ट्रसंघानें प्रथम कोणत्याहीं राष्ट्रानें आपलें सैन्य व आरमार आणि आकाशयानें यांची संख्या अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यांस आवश्यक इतकीच किमानपक्षीं ठेवावी असें करारनाम्याच्या आठव्या कलमानें ठरविलें आहे. आणि अशा रीतीनें युद्धसाहित्य बारेमाप वाढविण्याचें जें फाजील वेड सर्व प्रमुख

राष्ट्रांस लागलेलें आहे तें ताळयावर आणण्याचा प्रयत्न केला. शिवाय, कोणाही राष्ट्रानें युद्धोपयोगी साहित्य तयार करण्याच्या कृति वगैरेची माहिती गुप्त ठेवतां कामा नये असा निर्बंध घातला. ज्या राष्ट्रांना स्वतःच्या उपयोगासाठीं स्वतःस हत्यारें पात्यारें तयार करतां येत नाहींत त्यांना तीं पुरविण्याची हमीही राष्ट्रसंघानें घेतलेली आहे. आणि युद्धसाहित्यांत छाटाछाट करण्यासाठींच वॉशिंग्टन येथील 'शस्त्रसंन्यास परिषद्' भरविण्यांत आली होती. साहाजिकच एकदां लागलेली कोणतीही चटक लवकर सुटत नाहीं. यामुळें अशा कित्येक परिषदा पचनीं पडतील तेव्हां ही मात्रा कांहीं लागू पडली तर पडेल आणि ठरल्याप्रमाणें सर्व राष्ट्रें आपापलें युद्धसाहित्य कमी करतील, ही गोष्ट निराळी. तोंपर्यंत इंग्लंडनें या ना त्या सबबीवर ही योजना अमलांत आणण्याचें लांबणीवर ढकलावें आणि जपाननें अगर फ्रान्सनें इंग्लंडचा दाखला दाखवून स्वतः कांहीं करूं नये असाच प्रकार चालावयाचा !

विश्वशांततारक्षणासाठीं युद्धें टाळलीं तरी इतर असे कांहीं बिकट सामाजिक प्रश्न आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रसंग येत असतात कीं, त्यामुळेंही विश्वशांतता भंग पावण्याचा संभव असतो. तो शक्य तितका कमी व्हावा म्हणून राष्ट्रसंघाच्या करारनाम्यानें राजकीय कार्यक्रमाबरोबरच एक सामाजिक कार्यक्रमही आंखून तेविसाव्या कलमांत तो एकत्र ग्रथित केला आहे. महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमांतील अस्पृश्यतानिवारण आणि दारूबंदी यांतील तत्त्व तेविसाव्या कलमांतील पोट कलमें ब आणि क अथवा वरतीं दिलेल्या मुद्यांपैकीं अनुक्रमें ७ आणि ८ यांशीं ताडून पहावें !

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठीं राष्ट्रसंघ या संस्थेनें एक घटनायंत्र तयार केलें असून तें ज्या चार खुरांवर उभारलें आहे ते, असेंब्ली–संघसभा, कौन्सिल–कारभारीमंडळ, सेक्रेटरीयट–चिटनवीसकचेरी, आणि अंतरराष्ट्रीय न्यायसभा, हे होत. या प्रत्येकाची तपशीलवार रचना व कायदेकानू देण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु साधारण कल्पना येण्याइतकी त्रोटक माहिती देणें अवश्य आहे.

(१) असेंब्ली अथवा संघसभा ही सर्व लहानथोर सभासदराष्ट्रांची, चाळीस कोटी लोकवस्तीच्या चीनपासून तो दोन लक्षांच्या लक्संबुर्ग संस्थानापर्यंत सर्वांची प्रातिनिधिक परिषद् असून तेथें प्रत्येक सभासद-राष्ट्राचे जास्तींत जास्त तीन प्रतिनिधी बसूं शकतात. प्रत्येक राष्ट्रास एक मत असतें. ( करारनाम्याचीं दोन व तीन हीं कलमें पाहावीं. ) या सभेच्या प्रत्येक अधिवेशनाच्या आरंभीं बहुमतानें एक आणि सहा उपाध्यक्ष निवडण्यांत येतात. या संघसभेची बैठक प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबरमधील पहिल्या सोमवारीं जिनीव्हा येथें भरावी असें ठरलेलें आहे. परंतु एरवींही दहा सभासदांनीं बोलविली असतां अगर आगाऊ ठरविलें असतां व वाटेल त्या ठरविलेल्या ठिकाणीं तिच्या सभा भरूं

शकतात. सर्व निकाल एकमतानेंच लावावे लागतात. परंतु कांहीं विवक्षित बाबींवर विवक्षित पद्धतीचें बहुमत चालतें. या संघसभेचीं मुख्य कामें, ( १ ) कौन्सिलवरील फिरते सहा सभासद निवडणें. ( २ ) नवीन सभासद करून घेणें. ( ३ ) अंतरराष्ट्रीय न्यायसभेवरील न्यायाधीशांची निवड कारभारी–मंडळाच्या सहविचारानें करणें. ( ४ ) करारनाम्यांतील मसुद्यांत जरूर तेथें व तेव्हां दुरुस्ती करणें अगर पुरती जोडणें आणि ( ५ ) करारनामा कलम १५ प्रमाणें कारभारी–मंडळाकडून आलेल्या एखाद्या तंटाप्रकरणावर विचार करणें, अशीं आहेत. आपल्या निरनिराळ्या कमिट्यांच्या द्वारें राष्ट्रसंघाचीं कामें देखरेखीनें करण्याचा अधिकार संघसभेस आहे.

( २ ) कौन्सिल अथवा कारभारीमंडळ हें ( करारनामा कलमें तीन आणि चार पाहावीं. ) संघसभेनें निवडलेले चार आणि कायमचे पांच, ग्रेटब्रिटन, फ्रान्स इटली, जपान, आणि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें यांचे प्रतिनिधी मिळून एकंदर नऊजणांचें असावें असें मूळ ठरलें होतें. संयुक्तसंस्थानांनीं राष्ट्रसंघांतून अंग बाहेर काढून घेतल्यामुळें ती जागा रिकामी आहे, आणि १९२१ सालीं असेंब्लीनें फिरत्या सभासदाची संख्या चाराची सहा केली यामुळें हल्लीं कारभारी मंडळाचें सभासद दहा असतात. करारनाम्यांत कारभारीमंडळाची सभा वर्षाकाठीं एकदां तरी भरावी असें आहे. परंतु दर दोन महिन्यांनीं एक सभा भरण्याची रीत पडून गेली आहे. कारभारीमंडळाच्या कामाचें दिग्दर्शन करारनाम्यांत कलमें ११ ते १५ आणि १७ यांत केलें आहे. मुख्य आंतरराष्ट्रीय भानगडी मिटविणें हें कारभारीमंडळाचें मुख्य काम आहे. सल्लागार आणि कार्यकारी अशा संयुक्त स्वरूपाची ही संस्था आहे.

( ३ ) प्रत्येक कार्यकर्त्या संस्थेला एक कारकुनी खातें अवश्य लागतें. हें खातें म्हणजे त्या संस्थेची 'पोलादी चौकटच'! राष्ट्रसंघाची अशी सेक्रेटरीयट अथवा चिटनवीसकचेरी कायमची उघडण्यांत आली आहे व तिचें अधिष्ठान कायमचें जिनीव्हा येथेंच असतें. त्यांत सध्यां सुमारें पांचशे मंडळी काम करीत असतात. कामगार मंडळी कोणत्याही देशांतील कर्तबगार व्यक्तींतून निवडण्यांत येतात, आणि स्त्री–पुरुष असा भेदाभेद करण्यांत येत नाहीं. कचेरीचें काम इंग्रजी व फ्रेंच या दोन भाषांतून चालतें. सरचिटनवीस हा या खात्याचा मुख्य असून राष्ट्रसंघाच्या सर्व चळवळींची जबाबदारी त्यांचे शिरावर असते. याला एक सहकारी सरचिटनवीस देण्यांत आलेला असतो व शिवाय, दोन दुय्यम चिटनवीस असतातच. कामाच्या सोयीसाठीं या खात्यांत एकंदर अकरा पोटखातीं निर्माण करण्यांत आलेलीं असून त्यांना निरनिराळीं कामें तोडून दिलीं आहेत. एकंदरींत या खात्याचें काम असेंब्लीं व कौन्सिल यांच्या होणाऱ्या व झालेल्या कामांची नोंद ठेवणें, ठर-

लेला कार्यक्रम पार पाडण्यासाठीं कमिट्या नेमून योग्य तो पत्रव्यवहार करणें, आणि राष्ट्रसंघासाठीं नियत-कालिकें चालविणें इत्यादि आहे.

(४) राष्ट्रसंघाचा चौथा खूर म्हणजे आंतरराष्ट्रीय न्यायसभा ही होय. हें अत्यंत महत्त्वाचें अंग आहे. 'हेग परिषदांतून' उत्पन्न झालेली न्यायसभा प्रसंगोपात्त स्वरूपाची असे. तिलाच आतां कायमचें स्वरूप राष्ट्रसंघानें दिलें. या आंतरराष्ट्रीय न्यायसभेंत एकंदर पंधरा न्यायाधीश बसतात आणि निरनिराळ्या देशांतील प्रसिद्ध न्यायमूर्तींतून राष्ट्रसंघाचें कारभारीमंडळ व संघसभा यांनीं सह-विचारानें त्यांची निवडणूक केलेली असतो. ही न्यायसभा 'हेग' येथेंच भरतें. आणि वर्षांतून किमान एकदां तरी ती भरावी असें ठरविण्यांत आलें आहे. कोणत्याही अंतरराष्ट्रीय कायद्याच्या अर्थाचा व व्याप्तीचा निर्णय करणें, राष्ट्रांराष्ट्रांतील लढ्यांचा त्यापुढें मांडण्यांत आल्यास निकाल लावणें, हीं कामें न्यायसभेस करावीं लागतात. न्यायसभेच्या प्रमुखांस हेग येथेंच रहावें लागतें.

राष्ट्रसंघ १९१९ सालच्या एप्रिल महिन्यांत रीतसर स्थापन झाला. त्या-नंतर लगेच एकामागून एक याप्रमाणें एकंदर बावन्न राष्ट्रें त्यास येऊन मिळालीं. १९२३ सालीं अबिसिनिया आणि आयरिश फ्री स्टेट हीं सभासद झालीं आणि १९२४ च्या सप्टेंबरांत डोमिनिकल रिपब्लिक (सॅन डोमिंगो) यास; १९२६ सालीं जर्मनीस सभासद करून घेण्यांत आलें. ही सत्तावन राष्ट्रांची यादी शेवटीं परिशिष्टांत दिली आहे. एकंदर जगाची लोकसंख्या अदमासें पावणेदोन अब्ज म्हणजे १७५ कोटी इतकी आहे. त्यापैकीं राष्ट्रसंघांत सामील झालेली लोकसंख्या एकंदर २५० कोटी आहे म्हणजे ⅞ जग आज राष्ट्रसंघांत समाविष्ट झालेलें आहे. उरलेलें एकसप्त-मांशही राष्ट्रसंघांत प्रविष्ट होण्यास इच्छित नाहीं असें नाहीं. यावरून राष्ट्रसंघास त्याची पुढची पायरी जी विश्वसंघ त्याचें स्वरूप आजच कसें येत चाललें आहे हें दिसून येतें.

राष्ट्रसंघाच्या सभासदांची यादी वाचली तर त्यांत ज्याप्रमाणें कांहीं ओळ-खीचीं नांवें असावयास पाहिजेत असून तीं चुकलीसें आढळून येतें, त्याचप्रमाणें कांहीं अनोळखीं नांवेंही चमकतात; आणि कांहीं ओळखीचीं नांवें जीं तेथें अस-तील अशी कल्पना नाहीं तीं तेथें पाहून आश्चर्य वाटतें. यापैकीं असणें जरूर, परंतु नाहींत; अशांविषयीं थोडेंसें विवेचन आतांपर्यंत झालेंच आहे. कांहीं सभासद राष्ट्रें आपणांपासून फार दूर म्हणून कधीं परिचय नाहीं तर कांहीं तहनाम्यानें अगदीं नवीच बनविल्यामुळें आपणांस अनोळखी आहेत, यांत विशेष असें कांहींच नाहीं. परंतु कांहीं नांवें वाचलीं म्हणजे मात्र सभासदत्वाच्या लायकीबद्दलचें कलम पुन्हां काळजीपूर्वक वाचावसें वाटतें; कारण, स्वयंशासित आहेत अशीं ज्या राष्ट्रांविषयीं आपली कल्पना नाहीं अशांचीं नांवें त्या यादींत आढळतात. आणि मग 'स्वयंशासित राष्ट्र प्रांत अगर वसाहत यांस सभासद होतां येतें' या वाक्याची व्याप्ति किती याचा विचार करावासा वाटतो. अशा वर्गांत आपल्या हिंदुस्थानची

गणना करण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थान हें राष्ट्रसंघांत कोणत्या अधिकारावर समाविष्ट झालें याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे.

कोणत्याहि संस्थेची कार्यक्षमता तिच्या घटक सभासदांचे एकनिष्ठेवर अवलंबून असते. राष्ट्रसंघाकडून कार्य व्हावयास त्याच्या सर्व सभासद राष्ट्रांची तशी सदिच्छा असली पाहिजे, त्याशिवाय तो दुबळा आहे. राष्ट्रसंघाविषयीं योग्य तो आदर, त्याच्या उद्देशांविषयीं निःस्वार्थी पालनबुद्धि सभासद राष्ट्रांचे ठिकाणीं पूर्णत्वानें वास करीत असल्याशिवाय त्याचेकडून कांहीं कार्य होईल अशी आशा करणें व्यर्थच आहे. राष्ट्रसंघाविषयीं भीतियुक्त आदर वाटेल असें सामर्थ्य त्यांत उत्पन्न झालें पाहिजे. ही शक्ति एकादी प्रत्यक्ष अगर बाह्यवती नसून केवळ कार्यज्ञात् आणि अंतःस्थित अशीच असणार आणि ती शक्ति एकमेकांस तुल्यबळ व प्रतियोगी अशी जगांतील सर्व राष्ट्रें राष्ट्रसंघांत सामील होतील तेव्हांच मिळेल; तोंपर्यंत समर्थांच्या ओंजळीनें पाणी पिण्याची दास्यवृत्ति अवलंबिण्यावांचून राष्ट्रसंघास गत्यंतर नाहीं.

हिंदुस्थानची स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे. राष्ट्रसंघाच्या सभासदांत हिंदुस्थानचा समावेश करण्यांत आल्यामुळें तें स्वायत्त, स्वयंशासित राष्ट्र, प्रांतात अगर वसाहत असली पाहिजे असें म्हणावें तर खुद्द हिंदुस्थानांतील प्रजेचा स्वराज्याकरतां धडपड चाललेली आहे. स्वतंत्र राष्ट्रांतील प्रजा स्वराज्याचा लढा-लढत आहे असें म्हणणें ‘ जिवंत मनुष्य चितेवर जळत आहे ’ या म्हणण्याप्रमाणें ‘ वदतो व्याघात ’ आहे. तर स्वतंत्र राष्ट्रांची बनलेली संस्था जी राष्ट्रसंघ, त्याचा एक सभासद परतंत्र आहे ही गोष्ट ‘ सूर्यही अश्रू ढाळतो ’ या ‘विरोधाभासाची ’ वाटते. तेव्हां हें कोडें कसें उलगडावयाचें ? हिंदुस्थान स्वतंत्र आहे कीं परतंत्र आहे ? तर हिंदुस्थान हें स्वतंत्र आहे आणि परतंत्रही आहे हेंच त्याचें उत्तर. स्वतंत्र आहे कारण, त्याचें स्वामी इंग्लंड ते तसें आहे असें चार राष्ट्रांत उघड उघड म्हणतें आणि बाकीचें जग तें खरें मानून त्यांस आपल्या पाटाशेजारीं पाट लावून स्वातंत्र्याच्या जेवणावळींत बसूं देतें ! आणि हिंदुस्थान परतंत्र आहे कारण खुद्द तद्देशीयांना तसें वाटतें म्हणून ! आतां स्वतःकडे नेहमीं कमीपणा घेण्याचें जें मनुष्यस्वभावांतील सहजसौजन्य त्यामुळें हिंदुस्थान स्वतंत्र नाहीं असें तद्देशीयांना वाटतें कीं, खरोखरीं तें तसें नसून ‘ तुम्ही स्वतंत्र आहां, तुम्ही स्वतंत्र आहां, ’ असा डांगोरा पिटून मारून मुटकून वैद्य बोवा बनविण्याचा आव केवळ कांहीं कपटहेतूंनीं प्रेरित होऊन स्वार्थी इंग्लंडनें आणला आहे ! या घरीं अपंक्त ठरविलेल्या व अर्धपोटीं ठेविलेल्या हिंदुस्थानचें सोंवळेंभांडें राष्ट्रसंघाच्या खिडकींतून आंत फेंकून देऊन तेथील पंक्तींतील एक जागा अडविण्याचा, किंवा वारकऱ्यालाही पंक्तिप्रपंच न करतां आपल्या बरोबरीनें वागवितों असें परक्याच्या घरीं दाखविणाऱ्या यजमानाचें उदारपण दाखवण्याची, कीं, दुसरा कोणता हेतु इंग्लं-

डला साधावयाचा होता म्हणून आपल्या गाडीला हिंदुस्थानचा नळा अडकवून त्याला राष्ट्रसंघाची यात्रा घडविली ? असें करण्यांत खरोखरी एकादा स्वार्थी सद्धेतु अगर असद्धेतु होता कीं काय ? आणि राष्ट्रसंघांत प्रवेश मिळाल्यानें हिंदुस्थानचें कांहीं वास्तविक हित झालें आहे काय ? अगर यापुढें होण्याचा संभव आहे काय ?

हिंदुस्थानाला राष्ट्रसंघांत जो प्रवेश मिळाला तो खरोखरीं पाहतां केवळ इंग्लंडच्या मुर्वतीस्तव मिळाला. इंग्लडला हा आग्रह धरावा लागला; कारण, एकतर सर्व जगाला स्वयंनिर्णयाचें तत्व लावण्याचा बहाणा सुरूं करून आपल्या ताब्याखालीं हिंदुस्थानएवढा प्रचंड आणि सुधारलेला देश तसाच राहूं देणें त्यावेळीं इष्ट नव्हतें. महायुद्धानें इंग्लंडचें सामर्थ्य हलकें झालें होतें. अशा वेळीं इकडे खुद्द हिंदुस्थानांतही स्वराज्याची चळवळ धुमधडावयानें चालू होती. स्वकर्तव्य पार पाडल्याचा देखावा करून विल्सन यांच्या डोळ्यांत धूळ फेंकावयाची होती आणि हिंदुस्थानच्या लोकांचें तात्पुरतें समाधान करावयाचें होतें म्हणून स्वराज्याचा हप्ता व मॉंटफर्ड सुधारणांचा कागदी बोळा त्याचे तोंडावर त्यावेळीं इंग्लंडनें फेकून तें गप्प केलें. ही बतावणी इतकी यशस्वी झाली कीं ‘ बाहेरील जगांतही बसूं द्या ’ असें जेव्हां इंग्लंडनें राष्ट्रसंघस्थापनेच्या वेळीं म्हटलें त्यावेळीं सर्व वसाहतींसह हिंदुस्थान इत्यादि इंग्लंडचें पांच बगलबच्चे राष्ट्रसंघांत बिनहरकत मान्य केलें. राष्ट्रसंघाच्या मसुद्यावर हिंदुस्थानतर्फें बिकानेरच्या महाराजांनीं सही केली. त्यानंतर दादीबा दलाल, सप्रू, शास्त्री, महमद रफीक इत्यादि मंडळी वेळोवेळी हिंदुस्थानच्या वतीनें राष्ट्रसंघावर प्रतिनिधी होती. हिंदुस्थानचे जे तीन सभासद तेथें असावयाचे ते ब्रिटिशसरकारनेंच निवडून दिलेले असतात, आणि त्यांतही त्यांचा मुख्य भारतभूमीय असल्यामुळें अद्यापि हिंदुस्थानच्या जनतेचीं खरी मतें तेथें मांडलीं जात नाहींत ! परंतु यापुढें जर राष्ट्रसंघावर पाठवावयाचे प्रतिनिधी हिंदुस्थानच्या कायदेमंडळांनीं निवडावयाच ठरलें तर हा दोष नाहींसा होईल. सध्यां सुद्धां एकादे वेळीं सप्रूसारखी मंडळी योग्य कामगिरी बजावतात. राष्ट्रसंघाप्रित्यर्थ करावयाच्या खर्चाची हिंदुस्थानच्या वाटणीची रक्कम कमी करण्यासाठीं त्यांनीं खूप खटपट केली.

सध्यां वस्तुस्थिति कांहींही असो; परंतु जगाच्या चावडीवर हिंदुस्थानचें स्वतंत्र राष्ट्र ही जात ओळखण्यांत आली आणि यापुढें हिंदुस्थानचें गाऱ्हाणें राष्ट्रसंघाच्या वेशीवर टाकण्याचा मार्ग मोकळा झाला, एवढ्यापुरता हिंदुस्थानचा फायदाच झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. राष्ट्रसंघापासून हिंदुस्थानचा तोटा होण्याचें कांहींच कारण नाहीं. झाला तर फायदा होईल आणि तो करून घेण्यासारखी परिस्थिति निर्माण करण्याचे प्रयत्न हिंदुस्थाननें केले पाहिजेत. राष्ट्रसंघाकडे दुर्लक्ष करून उदासीन राहण्यांत हिंदुस्थानचें अहित आहे. तिकडे जर

हिंदुस्थानचें लक्ष वेधावयाचें असेल तर राष्ट्रसंघावरील तीनपैकीं निदान दोन सभासद तरी हिंदुस्थानच्या मतदारवर्गास आपल्या वरिष्ठ कायदेमंडळांतून निवडण्याचे अधिकार देण्याची योजना अवश्य व्हावयास पाहिजे !

---

# परिशिष्ट १ लें.

## राष्ट्रसंघाचा करारनामा ( समयपत्रिका. )

[ सरनामा. ] राष्ट्राराष्ट्रांत सहकारित्व वाढत जावें, राष्ट्राराष्ट्रांतील परस्पर संबंध शांततेचे राहून सर्वांना निर्भयतेची स्थिति प्राप्त व्हावी, आणि एतदर्थ युद्धाचा आश्रय करणार नाहीं हें बंधन मान्य करणें, राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार उघड पणें व न्यायाच्या आणि सन्मान्यतेच्या तत्त्वावर चालतील असें करणें, सर्वराष्ट्रीय धर्मशास्त्राच्या सर्वसंमत तत्त्वांना शासनसंस्थांनीं प्रत्यक्ष आचार नियमांत स्थान देणें व ही सुधारणा कायमची व्हावी असा प्रयत्न करणें, सुसंघटित जनसमाजाच्या परस्पर व्यवहारांत न्याय राखणें, व तहनाम्यांनीं उत्पन्न झालेल्या सर्व बंधनांबद्दल सर्वांकडून पूर्ण आदरभाव कृतीनें व्यक्त केला जाईल अशी व्यवस्था करण, या हेतूंनीं करार करणारे महापदस्थ पक्ष हा राष्ट्रसंघाचा करारनामा मान्य करतात.

कलम १ लें [ सदस्यत्व ] या करारनाम्याला जोडलेल्या परिशिष्टांत तहनाम्यावर सह्या केलेल्या ज्या राष्ट्रांचीं नांवें दिलीं आहेत तीं आणि सदरील परिशिष्टांत जीं इतर राष्ट्रें उल्लेखिलीं आहेत त्यांतील जी कोणी हा करारनामा बिनशर्त कबूल करतील तीं, या राष्ट्रसंघाचे उत्पादक सभासद गणलीं जातील. हा करारनामा अमलांत आल्यानंतर दोन महिन्यांच्या आंत राष्ट्रसंघाच्या चिटणीस–कचेरींत कबुलायतनामा वरील उल्लेखिलेल्या राष्ट्रांच्या समूहांत जें राष्ट्र हजर करील तें संघाचें सदस्य झालें असें मानलें जाईल. संघाच्या इतर सदस्यांना हें नवें राष्ट्र सदस्य झाल्याची वार्ता वटपत्रानें दिली जाईल.

परिशिष्टांत दाखल न झालेल्या अशा कोणत्याही पूर्ण स्वयत्त संस्थानाला, संस्थान संघाला ( डोमिनिअन ) अथवा वसाहतीला राष्ट्रसंघाचें सदस्य होतां येतें. मात्र, संघसभेंतील दोन तृतीयांश सभासदांची या गोष्टीस अनुमति पाहिजे, आणि या सदस्य होऊं इच्छिणारानें पुढील दोन गोष्टी केल्या पाहिजेत. एक, आपलीं अन्यराष्ट्रविषयक कर्तव्यें व बंधनें पाळण्याची आपली इच्छा मनापासूनची आहे हें सिद्ध करणारीं चोख तारणें द्यावीं; दुसरें, त्याची लष्करी व आरमारी सामुग्री व फौज किती असावी इत्यादि संबंधीं जे नियम संघ त्याला घालून देईल ते त्यानें

मान्य करावे. राष्ट्रसंघाच्या सदस्यास, दोन वर्षांची सूचना देऊन, सदस्यत्व सोडतां येतें; मात्र, सदस्यत्व सोडूं इच्छिणारानें त्याचेवर संघाच्या करारनाम्यानें पडलेली जबाबदारी व या करारनाम्यानें उत्पन्न होणारी त्याचीं अन्यराष्ट्रविषयक कर्तव्यें सदस्यत्व सोडण्यापूर्वी पार पाडलीं पाहिजेत.

कलम २ रें [ कार्यकारी यंत्रें ] एक संघ–सभा ( असेंब्ली ), एक कारभारी–मंडळ ( कौन्सिल ), आणि एक कायम चिटनीस–कचेरी ( सेक्रेटरीयट ) या यंत्रामार्फत राष्ट्रसंघाचें कायकर्तृत्व व्यक्त होईल.

कलम ३ रें [ असेंब्ली ] राष्ट्रसंघाच्या सदस्यभूत राष्ट्रांचें प्रतिनिधी हे प्रस्तुत संघसभेचे सभासद समजावे.

प्रस्तुत संघ–सभेच्या बैठकी नियमित वेळीं होऊन शिवाय प्रसंगोपात्त प्रश्नांचा विचार करण्यास नियमित वेळाबाहेरही होतील. या बैठकी संघाचे ‘ गृहस्थानीं ’ अथवा इतरत्र पूर्व निश्चित अशा स्थानीं होतील. या बैठकींत राष्ट्रसंघाच्या कार्य क्षेत्रांत येणाऱ्या अथवा जगाच्या शांततेशीं संबद्ध अशा कोणत्याही गोष्टींचा विचार संघसभा करील. या बैठकींत संघसदस्यांना प्रत्येकीं एक मत असेल. कोणत्याही सदस्य राष्ट्रास तीनपेक्षां अधिक प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार नाहीं.

कलम ४ थें [ कौन्सिल ] कारभारी मंडळांत अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, ब्रिटिश साम्राज्य, फ्रान्स, इटली व जपान या राष्ट्रांचें प्रतिनिधी असून शिवाय इतर सहा संघसदस्यांचे प्रतिनिधी असतील. कोणते प्रतिनिधी असतील, कोणते प्रतिनिधी असावयाचे हें वेळोंवेळीं ठरविण्याचा अधिकार संघसभेला आहे.

संघसभेची मताधिक्यानें अनुमति मिळाल्यास कोणत्याहि संघसदस्याचें प्रतिनिधी कायमचे जादा कारभारी करून घेण्याचा अधिकार कारभारीमंडळास आहे. तसेंच, ज्या संघसदस्यांची संघसभा कारभारीमंडळांत प्रतिनिधीरूपानें बसण्यास निवड करूं शकेल अशा सदस्याची संख्या संघसभेच्या सदरहू प्रकारच्या अनुमतीनें वाढविण्याचा अधिकारही कारभारी मंडळास आहे.

काराभारीमंडळावरील बिनकायमच्या संघसदस्यांच्या निवडणुकीबाबत नियम आणि त्यांतल्यात्यांत त्याची मुदत आणि फेरनिवडणूकीस उभें राहण्याची लायकी याविषयीं दोनतृतीयांश मताधिक्यानें संघसभा नियम तयार करील. जरूरी भासेल त्याप्रमाणें कारभारी मंडळाच्या वेळोंवेळीं बैठकी होतील या मंडळाची वर्षांतून एक बैठक मात्र झालीच पाहिजे. बैठकीचें ठिकाण, हें संघाचें गृहस्थान असेल अथवा पूर्वनिश्चित असें कोणतेंहीं स्थान असेल. या बैठकींत राष्ट्रसंघाच्या कार्यक्षेत्रांत येणाऱ्या अथवा जगताच्या शांततेशीं संबद्ध अशा कोणत्याही गोष्टींचा विचार होईल. कारभारी मंडळांत ज्या सदस्याचा प्रतिनिधी नाहीं अशा सदस्यराष्ट्रांच्या हिताहिताशीं प्रामुख्यानें निगडित असलेल्या कोणत्याही प्रश्नाचा विचार व्हावयाच्या

वेळीं सभासद म्हणून आपला कोणी प्रतिनिधी पाठवावा अशी निमंत्रण सूचना कारभारी मंडळाकडून त्या सदस्यराष्ट्राला गेली पाहिजे.

कारभारी–मंडळाच्या बैठकींत ज्या सदस्यराष्ट्रांचें प्रतिनिधी या मंडळावर असतील त्यांना प्रत्येकीं एक मत असून एकाहून अधिक प्रतिनिधी कोणाही संघ-सदस्यास पाठवितां येणार नाहींत.

कलम ५ वें ( मतदान ) या करारनाम्यांत ज्या बाबींसंबंधानें भिन्न तऱ्हेचा स्पष्ट उल्लेख नाहीं, अशा सर्व बाबींसंबंधीं, कारभारी–मंडळ अथवा संघसभा यांच्या बैठकींत त्या त्या बाबीचा विचार होऊन प्रतिनिधिद्वारां हजर असलेल्या सर्व सदस्यराष्ट्रांचें जेव्हां एकमत होईल, तेव्हांच त्या विशिष्ट बाबीचा त्या बैठकीनें निर्णय केला असें समजलें जाईल.

बैठकीच्या कार्यानुक्रमासंबंधाचे नियम करणें, विशिष्ट प्रश्नांच्या चौकशीसाठीं चौकशीमंडळें नेमणें वगैरे गोष्टी संघसभेच्या किंवा कारभारी मंडळाच्या बैठकींत प्रतिनिधिद्वारां हजर असलेल्या सदस्यराष्ट्रांच्या मताधिक्यानें ठरवाव्या. संघसभेची व कारभारी मंडळाची पहिली बैठक अमेरिकेंतील संयुक्तसंस्थानांच्या अध्यक्षांच्या निमंत्रणाप्रमाणें होईल.

कलम ६ वें ( सेक्रेटरीयट ). कायमची चिटनवीस कचेरी संघाच्या 'गृहस्थानीं' स्थापिली जाईल. या कचेरींत एक सरचिटनवीस व जरूरीप्रमाणें दुसरे चिटनवीस व इतर कामगार असतील. सर एरिक ड्रमंड हे संघाचे पहिले सरचिटनवीस होत. यानंतर संघसभेच्या मताधिक्य–संम्मतनुसार कारभारी मंडळ सर–चिटनवीसांची नेमणूक करील.

दुय्यम चिटनवीसांच्या व इतर कामगारांच्या नेमणुका सरचिटनवीस हे कार-भारी मंडळाच्या पसंतीनें करतील. संघसभा व कारभारीमंडळ यांच्या सर्व बैठकींत सरचिटनविशीचें काम हेच सरचिटनवीस करतील. राष्ट्रसंघाचा खर्च संघ–सभा ठरवील त्या प्रमाणांत संघसदस्यच सोसतील.

कलम ७ वें ( 'गृहस्थान' नेमणुका, हक्क व सवलती ) संघाचें 'गृहस्थान' जिनीव्ह येथें स्थापिलें आहे. हें गृहस्थान केव्हांही बदलण्याचा अधिकार कारभार मंडळांस आहे.

राष्ट्रसंघाच्या ताब्यांतील अथवा त्यांतही संबद्ध अशा सर्व जगावर चिटन-वीस खातें धरून, स्त्रिया व पुरुष दोघांसही नेमतां येईल. संघसदस्याचे प्रतिनिधी व संघाचे अधिकारी हे संघाचें कार्य करीत असतां त्यांना राष्ट्र–वकीलाचे हक्क व सवलती आणि अदंड्यता हीं भोगावयास मिळतील. संघ, संघाचे अधिकारी अथवा संघाचे बैठकीसाठीं आलेले प्रतिनिधी यांची ज्या इमारतींत व इतर जमी-नींत वसति असेल त्या इमारती व जमिनी अनातिक्रमणीय समजाव्यात.

कलम ८ वें ( युद्धसाहित्यांत छाटाछाट ) राष्ट्रसंघाच्या सदस्यास जाणीव

आहे कीं, जगतांत शांतता राखावयाची तर, प्रत्येक राष्ट्रानें त्याची अंतर्गत सुरक्षितता असावी आणि त्याची अन्यराष्ट्राविषयक कर्तव्यें त्याजकडून संघबलानें करवून घेण्याला राष्ट्रसंघाला जरूर असणारें सामार्थ्य असावें. या दोन तत्त्वांची उपेक्षा होऊं न देतां युद्धसाहित्य जितकें किमानपक्षीं कमी करतां येईल तितकें केलें पाहिजे.

संघाच्या प्रत्येक सदस्याच्या देशाची भूप्रदेशविषयक व इतर परिस्थिति लक्षांत घेऊन प्रत्येक राष्ट्रांतील सरकारनें आपलें साहित्य किती व कसें कमी करीत जावें यासंबंधीं योजना तयार करणें व या योजना त्या त्या सरकाराकडे विचारासाठीं व अमलांत आणण्यासाठीं रवाना करणें हें काम कारभारीमंडळीकडे आहे या योजनांचा दहा दहा वर्षांनीं किंवा तत्पूर्वीं पुनर्विचार होईल व जरूर भासल्यास त्या बदलल्या जातील.

कोणत्याही सरकारनें सदरील प्रकारच्या युद्धसाहित्यविषयक योजना एकदां मान्य केल्या म्हणजे मग कारभारीमंडळाच्या पूर्वानुमतीशिवाय या योजनांबाहेर त्या सरकाराला युद्धसाहित्य वाढवितां येणार नाहीं.

दारूगोळा व हत्यारें खासगी कारखान्यांतून खासगी पैशानें तयार होऊं देणें हें अनेक दृष्टींनीं अत्यंत आक्षेपार्ह आहे, ही गोष्ट संघाच्या सदस्यांना मान्य आहे. युद्धसाहित्याच्या सदरील उत्पादनपद्धतीमुळें होणारे दुष्ट परिणाम कसे टाळतां येतील आणि संघसदस्य असणाऱ्या ज्या राष्ट्रांना आपल्या सुरक्षिततेला अवश्य असणारें युद्धसाहित्य स्वतःचें देशांत निर्माण करतां येत नाहीं त्यांची ती गरज योग्य मार्गानें कशी भागवितां येईल, यासंबंधीं सल्ला देण्याचें काम कारभारी मंडळाचें आहे.

आपलें युद्धसाहित्य किती आहे, लष्कराच्या व आरमाराच्या वाढीसंबंधाच्या आपल्या पुढील योजना कशा प्रकारच्या आहेत, आणि युद्धसाहित्य करण्यास थोड्याफार फेरफारानें सहाय्यक होऊं शकतात अशा आपल्या कारखान्यांची व धंद्याची तपशिलवार स्थिति कशी आहे, या सर्व बाबींसंबंधीं मोकळ्या मनानें लागेल ती माहिती एकमेकांस देण्याचें संघ–सदस्य मान्य करीत आहेत.

कलम ९ वें [ कायमचें सल्लामंडळ ] संघाच्या करारनाम्यांतील कलमें १ व ८ यांतील नियमांची अंमलबजावणी करण्याच्या कामीं आणि सामान्यतः लष्करी, आरमारी व वैमानिक सर्व प्रश्नांचे बाबतींत कारभारी मंडळाला सल्ला देण्यासाठीं एक कायमचें सल्लामंडळ स्थापिलें जाईल.

कलम १० वें. [ हल्ल्यांविरुद्ध हमी ] राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्यराष्ट्रांचें विद्यमान राजकीय स्वातंत्र्य व मुलाखतीचें अभंगत्व यासंबंधीं संघसदस्य स्वतः आदरबुद्धी तर ठेवतीलच; शिवाय बाहेरील हल्ल्याचे वेळीं मदत ही करतील. अशा प्रकारचा बाहेरून हल्ला झाला असतां, अगर तशीं चिन्हें दिसलीं असतां अगर

शत्रुराष्ट्रांकडून धमकावणीची सूचना आली असतां, त्या सदस्यराष्ट्रांच्या संरक्षणाची जबाबदारी संघानें कशी पार पाडावी याची योजना करण्याचें व सल्ला देण्याचें काम कारभारी-मंडळानें केलें पाहिजे.

कलम ११ वें ( युद्धप्रसंगींचें कार्य ) कोणीही कोठेंही युद्ध सुरू करो अथवा युद्धाची धमकी देवो, या युद्धाचा अथवा धमकीचा सदस्यभूत राष्ट्रांशीं प्रत्यक्ष संबंध असो वा नसो, राष्ट्रसंघाच्या विचार क्षेत्रांत व कार्यक्षेत्रांत हें युद्ध व ही धमकी येते, असें करारनाम्यानें ठरविलें आहे. अशा युद्धाच्या अथवा धमकीच्या प्रसंगीं जगाची शांतता कायम रहावी, यासाठीं योग्य दिसतील ते व उपयोगी वाटतील ते उपाय योजणें हें राष्ट्रसंघाचें काम आहे. असा कांहीं प्रसंग प्राप्त झाल्यास कोणाही सदस्यभूत राष्ट्राच्या विनंतीवरून सरचिटणविसांनीं कारभारी मंडळाची सभा ताबडतोब बोलाविली पाहिजे.

राष्ट्राराष्ट्रांतील शांतता उच्छेद होण्यासारखी कांहीं भयसूचक परिस्थिति राष्ट्रांच्या अन्योन्य व्यवहारांत उत्पन्न झाली अथवा शांततेचा मूलाधार जो राष्ट्रांचा अन्योन्य स्नेह त्या स्नेहांत तफावत पडण्यासारखी जर कांहीं विपरीत गोष्ट घडून आली, तर अशा कोणत्याही गोष्टीकडे संघसभेचें अथवा कारभारी-मंडळाचें लक्ष वेधण्याचा हक्क प्रत्येक सदस्य-राष्ट्रास असून तें एक स्नेहकार्य आहे असेंही या कलमान्वयें ठरविलें जात आहे.

कलम १२ वें ( भांडणें पंचायतीकडे सोंपविणें ) आपापसांत युद्ध जुंपण्यासारखें कांहीं वितुष्ट उत्पन्न झाल्यास ती वितुष्टाची बाब निर्णयासाठीं पंचायतीपुढें किंवा न्यायसभेपुढें अथवा चौकशीसाठीं संघाच्या कारभारी मंडळापुढें मांडण्याचें या कलमान्वयें सदस्यराष्ट्रें ठरवीत आहेत, आणि पंचायतीनें अगर त्या न्यायसभेनें निर्णय दिल्यानंतर अथवा कारभारीमंडळाच्या चौकशीचा अहवाल जाहीर झाल्यानंतर तीन महिनेपर्यंत कशीही बाब असली तरी युद्धाचा आश्रय करावयाचा नाहीं असें सदस्यराष्ट्रें मान्य करीत आहेत. या कलमान्वयें असेंही ठरलें आहे कीं, ते पंच अगर ती न्यायसभा यांनीं निकाल देण्यास भलताच कालक्षेप करूं नये व कारभारी मंडळाचा अहवाल त्याजकडे प्रकरण आल्यापासून सहा महिन्यांच्या आंत प्रसिद्ध झाला पाहिजे, मग वाद कशाही भानगडीचा असो.

कलम १३ वें ( पंचायत ) राष्ट्रांच्या वकिलांच्या मार्फत न तुटण्यासारखा परंतु पंचायतीकडे अगर न्यायसभेकडे सोंपविण्यासारखा असा वाद परस्परांत उत्पन्न झाल्यास तो सांगोपांग पंचायतीपुढें अगर न्यायसभेपुढें ठेवण्याचें सदस्यराष्ट्रें मान्य करीत आहेत.

तहनाम्याचा अर्थ, सार्वराष्ट्रीय धर्मशास्त्राचा प्रश्न, अन्यराष्ट्रविषयक स्वीकृत वा स्वभावसिद्ध कर्तव्याचा भंग सिद्ध करणारी गोष्ट, असा भंग झाल्याचें सिद्ध झाल्यास त्याजबद्दल मोबदला कसा व किती द्यावयाचा हा प्रश्न, या व असल्या गोष्टीसंबंधाचे वाद पंचायतीपुढें अगर न्यायसभेपुढें मांडण्यासारखे आहेत.

असल्या कोणत्याही वादाकरितां कलम चौदाप्रमाणें स्थापिली गेलेली कायमची आंतरराष्ट्रीय न्यायसभा, अगर वाद करणारीं राष्ट्रें मान्य करतील असें दुसरें कोणतेंही लवाद अथवा त्यांच्यामध्यें झालेल्या पूर्वींच्या एकाद्या करारनाम्यानें ठरली असेल ती पंचायत यांना त्यांचा निर्णय करण्याचा अधिकार आहे.

अशा लवादानें दिलेला निकाल अगर निर्णय कांहीं कसूर न करितां अमलांत आणण्याचें सदस्यराष्ट्रें अंगावर घेत आहेत. जें सदस्यराष्ट्र हा निकाल अगर निर्णय मान्य करील त्याविरुद्ध युद्ध न करण्याचेंहि सदस्यराष्ट्रें पत्करीत आहेत; आणि अमान्य करील अगर अमलांत न आणील तर त्याच्या बाबतींत तो निकाल अगर निर्णय अमलांत आणण्याची योजना करण्याचें व सल्ला देण्याचें काम कारभारी मंडळाचें आहे.

कलम १४ वें. ( आंतरराष्ट्रीय न्यायसभा ) कायमची आंतरराष्ट्रीय न्याय सभा स्थापावयाची तर ती कशी असावी वगैरे संबंधीच्या योजना कारभारी–मंडळानें तयार करून त्या सदस्य राष्ट्रांना संमतीसाठीं सादर कराव्या. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा वाद ऐकून त्यावर निकाल देण्यास ही न्यायसभा समर्थ आहे. कारभारीमंडळानें अगर संघसभेनें एकादा वाद अगर प्रश्न यावर मागितल्यास आपलें मत प्रदर्शित करून सल्ला देण्याचाही या न्याय सभेला अधिकार आहे.

कलम १५ वें. ( पंचायतीकडे न सोंपविलेल्या वादाची व्यवस्था ) संघाच्या सदस्यभूत राष्ट्रांपैकीं कोणांत युद्ध होण्याइतका वाद उपस्थित झाल्यास आणि तो पंचायत अगर न्यायसभा याकडे निर्णयासाठीं कलम १३ प्रमाणें नेण्यांत आला नाहीं, तर ती बाब कारभारी मंडळापुढें मांडण्याचें सदस्यराष्ट्रें मान्य करीत आहेत. सरचिटनवीसांना एक सूचनापत्र पाठवून असल्या प्रकारचा वाद उपस्थित झाल्याचें वादीप्रतिवादींपैकीं कोणीही कळविलें म्हणजे कारभारी–मंडळापुढें तो मांडला असें समजलें जाईल व वादग्रस्त बाबींची पूर्ण चौकशी व विचार होण्यासाठीं करावयाची ती सर्व व्यवस्था सर चिटणीस करतील.

या कामाच्या सोयीसाठीं वादी–प्रतिवादी राष्ट्रांनीं आपल्या कैफियती वादसंबद्ध कागदपत्रें व इतर हकीगती यांसह होईल तितक्या लवकर सरचिटनवीसाकडे पाठवाव्या. त्यानंतर त्या प्रसिद्ध करण्याचा कारभारी मंडळ हुकूम सोडील.

अशा वादाचा समाधानकारक निकाल लावण्याचा कारभारी मंडळ यत्न करील व तो यशस्वी झाल्यास कारभारीमंडळास योग्य दिसेल त्याप्रकारें या वादांतील बाबी, वादीप्रतिवादींचें म्हणणें, व निर्णयपत्रांतील कलमें प्रसिद्ध केलीं जातील.

वादाचा निकाल लावतां आला नाहीं तर एकमतानें अगर मताधिक्यानें एक अहवाल तयार करून तो काराभारीमंडळ प्रसिद्ध करील. त्यांत वादविषयक गोष्टी व तत्संबंधीं न्याय्य व योग्य वाटणारे शिफारशीच्या स्वरूपाचे निकाल असतील. कारभारीमंडळावर प्रतिनिधि पाठविणारें कोणतेंही सदस्यराष्ट्र मंडळाकडे आलेल्या वादविषयक गोष्टी व तत्संबंधीं मंडळाचे निर्णय जाहीर करण्यास अधि-

कृत आहे.कारभारीमंडळीच्या वादासंबंधीं अहवाल एक वा अधिक वादीप्रतिवादीराष्ट्रांचे प्रतिनिधींखेरीज बाकी सर्व सभासदांच्या मतैक्यानें जर मंजूर झाला तर या अहवालांतील शिफारसीवजा निर्णय ज्या पक्षाला मान्य असेल त्याशीं युद्ध न करण्याचें संघसदस्य मान्य करीत आहेत.

एक वा अधिक वादीप्रतिवादी राष्ट्रांच्या प्रतिनिधींखेरीज, बाकी सर्व सभासदांना पसंत असा अहवाल जर कारभारी मंडळाला तयार करतां आला नाहीं तर हक्क व न्याय या दृष्टींनीं योग्य ती कारवाई करण्यास संघसदस्य मुखत्यार आहेत.

वादाचा विषय "सार्वराष्ट्रीय धर्मशास्त्रान्वयें सर्वथैव आमच्या अंतर्गत अथवा स्थानिक अधिकारांतील आहे" असें एखाद्या वादी अथवा प्रतिवादी पक्षानें म्हटलें व चौकशीअंतीं कारभारी मंडळलाही तें पटलें तर मंडळानें अहवाल प्रसिद्ध करावा. परंतु शिफारसवजा निकाल करूं नये.

या कलमान्वयें आलेले वाद संघसभेकडे पाठविण्याचा कारभारी-मंडळास अधिकार आहे. वादीप्रतिवादी राष्ट्रांपैकीं कोणीही तशी विनंति केल्यास मंडळानें त्यांचा वाद संघसभेकडे पाठविला पाहिजे, मात्र ही विनंति कारभारी मंडळाला त्यांजकडे वाद दाखल झाल्यापासून १४ दिवसांचे आंत केली पाहिजे.

कारभारी मंडळाकडून एकादें प्रकरण संघसभेकडे गेल्यावर संघसभेला अधिकार कोणते व त्याची कारवाई कशी व्हावयाची या संबंधांत प्रस्तुत कलम व कलम १२ यांत कारभारी मंडळाच्या बाबतींत ठरलेले सर्व नियम संघसभेला लागूं होतील. मात्र संघसभेनें काढलेला अहवाल जर कारभारी मंडळांत प्रतिनिधि पाठविणाऱ्या संघसदस्यांच्या सर्व प्रतिनिधींना आणि इतर संघसदस्यांपैकीं निम्याहून अधिकांना या दोन्हीही गणनेंत वादी-प्रतिवादी सदस्यांचे प्रतिनिधी वगळून सर्व सभासदांच्या मतैक्यानें मंजूर झालेल्या कारभारी मंडळाच्या अहवालाइतकाच हा संघसभेचा अहवाल संघसदस्यांना बंधनकारक मानला जाईल.

कलम १६ वें. (संघाचे दंडनियम) या करानाम्यांतील कलमें १२, १३ व १५ यांची अवहेलना करून जें सदस्यराष्ट्र युद्धाचा आश्रय करील, त्याच्या या करणीवरूनच त्यानें इतर सर्व संघसदस्यांविरुद्ध युद्धाचें कृत्य केलें आहे असें मानलें जाईल, आणि संघसदस्य असा करार करीत आहेत कीं, अशा राष्ट्रांशीं असलेले सर्व व्यापारी व देण्यावेण्याचे संबंध तोडून टाकणें, आपले राष्ट्रजन व या करार मोडणाऱ्या राष्ट्राचे लोक यांमध्यें चालू असलेला सर्व व्यवहार बंद करणें, तसेंच संघसदस्य असलेल्या व नसलेल्या कोणत्याही राष्ट्राचे नागरिक व करारबंधन तोडणाऱ्या राष्ट्राचे नागरिक यांमधील देण्याघेण्याचे व्यापारी, खाजगी वैयक्तिक सर्व व्यवहार बंद करणें या गोष्टी ताबडतोब अमलांत आणतील.

करारनाम्याचीं बंधनें तोडलीं गेलीं किंवा नाहीं हें कारभारीमंडळ ठरवील. या विचाराचे वेळीं युद्धाश्रयी राष्ट्र आणि ज्याविरुद्ध उद्देशून ही कृति असेल तें राष्ट्र यांच्या प्रतिनिधींचें मत ग्राह्य धरलें जाणार नाहीं.

या कलमान्वयें आर्थिक दडपण सुरू करण्याची तारीख कोणती याबद्दल शिफारस सदस्यराष्ट्रांना वटपत्रानें कारभारी मंडळ कळवील.

कांहीं विपक्षित सदस्यांच्या बाबतींत या सर्व उपायांचा अंमल सुरू करण्याचें कांहीं ठराविक काळपर्यंत तहकूब करण्याचा अखत्यार कारभारी मंडळास आहे.मात्र त्याची अशी खात्री झाली पाहिजे कीं अशी तहकुबी योजावयाच्या उपायांचा उद्देश जास्त साध्य होण्यास उपयुक्त आहे अगर त्या सदस्यांचें होणारें नुकसान अगर अडचण कमी होण्यास जरूर आहे.

कलम १७ वें ( संघबाह्य वाद ) संघबाह्य व संघांतर्वर्ती अशा दोन संस्थानांत झगडा असेल अथवा तंटा करणारीं संस्थानें सर्वच संघबाह्य असतील, अशा प्रसंगीं त्या वादापुरतें तरी संघबाह्य संस्थानानें अगर संस्थानांनीं संघसदस्याचीं बंधनें कांहीं अटीवर पाळण्यास तयार व्हावें, अशा प्रकारची सूचना त्यास करण्याचें काम करभारीमंडळानें केलें पाहिजे. सदर अटी कारभारीमंडळानें न्याय्य दिसतील त्या ठरवाव्या. या सूचनेला निमंत्रितांकडून मान्यता मिळाली तर या करारनाम्यांतील कलमें १२ ते १६ ( दोन्ही धरून ) यांतील नियम कारभारी मंडळास जरूर वाटतील ते फेरफार करून सदरील तात्पुरत्या संघसदस्याला लागू केले जातील.

सदरील प्रकारच्या वादांत सदरील प्रकारचें निमंत्रण संघबाह्य संस्थानांना पाठविल्यावर लागलीच वादाच्या गोष्टींची चौकशी कारभारीमंडळानें करून वाद मिटल्यास उत्तम व खात्रीनें परिणामकारक अशी जी कारवाई कारभारी मंडळाला दिसेल ती त्या त्या संस्थानानें करावयाची शिफारस कारभारी मंडळानें करावी.

सदर निमंत्रणाचा अव्हेर करून, संघसदस्यभूत एकाद्या संस्थानाच्या विरुद्ध जर कोणीही संस्थान युद्ध करील तर अशा संस्थानचे बाबतींत कलम १६ लागू होईल.

वादीप्रतिवादी दोनही पक्ष जर सदर निमंत्रण अव्हेरतील तर ज्याचें योगानें युद्ध टळून वाद मिटेल अशा प्रकारचे उपाय योजण्याचा व शिफारशी करण्याचा अधिकार कारभारी मंडळाला आहे.

कलम १८ वें ( तहांची नोंद ) यानंतर सदस्य राष्ट्रें जे जे आंतरराष्ट्रीय करारमदार करतील ते ते ताबडतोब संघाच्या चिटनवीस कचेरींत नोंदविले पहिजेत शक्य तितके लवकर ते जाहीर करण्यांत येईल. अशी नोंद होईतों कोणताही तह अगर अंतरराष्ट्रीय करार बंधनकारक होणार नाहीं.

कलम १९ वें(तहांची फेरतपासणी) गैरलागू झालेल्या तहांचा पुनर्विचार संघसदस्यांकडून व्हावा अशा प्रकारची सल्ला वेळोवेळीं त्या त्या राष्ट्रांना देणें आणि जगताच्या शांततेला बाधक असा आंतरराष्ट्रीय व्यवहार स्थितींचा विचार करण्याची सूचना करणें हें संघसभेचें अधिकारांतील काम आहे.

कलम २० वें. ( विसंगत करारमदार ) या करारनाम्याशीं विसंगत अशा प्रकारचे एकमेकांत झालेले लेखी व तोंडी करारमदार या करारनाम्यानें रद्द झाले

अशी मान्यता देऊन असले करारमदार यापुढें आम्ही करणार नाहीं अशी प्रतिज्ञा प्रत्येक सदस्यराष्ट्र शपथपुरस्सर करीत आहे.

संघसदस्य होण्यापूर्वी करारनाम्याशीं विसंगत असे कोणा सदस्याचे करारमदार कोणाशीं झाले असतील,तर त्याच्या बंधनांतून आपली सुटका करून घेण्यासाठीं ताबडतोब उपाययोजना करणें,हें त्या सदस्याचें कर्तव्य आहे.

कलम २१ वें ( अबाधित करारमदार ) पंचामार्फत निकाल करून घेण्याविषयींचा ठराव आणि शांततारक्षणासाठीं अस्तित्वांत आलेलें ' मनरो डॉक्ट्रीनें ' सारखे कर्तव्यक्षेत्रविषयक ठराव, यासारखे अंतरराष्ट्रीय करारमदार अबाधित चालतील असें सदस्यराष्ट्रें ठरवीत आहेत.

कलम २२ वें ( असमर्थांचें पालकत्व ) गेल्या महायुद्धानें ज्या वसाहती व जे प्रदेश युद्धपूर्व सत्ताधीशांच्या सत्तेखालून निघाले आहेत, परंतु तेथील रहिवासी आपल्या पायावर उभे राहाण्यास आजच्या कठोर परिस्थितींत समर्थ नाहींत अशा ठिकाणची पुढील व्यवस्था लावतांना हें तत्त्व अमलांत यावें—' या लोकांची उन्नति होऊन त्यांची स्थिति कशी सुधारेल याची विवंचना व खटपट करणें हें सुधारलेल्या जगाचें पवित्र कर्तव्य असून त्याच्या योग्य बजावणीची हमी संघाच्या कररनाम्यांत अंतर्भूत केली जाते. सदरील तत्त्व व्यवहारांत उतरवण्याचा उत्तम प्रकार असा—साधनसंपत्ति, अनुभव व प्रादेशिक दूर निकट भाव या सर्व दृष्टींनीं जें पुढारलेलें राष्ट्र विवक्षित मुलखाचें पालकत्व पत्करण्यास सर्वांत अधिक लायक असून ही जबाबदारी शिरावर घेण्यास तयार असेल त्या राष्ट्रावर हें पालकत्व सोपविलें जावें आणि संघासाठीं म्हणून हें काम त्यानें करावें.

पाल्य लोक ज्या दर्ज्याच्या संस्कृतिचे असतील, त्यांच्या प्रदेशांची परिस्थिति व आर्थिक स्थिति असेल त्याप्रमाणें भेदानुरूप पालकत्वाचें आज्ञापत्र भिन्न प्रदेशांत भिन्न प्रकारचें असणें जरूर आहे.

तुर्की साम्राज्यांत असलेल्या कांहीं लोकसमाजांची विकास—अवस्था अशा प्रकारची आहे कीं, त्यांचें स्वतंत्र राष्ट्रत्व आजच कांहीं शर्तींवर मान्य करतां येईल. या शर्ती म्हणजे स्वतःचे पायांवर उभे राहण्यास समर्थ होईपर्यंत एका संघनियुक्त पालकराष्ट्राचा राज्यकारभारासाठीं सल्ला व साहाय्य त्यांनीं घेत जावें. हा राष्ट्रपालक निवडतांना त्या त्या समाजाच्या इच्छेलाच प्राधान्य दिलें पाहिजे

कांहीं लोकसमाज, विशेषतः मध्य आफ्रिकेंतील लोक, अशा अवस्थेंत आहेत कीं, त्यांच्या प्रदेशाचें संघनियंत्रित पालकत्व जें राष्ट्र पत्करील त्याचेवर खालील शर्तींनुसार तेथील राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी असली पाहिजे व ती पार पाडण्याबद्दल योग्य खातरजमा त्यानें दिली पाहिजे ( १ ) या प्रदेशांत धर्मविचारस्वातंत्र्य अथवा उपासनास्वातंत्र्य असावें व त्यांना निर्बंध घालावयाचे ते सुव्यवस्थेचा व सुनीतीचा भंग न होईल इतक्या पुरतेच घालावे.( २ ) गुलामाचा

मांचा, हत्यारांचा व मादक पेयांचा व्यापार इत्यादि गैर व्यवहारांना बंदी असावी. ( ३ ) गड-किल्ले बांधणें, लष्करी अथवा आरमारी ठाणीं तयार करणें, पोलिस काम व देश संरक्षणाचें काम याखेरीज इतर कामासाठीं तद्देशीयांना लष्करी शिक्षण देणें या गोष्टी न होतील अशी व्यवस्था ठेवावी. ( ४ ) बंधु-सदस्यांस या प्रदेशांत उद्यम व्यापारासंबंधींच्या सवडी व सवलती अगदीं सर्वांस सारख्या असाव्या.

असेही प्रदेश आहेत कीं, ज्यांत लोकवस्ती अगदीं विरळ, क्षेत्रफळ लहान व सुधारलेल्या ठिकाणापासून दूर आहेत अशा वर्गांत नैर्ऋत्य आफ्रिका व दक्षिण पासिफिक द्वीपसमूहांपैकीं कांहीं द्वीपें येतात. असे प्रदेश संघनियुक्त पालक राष्ट्रांच्या मुलखाला जर अगदीं लागून असतील तर राज्यकारभाराचे सोईसाठीं पालक राष्ट्राच्या मुलखांचे हे प्रदेश अवयवीभूत भाग समजले जाऊन तेथें त्या राष्ट्राचे कायदे चालावे आणि या कायद्यांच्या बाबतींत वर वर्णिलेले निर्बंध तद्देशीयांच्या हितासाठीं पाळले जावे.

संघाच्य आज्ञापत्रानें देशपालकत्व ज्यांच्याकडे आलें असेल, त्यानें आपल्या ताब्यांत दिलेल्या देशाच्या कारभारासंबंधीं वगैरे वार्षिक अहवाल कारभारी मंडळास सादर केला पाहिजे.

विवाक्षित प्रतिपालित देशांत संघनियुक्त पालक राष्ट्रानें जो कारभार करावयाचा व जी सत्ता हुकमत चालवावयाची,त्या कारभाराच्या व हुकूमतीच्या मर्यादा संघसदस्याचे संमतीनें अगोदरच्या ठरलेल्या नसतील तर करभारीमंडळानें या मर्यादा ठरविल्या पाहिजेत व त्या अगदीं स्पष्ट व निःसंदेह अशा ठरविल्या पाहिजेत.

संघनियुक्त पालक राष्ट्रांचें प्रतिपालित देशासंबंधीं वार्षिक अहवाल त्या त्या राष्ट्रांकडून मागवून ते तपासणें व या राष्ट्रांना दिलेल्या आज्ञापत्रांचें पालन त्यांजकडून कसें होत आहे व कसें व्हावें यासंबंधांत कारभारीमंडळाला सल्ला देणें या दोन कामासाठीं एक कायमचें अहवाल तपासणी मंडळ नेमलें जाईल.

कलम २३ वें ( सामाजिक कार्यक्रम ) अस्तित्वांत असलेलीं आणि पुढें होतील तीं राष्ट्रांराष्ट्रांतील करारपत्रकें जमेस धरून व त्यांना प्रमाण मानून सदस्य-राष्ट्रें खालील गोष्टी करण्याचें मान्य करतात.

( अ ) स्वतःच्या देशांत व ज्यांच्याशीं आपला उद्यम व्यापाराचा संबंध आहे, अशा देशांत मोलमजूरी करणारे स्त्रीपुरुष व मुलें यांजकडून काम घेण्याच्या पद्धतींत व परिस्थितींत सचोटी व दयार्द्रता यांचा शिरकाव करून ही सुधारलेली स्थिति टिकाऊ करण्याचा प्रयत्न करणें व यासाठीं अवश्य ते सार्वराष्ट्रीय समाज काढून ते चालविणें.

( ब ) आपल्या ताब्यांतील देशांत असलेल्या तद्देशीयांना न्यायानें वागविलें जाईल अशी व्यवस्था करणें.

( क ) स्त्रिया व मुलें यांची खरेदीविक्री आणि अफूचा व दुसऱ्या घातुक मादकांच्या व्यापार यासंबंधीं करारनाम्याची अंमलबजावणी नीट होत आहे किंवा नाहीं हें पाहण्याचें सर्व साधारण देखरेखीचें काम राष्ट्रसंघावर सोंपविणें.

( ड ) संघसदस्यांचें सर्वसामान्य हितसंबंध संरक्षित व्हावे, यासाठीं ज्या देशांतील हत्यारें व दारूगोळा यांच्या व्यापारावर निर्बंध असणें अवश्य आहे त्या देशाशीं असणाऱ्या सदर व्यापारावर सर्व साधारण देखरेख करण्याचें काम संघावर सोंपविणें.

( ई ) सर्व संघसदस्यांना व्यापाराचे बाबतींत सारख्या न्यायानें वागविणें, सर्वांना दळणावळणाचीं व नेआण करण्याचीं साधनें अनिर्बंधपणें वापरावयास मिळतील अशी व्यवस्था करून ती चालविणें, यासंबंधांत १९१४–१९१८ चे युद्धांत जो प्रदेश उध्वस्त झालेला आहे त्यांत सदरील प्रकारच्या सोई करण्याची विशेष आवश्यकता आहे या गोष्टीकडे लक्ष दिलें जाईल.

( फ ) अनेक राष्ट्रांचें ज्या रोगादिकांनीं नुकसान होण्याचा संभव आहे असे रोग न होण्याचे व उद्भवल्यास त्यांच्या प्रतिकाराचे व निर्मूलनाचे उपाय योजण्याचा यत्न करणें.

कलम २४ वें ( आंतरराष्ट्रीय कार्यमंडळें ) निरनिराळ्या राष्ट्रांनीं सर्वसामान्य तहनाम्यान्वयें ज्या राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहारकचेऱ्या निर्माण केल्या आहेत अशा त्या त्या तहनाम्यावाल्यांची संमति असेल तर राष्ट्रसंघाच्या हाताखालीं दिल्या जातील. तसेंच यापुढें अशीं अनेकराष्ट्रसंबद्ध बाबींची सुव्यवस्था लावण्यासाठीं तात्पुरतीं व्यवस्थामंडळें जीं निर्माण केलीं जातील तीं राष्ट्रसंघाच्या नियंत्रणाखालीं आपलें कार्य करतील.

सदर प्रकारच्या अनेक राष्ट्रव्यवहार-नियामक-कार्यालयांच्या अथवा तात्पुरत्या व्यवस्थामंडळाच्या हातीं न दिलेल्या परंतु सर्वसामान्य करारपत्रांनीं निर्बंधित झालेल्या अशा ज्या बहुराष्ट्रीय हितसंबंधाच्या बाबी आहेत, त्यांचे बाबतींत कारभारी मंडळाची तशी संमति असून करारपत्रवाल्या पक्षांची तशी इच्छा असल्यास संघाची चिटनवीसकचेरी त्या त्या बाबींसंबंधीं सर्व प्रकारची उपयुक्त माहिती गोळा करून तिचा प्रसार करण्याचें काम करील आणि दुसरीही जरूर ती व योग्य ती कोणतीही मदत लागेल त्या पक्षास देईल.

संघाच्या नियंत्रणाखालीं जे अनेकराष्ट्र-व्यवहार-नियामक कार्यालय अथवा तात्पुरतें व्यवस्थामंडळ दिलें जाईल त्याचा खर्च चिटनवीस कचेरीच्या खर्चातच धरून घेण्याचा अधिकार कारभारी मंडळाला आहे.

कलम २५ वें ( शुश्रूषासंघास उत्तेजन ) जगतांत सर्वत्र आरोग्यसंवर्धन व्हावें, रोगांचा प्रादुर्भाव टळावा व दुःखाचें साम्राज्य आकुंचित व्हावें, या हेतूंनीं प्रेरित होऊन खटपट करणारे स्वयंसेवकाचें समुचित अधिकारपत्र मिळविलेले ‘ रेडक्रॉस ’ सारखे ‘ राष्ट्रीय शुश्रूषासंघ ’ संस्थापित होऊन त्यांनीं सहकार्यानें काम

करावें, या गोष्टीस हरतऱ्हेचें उत्तेजन व साहाय्य देण्याचें सदस्यराष्ट्रें मान्य करीत आहेत.

कलम २६ वें. ( करारनाम्यांत सुधारणा ) प्रस्तुत करारनाम्याला पुरती जोडतांना त्याचा मजकूर संघसभेनें तीन चतुर्थांश मताधिक्यानें, कारभारी मंडळाच्या सभासदांपैकीं हजर असतील त्या सर्व प्रतिनिधींचीं मतें जमेस धरून पास केल्यानंतर आणि कारभारी मंडळावर मतें घेतलीं त्यावेळीं प्रतिनिधी धाडणाऱ्या सदस्य राष्ट्रांपैकीं सर्वांनीं व संघसभेंत ज्यांचे प्रतिनिधी बसतात, अशापैकीं बहुमत होईल इतक्या सदस्यराष्ट्रांनीं मान्यता दिल्यावर ती पुरती अगर सुधारणा कायम होईल.

संघसभेच्या मतानंतर बावीस महिन्यांचे आंत जरूर तितक्या संख्येकडून मान्यता मिळाली नाहीं, तर ती सुचविलेली सुधारणा अमलांत येणार नाहीं.

सुधारणा अमलांत आल्याची वर्दी सर्व सदस्यराष्ट्रांना सर चिटनवीस देतील. त्यावेळीं ज्या राष्ट्रांनीं मान्यता दिली नसेल त्यांना तसें एक वर्षाच्या अवधींत जाहीर करण्याची मोकळीक आहे. परंतु तसें झालें असतां तें राष्ट्रसंघाचे सदस्य राहात नाहीं.

[ करारनाम्याचें वरील मराठी भाषांतर ‘ ज्ञानकोश ’ प्रस्तावनाखंड भाग १ यांतून बहुतेक जागाचें तसेंच घेतलें आहे. परंतु कलमें ४, ६, १२, १३, १५, १६ आणि २६ यांत वेळोंवेळीं झालेल्या दुरुस्त्यांप्रमाणें तीं नवीन सुधारून घातलीं आहेत. ]

राष्ट्रसंघांत सामील झालेलीं राष्ट्रें पुढें अकारविल्हेवारीनें दिलीं आहेत.

अर्जेंटिना, ॲल्बेनिया, ऑस्ट्रिया, ऑस्ट्रेलिया, इटाली, इस्थोनिया, कानडा कोलंबिया, कोस्टारिका, क्यूबा, ग्रीस, ग्वातिमाला, चाईल, चीन, जपान, जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, डेन्मार्क, डोमिनिकल रिपब्लिक, सॅन डोमिंगो, तुर्कस्तान, निकाराग्वे, नेदरलंड ( हालंड ), नॉर्वे, न्यूझीलंड, पनामा, पराग्वे, पर्शिया, ( इराण ), पेरू, पोर्तुगाल, पोलंड, फिनलंड, फ्रान्स, बलगेरिया, बेलजम, बोलिव्हिया, ब्राझिल, ब्रिटिश एंपायर, ( यांत कानडा, हिंदुस्थान, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व साौथ आफ्रिका यांची जमा आहे. ) युराग्वे, रोमानिया, लाटिविया लायबेरिया, लिथुयानिया, लक्सेंबर्ग, व्हेनिझुएला, सर्व-क्रोट-स्लोव्हनस्टेट, साल्वाडोर, सियाम, साौथ आफ्रिका, स्पेन, स्वीडन, स्विझरलंड, हयाटी, हंगेरी, हांड्युरास अबीसिनिया, आयरिश फ्री स्टेट.

सुमारें १५० कोटींहून जास्त लोकसंख्या राष्ट्रसंघांत सामील झाली आहे.

3049